स. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. 7328

# शिक्षणाची मूलतत्त्वे



REFBK-0011492

ग. म. पराठे

# शिक्षणाचीं मूलतत्त्वें

अनुक्रम
नों. दि.

लेखक

रा. म. मराठे

एम्. ए., एल्एल्. बी., एम्. एड्.

प्राचार्य, कॉलेज ऑफ एज्युकेशन, धुळें

दा. क्र.
११४९२

स्कूल ॲण्ड कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर

किंमत तीन रुपये

प्रकाशक
**दा. ना. मोघे, बी.ए.**
स्कूल अँण्ड कॉलेज बुकस्टॉल
कोल्हापूर

★

सर्व हक्क स्वाधीन
प्रथमावृत्ति : फेब्रुअरी १९६२

★

मुद्रक
**चिं. पां. मोडक**
समन्वय मुद्रणालय,
१९६/६९ सदाशिव पेठ,
पुणें २.

# प्र स्ता व ना

" Principles of Education " या माझ्या इंग्रजी पुस्तकाचा हा मराठी अनुवाद करण्याची प्रेरणा मला विद्यार्थ्यांकडून मिळाली. पुणें विद्यापीठानें बी. ईडी.च्या परीक्षेंत मराठींत उत्तरें लिहिण्याची मुभा दिल्यापासून मराठींतून अध्ययन करण्याची प्रवृत्ति बळावत आहे. सदर परिक्षेंतील दुसऱ्या प्रश्नपत्रिकेच्या पहिल्या विभागाचें शीर्षक " शिक्षणाचीं मूलतत्त्वें " हें आहे. या शीर्षकाखालीं विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत दिलेल्या सर्व सदरांचें विवेचन करणारें पुस्तक मराठींत नाहीं. ही उणीव भरून काढण्यासाठीं इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद करण्याचा आग्रह कांहीं विद्यार्थीमित्रांनीं धरला. प्रस्तुत अनुवाद हें त्या आग्रहाचें फळ आहे. या पुस्तकानें विद्यार्थ्यांची गरज भागली तर मला आनंद होईल.

कोणत्या इंग्रजी शब्दाबद्दल कोणता मराठी शब्द योजला आहे याविषयीं वाचकांस संदेह राहूं नये म्हणून शेवटीं पारिभाषिक शब्दांची यादी प्रकरणवार दिली आहे. मराठी शब्दांची निवड करतांना ' शैक्षणिक मानसशास्त्र ' या माझ्या पुस्तकांत योजिलेले शब्दच पसंत मी केले आहेत व अशा रीतीनें सुसंगति राखण्याचा यत्न केला आहे.

पुस्तकाच्या उपयुक्ततेंत भर पाडणाऱ्या सूचना वाचकांनीं केल्यास मी त्यांचा ऋणी होईन.

धुळें
१४–२–१९६२

— रा. म. मराठे

REFBK-0011492

# अ नु क्र म


१. शिक्षण शब्दाचा अर्थ . . १
२. शिक्षणाचें तत्त्वज्ञान ७
३. शिक्षणाचें शास्त्र आहे का ? २३
४. मानसशास्त्र, समाजशास्त्र व जीवशास्त्र यांचें ऋण २७
५. व्यक्ति कीं समाज ३९
६. व्यक्तिमत्त्वाचा विकास ४४
७. शीलसंवर्धन ५१
८. संस्कृतिसंवर्धन ५९
९. समायोजनपटुता ६३
१०. प्राचीन भारतीय शिक्षणाचीं उद्दिष्टें व ध्येयें ६८
११. शिक्षणाचीं केंद्रें ७३
१२. राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीयता यांचें शिक्षणांतील स्थान ८१
१३. फुरसदीसाठीं शिक्षण ९१
१४. व्यवसायासाठीं शिक्षण १००
१५. नागरिकत्वाचें शिक्षण १०८
१६. सांस्कृतिक शिक्षण ११७
१७. शिक्षणाचें गृहितकृत्य–विद्यार्थी १२२
१८. शिक्षक १२५
१९. अभ्यासक्रम ठरविण्याचीं मूलतत्त्वें १३४
कांहीं पारिभाषिक शब्द १४३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ११८८३
ग्रंथ संग्रहालय, ठाणे
नों. दि.

१

# शिक्षण शब्दाचा अर्थ

शिक्षण हा शब्द जरी सर्वांच्या तोंडी असला तरी त्याचा निश्चित अर्थ ठरविणें सोपे नाहीं. कारण शिक्षण म्हणजे काय या विषयीं लोकांमध्यें अनेक भिन्न समजुती आढळतात. बऱ्याच लोकांना असें वाटतें कीं शिक्षण म्हणजे ज्ञानग्रहण. विशेषतः पुस्तकांतून मिळणारें ज्ञान मिळविणें म्हणजे शिक्षण. अर्थात ज्यानें पुष्कळ पुस्तकें वाचलीं आहेत तोच माणूस सुशिक्षित असा समज रूढ आहे. इतरांच्या मतें शिक्षणाचें गमक म्हणजे भाषणांत व वागणुकींत दिसून येणारी दिखाऊ जिल्हई होय. ज्यांनीं शाळा, महाविद्यालयें इत्यादि शिक्षणसंस्थांतून बरींच वर्षे काढलीं आहेत अशा माणसांच्या ठिकाणीं ही जिल्हई दिसून येते. कांहीं थोडया लोकांना असें वाटतें कीं स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ति हेंच शिक्षणाचें अचूक लक्षण होय. याहूनहि अल्पतर विचारवंतांच्या मतें शिक्षणाचा खरा पुरावा अध्यात्मिक परिणतींत दिसून येतो. सामान्य जनतेत आढळून येणाऱ्या स्वार्थी दृष्टीपलीकडे जो गेला आहे, व विश्वोन्नति व आत्मोन्नति यांमधील अभेद ज्यास पटला आहे त्यालाच खरोखर सुशिक्षित म्हणावें.

या संभ्रमातून पार होण्यासाठीं जीवशास्त्राकडे वळावें हे श्रेयस्कर होय. कारण शिक्षण हें जीवनासाठीं असल्यामुळें त्याच्या कार्याविषयीं योग्य दिग्दर्शन जीवशास्त्राकडून मिळण्याचा संभव अधिक. जसे इतर प्राणी त्याप्रमाणें माणूसहि वाढणारा व विकसणार जीव होय. मानवी जीवनांत आपणांला शारीरिक वाढ व मानसिक विकास आढळून येतात. शारीरिक वाढीला अन्नग्रहण आवश्यक असतें, व मानसिक विकास सामाजिक संबंधा-

वाचून होत नाहीं. आंतरिक प्रेरणेमुळें मानवी जीव आपल्या परिसरांत वाढीला आवश्यक असणाऱ्या अन्नाची व विकासाला लागणाऱ्या सामाजिक संबंधांची प्राप्ति करून घेण्यासाठीं धडपडत असतो. अशा रीतीनें जीव-शास्त्रांकडून मिळणारा पहिला मौलिक विचार हा आहे कीं शिक्षण घेणारे बालक हे वर्धमान जीव असतात. कोणत्याहि कारखान्यांत आढळणाऱ्या कच्च्या मालाप्रमाणें निर्विकार व निर्हेतुक नसतात.

जीव हा स्वायत्त असतो. जीवनविषयक गरजांची जाणीव त्याला अंतरांतून होते, आणि त्याचे जीवन म्हणजे त्या गरजा भागविण्याच्या प्रयत्नांचा इतिहासच होय. स्वतःला प्रतीत होणाऱ्या गरजा भागवून जीवन पूर्ण करण्याची जीवाची धडपड जन्मापासून मरणापर्यंत अखंड चालू असते. ज्या प्रक्रियेच्या द्वारां गरजा भागविल्या जातात तिला समायोजन ही संज्ञा देतां येईल. आपला परिसर आपल्या वाढीला व विकासाला सहाय्यभूत होईल असें वळण त्यास देणें म्हणजे समायोजन होय. समायोजनाचीं प्रक्रिया जड नसून चेतन असते. स्वतःच्या गरजांना मुरड घालणें, व परिसराला स्वानुकूल वळण देणें या दोन्ही घटनांचा तींत समावेश होतो. परिसरावर प्रभुत्व मिळविण्यासाठीं मानवी जीव आमरण झटत असतो. जग सुधारण्यासाठीं चालणाऱ्या त्याच्या प्रयत्नांत कधी खंड पडत नाहीं. शिक्षण म्हणजे समायोजनाच्या प्रक्रियेविषयीं बालकांना मार्गदर्शन करण्यासाठीं समाजानें केलेली योजना होय. बालकांचें समायोजन शक्य तितकें सुलभ व कार्यक्षम व्हावें, व अशा रीतीनें त्यांची वाढ व विकास दोन्ही अनायास व निकोप व्हावीत असा समाजाचा हेतु असतो.

असें मार्गदर्शन अत्यावश्यक असतें. कारण जन्मतः बालक अजाण व असहाय असतो; शिवाय त्याच्या प्रेरणा इतर प्राण्यांच्या प्रेरणांपेक्षां अधिक संस्कारक्षम असतात; व म्हणून त्या प्रेरणांना इष्ट वळण देणें शक्य असतें. तथापि समायोजनाचा उगम अन्तःप्रेरणांतून होत असतो, त्याचें ध्येय आंतरिक गरजा भागवण्याचें असतें, समायोजन हे आंतरिक गरजामुळें व त्या गरजा भागविण्यासाठीं होतें, केवळ बाह्य निर्देशामुळें किंवा दडपणामुळें होऊं शकत नाहीं. सारांश, बालक हा कुंभाराच्या हातांतील मातीच्या मऊ गोळ्याप्रमाणें नसतो. कुंभार मातीच्या गोळ्याला वाटेल तसा आकार देतो;

गोळा हूं कीं चूं करीत नाहीं. बालकाला अन्तःप्रेरणा असते, अस्मिता असते. शिक्षक बालकाला स्वेच्छेनें वाटेल तसा घडवूं शकत नाहीं. त्याला बालकाच्या अस्मितेची दखल घ्यावी लागते. शिक्षण म्हणजे कुंभ घडविण्यासारखी कळ-सूत्री प्रक्रिया नव्हे.

हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं व्यक्तीची इच्छा असो वा नसो, तीस इतरांकडून मदत मिळो वा अडथळा होवो, समायोजन होतच असतें. जोपर्यंत आपण जिवंत असतों तोंपर्यंत प्रत्येक क्षणीं परिसरांतील सहेतुक वा निर्हेतुक प्रेरणांच्या प्रभावामुळें समायोजन चालूंच राहतें. कायदा, शासनसंस्था, सामाजिक व्यवस्था, हवामान, निसर्ग, या सर्वांचा अप्रत्यक्ष प्रभाव व्यक्तिमात्राच्या जीवनावर पडत असतो. व्यक्तीच्या समायोजनाला प्रत्यक्ष शिक्षणप्रक्रियेमुळें व या अप्रत्यक्ष प्रेरणांमुळें वळण मिळतें. अप्रत्यक्ष प्रेरणांमुळें मिळणाऱ्या या समायोजनाच्या वळणालाही व्यापक अर्थानें शिक्षण ही संज्ञा देता येईल. हें व्यापक शिक्षण शिक्षणसंस्थांच्या बाहेर व त्यांच्या मदतीवाचून घडत असतें. शिक्षणसंस्थांमधून दिलें जाणारें शिक्षण सहेतुक असतें, उलट अप्रत्यक्ष प्रेरणांतून मिळणारें शिक्षण अहेतुक व अनायोजित असतें. संस्थानिष्ठ शिक्षणाला औपचारिक शिक्षण व संस्थाबाह्य शिक्ष-णाला अनौपचारिक शिक्षण अशा संज्ञा देण्याचा प्रघात आहे.

कधीं कधीं अनौपचारिक शिक्षणाचे परिणाम इतके चांगले दिसून येतात कीं कांहीं लोकांना औपचारिक शिक्षणापेक्षां अनौपचारिक शिक्षणच बरें असें वाटतें. राजकुमार दुलीप सिंहजी यांना क्रिकेट शिकविण्यासाठीं खास शिक्षक नेमलेले होते. म्हणजे त्यांनीं औपचारिक शिक्षणाच्या द्वारा आपलें कसब संपादन केलें. उलटपक्षीं पी. बाळू हे जिमखान्यामध्यें चेंडू उचलणारा सेवक म्हणून काम करीत असत, आणि सेवक म्हणून काम करीत असतांना अनौपचारिक रीत्या त्यांनीं क्रिकेटमधील प्राविण्य हस्तगत केलें. दुलीपसिंहजी अधिक चांगलें खेळाडू झाले कीं पी. बाळू हें ठरविणें कठिण आहे. म्हणजेच अनौपचारिक शिक्षण श्रेष्ठ कीं औपचारिक शिक्षण श्रेष्ठ हें या बाबतींत ठरविणें सोपें नाहीं. औपचारिक शिक्षणाच्या सहाय्या-वाचून केवळ स्वावलंबनानें जे लोक श्रेष्ठ पदाला चढतात ते नेहमी अशी प्रौढी मिरवितात कीं आम्हीं ‘बाजारपेठेच्या विद्यापीठां’त शिकून तयार

झालों. आणि अनुभव हाच उत्तम शिक्षक असें विधानही पुष्कळ लोक कर-व त्यांचा हेतु औपचारिक शिक्षणाची हीनता सूचित करण्याचा असतो.

अशा रीतीनें शिक्षणसंस्थांच्या बाहेर शिक्षणाची प्रक्रिया चालू असते. शिवाय औपचारिक शिक्षण संपलें तरी व्यक्तीच्या शिक्षणांत खंड पडत नाहीं. कारण आपणाला पदोपदीं नवे अनुभव येत असतात. आणि अनुभवानें शहाणे होऊन आपण वर्तनांत बदल करतो म्हणूनच सर जॉन अ‍ॅडॅम्सन यांनीं म्हटलें कीं शिक्षण ही आमरण चालणारी प्रक्रिया आहे. आणि त्यांनीं असा उपदेश केला आहे कीं आपली नेहमीं प्रगति होईल, परागति होणार नाहीं अशी दक्षता आपण घेतली पाहिजे म्हणजेच जीवनाच्या अनुभूतींना आपण असें वळण दिलें पाहिजे कीं ज्या योगानें आपली पावलें नेहमी प्रगतिपथावरच पडत राहतील.

शिक्षणांचें जें हें अनौपचारिक स्वरूप सांगितलें त्याचें ज्ञान शिक्षण-शास्त्राच्या अभ्यासकांना हवें. पण त्यांचा घनिष्ठ संबंध औपचारिक शिक्षणाशीं असतो. औपचारिक शिक्षण म्हणजे प्रत्येक पिढीनें भावी पिढीवर केलेले संस्कार होत. समाजाचे भावी घटक सामाजिक जीवन कंठण्यास लायक व्हावेत या हेतूनें योजनापूर्वक व सहेतुकपणें प्रत्येक पिढी हे संस्कार करीत असते. औपचारिक शिक्षणाचा उगम संस्कृतीच्या वाढीमधून होतो. मानवी संस्कृतीचें स्वरूप व्यापक होत गेलें म्हणजे प्रौढांचे व्यवहार व बालकांच्या शक्ति यांच्यामधील अंतर वाढत जातें. समाजाच्या ज्ञानाचा ठेवा इतका मोठा होतो कीं केवळ व्यावहारिक अनुभवांतून बालकांत तो संक्रांत करणें प्रौढांना शक्य होत नाहीं. आणि हें महत्त्वाचें काम पार पाडण्यासाठीं विशिष्ट साधन निर्माण करण्याची गरज भासूं लागते.

बालकांचें समायोजन नीट व्हावें म्हणून समाजानें हेतुपूर्वक संस्कार घडविण्याची जी योजना केलेली आहे तिचे चार घटक आहेत. या चारांपैकीं सर्वांत महत्त्वाचा घटक बालक अथवा विद्यार्थी होय. समायोजनाच्या प्रक्रियेंतील जीवाच्या आंतरिक गरजांचें जें महत्त्व वर दिग्दर्शित केलें आहे तें ध्यानांत घेतां बालक हाच शिक्षणाचा केन्द्रबिंदु म्हटला पाहिजे. दुसरा घटक ज्या परिसरांत व ज्या परिसराच्या द्वारा बालकावर नियोजित संस्कार घडविले जातात तो परिसर होय. परिसरांत अभ्यासक्रमांतील

विषयांचा म्हणजेच ज्ञानाचा समावेश होतो. ज्ञान हें शिक्षणाचें सर्वमान्य साधन आहे. बालकावर संस्कार घडविणारे शिक्षणसंस्थेंत आढळणारे, उपकरणें, संस्थेचे संस्कारस्वास्थ्य इत्यादि जे विशेष त्यांचाही समावेश परिसरांत होतो. तिसरा घटक समाजाची नैतिक मूल्यें हा होय. शिक्षण देतांना विद्यार्थ्यांच्या वर्तनांत फरक घडवून आणण्याचा प्रयत्न होत असतो. पण फरक हा स्पृहणीय असूं शकेल अथवा निषेधार्हही असू शकेल. कोणते फरक इष्ट आहेत तें ठरविणारी तत्त्वप्रणाली शिक्षणकार्यांत अध्याहृत आहे. असें मार्गदर्शन करणारी मूल्यें निश्चित करण्याचें काम शैक्षणिक तत्त्वज्ञानाचें होय. शेवटचा घटक इच्छित फरक घडवून आणण्याचें कार्य ज्याच्यावर सोंपविलेलें असतें तो शिक्षक होय.

शिक्षण म्हणजे बालक, परिसर, मूल्यें व शिक्षक या चार विकारी घटकांचा समुच्चयात्मक परिणाम होय. या चारांपैकीं प्रत्येक घटकाचा इतर तिहींवर प्रभाव पडत असतो, व या प्रभावामुळें कित्येकदा अनिच्छित व अनाकलित परिणाम घडून येतात. म्हणजेच शिक्षण ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. तिचें स्वरूप जड नसून चेतन असतें. या स्वरूपांतच परिवर्तनाची व समायोजनाचीं बीजें अन्तर्भूत असतात.

कांहीं विचारवन्त शिक्षणाच्या द्विकेन्द्र स्वरूपावर विशेष भर देतात. हीं दोन केन्द्रें म्हणजे बालक व शिक्षक हे होत. शिक्षणाकडे पाहण्याच्या या वृत्तींत परिसरांतील प्राकृत्रिक घटकांकडे दुर्लक्ष करून मानवी घटकांवर लक्ष केन्द्रित केलेलें असतें. प्राकृतिक घटक हे विकारक्षम असले तरी त्यांत होणारें परिवर्तन शास्त्रीय नियमाना अनुसरून होत असतें. पण दोन मानवी व्यक्तींचे परस्परांवर होणारे परिणाम अतर्क्य असतात. शिवाय हल्लींच्या बहुजनस्पर्शी शिक्षणप्रक्रियेंत अनेक व्यक्तींच्या परस्परांवर होणाऱ्या परिणामांचा समावेश होतो; व हे परिणाम अर्थातच तर्काच्या आवाक्याबाहेर असतात.

बालकांत फरक घडवून आणण्याचें उद्दिष्ट, शिक्षणखात्यांतील गृहीत कृत्य होय. या फरकाच्या स्वरुपाचें विशेष विवेचन आतांच न करतां बालकाच्या प्रतिक्रियांत बदल घडवून आणावयाचा असतो असें म्हटलें तरी पुरे. वर म्हटल्याप्रमाणें शिक्षणाचा हेतु बालकांचें समायोजन सुकर करण्याचा असतो.

समायोजन म्हणजे कमीं कार्यक्षम प्रतिक्रिया दूर करून अधिक कार्यक्षम प्रतिक्रिया आत्मसात करणें होय. प्रतिक्षणीं परिसरांतील अनेक चेतक आपणांस चेतवीत असतात, आणि त्यांच्या अनुरोधानें उपजत ज्ञानानें अवगत झालेल्या प्रतिक्रिया आपण करतों. उपजत प्रतिक्रियांत बदल घडवून आणण्यासाठीं शिक्षणाची योजना करतात. व्यक्तीच्या उन्नतीचें मापन करतांना उपजत प्रतिक्रियांत किती व कशा स्वरूपाचा फरक पडला आहे याचा आढावा घ्यावा लागतो. कामवासनेचें रुपांतर प्रीतींत आणि कुतूहलाचे रूपांतर संशोधक वृत्तींत करणें म्हणजेच शिक्षणानें प्रतिक्रियांचें प्रगमनशील परिवर्तन घडवून आणणें होय.

शिक्षण हें सहेतुक असतें. साधावयाचें उद्दिष्ट निश्चित नसलें तरी संदिग्धपणें शिक्षकांच्या डोळ्यासमोर असतें. शिक्षणाची योजना समाज कांही विशिष्ट हेतूंनी करीत असतो, आणि शिक्षणखात्याची रचना ते हेतू साध्य व्हावे अशा स्वरूपाची असते. समाजाच्या नियोजित शिक्षणांत अन्तर्भूत असलेला हेतु हाच औपचारिक शिक्षण व अनौपचारिक शिक्षण यांतील महत्त्वाचा फरक होय.

शिक्षणाच्या प्रक्रियेंत साधनाचा उपयोग अपरिहार्य असतो. शिक्षणाचे हेतु साध्य व्हावे म्हणून परिसरांचें नियंत्रण करावें लागतें. जे बहुविध चेतक आपणांस चेतवितात तें सर्व सारखेच उपयुक्त नसतात. शिक्षण देतांना अनिष्ट चेतक टाळून इष्ट चेतक पुरविले जातात. जीवनांतील समस्यांना तोंड देण्याची शक्ती ज्या योगें प्राप्त होईल अशा तऱ्हेचे निवडक अनुभव बालकाला पुरविणें हें शिक्षकाचें काम असतें.

'परिसराचें नियंत्रण करून तरुण पिढीच्या विकासाला इष्ट वळण देण्याची सहेतुक प्रक्रिया' अशी शिक्षणाची व्याख्या करावयास हरकत नाहीं. बालकाला समाजांतील आपली भावी जबाबदारी योग्य रीतीनें पार पाडतां यावी म्हणून त्याच्या नैसर्गिक विकास पद्धतींत फरक घडवून आणण्याची आवश्यकता या व्याख्येत अन्तर्भुत आहे.

****

# २ :

## शिक्षणाचें तत्त्वज्ञान

****************************

### तत्त्वज्ञान आणि शिक्षण

तत्त्वज्ञान या शब्दाचे दोन भिन्न अर्थ आहेत. त्यांपैकीं एक अर्थ व्यापक असून दुसरा संकुचित आहे. ज्ञानाची एक शाखा सर्व विश्वाचा साकल्यानें विचार करून त्यांत प्रतीत होणारी तर्कशुद्ध योजना शोधून काढण्याचा प्रयत्न करते. या ज्ञानशाखेला 'तत्त्वज्ञान' ही संज्ञा देतात. येथें तत्त्वज्ञान या शब्दाचा व्यापक अर्थ अभिप्रेत आहे. सर्व संचित ज्ञानाचा आढावा घेऊन ही शाखा पुढील प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करते. सत्तत्वाचें स्वरूप काय आहे ? मानवाचें स्वरूप काय आहे ? निश्चित केलेलें सत्तत्वाचें व मानवाचें स्वरूप ध्यानांत घेतां मानवी जीवनाचा आदर्श काय आहे ? तें आदर्श जीवन मानवास कसें कंठतां येईल ? या ज्ञानशाखेचा हेतु मानवी जीवनाचें मूल्यमापन करून त्यांत सुधारणा घडवून आणणें हा असतो. या अर्थी तत्त्वज्ञानाचा निर्देश 'अध्यात्मविद्या' या शब्दानें करणें योग्य ठरेल.

शिक्षण ही विधायक प्रक्रिया आहे. तिची सुरवात करण्यापूर्वी आपणांस पुढील प्रश्नांचीं उत्तरें देणें भाग पडतें. शिक्षणाचा हेतु कोणता—ऐहिक उत्कर्ष कीं पारलौकिक कल्याण ? ज्यास शिक्षण द्यावयाचें तो बालक केवळ जड-स्वरूप आहे कीं चिन्मय आहे ? तरुण पिढीला जीवनांतील जबाबदारी नीट उचलतां यावी म्हणून त्या पिढीचें समायोजन सुकर व संपूर्णपणें कार्यक्षम करणारी प्रक्रिया अशी आपण शिक्षणाची व्याख्या केली आहे. पण जीवन म्हणजे काय ? व्यक्तीची तद्विषयक जबाबदारी कोणती ? समायोजनाचें

उद्दिष्ट भौतिक लाभ हें असावें कीं अध्यात्मिक प्रगति हें असावें ? हे सर्व प्रश्न अध्यात्मविद्येच्या कक्षेंतील आहेत. त्यांचें कांहींतरी निश्चित उत्तर डोळ्यासमोर ठेवल्यावांचून शिक्षणकार्याचा आरंभच होऊं शकत नाहीं. शिक्षकाला सुबोधपणें या उत्तरांची जाणीव नसली तरी त्याची कार्यपद्धति त्या उत्तरांवर आधारलेली असते.

अशा रीतीनें अध्यात्मविद्या व शिक्षण यांचा अन्योन्य संबंध फार दृढ आहे. असेंही म्हणतात कीं अध्यात्मविद्या व शिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. अध्यात्मविद्येचें कार्य आदर्श जीवन कोणतें तें निश्चित करण्याचें असून शिक्षणाचें कार्य त्या आदर्श जीवनाची साधना करणें हे असतें. इतिहासावरून असें दिसून येतें कीं प्राचीन आणि अर्वाचीन अशा सर्व थोर तत्त्ववेत्त्यांनीं शिक्षणकार्याकडे सक्रिय अवधान दिलेलें आहे. उदाहरणार्थ प्लेटो व ॲरिस्टॉटल् हे प्राचीन तत्त्ववेत्ते व रसेल व व्हाइटहेड हे आधुनिक तत्त्ववेत्ते यांनीं शिक्षणाविषयीं पुष्कळच आपुलकी दाखविली आहे. किंबहुना असे होणें अपरिहार्यच आहे. कारण ज्याला आपला जीवन-विषयक आदर्श फार स्पृहणीय वाटतो, त्याला तो आदर्श इतरांस पटवून देण्याची तीव्र उत्कंठा असते. मतपरिवर्तनाचें हे प्रयत्न म्हणजे शिक्षणाचाच एक प्रकार होय. दुसऱ्यांचें धर्मांतर घडवून आणण्याचा खटाटोप हा सुद्धा शिक्षणाचाच प्रकार होय. कारण आपणांस पटलेला अध्यात्मविद्येचा दृष्टि-कोन इतरांच्या गळीं उतरविण्याचा हेतु त्या खटाटोपाच्या मुळाशीं असतो.

संकुचित अर्थानें तत्त्वज्ञान या शब्दावरून ‘कोणत्याहि मानवी कार्याचे स्वरूप ठरविणारी तत्त्वप्रणाली’ असा बोध होतो. अशा अर्थानेंच न्यायाचें तत्त्वज्ञान, वाङ्मयाचें तत्त्वज्ञान, कलेचें तत्त्वज्ञान इत्यादि शब्द-प्रयोग आपण करतों, या अर्थीं तत्त्वज्ञानाचें कार्य असें असतें. विशिष्ट मानवी कार्याचा साकल्यानें विचार करून त्याचें उद्दिष्ट ठरविणें, व तें उद्दिष्ट साध्य करण्यासाठीं उत्तम साधने कोणतीं व उत्तम पद्धती कोणत्या तें ठर-विणें हें कार्य अध्यात्मविद्येच्या साहाय्यावांचून होऊं शकत नाहीं. कारण कोणत्याहि मानवी कार्याचें उद्दिष्ट हें जीवनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असतें. शिल्पकलेसारखी उपयुक्त कला घेतली तरी तिचें स्वरूपहि शिल्प-कारांच्या अध्यात्मिक श्रद्धेस अनुसरून भिन्न झालेलें आढळून येतें.

म्हणून शिक्षणाच्या तत्त्वज्ञानासहि अध्यात्मविद्येचा मागोवा घ्यावाच लागतो. आणि अध्यात्मविद्येंत अनेक मतप्रणाली असल्यामुळें शिक्षणाच्या तत्त्वज्ञानांतहि तितकीच विविधता आढळून येते. अध्यात्मविद्येतील स्वतःचा दृष्टिकोन ठरला म्हणजे तदनुसार शिक्षणकार्याची दिशाहि निश्चित होते. शिक्षणशास्त्राच्या अभ्यासकांना अध्यात्मविद्येतील विविध मतप्रणालींचें ज्ञान आवश्यक आहे. म्हणूनच सारांशरूपानें त्यांचा परिचय करून देण्याचा प्रयत्न पुढील विवेचनांत केला आहे. हें विवेचन त्रुटित असलें तरी त्या त्या विचारप्रवाहांतील मर्म समजण्यास पुरेसें आहे.

## प्रकृतिवाद

या वादांत अनेक पोटभेदांचा समावेश होतो. त्यांपैकीं पहिला भौतिक वाद होय. याचा प्रणेता डेमोक्रिटस हा ग्रीक तत्त्ववेत्ता होय. याच्या मतें सर्व सृष्टि जडस्वरूप आहे. सृष्टवस्तूंचें पृथक्करण केले असतां त्या जड परमाणूंपासून घडविलेल्या दिसतात. मन ही एक जड वस्तू असून मानव म्हणजे एक यंत्र होय. अठराव्या व एकोणिसाव्या शतकांत भौतिकवाद फार लोकप्रिय होता. पण आतां त्या लोकप्रियतेस ओहोटी लागली आहे. कारण आधुनिक शास्त्रज्ञांच्या मतें जडवस्तु या सुद्धा वीज, शक्ति, वायु इत्यादि पृथक्करणांतील घटकांच्या संयोगानें बनलेल्या असतात. म्हणजे आधुनिक शास्त्राला जडवस्तूंत सुद्धां चैतन्य प्रतीत होऊं लागलें आहे.

दुसरा पोटभेद यथार्थवादाचा होय. याचा प्रणेता फ्रेंच तत्वज्ञ ऑगस्ट कॉम्टे होय. या मताप्रमाणें शास्त्रांचे सिद्धांत अन्तिम स्वरूपाचे असून तत्त्वज्ञानांवर बंधनकारक असतात. भौतिक व सामाजिक विश्वांत उत्सर्ग अन्तर्भूत असून या दोन्ही प्रकारच्या विश्वांचें नियमन या उत्सर्गानुसार होतें मानवी प्राण्याचें जीवन या विश्वांच्या कक्षेंत मोडणारें असल्यामुळें मानव हा वरील उत्सर्गाच्या हातांतील खेळणें होय.

भौतिक वाद व यथार्थवाद हे दोन्ही शिक्षणक्षेत्रांत अनुपकारक आहेत. कारण या दोन्ही वादांच्या मतें शिक्षणाचें कार्य प्रकृतीचे उत्सर्ग शोधून काढून तदनुसार वर्तन करण्यास शिकविण्याचें असतें. किंबहुना शिक्षणाचा हा खटाटोपही वन्ध्यच होय. कारण मानवाला प्रकृतीच्या नियमाविरूद्ध

वर्तन करणेच अशक्य असतें, म्हणजे त्या नियमांचा अनुसार हा अटळ असतो. सारांश, मानव हा स्वत:च्या भवितव्याचा विधाता नसून त्याचें जीवन म्हणजे पूर्वनियोजित घटनाशृंखलेतील एक अत्यल्प दुवा असतो. अत्यंत परंपरागत शिक्षणपद्धतिसुद्धां आपल्या कार्याचें मूल्य याहुन अधिक आहे असें मानते: विद्यार्थ्याच्या जीवनाला हितकर वळण देण्याची शक्यता त्या पद्धतींत गृहीत धरलेली असते.

तिसरा पोटभेद जीवशास्त्रीय प्रकृतीवादाचा होय. हा वाद चेतन जीव व जड वस्तु यांमधील भेदाचें महत्त्व मान्य करतो. या वादाच्या मतें मानव हा जडवस्तूचा एक प्रकार नाहीं, तो चेतन जीवजातीचा अत्युच्च नमुना होय. या नमुन्याचा संभव उत्क्रांतीच्या प्रक्रियेंतून झाला असून मानव हा त्या प्रक्रियेची अन्तिम निर्मिति होय. रूसो हा या वादाचा एक प्रसिद्ध प्रणेता आहे. त्याला असें वाटे कीं या अत्युच्च नमुन्याचा खरा प्रतिनिधि असंस्कृत मानव होय. मानवी स्वभावाची उपजत उदात्तता मानवनिर्मित संस्थांशीं संबंध आल्यानें कलुषित होते म्हणून असंस्कृत मानवाची सहजस्पुर्त विचारसरणी ही सुसंस्कृत मानवाच्या विमर्शजनित संकल्पांपेक्षां अधिक ग्राह्य होय. अशा रीतीनें प्रकृति विरूद्ध संस्कृति हा संघर्ष रूसोच्या प्रकृतिवादांत अभिप्रेत आहे.

या वादाच्या पुरस्कर्त्यांनीं जे विचार मांडले आहेत त्यांत शिक्षण-संस्थांत दिसून येणारे पांडित्याचें अवडंबर व इतर प्रस्थापित संस्थांत दिसून येणारा सामाजिक अन्याय यांवर जोराचे प्रघात केले आहेत. पुस्तकी विद्येविषयी दिसून येणारी आत्यंतिक आसक्ती त्यांना निषेधार्ह वाटतें. तसेंच व्यक्तीचें समाजांतील स्थान पूर्वनियोजित आहे ( म्हणजेच त्याच्या परंपरागत स्थानावर अवलंबून आहे ) असें मानून त्या स्थानास ती लायक व्हावी अशी खटपट करणें हा शिक्षणाचा हेतु आहे हा विचारही त्यांना आक्षेपार्ह वाटतो.

बालक जन्मताच पापदूषित असतो हें ख्रिस्ती मत या वादाला मान्य नाहीं. बालक जन्मत: सत्प्रवृत्त असतो, आणि त्याच्या उपजत स्वभावांत भावी अभ्युदयाची बीजें सुप्तावस्थेत असतात. म्हणून शिक्षणाचा हेतु व्यक्तीमात्रांतील सत्प्रवृत्ति जागृत करून त्यास आत्मविकासाचा मार्ग

नों. दि.……

मोकळा करून देणें हा असावा. उपजत ऋजु स्वभाविकास कलुषित करणें एवढाच मानवी संस्थांचा प्रभाव दिसून येतो. म्हणून शिक्षणाचें स्वरुप अकरणरुप असावें. शिक्षणाची उत्तम पद्धत म्हणजे बालकास आत्मविकास साधण्याचें पूर्ण स्वातंत्र्य देणें ही होय. शिक्षणाचें उद्दिष्ट सद्गुणांचें बीजारोपण करणें अथवा सत्याचें दिग्दर्शन करणें हें नसून दुर्गुणापासून अलिप्तता व असत्यापासून संरक्षण हें असावें. शिक्षणाच्या प्रक्रियेंत बालकाला शहाणपणानें कालाचा व्यय करण्याची संधी मिळावी. अनुमानतः या योजनेत शिक्षकाकडे गौणत्व येतें. शिक्षणाच्या नाटकांतील शिक्षकाची भूमिका नायकाची नसून सूत्रधाराची ठरते. त्यानें होतां होईतों पडद्यामागें रहावें, आणि बालकाच्या आत्मविनयनाच्या खटपटींत कमीत कमी लुडबूड करावी.

या विचारसरणीमुळें शिस्तीच्या कल्पनेंतही क्रांति झालेली दिसते. संस्कृतिदूषित व विमूढ प्रौढांनी प्रकृत्या निर्मल बालकावर सत् व असत् यांविषयींचे आपले निर्णय लादणें हें अक्षम्य पाप गणलें पाहिजे. म्हणून शिस्त ही शिक्षकांनी लावू नये, बालकांच्या स्वकर्मांच्या नैसर्गिक परिपाकांतून ती लागावी असें रुसोचें मत आहे. मुलाला अनुभवातूनच सत् काय व असत् काय, इष्ट काय व अनिष्ट काय याचें ज्ञान व्हावें. बोटें भाजलीं म्हणजे विस्तवाशीं खेळूं नये हा धडा तो शिकेल. लोकांनीं आपल्या बोलण्यावर विश्वास ठेवणें सोडून दिलें म्हणजे असत्यवचन वाईट हा बोध त्याला मिळेल.

प्रौढवयांतील जीवनाची तयारी बालकाच्या शिक्षणांतून व्हावी हें तत्त्वही या वादास असंमत आहे. बालक हे बालक असतात, लघ्वाकृति मानव नव्हेत. त्यांचें मन विकसनशील असतें, व विकासाच्या प्रक्रियेंत नवनवीन प्रवृत्ति व शक्ति यांचा आविर्भाव हळूहळू होत असतो. म्हणून शिक्षणाचें उद्दिष्ट बालकाच्या प्रस्तुत जीवनाशीं निगडित असावें. ज्या योगें आविर्भूत होणाऱ्या प्रवृत्तींना व शक्तींना विकासासाठीं योग्य वाव मिळेल व त्याची जोपासना होईल आणि बालकाचें आजचें जीवन सुखकर होईल अशा तऱ्हेचा कार्यक्रम शिक्षण प्रक्रियेंत अन्तर्भूत असावा.

या मताच्या अनुयायांचा आणखी एक आग्रह असा आहे कीं शिक्षणांत पुस्तकी ज्ञानावर भर नसावा; त्याऐवजीं प्रत्यक्ष वस्तूंशीं संबंध आणण्या

कृतींवर भर द्यावा. निसर्ग विज्ञान हा विषय वनांत व उपवनांतच मुलांनी शिकावा. गणितविषयाचें ज्ञान क्रयविक्रयाहि नित्य सामाजिक व्यवहाराच्या द्वारा व्हावें. शासनपद्धतीचें स्वरूप समजण्यासाठीं मुलांकडून ग्रामपंचायत, नगरपालिका इत्यादि स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कारभाराचें प्रत्यक्ष अवलोकन करून घ्यावें. इतिहासाच्या अध्ययनांत सुप्रसिद्ध ऐतिहासिक स्थळें व अवशेष पाहण्यासाठीं योजलेल्या सहलींचा अन्तर्भाव असावा. वर्तनाला वळण देण्याची कुवत जीवनांतील अनुभवांत जास्त असते, पुस्तकांतून मिळणाऱ्या आडगिऱ्हाइकी माहितींत ती फार कमी असते.

या शिवाय शालेय परिसरांत सामाजिक जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव मिळण्याची सोय असावी असाही या वादाचा दावा आहे. मुलामुलींच्या विभक्त शिक्षणापेक्षां सहशिक्षणच अधिक इष्ट, कारण समाजांत दिसून येणाऱ्या मुलामुलींच्या सहजीवनाची प्रतिकृति त्यांत उमटलेली असते. स्वयंशासनाचा अन्तर्भाव शिक्षणांत झाला पाहिजे. कारण समाजांत पदोपदीं लागणारे आत्मसंयम, योजकता, वस्तू व घटना यांचें व्यवस्थापन व नियंत्रण करण्याची शक्ती इत्यादि जे गुण ते अंगीं बाणण्यासाठीं स्वयंशासनावांचून अन्य साधनच नाहीं. आणि प्रौढवयांत नागरिकांनीं सामाजिक हितासाठीं सहकार्य करावें अशी जर आपली अपेक्षा असेल तर शिक्षणपद्धतीचें स्वरूप सहकाराचें असलें पाहिजे, चढाओढीचें असून चालणार नाहीं.

शिक्षणशास्त्राच्या तत्त्वप्रणालींत महत्त्वाची भर जीवशास्त्रीय प्रकृतिवादानें घातली आहे. या वादाच्या शिक्षणविषयक बहुतेक सूत्रांनुसार आचार आधुनिक पद्धतींत समाविष्ट झालेले दिसतात. शिक्षण बालककेंद्रित असावें या तत्त्वाचा आग्रही प्रचार करण्याचें श्रेय या वादालाच आहे. या तत्त्वांतूनच शिशुनिरीक्षण प्रथेचा उद्‌भव झाला. व शिशुनिरीक्षणाच्या कार्यातून मानसशास्त्रांतील व शिक्षणशास्त्रांतील अनेक सिद्धान्त प्रतीत झाले. रूसोच्या कांहीं विक्षिप्त मतांचा आतां जरी अव्हेर करण्यांत आला असला, तरी शिक्षणशास्त्राच्या प्रगतिपथावरील प्रकाशमान दीप त्याच्या शिक्षण विषयक कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख असाच सतत होत राहील.

**अध्यात्मवाद**

अन्तिम सत्य चित्स्वरूप आहे हें अध्यात्मवादाचें आधारसूत्र आहे. कांहीं अध्यात्मवादी परमेश्वर देहधारी आहे असें मानतात, तर दुसरे चराचरांत व्यापून राहिलेल्या परब्रह्मावर श्रद्धा ठेवतात. कांहींच्या मतें इंद्रिय गोचर विश्व सत्य आहे तर कांहींच्या मतें तें अभासमय आहे. अध्यात्मवाद्यांच्या मतामतांत जरी असे फरक दिसून आले तरी एका बाबतींत त्या सर्वांचें एकमत आहे. विश्वाची उपपत्ति भौतिक शास्त्रांतील नियमांच्या आधारावर लावणें व विश्वाला यन्त्रस्वरूप मानणें चूक आहे; भौतिक शास्त्राहून वरचढ अशी शक्ति विश्वाचें नियोजन व नियंत्रण करते.

अनुमानतः विश्व हें विमर्शप्रेरित असून, विवेकग्राह्य ध्येयाकडे त्याची वाटचाल सतत होत आहे. सजीव व निर्जीव अशा सर्व समूर्त सृष्ट पदार्थांचा हेतु अनंत चित्स्वस्वरूपाची अभिव्यक्ति करण्याचा असतो. ही एकमेव प्रेरणा सर्व सृजनक्रियेंत अनुस्यूत आहे. विश्वांतील प्रत्येक उलाढाल व घटना योजनाबद्ध असते. सुकलेल्या पानांचें पतन हेंही ईश्वरप्रेरित असतें.

सत्य, शिव व सौन्दर्य हे चित्स्वरूपाचे गुण आहेत. म्हणून हीं मूल्यें अन्तिम व वादातीत आहेत. तीं त्रिकालाबाधित असून मानवी जीवनांतील सुखदु:खांनीं अथवा यशापशांनीं तीं विचलित होऊं शकत नाहींत.

सृष्टींतील मानवाचें स्थान विशिष्ट व इतर प्राण्यांच्या स्थानाहून श्रेष्ठतर आहे. कारण त्याचा आत्मा अन्तिम सत्याप्रमाणें चित्स्वरूप असतो. म्हणून मानवी आत्मा हा सनातन चैतन्य आणि अशाश्वत सृष्टि यांना सांधणारा दुवाच होय. उत्क्रान्तिप्रक्रियेंतून आत्म्याचें जनन झालें ही उपपत्ति चूक आहे,कारण आत्मा अनाद्यनंत चैतन्याचा अंशभागी असतो.

वरील तत्त्वांवरून शिक्षणाचें उद्दिष्ट स्पष्ट होतें. मानवाला आपल्या चित्स्वरूपाची प्रतीति घडविणें हा शिक्षणाचा हेतु असला पाहिजे. आपला आत्मा चित्स्वरूप असल्यामुळें चैतन्याची ओढ प्रत्येक व्यक्तीच्या अन्तःकरणांत बीजरूपानें असतेच. ती अंकुरित करून सफल करणें, सान्त आत्म्याचा विकास करून अनन्त चैतन्याचा बोध त्यास करून देणें, व दोघांमधील अभेदाचा प्रत्यय घडवून अनन्तांत विलीन होण्यास त्यास उत्सुक करणें हें शिक्षणाचें कार्य होय.

शिक्षणाच्या प्रक्रियेंतून बालकाला सत्य, शिव व सौन्दर्य या अन्तिम मूल्यांचा अधिगम झाला पाहिजे. ही मूल्यें ग्रहण करण्याची शक्ति प्रत्येक बालकांत जन्मतःच असते. शिक्षकाचें काम ही उपजत शक्ति जागृत करण्याचें व तिची जोपासना करण्याचें आहे. हेतु हा कीं बालकानें हीं सनातन मूल्यें आत्मसात करून घ्यावींत, आणि आपल्या जीवनांत त्यांचा आविष्कार व्हावा म्हणून सयत्न राहावें.

म्हणूनच हीं सनातन मूल्यें ज्या संस्कृतींत साकार झालेलीं आहेत त्या संस्कृतीचें लोण भावी पिढीला पोचविणें हें शिक्षणाचें एक महत्त्वाचें कार्य होय.अभ्यासक्रमांत भौतिक शास्त्रांपेक्षां मानवविषयक शास्त्रांना जास्त महत्त्व दिलें पाहिजे. कारण मानवविषयक शास्त्रें चैतन्याशीं संबद्ध असतात. या शास्त्रांच्या अभ्यासानें बालकाच्या मनांत ‘ दिव्य असंतोष ’ निर्माण होऊन त्याची वृत्ति आत्मबोधाकडे वळेल.

अध्यात्मवादांत सार्वत्रिक शिक्षणाची आवश्यकता अभिप्रेत आहे. कारण प्रत्येक आत्म्याचा उद्धार झालाच पाहिजे. प्रत्येक मानव हा परामार्थतः आपल्या भवितव्याचा विधाता असतो. कारण आत्मबोधाचीं साधनें त्याच्या आवाक्यांत असून, त्या साधनांचा उपयोग अथवा अव्हेर करणें त्याच्या मर्जीवर अवलंबून असतें. शिक्षणाच्या साधनसामग्रीचें चक्र शिक्षकानें अशा रीतीनें फिरवावें कीं ज्यायोगें बालकाला आत्मबोधाच्या मार्गावर पाऊल टाकण्याची प्रेरणा मिळेल. प्रत्येक वनस्पतीची जास्तीत जास्त वाढ व्हावी म्हणून जसा माळी जागरूक असतो, तद्वतच शिक्षकानें प्रत्येक बालकाला आत्मबोधाची साधना प्राप्त करून देण्यासाठीं साक्षेप केला पाहिजे.

अशा रीतीनें प्रत्येक व्यक्तीचा विभिन्न उद्धार झाला पाहिजे असा आग्रह जरी या वादांत असला तरी तो समाजहित बुद्धीला मारक होत नाहीं. सर्वच आत्म्यांना सनातन मूल्यांची साधना करावयाची असल्यामुळें त्यांच्यांत बरेच साधर्म्य असते आणि आत्मबोध झालेला आत्मा समाजाभिमुख असतो, समाजविरोधी नसतो..

अध्यात्मवाद्यांच्या मतें शिस्तीचा संभव नियोजन व स्वातंत्र्य या दोहोंमधून व्हावा. बालमनाला आत्मबोधाचीं आकांक्षा असते, आणि त्याला

आचार-विचारांचें स्वातंत्र्य असते. पण मानवी आत्मा सान्त असल्यामुळें बालमनांतच या दिव्य ध्येयाशीं विसंवाद करणाऱ्या कांहीं उपजत प्रेरणा असतात. म्हणून बाल्यावस्थेंत उदात्त वृत्ति व हीन वृत्ति यांत संघर्ष चाललेला दिसून येतो. आत्मबोधासाठीं मानवानें युगानुयुगें चालविल्या संगरांत उपकारक ठरलेली संस्कृतीची परंपरा एकीकडून बालमनाला ओढीत असते, व दुसरीकडून आत्मघातकी प्रेरणा त्याला खेचीत असतात. या संगराचे योग्य पर्यवसन करणें हें शिक्षणाचे कार्य आहे. या सिद्धीसाठीं परिपक्व बुद्धीच्या बालकांना केलेलें मार्गदर्शन हें साधन न्याय्य आहे. परंतु या मार्गदर्शनाचें दडपण इतकें तीव्र केव्हांही होऊं देऊं नये की ज्यायोगे आपलें भवितव्य घडविण्याची जबाबदारी आपलीच आहे ही बालकाची जाणीवच नष्ट होईल.

शिक्षणविषयक बहुतेक साक्षेपांना अध्यात्मवादाची प्रेरण असते. शिक्षकाला अध्यात्मवादाची सर्वच तत्त्वे कदाचित मान्य होणार नाहींत. तथापि मनांत त्याला हें उमजते कीं शिक्षणाचा ध्यास केवळ पार्थिव मूल्यासाठीं नसतो, तसेंच शिक्षणाच्या प्रक्रियेनें बालकाला अशी एक प्रतिष्ठा प्राप्त करून द्यावयाचीं असते कीं जिचे मापन केवळ पार्थिव मूल्यांनीं होऊं शकणार नाहीं.

## उपयुक्ततावाद

अगदीं काटेकोरपणें विचार केला तर उपयुक्ततावादाचा समावेश अध्यात्मविद्येंत होऊं शकणार नाहीं. कारण अन्तिम सत्याचे स्वरूप काय याचा निर्णय करण्याच्या खटाटोपांत हा वाद पडत नाहीं. या वादाच्या प्रणेत्यांच्या मतें अन्तिम सत्याचे स्वरूप ठरविण्याचा प्रयत्न केव्हांही वांझच ठरणार. शिवाय सत्य, शिव, सौन्दर्य हीं किंवा यासारखीं मूल्यें गृहीत धरून चालण्यास या वादाचा विरोध आहे. या विचारसरणीप्रमाणें मूल्याचा संभव मानवी व्यवहारांतून होतो. मानवी उद्दिष्टाच्या साधनेस मूल्य साहाय्यभूत असल्यामुळें तीं नेहमी विकारी असतात. मूल्यें व्यवहारसापेक्ष असल्यामुळें तीं आगाऊच निश्चित करण्याचा आग्रह तत्त्वतः सदोष आहे. असा प्रयत्न आभासावर अथवा चुकीच्या समजुतीवर आधारलेला असतो.

अन्तिम मूल्यांच्या बाबतींत उपयुक्ततावाद्यांची अशी अकरणरूप वृत्ति असली तरी मानवाच्या अंगीं पूर्णत्वाची साधना करण्याची शक्ति

आहे, आणि मानवजातीची सतत प्रगति होत आली आहे व होत राहील अशी त्यांचीं दृढ श्रद्धा आहे. सृष्टीच्या योजनेचे मानव हा केन्द्रस्थान आहे असे ते मानतात. सर्व चराचर पदार्थ विकारी आहेत, नेहमीं बदलत राहणें हा हा विश्वाचा स्थायी भाव आहे. पण या स्थित्यंतराला वळण देणारी अथवा त्याचे नियंत्रण करणारी कोणतीही शक्ति निसर्गांत नाहीं. सृष्टींतील स्थित्यंतरें अकल्पनीय असतात. पण मानवानें या विकारशील अनागोंदीला काबूत आणण्याचें कार्य हातीं घेतलें आहे. अतिमानुष शक्तीचें अस्तित्व या वादास मान्य नसल्यामुळें मानव हाच आपल्या भवितव्याचा विधाता बनतो. स्वतःचा उद्धारकर्ता मानवच होय; आणि उद्धाराचें साधन त्याची बुद्धि होय. बुद्धीच्या योगानें मानव स्थित्यंतरावर नियंत्रण ठेऊन आपल्या आकांक्षांना अनुकूल असें वळण त्यास देऊं शकतो.

म्हणून मानवाच्या सृजनशक्तीचें महत्त्व अमाप आहे. मानवाच्या आंतरिक गरजा त्याच्या सृजनशक्तीला कार्यप्रवृत्त करतात. मानवी व्यवहार म्हणजे गरजा भागविण्यासाटीं सृष्ट पदार्थांवर केलेले प्रयोग होत. उत्तरोत्तर, अधिकाधिक समाधानकारक जीवन जगण्यासाठीं मानवाचा उद्योग मानवजातीच्या निर्मितीपासून अखंडपणें चालू आहे. आणि या उद्यमशील आकांक्षेमुळेंच शास्त्रांत दिसून येणारी प्रगति झाली आहे. मूल्य हें प्रगमनशील मानवी व्यवहाराचें अपत्य होय. ज्याची यथार्थता व्यवहारांत दिसेल तेंच सत्य होय, आणि व्यवहारांत जें हितकारक ठरेल तेंच शिव होय. हें प्रतिपादन म्हणजे संधिसाधुत्वाचा निकृष्ट नमुना होय असें वाटणें साहजिक आहे. परंतु मानवाच्या नैतिक कल्पनांत कालानुक्रमें झालेले फरक लक्षांत घेतले, तर याहि विचारसरणीला ऐतिहासिक आधार सांपडतो. उपयुक्ततावाद म्हणजे भविष्योन्मुख असलेलें मानवाधिष्ठित दर्शन होय. हें दर्शन अशी ग्वाही देतें कीं मानवांच्या सहकारी प्रयत्नांनीं वर्गरहित सर्वोदयकारक लोकशाही समाज निर्माण होऊं शकेल. विश्वबंधुत्व व विश्वराज्य या ज्या उदात्त आधुनिक आकांक्षा आहेत त्यांच्याशी उपयुक्ततावादाचा सुसंवाद आहे. हा वाद व अध्यात्मवाद यांत फरक इतकाच आहे कीं मानवी प्रगतीला भगवंताचे अधिष्ठान पाहिजे असे अध्यात्मवाद मानतो, व त्या अधिष्ठानाची आवश्यकता उपयुक्ततावादाला पटत नाहीं, मानवी स्वभावांत उन्नततर

जीवनाविषयीं आकांक्षा जन्मत: असते, व त्या आकांक्षेची प्रेरणा प्रगति घडवून आणण्यास समर्थ आहे असें उपयुक्ततावाद मानतो.

उपयुक्ततावादाची शिक्षणप्रक्रियेला सर्वांत मोठी देणगी म्हणजे व्यवसायपद्धती होय. या पद्धतींत मुलांकडून सर्जक कृति करून घेण्यावर भर देतात. सृष्टींतील स्थित्यंतरावर नियंत्रण ठेवणें हें मानवाचें जीवनकार्य असल्यामुळें नियंत्रण कौशल्य ज्यायोगें हस्तगत होईल असे शिक्षण शाळांतून मिळालें पाहिजे. शाळा या ज्ञान विकणारीं दुकानें असूं नयेत; तर समायोजना कौशल्य मिळवून देणाऱ्या प्रयोगशाळा असाव्यात, ज्ञानाचे पर्यवसान जर हितपरिणामीं कृतींत झालें नाहीं तर तें ज्ञान निरर्थक होय. मुलांनीं निरामय राहणीचें नियम पोपटासारखे पाठ केले व आपल्या नित्याच्या व्यवहारांत त्या नियमांचा भंग करणें तसेंच चालूं ठेवलें तर मिरविलेलें आरोग्यज्ञान असून नसल्यासारखेंच होय. म्हणून बालकांच्या सृजनशक्तीला ज्यायोगें आव्हान मिळेल. अशी विपुल साधनसामुग्री शाळांत उपलब्ध असावी. चित्रे काढणें, कविता व कथा लिहिणें, धान्य पिकविणें, सूत कांतणें व कापड विणणें सामाजिक मेळावे योजणें व घडवून आणणें, हे व अशा स्वरूपाचे व्यवसाय यांना शालेय कार्यक्रमांत अग्रस्थान असावें. असे झालें तर अपरिहार्यपणें मुलें शिकतील, त्यांच्या बुद्धीचा विकास होईल, आणि शिक्षणप्रक्रियेंत मुलांनीं हौसेने व उत्साहाने भाग घेतला असल्यामुळें त्यांना मिळालेलें शिक्षण अधिक सफल व चिरपरिणामी असेल.

उपयुक्ततावादांत अशा रीतीनें शिक्षण कृतिद्वारां मिळावें या तत्वाचा पुरस्कार केला आहे. निष्क्रिय वृत्तीने ज्ञानसंग्रह करणें म्हणजे शिक्षण नव्हे, त्यांत बुद्धीला व शीलाला कांहीं वळण लागूं शकत नाहीं. शिक्षकानें बालकाभोंवती अशी समस्यायुक्त परिस्थिती निर्माण करावी कीं बालकाला साहजिकच त्या समस्येला तोंड द्यावेसें वाटेल आणि ती समस्या उकलण्यासाठीं उपयुक्त साधनांचा तो शोध करूं लागेल. गणनक्रियेचें सम्यग्ज्ञान होण्यासाठी व त्या क्रियेंत कौशल्य मिळविण्यासाठीं आकडेमोडीपेक्षां एखादें दुकान चालविण्याचा व्यवसाय अधिक उपकारक ठरतो. असाच परिणाम इतिहासाच्या अध्यापनांत आधारांचा उपयोग केल्यानें, व पदार्थ विज्ञान व रसायनशास्त्र यांचा अध्यापनांत प्रयोगांवर भर दिल्यानें होतो. सारांश, शिक्षण-

प्रक्रियेंत कोणत्याहि विषयांतील मूलतत्वांचें ज्ञान देत असतांना त्या तत्त्वांचा व्यवहारांतील उपयोगहि शक्य तो कृतिपद्धतीनें समजावून द्यावा.

म्हणूनच शिक्षण देतांना बालकांच्या ज्ञानलालसेचा पूर्ण उपयोग करून घ्यावा, शिक्षण हे कोणावर लादतां येत नाहीं, खरें शिक्षण फक्त स्वयंप्रेरणेनेंच घडूं शकतें. जीवनांतून वर्धिष्णु आनंद मिळविण्याची ईर्ष्या बालमनांत उपजत असते. ही आंतरिक प्रेरणाच आत्मविकासाचें साधन झाली पाहिजे. आत्मोद्धार करण्याची जबाबदारी सर्वस्वी बालकाची असावी. शिक्षणाचें कार्य फक्त आत्मोद्धाराला अनुकूल परिस्थती व उपयुक्त साधन-सामग्री उपलब्ध करून देण्याचें असावें. या योजनेंत शिक्षण हें दुहेरी अर्थानें बालकेंद्रित होतें. एकतर अशा शिक्षणाचें उद्दिष्ट बालकाचा विकास व्हावा हें असतें. अन्यथा शिक्षणाचा उगमही बालकाच्या आत्मोन्नतिपर आकांक्षे-तून झालेला असतो.

अर्थातच शिक्षणाची योजना करतांना तें बालमनाच्या परिणतीच्या टप्प्याला अनुरूप असण्याची दक्षता घेतली पाहिजे. भूत अथवा भविष्य यांचें अयोग्य दडपण शिक्षणावर पडूं नये बालकाच्या वर्तमान गरजा हाच शिक्षणाचा आरंभबिंदु असावा. एका अवस्थेंत बालकाला वाचन हें मनोरंजनाचे साधन म्हणून हवेसे वाटेल, दुसऱ्या अवस्थेंत तें आत्मा-विष्कारांचें साधन म्हणून प्रिय होईल व तिसऱ्या अवस्थेंत ज्ञानशक्ति संपा-दन करण्याचें साधन म्हणून इष्ट भासेल. वाचनाविषयींची बालकाची मूल्यें अशा प्रकारें उत्क्रांत होत राहतील. शिक्षणानें प्रस्तुत गरजा भागवून भावी गरजांचें अप्रत्यक्ष दिग्दर्शन करावें, व अशा रीतीनें मंदगतीनें व नकळत होणाऱ्या उत्क्रांतिप्रक्रियेला साहाय्यकारक व्हावें.

अशा तऱ्हेच्या शिक्षणयोजनेंत बाह्योपचारानीं शिस्त लावण्याचें प्रयो-जन उरत नाहीं. कारण येथें शिक्षणप्रक्रियेला बालकाच्या स्वच्छंद, सुखकर, ध्येयप्रेरित उद्योगाचें स्वरूप प्राप्त झालेलें असतें. अशा परिस्थतींत शासन व नियंत्रण यांची गरजच उद्भवत नाही. उद्योगांतूनच वर्तनाला वळण लागतें आणि बालकाच्या मनांत उपक्रमशीलता व संयोगी सहकारिता या वृत्ति निर्माण होतात. शाळेचें रूपांतर लोकराज्यांत होते, आणि या लोकराज्यां-

तील सर्वोदयाच्या साधनेंतून बालकांना अप्रत्यक्षपणें नागरिकत्वाचें शिक्षण मिळतें.

उपयुक्ततावादाच्या प्रभावानें अभ्यासक्रम व अध्यापनपद्धति यांत महत्त्वाचे व हितकर फरक झाले आहेत. आधुनिक शाळांतील बऱ्याच प्रगमनशील विशेषांचा उद्‌गम या वादांतूनच झालेला दिसेल. ज्ञानाहून फारच वरचढ स्थान कृतीला देण्याच्या या वादाच्या अतिरेकी आग्रहाविरुद्ध अर्थातच जोराचे आक्षेप घेतले जातात. तथापि शिक्षणशास्त्राची तत्वप्रणाली व आचार पद्धति या दोहोंतही उपयुक्ततावादानें बहुमोल भर घातली आहे ही गोष्ट सर्वमान्य आहे.

**वास्तववाद**

सृष्ट पदार्थ आणि तद्विषयक ज्ञान दोन्ही सत्य आहेत असा या वादाचा बीजमंत्र आहे. मानव, पशुपक्षी, व भोंवतालचा निसर्ग यांचें अस्तित्व स्वयंभू आहे, परस्परसापेक्ष नाहीं. सृष्ट पदार्थांविषयीं आपण विचार करूं लागलों म्हणजेच त्यांचें अस्तित्व निर्माण होतें हा युक्तिवाद बरोबर नाहीं. ते पदार्थ मानवी विचाराचा विषय झाले नसले, किंबहुना त्यांच्याविषयीं विचार करण्यास मानवच अस्तित्वांत नसला तरींही ते पदार्थ विद्यमान असतातच. मनुष्यदेहाबाहेरील वस्तूंविषयीं ज्ञान मिळविणें मानवी बुद्धीच्या आवाक्यांतील गोष्ट होय. अशा रीतीनें मिळविलेलें ज्ञान भासमान नसून प्रत्यक्ष वस्तूंविषयीं असतें; व त्या ज्ञानाची सत्यता बाह्यसृष्टींतील अस्तित्वाशीं तें ज्या प्रमाणांत जुळतें असेल त्या प्रमाणांत असते. ज्ञानाची सत्यता ज्ञान, सृष्ट पदार्थ व घटना यांचा पडताळा पाहून ठरवावयाची असते.

नीतिनियम ठरविण्याची प्रवृत्ति मानवी स्वभावांत जन्मतःच असते. या प्रवृत्तीचें समाधान होणें आवश्यक आहे. आपलीं ध्येयें व आपली वर्तणूक निसर्गसिद्ध नीतीशी सुसंगत आहेत असा प्रत्यय प्रत्येक व्यक्तीला झाला पाहिजे. निसर्गसिद्ध नीतीच्या स्वरूपाचें योग्य आकलन होण्यासाठीं मानवी स्वभाव व ऐतिहासिक घटना यांचा विमर्शपूर्वक अभ्यास केला पाहिजे.

कोणत्याही धर्माचीं तत्त्वें वास्तववाद मान्य करीत नाहीं. तथापि या वादाचा धार्मिक श्रद्धेला विरोध नाहीं. नाशवंत वस्तूंनीं भरलेल्या ज्या

विश्वांत आपण राहतों त्याला कोणीतरी बाह्य स्रष्टा असावा असें या वादाचें अनुमान आहे.

वास्तववादाच्या मतें शिक्षणाचें उद्दिष्ट निसर्गसिद्ध नीतीला अनुसरून आचरण करणाऱ्या व्यक्ति तयार करणें हें असावें हा हेतु सिद्ध होण्यासाठीं इतिहास व अभिजात वाङ्मय हे विषय अभ्यासक्रमांत अवश्य असावेत. आपल्या भोंवती जे पदार्थमय विश्व पसरलेलें आहे त्याचें ज्ञान मिळविणें हेंही तितकेंच महत्त्वाचें आहे. शिस्तीच्या बाबतींत वास्तववादाची भूमिका, प्रकृतिवाद व अध्यात्मवाद यांच्या भूमिकांशी तडजोड साधणारी आहे. स्वातंत्र्य हें मंगल जीवनाची गुरुकिल्ली आहे, म्हणून बालकाच्या उपक्रमशीलतेला धक्का लागता कामा नये. पण मंगल जीवन हीन प्रेरणांचें संयमन केल्यावाचून सिद्ध होऊं शकत नाहीं. तरुण पिढीला हा संयम प्रौढ व्यक्तींच्या मार्गदर्शनावाचून साधतां येणार नाहीं. आपल्याभोंवतीचा अफाट निसर्ग अव्यभिचारी नियतीच्या आधीन असतो. नियंमनाचें महत्त्व किती आहे, व नियमांस अनुसरून वागण्याची वृत्ति कशी आत्मसात करावी हें प्रौढांनी अप्रबुद्धांना समजावून द्यावें.

वास्तववादाच्या शिक्षणयोजनेंत धर्मावर बहिष्कार नाहीं, किंवा त्यांत धर्माला अवास्तव महत्त्वही दिलें नाहीं. त्याचें शैक्षणिक कार्य धार्मिक श्रद्धेच्या अभावीं सुद्धां सुरळीतपणें चालू शकेल.

**शैक्षणिक तत्त्वज्ञानाची व्याप्ति**

जीवनविषयक प्रमुख तात्त्विक सिद्धान्तांचें जें विवेचन येथपर्यंत केलें आहे, त्यावरून शैक्षणिक तत्त्वज्ञानाच्या कार्याची रूपरेषा स्पष्ट होते. त्याचें प्रथम कार्य शिक्षणाचें उद्दिष्ट ठरवून शिक्षणाच्या साक्षेपाला योग्य दिशा दाखवून देणें हें होय. हें कार्य सुलभ नाहीं. तत्त्वज्ञानाच्या निरनिराळ्या शाखा या बाबतींत परस्परविरोधी मतें मांडतात. आध्यात्मिक निःश्रेयस, व्यक्तित्वाची जोपासना, आदर्श नागरिकत्व इत्यादि भिन्न उद्दिष्टें सांगण्यांत आलीं आहेत. या उद्दिष्टांमधील विरोध तात्त्विक स्वरूपाचाच जास्त असतो, व्यवहारांत या उद्दिष्टांमधील विरोध अंशमात्रानें उरतो. म्हणून शिक्षणाच्या प्रत्यक्ष कार्यांत तडजोडीनें सर्वमान्य ध्येय स्वीकारतां येतें.

शैक्षणिक तत्त्वज्ञानाचें दुसरें काम अभ्यासक्रमाचें स्वरूप निश्चित करणें हें असतें. या बाबतींत तत्त्वज्ञानाच्या धर्मनिष्ट शाखांचा आग्रह धर्मग्रंथ, इतिहास, अभिजात वाङमय या विषयांचा समावेश करण्याविषयीं असतो, आणि भौतिकवादी शाखांचा आग्रह भौतिक शास्त्रांच्या अभ्यासालाच सर्व महत्व देण्याविषयीं असतो. या दोन्ही आग्रहांचा समन्वय साधणें फारसें कठिण नाहीं.

शैक्षणिक तत्त्वज्ञानाचें तिसरें कार्य शिस्तीचें स्वरूप ठरविणें हें होय. या बाबतींतहि मतभेद दिसून येतो. कारण तत्त्वज्ञानाच्या विविध शाखांची बालस्वभावाविषयीं धारणा भिन्न आहे. मुलें हीं जन्मतःच दुष्प्रवृत्त असतात असे मानलें तर त्यांस वळविणारी शिस्त अधिक कडक असावी लागेल, व ही शिस्त प्रौढांनीं बालकांवर लादावी लागेल. उलट मुलें जन्मतः सत्प्रवृत्त असतात असें मानलें तर बाहेरील नियंत्रण कमीत कमी ठेवून सत्प्रवृत्तींची जोपासना करणारी अन्तःप्रेरित शिस्त अनुसरावी लागेल. सुदैवानें शाळांच्या दैनंदिन व्यवहारांत अशी विरुद्ध ध्रुव गांठणारीं एकांगी मतें मान्य करावी लागत नाहींत. शिस्तीच्या बाबतीतही समजुतीनें मध्यम मार्ग काढतां येतो.

शिक्षकाच्या कार्याच्या व्याप्तीविषयींचा निर्णयही शैक्षणिक तत्त्वज्ञानानेंच केला पाहिजे. अध्यात्मवाद शिक्षकाला मानाचें व अधिकाराचें स्थान देतो, व बालकाचा अध्यात्मिक विकास करून त्याला आत्मबोधाच्या मार्गावर नेण्याची जबाबदारी शिक्षकावर टाकतो. उलटपक्षीं प्रकृतिवादाचा आग्रह असा आहे कीं शिक्षकाचा प्रभाव बालकांवर कमीतकमी व अप्रत्यक्षपणें पडावा. शिक्षकाचें मुख्य कार्य योग्य परिस्थिति निर्माण करून बालकाला आत्मविकासाची संधि देणें हें असावें. वास्तववाद या दोन टोकांमधील भूमिका घऊन शिक्षक व बालक यांना समान महत्त्व देतो.

शैक्षणिक व्यवहारांत अनेक समस्या निर्माण होतात. त्यांपैकीं कांहींची उकल करून घेण्यासाठीं मानसशास्त्राची कांस धरावी लागते. उदाहरणार्थ, मिळविलेलें ज्ञान पक्कें होईल अशा रीतीनें मुलांकडून ज्ञानग्रहण कसें करून घ्यावें याविषयीं मानसशास्त्र मार्गदर्शन करूं शकतें. पण ज्या समस्यांचा उकल करतांना मानवी जीवन व स्वभाव यांविषयीं मूलभूत तात्त्विक सिद्धान्तांचा अवलंब करावा लागतो, त्यांचें उत्तर आपणाला

शैक्षणिक तत्त्वज्ञानांतूनच मिळूं शकेल. उदाहरणार्थ, पाठ्य पुस्तकांचें बाह्य-स्वरूप अनुभवानें प्रयोग करून ठरवावें लागेल. त्यांतील मजकुराच्या मांडणीचा क्रम मानसशास्त्र ठरवील. पण मजकूर काय असावा याचा निर्णय शैक्षणिक तत्त्वज्ञान देईल.

जीवन व शिक्षण यांविषयीं स्पष्ट तात्त्विक भूमिका ठरविल्यावांचून कोणालाही आदर्श शिक्षक होतां येणार नाहीं. मानवी जीवनाचा हेतु सतत उन्नति साधीत राहणें हा आहे, व शिक्षणाचें उद्दिष्ट बालकांना जीवनाचा हा हेतु समजावून देऊन त्याची साधना करण्यास समर्थ करणें हें आहे, अशी ज्याची श्रद्धा असेल तोच शिक्षक आपलें काम दीक्षित वृत्तीनें करील. अशी दीक्षित वृत्ति शिक्षणाचा आदर्श साधण्यासाठीं अत्यावश्यक आहे. अशा निष्ठेनें काम करणाऱ्या शिक्षकालाच बालकांच्या अन्तःकरणांतील चिज्ज्योति प्रज्वलित केल्याचें समाधान पदोपदीं लाभूं शकतें. मानवी जीवनांतून साध्य होणारें हें उच्चतम समाधान आहे.

****

३ :

# शिक्षणाचें शास्त्र आहे का ?

**** ******************************

शिक्षणाच्या तत्वांचें विवेचन करणाऱ्या कांहीं जुन्या पुस्तकांतून 'शिक्षण हें शास्त्र आहे कीं कला ?' हा वाद उपस्थित केलेला दिसतो. आणि या वादाचें पर्यवसान बहुधा शिक्षण हें शास्त्रही आहे व कलाही आहे असे केलेलें असतें. शास्त्र व कला यांत महत्वाचा भेद असून कले-पेक्षां शास्त्र श्रेष्ठ होय अशी भूमिका असा प्रश्न विचारणारांची असावी. त्यांना वाटते कला ही कृतिस्वरुप असून तिचें कार्य जीवनांतील गरजा भागविण्याचें आहे; उलट पक्षीं शास्त्र हें विचारप्रधान असून त्याचें उद्दिष्ट सामान्य तत्वें प्रस्थापित करण्याचें असतें. उदाहरणार्थ, कुंभ करणें व जोडे शिवणें या कला आहेत. पदार्थविज्ञान व ज्योतिष हीं शास्त्रें आहेत.

परंतु हा भेद वरकरणी असून शास्त्र व कला यांच्या स्वरुपाविषयीं खोल विचार केला असतां त्यांचें विसर्जन होतें. सर्व शास्त्रांचा आरंभ मानवी गरजा भागविणाऱ्या कलांच्या स्वरूपांत झालेला दिसतो. उपयुक्त कलांच्या विकसनक्रमांत अशी एक अवस्था येते कीं अनुभवांतून संचित केलेल्या सूत्रांच्या आधारानें त्या त्या कलेंतील समस्यांचें तर्कशुद्ध विश्लेषण करणें शक्य होतें, आणि विशिष्ट अडचणीचें निराकरण करण्यासाठीं पूर्व-नियोजित पद्धतीनें संशोधन करण्याचा मार्ग मोकळा होतो. उदाहरणार्थ, वैद्यकशास्त्राचा उगम किरकोळ रोग बरे करणारी कला म्हणून झाला. हळूहळू हार्वे, पाश्चर यांसारख्या थोर व्यक्तींच्या अनुपम कर्तबगारीमुळें सर्वसंमत तत्वांची बैठक मिळून वैद्यककलेचें रूपांतर वैद्यकशास्त्रांत झालें. वास्तुविद्येचें मूळही अशाच प्रकारच्या कूटजोत्पादनाच्या कलेंत दिसून येईल.

अशा प्रकारें कालदृष्टचा कला ही शास्त्राची ज्येष्ठ भगिनी आहे. ज्या क्षणीं कला आकस्मिक ज्ञानाचा आधार सोडून सुव्यवस्थित ज्ञानाचा आधार घेऊं लागते त्या क्षणीं तिचें रूपांतर शास्त्रांत होते. जों पर्यंत एखादी क्रिया यदृच्छया उत्पन्न झालेल्या, माहितीवर आधारलेली असते, तोपर्यंत तिचा उल्लेख कला म्हणून करणें योग्य होय. पण ती क्रिया सुप्रतिष्ठित चाको-

रींतून होऊं लागली, आणि तिची व्याप्ति आणि आवाका स्पष्टपणें ठरला म्हणजे तिला शास्त्राची प्रतिष्ठा प्राप्त होते. अशा रीतीनें उपयोगापेक्षां तत्त्वाला अधिक महत्त्व देण्याची पद्धत आहे. आचारापेक्षां विचार श्रेष्ठ वाटणें हा दोष बुद्धिपूजक मानवांत क्षम्यच गणला पाहिजे. परंतु तत्त्व व व्यवहार यांचा फार निकटचा संबंध असतो. कुशल व्यवहाराच्या आधारा शिवाय तत्त्वें विश्वसनीय होऊं शकत नाहींत, आणि योग्य तत्त्वांचें अधिष्ठान नसेल तर व्यवहार कुशल होऊं शकत नाहीं. तत्त्व व व्यवहार परस्परसापेक्ष असून, वारंवार एकाचा दुसऱ्याशीं पडताळा पाहून दोहोंतही इष्ट सुधारणा करणें आवश्यक असतें.

शिक्षणशास्त्राचा उद्‌भवही प्रागैतिहासिक कालांत कला म्हणून अस्पष्ट स्वरूपांत झाला. शिक्षण हें कुटुंब संस्थेचें जुळें भावंड आहे. आईबाप हे आद्यगुरु असून त्यांनींच प्रयत्नप्रमाद पद्धतीनें शिक्षणकलेचा ओनामा घालून दिला. जसजसा संस्कृतीचा विकास होत गेला तसा तसा मानवी ज्ञानाचा संचय होत जाऊन जीवनांत जटिलता निर्माण झाली. (कार्यव्यापकतेमुळें आईबापांना मुलांना शिकवून जीवनकलहाशीं तोंड देण्याला समर्थ करणें अशक्य होऊं लागलें.) अशा रीतीने शिक्षकाचा पेक्षा निर्माण झाला. कालक्रमाने विचारवंत लोक या नवीन मानवी व्यवसायाविषयीं, त्याच्या उद्दिष्टाविषयीं व कार्यपद्धतीविषयीं चिंतन करूं लागले. त्या व्यवसायांतील अनुभवांचें बुद्धीच्या निकषावर परिक्षण होऊन त्याला आधारभूत असणाऱ्या तत्वांची संगतवार मांडणी होऊं लागली. प्लेटो व ॲरिस्टॉटल, रुसो व पेस्टॉलॉझी, नीट्‌झ्शे व हेगेल, ड्यूई व माँटेसरी या पाश्चात्य विचारसूरींनीं शिक्षणाविषयीं इतका बहुविध व मूलगामी विचार केला आहे कीं शिक्षणाचें शास्त्र होण्यासाठीं आवश्यक तो सर्वसंमत तत्वांची बैठक उपलब्ध झाली आहे असें म्हणावयास हरकत नाहीं.

शिवाय ही शिक्षणविषयक विचारपरंपरा अनेक शतकें चालू असल्यामुळें तिचें सुस्पष्ट अशा अनेक शाखांत विभजनही झालें आहे. शिक्षणाच्या आगमामध्यें आतां शैक्षणिक तत्वज्ञान, इतिहास, शालेय व्यवस्था, शैक्षणिक प्रशासन, शैक्षणिक मानसशास्त्र, अध्यापन पद्धतीचीं सामान्य तत्वें, व विशिष्ट विषयांच्या अध्यापनपद्धति, इत्यादि विभागांचा समावेश होतो. या प्रत्येक शाखेमधील ग्रंथसंभार विपुल असून त्यांत सारखी भर पडत

आहे. शिक्षणशास्त्र आतां पूर्णपणें वयांत आलें आहे असें म्हणावयास प्रत्यवाय नाहीं. या शास्त्राचें उद्दिष्ट समायोजनप्रक्रियेचीं आधारभूत तत्वें शोधून काढणें, व सर्वोत्तम समायोजन कोणतें ते ठरविणें, हें असतें. व शिक्षणाची कला या शास्त्रानें ठरवून दिलेल्या समायोजनाची साधना घडवून आणते.

तथापि कांहीं आधुनिक आक्षेपक शिक्षणाला शास्त्राचा दर्जा देण्यास तयार नाहींत. त्यांचा दावा असा आहे कीं, शिक्षणाच्या मूलतत्वांविषयींच शिक्षणतज्ज्ञांत एकवाक्यता दिसून येत नाहीं. आणि अशी एकवाक्यता असणें हें तर शास्त्राचें आद्य लक्षण होय. उद्दिष्ट, अभ्यासक्रम व अध्यापन पद्धति या शिक्षणाच्या तिन्हीं अंगांविषयीं असंधेय मतभेद शिक्षणतज्ज्ञांत आढळतात. एकाच्या मते व्यक्तिविकास हें शिक्षणाचें उद्दिष्ट होय, तर दुसऱ्याच्या मतें समाजोन्नति होय. अभ्यासक्रमाची निवड करतांना कांहीं लोक विषयांच्या उपयुक्ततेला प्राधान्य देतात, तर इतर कांहीं विषयांच्या विनयनक्षमतेला देतात. कांहींचे मत शिक्षणपद्धति तर्काधिष्ठित असावी असे आहे तर दुसऱ्यांच्या मतें ती कृतिनिष्ठ असणें श्रेयस्कर होय. शिक्षणाला हीन लेखणारे टीकाकार असा सवाल करतात कीं या गोंधळात शास्त्रत्व कुठें व कितीसे आहे ?

शिक्षणतज्ज्ञांत मतभेद आहेत. हें सत्य नाकारतां येणार नाहीं. तथापि हे विरोध गोंधळाचें चिन्ह नसून, चैतन्याचे निदर्शक आहेत. विरोधकांनीं या मतभेदांना अवास्तव महत्त्व दिलें आहे. व्यवहारांत या भिन्न मतांचा समन्वय होऊं शकतो, शिक्षणकार्याची युगांची अविच्छिन्न परंपरा शिक्षणशास्त्रावरील मानवी श्रद्धेचा पुरावा होय. शिक्षणानें व्यक्तींत सुधारणा होते ही श्रद्धा शिक्षणकार्याच्या पाठीशीं आहे. अधिकाधिक उन्नत मानव तयार करणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट सर्वमान्य आहे. विविध अभ्यासक्रम आणि अध्यापनपद्धति या उद्दिष्टाचीं केवळ उपकरणें होत. म्हणून शिक्षण हें शास्त्र या संज्ञेस पात्र आहे. ज्याप्रमाणें विभिन्न चिकित्सापद्धति व उपचारपद्धति असूनही वैद्यकाच्या शास्त्रत्वास बाध येत नाहीं तद्वतच शिक्षणविषयक मतभेदामुळें त्याचा शास्त्राचा दर्जा नाकारतां येणार नाहीं.

दुसरा आक्षेप असा आहे कीं शिक्षणांत अंशात्मकमापनाची शक्यता नसल्यामुळें शिक्षण हें शास्त्र होऊंच शकत नाहीं. कारण अंशात्मक मापन

हा सर्व शास्त्रांचा पाया आहे. शिक्षणाचा व्यवहार मानवी मनाशी असतो, आणि मन हें तर बोलूनचालून अगोचर व म्हणून अगण्य वस्तु आहे. शिवाय शिक्षणप्रक्रियेत नीतिमूल्यें अन्तर्भूत असतात; आणि या मूल्यांचें स्वरूपही गणनक्षम नसतें. इतकेंच नव्हे तर शिक्षणकार्यकर्त्यांनी ज्या कांहीं मापनपद्धति पुरस्कृत केल्या आहेत त्या सर्व अविश्वसनीय आहेत.

शिक्षणांत मापन करणें दुष्कर आहे अशी कबुली दिलीच पाहिजे, पण मापन अशक्य आहे असें म्हणणें म्हणजे उपलब्ध पुराव्याकडे डोळेझांक करणें होय. भौतिक शास्त्रांत पदार्थांचें माप त्या पदार्थाच्या इतर पदार्थांवर होणाऱ्या परिणामांवरून ठरवितात. उदाहरणार्थ, उष्णतेचें मापन ऊष्णतेच्या पाऱ्यावर होणाऱ्या परिणामावरून करतात. शिक्षणांतही मनाचें मापन योजिलेल्या चेतकांस त्या मनाकडून होणाऱ्या प्रतिक्रियांवरून करतात. हें काम कष्टाचें आहे व त्यास कालावधि बराच लागतो हें मान्य करणें भाग आहे. पण या कष्टसिद्ध प्रक्रियेंतून अधिकाधिक फळ पदरीं पडत आहे याविषयीं शंका नाहीं. मानसशास्त्रज्ञांनीं अनेक प्रयोग करून बौद्धिक कसोटचा हें मापनाचें विश्वसनीय साधन उपलब्ध करून दिलें आहे. त्यांची यथार्थता व विश्वसनीयता अनुभवानें सिद्ध झाली आहे. जेव्हां सर्व मानसिक क्रिया अशा रीतीनें मापल्या जातील तेव्हां मनाचें स्पष्ट रेखाचित्र मिळू शकेल. शीलविषयक कांहीं कसोटचा बौद्धिक कसोटचाइतक्या सफल ठरल्या नाहींत म्हणून हताश होण्याचें कारण नाहीं. मनाच्या मापनाच्या संशोधनाला आतां कोठें सुरवात होत आहे. हळूहळू हें मापन अधिक चोखंदळ होईल. पृथक्करणपद्धतीनें जशी भौतिक शास्त्रांची प्रगति झाली तशी शिक्षणाची अवश्य होईल.

ज्या ज्या पाश्चात्य देशांत शिक्षणाला फार महत्त्व देतात (उदाहरणार्थ, अमेरिकेंतील संयुक्त संस्थानें, इंग्लंड, रशिया.) त्या त्या देशांत मानवी जीवनाचा दर्जा भौतिक, बौद्धिक व नैतिक या तिन्हीं अंगांनीं उंचावत जात आहे. ज्या व्यवसायानें मानवाचें असें कल्याण होतें त्याला शास्त्राचा दर्जा नाकारणें म्हणजे निव्वळ हटवाद होय. शिक्षण हें शास्त्र आहे इतकेंच नव्हे तर मानवी हिताच्या दृष्टीनें तें इतर सर्व शास्त्रांहून अधिक महत्त्वाचें शास्त्र आहे.

****

## ४ :

# मानसशास्त्र, समाजशास्त्र व जीवशास्त्र यांचें ऋण

****************************

### मानसशास्त्र

शिक्षणशास्त्राला पुढील तीन प्रश्नांचीं उत्तरें द्यावयाचीं असतात. शिक्षण कशासाठीं आहे ? शिक्षणाचें साधन काय ? आणि शिक्षणाची पद्धत कशी असावी ? शिक्षणाचे उद्दिष्ट, त्याचा अभ्यासक्रम व अध्यापनाची रीत एतद्विषयक हे प्रश्न आहेत. यांपैकीं उद्दिष्टाचें दिग्दर्शन शैक्षणिक तत्त्वज्ञान करतें. अभ्यासक्रमाची निश्चिति मानसशास्त्र व समाजशास्त्र यांच्या साहाय्यानें होते. आणि रीतिविषयक विवरण हा सर्वस्वी मानसशास्त्राचा प्रांत होय.

मानसशास्त्राचें एक प्रमुख सूत्र असें आहे कीं खरें खुरें शिक्षण हें स्वयंप्रेरित असते. शिक्षकाचा प्रभाव अर्थातच शिकणारावर पडतो, पण विनयन फक्त विद्यार्थ्यांच्या स्वेच्छेद्वाराच होऊं शकतें. याबाबतींत ड्यूई यानें असें म्हटलें आहे " शिक्षक यंत्राचें सुकाणू फिरवूं शकेल पण यंत्र चालण्यासाठीं लागणारी शक्ती बालकानेंच पुरविली पाहिजे. " म्हणून शिक्षण-प्रक्रियेंत शिकणाराच्या शिकण्याच्या इच्छेला फार महत्त्व आहे. इच्छा असेल तर शिकणें हौसेनें होऊं शकतें, म्हणजेच विद्यार्थ्यांची वृत्ति शिक्षणाला अनुकूल राहते. तसेच इच्छा असेल तर अभ्यासक्रमाची निवड सहज करतां येते. म्हणून बालकांच्या उपजत आकांक्षा कोणत्या, अनुभवांतून निर्माण होणाऱ्या कोणत्या, त्या आकांक्षा कशा उत्पन्न करतां येतात, व दोन्ही प्रकारच्या आकांक्षांचा उपयोग शिक्षणांत कसा करावयाचा त्या गोष्टीचें ज्ञान शिक्षकास आवश्यक होय. हें ज्ञान त्याला मानसशास्त्रामधून मिळूं शकतें.

मानसशास्त्राचा आणखी एक सिद्धांत असा आहे कीं सर्व बालकांना निसर्गाकडून बुद्धिमत्तेची सारखीच देणगी मिळालेली नसते. व्यक्तीव्यक्तीमध्यें उपजत बुद्धिमत्तेच्या बाबतींत महत्त्वाचे भेद असतात. आणि या भेदामुळें प्रत्येक बालकाची ज्ञानार्जन करण्याची गति भिन्न असते. एखाद्या विषयांत कोणत्या अंशांपर्यंत ज्ञानाधिगम तो करुं शकेल ती मर्यादा भिन्न असते व किती व कोणते विषय तो शिकूं शकेल तो ज्ञानार्जनाचा आवाकाही भिन्न असतो सर्व मुलांना तेच ठराविक विषय शिकावयास सांगणें योग्य नव्हे हें शिक्षकास उमजले पाहिजे. कांहींना संस्कृत, फारसी इत्यादि प्राचीन भाषा शिकण्याची कुवत नसेल, तर कांहींना गणितविषय शिकण्याची पात्रता नसेल. अस्तिपक्षीं बोलावयाचें म्हणजे कांहीं मुलांना इतिहासाची आवड असेल, तर इतरांना पदार्थविज्ञानाची असेल. वैयक्तिक निवडीला भरपूर वाव देणारा व्यापक अभ्यासक्रम मानसशास्त्रदृष्टचा निर्दोष होय. उलट आवश्यक विषयांनीं भरलेला संकुचित अभ्यासक्रम अत्यंत सदोष गणला पाहिजे. सर्व मुलांच्या शरीराला ज्याप्रमाणें एकच अन्नसत्त्व सारखेंच पोषक होणार नाहीं. त्याचप्रमाणें सर्व मुलांच्या बुद्धिविकासाला एकाच विषयाचा अभ्यास सारखाच पोषक होणार नाही. शिवाय या वर्गातील सर्व मुलांकडून एका विपयांत ठराविक काळांत सारखीच प्रगति होऊं शकेल अशी अपेक्षा करणें म्हणजे सर्व मुलांना सारखीच लांब उडी मारतां येईल अशी अपेक्षा करण्यासारखें हास्यास्पद आहे. प्रत्येक मुलाला त्याला झेंपेल तेवढचा गतीनें व झेंपेल तेवढचा मर्यादेपर्यंत अभ्यास करण्याची मुभा असावी.

शिक्षणावर प्रभाव पाडणारा परिपक्वता हा आणखी एक मानसिक विशेष आहे. कालगतीनें मनाचा विकास होत असतो आणि वाढीच्या विभिन्न अवस्थांमध्ये निरनिराळ्या शक्तींचा आणि अभिरुचींचा आविर्भाव होत असतो. ही विकसनशीलता ध्यानांत घेऊन व प्रत्येक अवस्थेंतील गुणविशेष लक्षांत आणून अभ्यासक्रमाची योजना करावयास हवी. व्याकरणासारख्या अमूर्त विषयाचा अभ्यास फार लवकर सुरु करणें अपायकारक होय. कारण त्यांत कालाचा व शक्तीचा अपव्यय होतो. शिवाय अशा अवघड अभ्यासांत आरंभींच अपयश आल्यामुळें बालकाची वृत्ति एकंदर शिक्षणप्रक्रियेस प्रतिकूल होण्याचा धोका संभवतो.

शिकवावयाच्या मजकुराची रचना कशी करावी, कोणत्या गतीनें शिकवावें, कमीतकमी वेळांत जास्तींत जास्त ज्ञानार्जन कसें होऊं शकेल, मिळविलेलें ज्ञान पक्कें कसें होऊं शकेल इत्यादि प्रश्न अध्यापन पद्धतीच्या कक्षेंत येतात. या व अशा प्रश्नांचीं उत्तरें ठरविण्यासाठी मानसशास्त्रज्ञांनीं अनेक प्रयोग केले आहेत. त्या प्रयोगांतून निघणाऱ्या सर्वमान्य निष्कर्षानुसार शिक्षकाचा व्यवहार असावा.

शीलसंवर्धन व व्यक्तित्वाची जोपासना याबाबतींतहि मानसशास्त्राचें मार्गदर्शन फार उपकारक ठरतें. इष्ट स्थिरवृत्तींची निर्मिति करणें व आदर्श अहंवृत्तीच्या नियंत्रणाखालीं गुणानुक्रमें त्यांचें व्यवस्थापन करणें या गहन व सूक्ष्म मानसिक प्रक्रिया आहेत. त्यांचें यथार्थज्ञान शिक्षण कार्याला आवश्यक आहे.

शिक्षणाची समान संधि सर्व बालकांना कशी द्यावयाची या जटिल समस्येचा उकल मानसशास्त्रांच्या साहाय्यावाचून होऊं शकत नाहीं. मानसशास्त्राचा असा निष्कर्ष आहे कीं प्रत्येक बालकाच्या शिक्षणक्षमतेला मर्यादा असते. तो कोणत्या दर्जाचें शिक्षण घेऊं शकेल व किती अंशांपर्यंत घेऊं शकेल हें निसर्गानें ठरवितो; म्हणून प्रत्येक बालकाला त्याच्या स्वभावास व शक्तीस अनुसरून योग्य त्या दर्जाचें व योग्य त्या मर्यादेपर्यंत शिक्षण उपलब्ध करून दिलें म्हणजेच समानतेच्या तत्त्वाची न्याय्य अंमलबजावणी झाली. सर्वांना एकाच प्रकारचें शिक्षण देणें म्हणजे समता नव्हे. बालकाची गरज व गुणवत्ता जाणून त्यास झेंपणारें व त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा यावच्छक्य विकास करणारें शिक्षण पुरविण्यानेच शिक्षण व्यक्तीला व समाजाला उपकारक होतें. बालकाची गरज व कुवत ठरविण्याचें तंत्रहि शिक्षकानें मानसशास्त्राकडून अवगत करून घेतलें पाहिजे.

वस्तुतः शिक्षणाच्या शास्त्राचें वा कलेचें असे एकही अंग नाही कीं ज्यावर मानसशास्त्राचा प्रभाव पडलेला नाहीं. शिक्षणाला मानसशास्त्राच्या नियंत्रणाखालीं आणण्याची पेस्टॉलॉझीची प्रतिज्ञा ही शिक्षणाच्या दृष्टीनें फारच कल्याणप्रद सुधारणा होती. जसजसा काळ लोटत आहे तसतशी ती प्रतिज्ञा जास्त जास्त पूर्ण झालेली दिसून येत आहे. आज मानसशास्त्राचा अभ्यास, आणि विशेषतः बालमनाच्या विकसनाचें ज्ञान देणाऱ्या मानस-

शास्त्रान्तर्गत शाखेचा अभ्यास, हें शिक्षणपेशाच्या तयारीचें अनिवार्य अंग मानतात. आणि मानसशास्त्रावर प्रभुत्व मिळविल्याशिवाय उत्तम शिक्षक होतां येत नाहीं या सिद्धान्तावर आक्षेप घेण्याचें धाडस कोणताही शिक्षणतज्ञ करणार नाहीं.

समाजशास्त्र

समाजशास्त्रांत सामाजिक समूहांचा उगम, विकास, त्यांची घटना व त्यांचे कार्य याविषयीं अभ्यास केलेला असतो. कोणत्याही आधुनिक समाजांत आपणाला विविध प्रकारचे समूह आढळतील. या समूहांत कॉंग्रेस व स्वतंत्र यांसारखे राजकीय पक्ष, शिक्षकसंघ व मजूरसंघटन यांसारखे व्यावसायिक गट, महाराष्ट्रीय मंडळ व क्रिकेट क्लब यांसारख्या रंजननिष्ठ संहति, व गीताधर्ममंडल आणि प्रार्थनासमाज यांसारख्या धर्मपर संघटना यांचा समावेश होतो. कालक्रमानें मानवी समूहांच्या वैचित्र्यांत आणि जटिलतेंत सतत वाढ होत गेली आहे. आणि अधिकाधिक जटिल संघटनांच्या कार्यप्रभावानें मानवी संस्कृतीची उन्नति होत जाउन आज त्या संस्कृतीला बरेचसें स्थिर स्वरूप प्राप्त झालेलें दिसत आहे.

शिक्षकाला समाजशास्त्राच्या अभ्यासाची गरज दोन कारणांसाठीं भासते. एक तर कोणतीहि शिक्षणसंस्था हीहि सामाजिक संघटनाच असते व तिचें कार्य सुरळीत चालावें म्हणून समाजशास्त्राच्या निष्कर्षाचें साहाय्य घ्यावें लागतें. अन्यथा शिक्षणाचें उद्दिष्ट तरुणपिढीला आपली सामाजिक जबाबदारी पेलण्यास समर्थ व्हावी हें असते‘ बालकाला समाजाचा आदर्श घटक बनविण्याचें ध्येय शिक्षणात अध्याहृत आहे. समाजाच्या आदर्श घटकाच्या अंगीं कोणते गुण असावेत, व ते गुण अंगीं बाणण्यासाठीं कोणते उपाय योजावेत याचें दिग्दर्शन समाजशास्त्रात मिळतें. म्हणून शिक्षकाच्या अभ्यासविषयांत समाजशास्त्राला मानाचे स्थान आहे.

व्यक्ति एकत्र ओढल्या जाऊन संघ बनविण्यास प्रवृत्त होतात याचें कारण केवळ सान्निध्य नव्हे, त्याला समानहिताचें अधिष्ठान लागतें. एखादा श्रीमंत पेढीवाला व त्याचा आचारी सन्निध राहत असले तरी त्यांच्यांत मैत्री होणार नाहीं. दोन दूरस्थ पेढीवाल्यांत सख्य झटकन होईल. आपल्या

शेजारी अनेक प्रकारचे लोक राहतात सर्वांशीं आपले सारखेंच रहस्य जमत नाहीं. संगीताची किंवा प्रवचनांची आवड असा समान धर्म असला तर मात्र गट्टी ताबडतोब जमते.

समान हितसंबंधामुळें व्यक्तींची सामाजिक संघटना होते तें तत्त्व तर्काशी सुसंगत असून सहज पटण्यासारखें आहे. पण समाजशास्त्राचा आश्चर्यकारक निष्कर्ष असा आहे कीं विभक्तपणाची भावना हीहि सामाजिक एकोप्याला उपकारक ठरते. असें दिसतें, कीं समाजांतील विविध गटांमध्यें अलगपणाची जाणीव असणें इष्ट आहे, संघटन व विघटन हे घटक समाजकार्यांत परस्परांना पूरक झालेले दिसतात. संघातील व्यक्तींमध्यें समान धर्म असेल तर संघांत इष्टता निर्माण होते; व आपला संघ इतर संघाहून निराळा आहे या जाणीवेनेहि संघांत तशीच दृढता निर्माण होते. आणि सर्व संघांचें सामायिक हित साधण्यासाठीं समान ध्येय जितके आवश्यक असतें, तितकीच आवश्यक, आपापला संघ स्वतंत्रपणें काम करीत आहे, ही जाणीव असते. उदाहरणार्थ, आज महाराष्ट्रांत सर्वत्र दिसून येणारें नाटच-संघ घ्या. नाटचकलेचा उत्कर्ष व्हावा हें सर्वांचें समान उद्दिष्ट आहे. तथापि प्रत्येक संघ नाटचाराधनेंत एकमेकांवर कडी करण्याचा प्रयत्न करीत आहे. सर्व संघांत समान ध्येयाची व विभक्ताची उणीव सारखीच उत्कट आहे. आणि या दोन्ही गुणविशेषांमुळें नाटचकलेचा उत्कर्ष होत आहे.

हिंदुसमाजाचें कार्य जातिसंस्था असूनही अनेक शतकें सुरळीतपणें चालत कसें राहिलें याचें रहस्य आपणांला समाजशास्त्राच्या प्रस्तुत सूत्रांत आढळतें. प्रत्येक वेगळी जात ही जातींतील व्यक्तींचें हित साधून शिवाय एकंदर समाजाच्या उत्कर्षास व स्थिरतेस हातभार लावीत होती. पुढें समाज विस्कळीत होऊन जातीचे हितसंबंध परस्परांस बाधक होऊं लागले तेव्हां जातिव्यवस्थेंतील समाजविघातक दोष उघडकीस आले.

संघटन व विघटन या दोन्हीं प्रवृत्तींना वाव देऊन शालेय संघटना प्रबल केली पाहिजे. शाळेचें एक कार्य संघटनेला उपकारक होणारे विद्यार्थ्यांमधील समान धर्म शोधून वाढीस लावणें हें असावें. संगीत, क्रीडा, वाङ्मय, नाटच इत्यादि विषयांविषयीं आवड असणाऱ्या मुलांना एकत्र येऊन संघ निर्माण करण्याची संधी मिळाली पाहिजे. शाळेमध्यें इयत्तावार

संघ असतात त्यांतील मुलें बहुधा समान वयाचीं असतात. विषम वयांच्या मुलांचे संघ अस्तित्वांत आणण्यासाठीं कुलपद्धतीचा स्वीकार करावा. मंडलें, कुलें यांविषयीं एकनिष्ठा निर्माण करण्यासाठीं मंडलाच्या, वर्गांच्या व कुलांच्या चढाओढी ठेवाव्या. शाळेविषयींच्या आत्मीयतेला बाध येऊं नये म्हणून या सर्व संघाना एकत्र येऊन सहकारानें काम करतां येईल अशा योजना आखाव्या. शाळेविषयी मुलांची निष्ठा आंतरशालेय चढाओढीत भाग घेतल्यानें दृढतर होईल, परंतु या निष्ठेला विकृत स्वरुप येऊं नये म्हणून इतर शाळांबरोबर सहकार्यानें साक्षरता मोहीम, श्रमदान, सफाई यांसारख्या सामाजिक कार्यांत भाग घ्यावा. शाळेनील संघनिर्मितीचा हेतु संघाचा गुणानुक्रमें चढता सोपान तयार करण्याचा असावा. प्रत्येक संघानें आपलें वेगळें अस्तित्त्व, व आपली वेगळी आस्मिता राखावी, पण एकंदर शालेय समाजाच्या हिताशीं असणारा आपला निकटचा संबंध विसरुं नये.

कोणतीही व्यक्ति संघाचा आदर्श घटक व्हावयाची असेल तर आपलें हित व संघहित यांमधील एकरूपता पटली पाहिजे. चांगल्या व्यक्तिवांचून चांगला समाज निर्माण होऊं शकत नाहीं, व समाज चांगला नसेल तर त्यांत चांगली व्यक्ति टिकाव धरुं शकत नाहीं. अशा रीतीनें चांगली व्यक्ति व चांगला समाज परस्परांच्या अस्तित्वास मारक नसून पोषक असतात. याशिवाय आदर्श संघघटकाच्या अंगी आपल्या बांधवांशीं खेळीमेळीनें वागण्याची कला असली पाहिजे. या कलेचें मूळ जबाबदारीची जिवंत जाणीव हें होय. स्वतःचें हित व समाजहित यांत जेव्हांजेव्हां संघर्ष असेल तेव्हां तेव्हां स्वहितावर तिलांजली देण्याची तयारी असली पाहिजे.समाजातील इतर घटकांच्या हिताला बाध न आणता आपलें सर्व व्यवहार व्यक्तीनें चालविलें पाहिजेत. धूळ बसावी म्हणून आपल्या दारासमोर पाणी शिंपावें, पण शिंपतांना तें येणाराजाणारांच्या अंगावर उडणार नाहीं अशी खबरदारी घ्यावी. तसेंच फाजील पाणी सांडून रस्त्यावर चिखल करूं नये. भूक लागली असेल तर केळें खावें, पण दुसऱ्याचे दांत पडतील अशा रीतीनें केळ्याची साल रस्त्यावर टाकूं नये.

पण अशीं अकरणरूप खबरदारी घेतली म्हणजे आदर्श नागरिकत्व अंगी बाणलें असे नव्हे. समाजाच्या घटकानें समाजहित साधण्यासाठीं

साक्षेप केला पाहिजे. दुसऱ्यानें रस्त्यावर टाकलेलें केळ्याचें साल अर्पण उचलून केराच्या पेटींत टाकलें पाहिजे. रस्त्यावर खड्डा पडून पाय मुरगळ-ण्याची भीति उत्पन्न झाली असेल तर तो बुजवून टाकण्यास पुढें सरसावलें पाहिजे. अंगमेहनत करून आणि बुद्धीचा उपयोग करून इतरांच्या सह-कार्यानें समाजाच्या उत्कर्षासाठीं झटलें पाहिजे. देशांतील प्रचलित समाज-विकासयोजनांतून हाच धडा नागरिकांना देण्याचा प्रयत्न चालू आहे. 'श्रम-दान, साक्षरतामोहीम यांचाहि प्रपंच एवढ्याचसाठीं आहे कीं करणरूप समाजनिष्ठा भारतीयांच्या आचारांत साकार व्हावी. आदर्श नागरिक अशा रीतीनें केवळ इतरांस उपद्रव न देण्यांत इतिकर्तव्यता मानीत नाहीं तर तो समाजाचें अल्पतम कां होईना पण प्रत्यक्ष हित साधण्यासाठीं झटत राहतो.

एवंगुणविशिष्ट नागरिक शाळेंत तयार व्हावे अशी आपली इच्छा असेल तर शाळेची पुनर्घटना करावी लागेल. चढाओढीवर आधारलेल्या पद्धतीच्या जागीं सहकार्यावर आधारलेली पद्धत स्वीकारली पाहिजे. भयप्रेरित शिस्त जाऊन तिचें स्थान आत्मसंयमानें घेतलें पाहिजे.

आवश्यक विषयांनीं भरलेला ठराविक अभ्यासक्रम बदलून निवडीला भरपूर वाव देणारा व्यापक अभ्यासक्रम आंखला पाहिजे. असे केलें तरच बालकांची आत्मोद्धाराची आकांक्षा जागृत होऊन शिक्षण-कार्याला उपकारक होईल. सारांश, शाळेचा कायापालट होऊन ती बालकांचें नगर बनली पाहिजे, तरच आत्मज्ञान, आत्मगौरव व आत्मसंयम या गुणांची साधना करून सर्व बालक समायोजानाची वर्धिष्णु शक्ति संपादन करण्याच्या उपक्रमांत हिरीरीनें भाग घेतील.

समाजशास्त्रज्ञांना असें आढळून आलें आहे कीं, मानवी संस्था या साधारणतः पुराणपूजक असतात; आणि या वृत्तीमुळें विद्यमान सामाजिक परिस्थितीशी त्यांचा विसंवाद निर्माण होतो. शाळा तर फारच पुराणानुयायी असतात. युरोपांत एके काळीं ग्रीक व लॅटिन या भाषा व्यवहारोपयोगी असल्यामुळें दुय्यम शाळांतील अभ्यासक्रमांत त्यांना महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें; परंतु या भाषा व्यवहारांतून निघून जाऊन निरुपयोगी बनल्या तरी त्यांचे अभ्यासक्रमांतील स्थान मात्र कायमच राहिलें. आपणांस जें येतें तेंच शिकवावें असें शिक्षकांस वाटणें मनुष्यस्वभावास अनुसरून आहे. याचा परि-

णाम असा होतो कीं आज शाळांतून जें शिक्षण मिळतें ते पन्नास वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीस अनुसरून असतें. संस्था व समाज यांमधील हा काल-भेद प्रयत्नपूर्वक दूर केला पाहिजे. भौतिक शास्त्रें व अर्वाचीन भाषा यांचा अभ्यासक्रमांत समावेश करण्यास युरोपांतील दुय्यम शाळांनीं केलेला विरोध त्या शाळांस भूषणावह खास नाहीं. पुराणप्रियतेंतून उद्भवणारी ही गति-विमुखता शाळांनीं प्रयत्नपूर्वक टाकली पाहिजे, आणि समाजाच्या बदलत्या गरजांस अनुसरून अभ्यासक्रमांत व अध्यापनपद्धतींत सुधारणा करीत राहिलें पाहिजे.

तसेंच गुन्हेगारी, दारिद्र्य, शारीरिक व मानसिक विकृति यांचें निराकरण करण्याच्या मोहिमेंत शाळांनीं अग्रेसर राहिलें पाहिजे. वैद्यक-शास्त्राची आतां इतकी प्रगति झाली आहे कीं कठीण रोगहि बालपणीं उघडकीस आले तर बरे होऊं शकतात. योग्य कालांतरानें सर्व विद्यार्थ्यांची सर्वंकष वैद्यकीय तपासणी करून रोग उघडकीस आणण्याचें काम शाळा करूं शकतील. वैद्यकीय तपासणींचें महत्त्व अजून आपल्या शाळांना उमजलें नाहीं; म्हणून पुष्कळ शाळांत त्या तपासणीचें तांत्रिक सोंग करतात. तसेच वैद्यकीय तपासणींत दिसून येणाऱ्या दोषांवर तावडतोब उपाययोजना करण्याचें महत्त्व आपल्या समाजास अजून पटलें नाहीं. शारीरिक रोगांच्या निवारणाच्या मोहिमेचें अंग म्हणून संपन्न पाश्चात्य देशांत मुलांना चष्मे व पादत्राणें, दूध व जेवण हीं पुरविलीं जातात. त्यांचें अनुकरण करणें सांपत्तिक टंचाईमुळें आपणांस शक्य नसेल; पण नुसती वैद्यकीय तपासणी झाली व उघडकीस आलेल्या दोषांवर कांहीं उपाययोजना झाली नाहीं तर त्या तपासणीचा उपयोग तरी काय ?

समाजमानसशास्त्राच्या मतें गुन्हेगारी व मानसिक विकृति यांच्या उगमाचें बीज सदोष संगोपन व अनिष्ट परिस्थिति यांत आढळतें. बाल-वयांत प्रेम व सुरक्षितता यांची वाण पडली तर मानसिक विकृति निर्माण होते. तसेच जीवनाच्या आवश्यक गरजाहि पुऱ्या न झाल्यामुळें कांहीं लोक गुन्हे करण्यास प्रवृत्त होतात. पालक व सरकार यांच्या मदतीशिवाय शाळेला या क्षेत्रांत फारसें काम करतां येणार नाहीं. तरीसुद्धां या बाबतींत शाळेचें कार्य गौण म्हणतां येणार नाहीं. शाळेनें सर्व विद्यार्थ्यांस समान व न्याय्य

वागणूक द्यावी, प्रत्येक बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची बूज राखावी आणि अशा रीतीनें प्रत्येक बालकाच्या हृदयांत सुखाची व प्रतिष्ठेची जाणीव निर्माण करावी. ही जाणीवच मानसिक विकृति व गुन्हेगार प्रवृत्ति यांपासून बचावाचें अमोघ साधन आहे.)

औद्योगिक क्रांतिमधून संपत्तीला अवास्तव महत्त्व देण्याची वृत्ति निर्माण झाली. या वृत्तींतून निर्दयपणें शोषण करण्याचे मार्ग निघून बहुजन-समाज दरिद्री झाला. या अनर्थपरंपरेचें निर्मूलन करण्यासाठीं शाळेनें योग्य नीतिमूल्यांचें बीजारोपण मुलांच्या मनांत केलें पाहिजे. अन्यायानें परशोषण करण्याच्या वृत्तीविषयी त्यांच्या मनांत घृणा निर्माण झाली पाहिजे. तसेंच अन्यायानें मिळालेल्या लाभाचा उपभोग घेणें हेंहि त्यांना तिरस्कारार्ह वाटलें पाहिजे. शारीरिक स्वास्थ्याचें महत्त्व मान्य करूनहि आध्यात्मिक श्रेयाचें महत्त्व वरचढ आहे ही जाणीव मुलांस झाली पाहिजे. अशा रीतीनें शाळेनें मुलांचीं मनें सामाजिक क्रांतीस अभिमुख केलीं पाहिजेत.

## जीवशास्त्र

जीवशास्त्र हें सर्व सजीव प्राण्यांना समान लेखतें. सर्व प्राण्यांना एक-सूत्रानें बांधणाऱ्या गुणविशेषणांचा अभ्यास हा जीवशास्त्राचा विषय होय. या शास्त्राच्या मतें मानव हाहि एक प्राणीच असून तो उत्क्रांतिप्रक्रियेंतील सर्वांत अलीकडची निर्मिति आहे. क्षुद्रतम परमाणूपासून अत्युच्च मानवी मनापर्यंत सर्व सृष्टी एकरूप आहे असें जीवशास्त्र धरून चालतें. मानवाच्या ज्या अत्युच्च शक्ती आहेत त्यांची बीजेंसुद्धां उत्क्रांतिसोपानाच्या तळच्या पायऱ्यांवरील प्राण्यांच्या जीवनांत कशीं दिसून येतात तें जीवशास्त्र दाखवून देतें. उत्तरोत्तर अधिकाधिक प्रभावी शक्ति निर्माण करणारी उत्क्रांतीची प्रक्रिया ही जीवनप्रक्रियेचा एक महत्त्वाचा विशेष आहे. मानवी जीवनांत जास्त जटिल समस्यांना तोंड द्यावें लागतें, व तसें तोंड देण्याचीं साधनें निसर्गानें त्याला उपलब्ध करून दिलीं आहेत, या दोन गोष्टींवर मानवी श्रेष्ठता आधारलेली आहे,

मानवाचे जीवशास्त्रीय गुणविशेष हे त्याच्या परिस्थितीशीं समायोजन करून घेण्याच्या वर्धिष्णु सामर्थ्याचें द्योतक आहेत. शिक्षणाचा हेतु समा-

योजनाची प्रक्रिया द्रुततर व सर्वांगपरिपूर्ण करण्याचा असतो. म्हणून शिक्षकाला मानवाच्या जीवशास्त्रीय गुणांचें ज्ञान उद्‌बोधक झाल्यावांचून राहणार नाहीं.

मानवाचा पहिला विशेष हा आहे कीं त्याचा वरचा मेंदू खालच्या मेंदूपेक्षां आकारानें मोठा असतो. प्राण्यांचें निरीक्षण केलें असतां असें आढळतें कीं सर्व उच्च श्रेणींतील प्राण्यांचा कल वाढत्या आकाराचा ऊर्ध्वमेंदु संपादन करण्याचा असतो. अधरमेंदु अविमर्श क्रियेचें नियंत्रण करतो व ऊर्ध्वमेंदु सविमर्श क्रियेचें नियंत्रण करतो. यावरून उत्क्रांतीची प्रक्रिया सहजप्रवृत्त वर्तनाकडून विचारोत्पादित वर्तनाकडे वाटचाल करीत असलेली दिसते. मानवी जीवनांत अविनित वागणुकीचें स्थान अत्यंत गौण आहे. मानव ज्या जटिल परिसरांत वाढतो त्यांत विचारपूर्वक केलेल्या वर्तनाचाच निभाव लागूं शकेल. विचारपूर्वक वर्तन करण्याची शक्यता ऊर्ध्व मेंदूच्या वाढत्या आकारामुळें निर्माण झाली आहे. शिक्षणानें या शक्यतेचा फायदा घेऊन मुलाना सारासार विवेक करूनच वर्तन करण्याचें वळण लावलें पाहिजे सहजप्रवृत्त प्रतिक्रिया थोपवून धरावी; पूर्वानुभवांवरून त्या प्रतिक्रियेची ग्राह्याग्राह्यता ठरवावी व तींत इष्ट तो फरक करून मगच प्रतिक्रिया करावी. ही शिकवणूक मुलांस दिली पाहिजे, ऊर्ध्वमेन्दूचा वाढता आकार असें दर्शवितो कीं उच्चतर जीवनास शिक्षण आवश्यक आहे, व मानवाचें भागधेय उच्चतर जीवन कंठण्याचें असल्यामुळें तो शिक्षणक्षम आहे. अशा रीतीनें शिक्षणाची आवश्यकता मानवी प्रकृतींतूनच सिद्ध होते व शिक्षण म्हणजे बालकावर बळजवरीनें बाहेरून लादलेलें दडपण आहे असा जो गैरसमज क्वचित आढळतो त्याचें निरसन होतें.

या निष्कर्षाला दुसऱ्या एका गुणविशेषामुळें बळकटी येते तो विशेष मानवी अपत्याचें प्रदीर्घ बालपण होय. मानवी अपत्य जन्मत: अत्यंत अवश असतें, व या अवशावस्थेंतच त्याला बराच काळ कंठावा लागतो. म्हणून मानवी अपत्यांना पितरांचें संरक्षण व मार्गदर्शन हवें असतें. या आवश्यकतेतून कुटुंबसंस्थेचा व नीतिशास्त्राचा संभव झालेला आहे. बालकाच्या प्रदीर्घ बालपणांतून निघणारा निष्कर्ष हा आहे कीं जीवनाचा प्रवास स्वत:च्या जबाबदारीवर सुरू करण्यापूर्वीं त्याला दीर्घकाल उमेदवारी करावी लागते व

शिक्षण घ्यावें लागतें. जास्त जटिल जीवन कंठण्याची जबाबदारी निसर्गाने मानवावर टाकली असल्यामुळें ती जबाबदारी पार पाडण्यासाठीं लागणारे शिक्षण मिळविण्याची तजवीजही निसर्गाने प्रदीर्घ बालपणाच्या रूपात करून ठेवली आहे. बालपण हा शिक्षण घेण्याचा काळ होय अशी निसर्गाची योजना असल्याचें अशाप्रकारें सिद्ध होते.

आणखी एक उल्लेखनीय विशेष हा आहे कीं मानवी मनाचे व्यापार मेंदूच्या द्वारा चालतात. म्हणून मेंदूचे संवेदनक्षेत्र व क्रीयाक्षेत्र याचा विकास घडवून आणणें हें शिक्षणाचें अवश्य अंग गणलें पाहिजे. अशिक्षित लोकांच्या मेंदूत मानसशास्त्रज्ञांना अविकसित क्षेत्रखंड आढळले आहेत. हें विकसनाचें कार्य मेंदूतील मज्जापेशी विकसनक्षम असेपर्यंतच म्हणजे वयाची अठरा वर्षें पूर्ण होण्याचे आंत केलें पाहिजे. आणखी एक निष्कर्ष असा कीं शिक्षणाचा काल त्रुटित करणें इष्ट नव्हे. कारण उर्ध्वमेंदूचा जो भाग विचार कल्पनादि उच्चतर मनोव्यापारांचें अधिष्ठान आहे त्याचा पूर्ण विकास कुमारवयाच्या अंतापर्यंत म्हणजे एकुणिसाव्या वर्षापर्यंत होत नाहीं.

जीवशास्त्राच्या मतें मानवाचे पुढील गुणविशेष त्याच्या श्रेष्ठत्वास साधनीभूत झालेले आहेत. उन्नतमुख अंगस्थिति, आंगठा व बोटें यांच्या विशिष्ट रचनेने युक्त असे हात, आणि स्वरयंत्र. या विशेषावरून आधुनिक शिक्षणयोजनांत भाषाशिक्षण, कलाकसबांचे शिक्षण, व ललित अंगविक्षेपांवर भर देणारें शरीरशिक्षण यांना महत्त्वाचें स्थान कां देतात तें स्पष्ट होतें. शिक्षण हें मानवी अधिगमांत पूर्णत्व आणण्याचा प्रयत्न करीत असतें म्हणूनच मानवाला प्राणिश्रेष्ठ ठरविणारे जे गुणविशेष, त्यांच्या विकासावर शिक्षणांत भर देतात.

जीवशास्त्रावरून होणारा आणखी एक बोध हा आहे की बालकांच्या अंगीं कांहीं गुण व शक्ति उपजत असतात आणि या उपजत गुणांना व शक्तींना अनुसरून बालकांत व्यक्तिवैचित्र्य दिसून येतें. शिक्षणाची योजना हें वैचित्र्य जमेस धरूनच केली पाहिजे. एकाच प्रकारचें शिक्षण सर्व मुलांना पेलणार नाहीं व उपकारक होणार नाहीं. जन्मतःच बालकाला गुणविशेषांची देणगी देऊन निसर्गानें त्याच्या विकासाचा आराखडा ठरविलेला असतो.

शिक्षणाचें कार्य तो आराखडा शोधून काढून त्याची पूर्तता करण्याचें असतें. म्हणून शिक्षण हें व्यक्तिनिष्ठ असावें. सर्व मुलांकडून सारख्याच अधिगमाची अपेक्षा करणें, वा सर्वांनी सारख्याच गतीनें ज्ञानार्जन करावें अशी अपेक्षा करणें अयोग्य होय. प्रत्येक बालकाला त्याचे गुणविशेष व त्याच्या गरजा यांना अनुरूप अशा प्रकारचें व अशा मर्यादेपर्यंत शिक्षण पुरविण्यांतच शिक्षण योजनेची सार्थकता आहे.

****

## ५ :

# व्यक्ति कीं समाज ?

****************************

शिक्षणाच्या उद्दिष्टांत व्यक्तिहिताला प्राधान्य द्यावें कीं समाजहिताला हा वाद जुना व अटीतटीचा आहे. एका बाजूला प्रकृतिवादाच्या पुरस्कर्त्यांचा आग्रह आहे कीं व्यक्तीची उन्नति हेंच शिक्षणाचें उद्दिष्ट असावें. शिक्षणानें व्यक्तिमात्रांत बीजावस्थेंत असणाऱ्या गुणविशेषांची व शक्तींची पूर्ण वाढ व्हावी, आणि त्यायोगें व्यक्तीचे जीवन पूर्ण व समृद्ध व्हावें. व्यक्ती जरी समाजांत राहात असली तरीं व्यक्तीच्या जीवनाचें समाजजीवनापासून अलग असें स्वतंत्र वैशिष्टय असतें, व तें साधून देण्याचें काम शिक्षणाचें आहे. उलट अध्यात्मवादी म्हणतात कीं, समाजहित साधणें हाच शिक्षणाचा हेतु असावा. प्रत्येक व्यक्ति समाजाचा घटक असते; आणि घटक या नात्यानेंच फक्त तिच्या अस्तित्वाला महत्त्व असतें. म्हणून शिक्षणाचें कार्य उत्तम नागरिक म्हणजेच आदर्श-समाजघटक तयार करणें हें असावें; समाजहितावेगळें दुसरें मूल्यच या मताचें प्रतिपादन करणाऱ्यांना मान्य नाही.

या वादाचा उगम विरोधी जीवनमूल्यांतून झालेला आहे. प्राचीन कालापासून आदर्श जीवनाचीं दोन विसंवादी ध्येयें प्रचलित आहेत. ' ऋणं कृत्वा घृतं पिब ' असा उपदेश करणारी भोगवादी विचारसरणी उपभोग हेंच जीवनाचें इतिकर्तव्य मानते. उलट ' न हि कामस्तु कामानाम् उपभोगेन शाम्यति ' अशी सूचना देणारी त्यागवादी वृत्ति विलासांना तुच्छ लेखते. अर्थातच भोगवादी व्यक्तिनिष्ठ मूल्यें स्वीकारतो; उलट त्यागवादी जनहिताचें साधन एवढेंच व्यक्तिजीवनाचें महत्त्व मानतो. या परस्परविरोधी जीवननिष्ठांमधून शिक्षणाचीं व्यक्तिनिष्ठ व समाजनिष्ठ उद्दिष्टें निघालीं आहेत.

इतकेंच नव्हे तर या विरोधाचें मूळ मानवी स्वभावाच्या प्रकृतिसिद्ध द्विधावृत्तींतच आढळतें. मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे असें म्हणतात, आणि या विधानांत बरेंच तथ्यही आहे. कारण मनुष्यमात्राला खरोखरच आपल्या बांधवाचा सहवास प्रिय व हवासा वाटतो. परंतु मनुष्य हा पराकाष्ठेचा आत्मलक्षी प्राणी असतो हा निष्कर्षही तितकाच खरा आहे. आपल्या भावनांचा, विचारांचा, आकांक्षांचा, असा एक भाग असतो कीं ज्याचें केन्द्र आपलें व्यक्तित्व हेंच असतें. त्या भागापुरती समाजाची भूमिका आपल्या महत्त्वाकांक्षा व्यक्तित्वाच्या धीरोदात्त प्रदर्शनासाठीं आवश्यक असणारी रंगभूमि एवढीच असते. उलटपक्षी जीवनांत कांहीं प्रसंग असे असतात कीं ज्यावेळीं आपण इतर व्यक्तींच्या हिताविषयीं खरीखुरी निस्वार्थ आस्था दाखवितों, त्यावेळीं त्यांचें व्यक्तिमत्त्व उठून दिसावें म्हणून स्वत: गौण भूमिका स्वीकारतों. मानवाची अहंकारी वृत्ति शिक्षणाच्या व्यक्तिनिष्ठ उद्दिष्ठाला पोषक असून, त्याची परोपकारी वृत्ति समाजनिष्ठ उद्दिष्टाला पोषक आहे.

व्यक्तिनिष्ठ उद्दिष्टांच्या पुरस्कारार्थ असा मुद्दा मांडतात कीं समाजाला मन नसतें, वळण फक्त व्यक्तीच्या मनाला देतां येते. व्यक्तिगत मनाची सुधारणा करीत राहणें इतकेंच कार्य शिक्षणाच्या आटोक्यांतील आहे. समाजहिताच्या उद्दिष्टाची जरी तात्त्विक मांडणी केली तरी त्याची साधना व्यक्तिहिताच्या ओंजळीतूनच करावी लागेल; कारण अन्य पर्यायच उपलब्ध नाहीं. समाजहितबुद्धीची जाणीवही व्यक्तिगत अन्त:करणांतच निर्माण करावी लागते. समाज हा शब्द आपल्या वाणींत व लेखनांत अघळपघळपणें योजला जात असला तरी त्याचा अभिप्रेत अर्थ एकत्र आलेल्या अनेक भिन्न व्यक्ति असाच असतो.

या युक्तिवादाच्या समर्थनार्थ इतिहासाची ग्वाही देतात. इतिहास म्हणजे थोर पुरुषांची चरित्रपरंपरा होय, जें जें कांही समाजहितपर कार्य झालेलें आहे तें तें सर्व आदर्श व्यक्तींच्या हातानींच होय. सॉक्रेटिस, बुद्ध, ख्रिस्त, यांसारखे तत्त्वज्ञ; होमर शेक्सपिअर, टागोर, यासारखे लेखक; मार्क्स्, ऑरेलिअस्, अशोक, लिंकन यांसारखे शासक; आणि पाश्चर, बोस, आइन्स्टीन यांसारखे शास्त्रज्ञ; यांची कामगिरी मानवी संस्कृतीतून वजा करा, व काय शिल्लक राहते तें सांगा. व्यक्तींचे स्वयंप्रेरित प्रयत्न हे

मानवी हिताचें एकमेव उगमस्थान आहे. अर्थातच व्यक्तिमात्राचा जास्तींत जास्त उत्कर्ष साधणें हेंच शिक्षणाचें उद्दिष्ट आपोआप ठरतें.

तसेच घटकरूपाने समाजरचनेस साहाय्यभूत होणें एवढेंच केवळ व्यक्तीचे विधिलिखित कार्य नव्हे. समाजजीवनाचें जें कांहीं आवाहन त्याच्या कडून होईल त्या व्यतिरिक्त मानवाची व्यक्तिविशिष्ट गुणवत्ता असते. आपल्या भवितव्याचा तो स्वायत्त विधाता असतो, आणि निसर्गदत्त गुणांच्या पायावर जी कांहीं व्यक्तित्वाची इमारत तो रचतो त्याचें उत्तरदायित्व त्याच्यावरच असतें. उपनिषदांतील गूढ विद्येंत रंगून जाणारा अभ्यासक किंवा वनांतील गुहेत आत्मचिंतन करणारा योगी समाजाचें कांहीं हित साधीत नसेल. तथापि दोघांचीही आकांक्षा निषेधार्ह खास नाहीं. आणि तिच्या पूर्तीची पूर्वतयारी करून देणें हें शिक्षणाचें आवश्यक कार्यच म्हटलें पाहिजे. जर व्यक्तीचें सुख व व्यक्तीचा संतोष समाजास अपाय न करतां साधत असतील तर अशी सुखी व संतुष्ट व्यक्ति घडविणें हेंही शिक्षणाचें एक स्पृहणीय साध्य म्हणावयास हरकत नाहीं. व्यक्तिजीवनाचें अशीं कांहीं अंगें असतात कीं त्यांना सामाजिक महत्त्व नसतें, तथापि त्या अंगांना आकार देणें हेंहि शिक्षणाचें विहित कर्मच होय.

समाजनिष्ठ उद्दिष्टाचे पुरस्कर्ते म्हणतात, कीं ज्या व्यक्तिमत्त्वाचा एवढा उदोउदो केला जातो तें सामाजिक जीवनांतूनच घडविलेलें असतें. बालकाच्या जन्मकालीं त्याचें शरीर जितकें विवस्त्र असतें तितकेंच मनही असतें व आईबाप ज्याप्रमाणें शरीराला वस्त्रें पुरवितात, त्याचप्रमाणें समाज मनाला वस्त्रें पुरवितो. सामाजिक परिसराविरहित मानवी जीवनच असंभनीय आहे, आणि प्रत्येक मानवी हित हें समाजहिताशी निगडित असतें. संगीतप्राविण्यासारखी अपूर्व व्यक्तिगत देणगी ही समाजाच्या कोंदणावाचून असफल होते. व्यक्तिहित साधूं जाणें म्हणजे आभासाची साधना करूं पाहणें होय.

समाजाचे उपकर्ते म्हणून ज्या थोर व्यक्तींचा निर्देश केला जातो त्यांचें थोरपण समाजनिर्मित असतें. अशा व्यक्ती म्हणजे उदात्त मानवी परंपरांच्या प्रवाहांतील लाटा होत. या उदात्त परंपरांतून ज्या सामाजिक जीवनाचा साक्षात्कार होतो तें किती उदात्त, समृद्ध व चिरंतन आहे !

आणि त्याच्याशीं तुलना करतां व्यक्तिजीवन हें किती हीन, अकिंचन आणि त्रुटित आहे ! जर व्यक्तीच्या हिताचा विचार कर्तव्यच असेल, तर विचारांती असें दिसून येईल कीं व्यक्तीचे खरें हित समाजजीवनाच्या प्रवाहांत आपलें जीवन विलीन करण्यानेंच साधतें.

समाजाचें स्थैर्य व्यक्तींच्या अनुरोधावर अवलंबून असते हेंही विसरून चालणार नाहीं. ज्या बंडखोर व्यक्ति सामाजिक परंपरा भंगून टाकूं पाहतात, त्या आपल्या या साहसानें अनेक शतकांच्या कष्टांनीं उभारलेल्या मानवी संस्कृतीला धोका निर्माण करतात. मानवी संस्कृतीचा विध्वंस होऊं न देणें ही जबाबदारी शिक्षणाची आहे. म्हणजेच शिक्षणाचा हेतु समाजाला बळकटी आणणें हा असला पाहिजे.

अशा रीतीनें या वादांतील दोन्ही पक्ष आत्मसमर्थनार्थ कोटिक्रम करीत असतात, व्यक्तीचें हित व समाजाचें हित यामध्ये मूलगामी असंधेय विरोध आहे असें दोन्ही पक्ष धरून चालतात. जर व्यक्तीची आकांक्षा अविवेकी असेल तर विरोध अपरिहार्य आहे. जेव्हां एखादा अकुशल खेळाडू कूटनीतीनें संघाचा नायक होऊं पाहतो, किंवा एखादा अनाचारी नागरिक नगरपालिकेच्या अध्यक्षपदाची लालसा धरतो तेव्हां त्यांचें हित हें उघडच समाजहिताला विघातक असतें. उलटपक्षी प्रगतिविन्मुख समाज व्यक्तींच्या विकासाला पायबंद घालतो. तत्कालीन समाजाच्या शास्त्रविरोधी दुराग्रहामुळें गॅलिलीओचें संशोधन संकुचित झालें, तर अमेरिकेंतील उपक्रमशील साहसी समाजाकडून एडिसनच्या संशोधक बुद्धीला अपरिमित उत्तेजन मिळालें. चीन व भारत यांतील गतानुगतिक समाजांनीं अनेक शतकेंपर्यंत व्यक्तींच्या कर्तृत्वाची पातळी उंचावूं दिली नाहीं.

पण असें होणें अपरिहार्य नाहीं. सामान्य परिस्थितीत समाज व व्यक्ती यांचा एकमेकांवर पडणारा प्रभाव परस्परांना उपकारकच असतो. सॉक्रेटिस, ख्रिस्त किंवा महात्मा गांधी यांच्यासारख्या व्यक्तींच्या कर्तबगारीनें सामाजिक जीवनाची पातळी उंचावते. आणि या उंचावलेल्या सामाजिक जीवनामुळें नंतर येणाऱ्या व्यक्तींचें कर्तृत्व जास्त उंची गाठूं शकतें. व्यक्ति व समाज यांच्या एकमेकांवर पडणाऱ्या अशा उन्नतीकारक प्रभावानें मानवी संस्कृतीला आजचें उदात्त स्वरूप प्राप्त झालें आहे. मानवी इतिहासांत

समाज व व्यक्ती यांचा संघर्षाचे व म्हणून रुद्ध प्रगतीचे कालखंडही आढळून येतात; पण ते अपवादात्मक होत.

व्यक्तिहित व समाजहित यांचा समन्वय घडवून आणण्यासाठीं व्यक्तिमत्वाची व्याख्या समंजसपणानें केली पाहिजे. सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवणें हा गुण व्यक्तिमत्वाच्या आलेखांत अन्तर्भूत केला पाहिजे. लोकांचा अपमान करणारा व लोकांवर जुलमी सत्ता गाजविणारा उपद्रव-कारक आत्मगौरव साधणें म्हणजे व्यक्तिमत्वाचा खरा विकास नव्हे. समाजाच्या जास्तीत जास्त उपयोगी पडण्याची शक्ति मिळविणें म्हणजेच खरा आत्मविकास होय. आत्मविकासांत जशी सर्व उपजत गुण व शक्ति पूर्णत्वास नेण्याची आकांक्षा समाविष्ट आहे तशीच त्या पूर्णत्व पावलेल्या गुणांचा व शक्तींचा उपयोग समाजहिताचें साधन म्हणून वापरण्याची दीक्षाही पाहिजे. शिक्षणानें एवंगुणविशिष्ट व्यक्ति तयार झाल्या तर समाजहित साधण्यासाठीं वेगळा खटाटोप करण्याचें कारण नाहीं. कारण ज्याप्रमाणें व्यक्तीचा मोठेपणा समाजाच्या कोंदणांतच आकार घरूं शकतो, तसेच समाजहितहि दीक्षीत व्यक्तींच्या स्वयंस्फूर्त कर्तृत्वावांचून सिद्ध होत नाहीं. म्हणूनच शिक्षणाचें उद्दिष्ट अशा रीतीनें व्यक्तिमात्राला आत्मविश्वासाला वाव देण्याचें असावें, कीं ज्यायोगे कोणतीहि निसर्गदत्त शक्ती वन्ध्य राहणार नाही. तर पूर्णत्व पावून आपल्या प्रभावानें व्यक्तीला कीर्ति मिळवून देईल व समाजाच्या सुखांत व स्वास्थ्यांत भर टाकील.

थोर पुरूषांच्या चरित्रांत आत्मविकासाच्या या परलक्षी ध्येयाचा प्रत्यय येतो. सॉक्रेटिस, बुद्ध, ख्रिस्त व महात्मा गांधी या व्यक्ती जगद्वंदित आहेत. आणि या सर्वांचें मोठेपण मानवजातीचें कल्याण साधण्याच्या ध्येयांतूनच प्राप्त झालेलें आहे. डॉ. आल्बर्ट श्वाइट्झर या विद्यमान थोर पुरुषाच्या चरित्रापासूनही आपणाला हाच धडा मिळतो कीं व्यक्तिमत्वाचा खरा विकास निस्वार्थ लोकसेवेंत होतो; आकुंचित वृत्तीने केलेल्या स्वार्थ-साधनांत होत नाहीं.

६ :

# व्यक्तिमत्त्वाचा विकास

************************************

व्यक्तिमत्त्वाचा विकास हें शिक्षणाचे एकमेव उद्दिष्ट असावें असें मत शिक्षणविषयक वाङमयांत आग्रहाने मांडलेलें आढळतें. व्यक्तिमत्त्वाच्या व्याख्येविषयीं ओझरतें दिग्दर्शन मागील प्रकरणांत आलेंच आहे. तथापि हा आग्रह धरणारांच्या मतें व्यक्तिमत्त्वाचें स्वरुप काय आहे याचा जरा सविस्तर उहापोह करणें योग्य होईल. व्यक्तिमत्त्वाच्या योगाने एक व्यक्ति इतर व्यक्तींपासून वेगळी असल्याचें दिसतें; या वेगळेपणांत सहज उठून दिसणारा भाग शरीरविषयक असतो; म्हणून व्यक्तिमत्व घडविणाऱ्या शारीरिक भेदांचा आधीं विचार करूं.

रूप, कान्ति, उंची व ज्ञानेन्द्रियांची तीक्ष्णता हे व्यक्तीच्या शरीराचे महत्त्वाचे गुण होत. हे सर्व गुण निसर्गदत्त असतात आणि प्रयत्न करूनही त्या गुणांत महत्त्वाचा फरक होऊं शकत नाहीं. ज्या पुरुषापाशी रूप सुन्दर असेल, कान्ति केतकीसारखी असेल, उंची भव्य असेल व इन्द्रियें कार्यक्षम असतील, त्यास याहून कमी शरीरगुण असणाऱ्या व्यक्तीपेक्षां श्रेष्ठत्व आपोआप प्राप्त होतें यांत शंका नाहीं. आणि हें श्रेष्ठत्व आमरण टिकणारें व मानवी उपायांनीं दूर न होणारें असतें.

पण शिक्षणाला अशा अविकार्य गुणांशी कांहीं कर्तव्य नाहीं. शिक्षणाचे लक्ष्य ते विकारी गुण असतात, कीं जे सुयोजित विनयनामुळें सुडौल आकार धरूं शकतात. रूप, कान्ति इत्यादि अस्वाधीन शरीरगुणांकडे दुर्लक्ष करून आरोग्य, सामर्थ्य व लालित्य या प्रयत्नसाध्य गुणांनीं प्रत्येक बालकाचें शरीर अलंकृत असावें असा प्रयत्न शिक्षण करतें. प्रत्येक बालकाचे शरीर त्या त्या शरीराच्या मगदुराप्रमाणें उत्तम कार्यक्षम स्थितींत ठेवणें हें

शिक्षणाचे कार्य आहे. त्यासाठीं निरोगी कसें राहावें याचें शिक्षण दिलें पाहिजे. अन्नाचा कस व त्याचें परिमाण सुविहित ठेवलीं पाहिजेत, व सुललित हालचाली करण्याची कला शिकवली पाहिजे. कुरूप अवयव दूषणीय नव्हेत, पण मलिन मुख दूषणीय आहे; बूटकेपणा लांछनास्पद नाहीं, पण गबाळेपणा आहे; शरीर दुर्बल असणें हें कमीपणाचें नाहीं, पण गबाळेपणा आहे. शरीर दुर्बल असणें हें कमीपणाचें नाहीं, पण तें रोगग्रस्त असणें कमीपणाचें आहे. कारण हे सर्व उपरोक्त दोष परिहार्य आहेत. व ते व्यक्तींत आढळणें याचाच अर्थ शारीरिक व्यक्तित्त्वाची जोपासना नीट झाली नाहीं असा होतो.

व्यक्तिमत्वाच्या मानसिक विभागांत चतुर्विध उपजत गुणांचा समावेश होतो. क्षुधा, क्रोध, आत्मगौरव, कामवासना इत्यादि सहजप्रवृत्तींचा मिळून त्यापैकीं एक गुण होतो. कांहीं सहजप्रवृत्ति जन्मापासून कार्यप्रवण असतात. कांहीं वयोमानानुसार आविर्भूत होतात. सर्व सहजप्रवृत्तींचा जोर सर्व मुलांत सारखा नसतो. प्रत्येक बालकांत एखादी सहजप्रवृति प्रबळ असते. इतर त्या मानानें कमी जास्त प्रभावी असतात. अशा रीतीनें सहजप्रवृत्तींच्या संहतीच्या आलेखांत अगणित वैचित्र्य दिसून येतें. सहजप्रवृत्ती शिक्षणदृष्टचा महत्वाच्या आहेत. कारण आपल्या परिसराचें संशोधन करून त्यांतील विविध घटकांशीं संबंध प्रस्थापित करण्याची प्रेरणा बालकाला सहजप्रवृत्तींकडून मिळत असते. शिवाय त्या लवचिक असून शिक्षणानें त्यांना सहज वळण देतां येतें. शिक्षणानें सहजप्रवृत्तींत दोन प्रकारचे फरक घडून येतात. एखाद्या प्रवृत्तीला जागृत करणारे जे नैसर्गिक चेतक त्यांच्या ऐवजी दुसऱ्या चेतकांची स्थापना करतां येते, व अशा बदललेल्या चेतकांकरवी ती प्रवृत्ती जागृत होऊं शकते असाच बदल प्रवृत्तीच्या प्रतिक्रियांतही घडवून आणतां येतो. बालकाचा क्रोध त्याच्या हालचालींत कांहीं व्यत्यय आणल्याने नैसर्गिकरीत्या जागृत होतो, व तो क्रोध हातपाय झाडून प्रगट केला जातो. प्रौढाचा क्रोध जगांत कोठेंही सामाजिक अन्याय झाल्यास, त्याच्या वृत्तान्ताने होऊं शकतो, व त्या क्रोधाचें पर्यवसान लोकजागृतीसाठी केलेल्या प्रयत्नरचित योजनेंत होऊं शकतें. म्हणून सहज प्रवृत्तींचा उद्‌गम योग्य चेतकांशीं जोडणे, व त्यांच्या प्रतिक्रियांना समाजहितपर स्वरूप देणें, म्हणजेच त्या प्रवृत्तीचें उदात्तीकरण करणें हें शिक्षणाचें ध्येय असतें.

दुसरा उपजत मानसिक गुण स्वभावविशेष होय. कांहीं मुलांची वृत्ति चंचल असते, कांहींची स्थिर असते, कांहीं चपल असतात. कांहीं संथ असतात; कांहींचा चित्तविक्षोभ लवकर होतो, कांहींचा होत नाहीं, कांहीं लाजाळू असतात, कांहीं आगाऊ वृत्तीची असतात. अशा अनेक गुणांच्या वैचित्र्यपूर्ण संहतीनें स्वभावविशेष सिद्ध होत असतो. हे स्वभाव गुण अनुवंशिक असतात. तथापि परिसरांतील घटकांच्या प्रभावाने त्यांत थोडाबहुत बदल घडून येऊं शकतो. (स्वभावगुणांचा समतोल विकास करणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट होय.) बालकावर घडवावयाच्या संस्कारांची अशी योजना करावी कीं बालकाची प्रक्षोभता वा शिथिलता वाढून पराकोटीला जाणार नाहीं तर उलट त्यांची धार बोथट होऊन हे गुण सौम्य स्वरूपांत प्रगट होतील. शिक्षणाने असा ऋजू स्वभाव घडविला पाहिजे कीं जो व्यक्तीच्या कर्तृत्वाला प्रेरक होईल व समाजाशीं सलोख्याचें संबंध जोडण्यांत व्यक्तीला सहाय्यक होईल.

सर्वांत महत्त्वाचा उपजत गुण बुद्धिमत्ता होय. बालकाच्या बुद्धीचा आवाका जन्मतःच ठरून जातो; व त्यांत विशेष फरक शिक्षणानें घडून येऊं शकत नाहीं. याचा अर्थ बुद्धिमत्तेच्या विकासाला वाव नसतो असा नव्हे. बहुतेक लोक आपल्या निसर्गदत्त बुद्धिमत्तेचा पूर्ण उपयोग करीत नाहींत. बुद्धिवान मुलांच्या संभवनीय प्रतिभेचा पूर्ण विकास तर होत नाहींच, पण कमी प्रतीच्या बुद्धिमत्तेलाहि पूर्णपणें कार्यान्वित होण्यास वाव मिळत नाहीं. (प्रत्येक बालकाच्या बुद्धिमत्तेचा कस ठरविणें, ती बुद्धिमत्ता पूर्णपणें कार्यक्षम होईल असा अभ्यासक्रम योजणें. व ज्या व्यवसायांत त्या बुद्धिमत्तेचा प्रभाव पूर्णांशानें पडेल असा व्यवसाय निवडण्यास त्यास प्रवृत्त करणें, असें त्रिविध कार्य शिक्षणाचें साध्य होय.)

चौथा मानसिक गुण एखादें काम उत्तम रीतीनें करण्याची उपजत क्षमता होय. कांहीं मुलांच्या अंगीं चित्रें काढण्याची तर कांहींच्या अंगीं सुतार काम करण्याची आणि कांहींच्या अंगीं गाण्याची उपजत कला असते. (आधुनिक मानसशास्त्राच्या मतें प्रत्येक बालकाच्या अंगीं अशी कोणती तरी विशिष्ट किमया असते.) हें मत खरें ठरलें तर लोकशाहींतील समतेच्या ध्येयाला निश्चित बळकटी येईल. सर्वांच्या अंगीं नसली तरी कांहीं मुलांच्या अंगीं

अशी किमया असतें हे निर्विवाद खरे आहे. शिक्षणाचे उद्दिष्ट ही गूढ सृजन-शक्ती उघडकीस आणून तिची योग्य जोपासना करणें हें होय.) असें झालें म्हणजे अशा सर्व बालकांना सामाजिक जीवनाच्या समृद्धतेनें आपल्या कलाविलासानें भर घातल्याचे श्रेय मिळेल. व समाजाच्या दृष्टीनें लाभ असा होईल कीं कोणाच्याच अंगचा उपजत गुण अविकसित राहून वन्ध्य ठरणार नाहीं.

प्रत्येक व्यक्तीला आपल्या अंगच्या सर्व शारीरिक व मानसिक उप-जत गुणांचा यावच्छक्य विकास व उपयोग करण्यास समर्थ करणें हा 'व्यक्तिमत्त्वाचा विकास' या उद्दिष्टाचा एक अर्थ होय. या अर्थाचा निर्णय पृथक्करण पद्धतीनें लावला आहे. मानवी समष्टीचें शारीरिक व मानसिक विभागांत विश्लेषण करून त्या त्या विभागाचा इष्ट गुणोत्कर्ष निरूपिला आहे. तथापि व्यक्तीचें जीवन एकसंध असतें; तिचें कार्य विभागशः चालत नाहीं म्हणून व्यक्तिजीवनाच्या एकसंधतेच्या दृष्टीनें व्यक्तिमत्त्वाचा विचार करणें अनिवार्य आहे.

एकसंधतेच्या दृष्टीनें मानवी वर्तनाचा अप्रतिरूपता हा विशेष गुण आहे. समकालीन परिस्थिति व स्वतःचे गुणदोष यांचा पडताळा पाहून मानव आपल्या कर्तृत्वाची विशिष्ट दिशा ठरवितो. हें व्यक्तिवैशिष्टय थोर लोकांच्या चरित्रांत स्पष्टपणें दिसून येतें. एखादा माणूस बिर्लाशेटजीप्रमाणें धनार्जनकर्त्याचा मुकुटमणि होईल, तर दुसरा आचार्य विनोबांप्रमाणें अकिं-चन लोकसेवेंत रत राहील. पण अप्रतिरूपतेच्या निदर्शनाला मोठेपणा आव-श्यक नाहीं; लघुतम कार्यांतही तिचा साक्षात्कार होऊं शकतो. एखाद्या पेढीवरील गणकाच्या कार्याचे सूक्ष्म अवलोकन केलें तरी प्रत्येकाच्या कार्य-पद्धतींतील वैशिष्टय दिसून येईल. प्रत्येक मानवाच्या मनांत विशिष्टतेची अभिलाषा असते, व तिचा प्रत्यय सही करण्याच्या नित्य कर्मांतही आढळतो. मनुष्य आपल्या कर्तृत्वाची मर्यादा ओळखून वागेल, तर विशिष्टतेची आकांक्षा त्याला सामान्य जीवनांतही पूर्ण करतां येईल.

पण पुष्कळदां अभिलाषेची पूर्तता अश्लाघ्य स्वरूपांत केलेली आढ-ळून येते. योग्य मार्गानें वैशिष्टय साधतां येत नाहीं असे दिसून आलें म्हणजे भग्नाश लोक विक्षिप्तपणाच्या आहारी जातात. एखादा मनुष्य

दाढी वाढवील, तर दुसरा मस्तकावर जटा धारण करील, आणि तिसरा अंगावर भगवी कफनी चढवील; आणि अशा कृत्रिम उपायांनीं आपल्या अनन्य साधारण व्यक्तिमत्त्वाचा दावा सिद्ध झाला अशी स्वतःची फसवणूक करून घेईल. अलौकिकत्त्वाची साधना सुलभ नसते. आपल्या युगांतील समस्यांचा अभ्यास करून, स्वकीय गुण रुचीस अनुसरून विशिष्ट भूमिकेवरून समाजाच्या हितसंवर्धनास स्वतःस जो वाहून घेईल, त्यालाच अलौकिक महत्ता प्राप्त होते. आगरकर, टिळक व कर्वे यांची थोरवी अनन्यसाधारण आहे. कारण त्यांनीं परिस्थितीच्या आव्हानाला आपआपल्या परीनें प्रभावी उत्तर दिले, आर्षवचनापेक्षां बुद्धीला वरचढ ठरवून आगरकरांनीं जीवनाकडे बघण्याचा आपला दृष्टिकोन बदलून टाकला; टिळकांनीं राजकीय चळवळीविषयींच्या आपल्या विचारसणीत क्रान्ति केली, आणि अज्ञानशृंखलेतून स्त्रियांना मुक्त करण्याचा मार्ग कर्व्यांनीं दाखवून दिला. एकाच युगांत व परिस्थितींत घडलेल्या या तिघांच्या कर्तबगारींत मानवी व्यक्तिमत्त्वाच्या अनंतरूपत्वाचें उत्कृष्ट दर्शन होतें.

म्हणूनच व्यक्तिमत्त्वाच्या आकारविधानासाठीं स्वायत्तता हा आवश्यक गुण आहे. निसर्गदत्त गुणांचा काय उपयोग करावयाचा याचा अंतिम निर्णय व्यक्तीच्या निवडीवरच अवलंबून असतो. असामान्य बुद्धिमत्तेचा उपयोग करून एखादी व्यक्ति प्रभावी संघटना निर्माण करील व देशाच्या भवितव्याचा आकार बदलून टाकील कायदे आझम जीना आणि डॉ. आंबेडकर यांनीं असेंच केलें. दुसरी व्यक्ति आपल्या हुशारीचा उपयोग करून पोकळ व्यापारी कंपन्या काढील आणि गोरगरीबांना व विधवांना लुबाडून धनवान बनेल. कर्तबगारीचें क्षेत्र निवडतांना उपलब्ध असणारें पर्याय नेहमीच इतक्या विरुद्ध स्वरूपाचे–समाज व समाजविघातक–नसतात. टिळकांनीं शिक्षणाला रामराम ठोकून राजकारण पत्करलें; कीट्सनें वैद्यकाला सोडचिठ्ठी देऊन काव्यदीक्षा घेतली, व दोघांचीही निवड सफलदायी ठरली. इच्छेनुसार कर्तृत्वाची दिशा ठरविण्याची ही मुभा म्हणजे मानवाचा एक बहुमोल अधिकार आहे. समाजहितालाही तो पोषक असतो. कारण या अधिकारामुळें मानवी जीवनांत आवश्यक ती विविधता निर्माण होते.

स्वायत्तता हा गुण नैतिक दृष्टचाही महत्त्वाचा आहे. आपल्या नैसर्गिक गुणवत्तेचा योग्य उपयोग करण्याचा नैतिक जबाबदारी प्रत्येक व्यक्तीवर पडते असाच निष्कर्ष स्वायत्ततेमधून निघतो. तसेंच स्वायत्ततेचा धार्मिक अर्थ असा होतां होतो कीं ज्या अर्थी आपल्या सर्व ऐहिक कृत्यांबद्दल शेवटीं देवाच्या दरबारीं जाब देणे आहे त्याअर्थी उपजत शक्तींचा व्यय करताना ईश्वराची नजर सतत आपणावर आहे ही जाणीव आपण ठेवली पाहिजे. धर्मावर श्रद्धा नसली तरी नैसर्गिक गुणवत्तेचा अपव्यय वा तिची उधळपट्टी करू नये हें तत्त्व मानवी बुद्धीला सहज पटणारें आहे. तसेंच कर्तृत्व गाजविण्यासाठी आवश्यक ती अनुकूल परिस्थिति व सुरक्षितता आपणास समाजाकडून मिळत असल्यामुळें आपलें कर्तृत्व गाजविण्यासाठी आवश्यक ती अनुकूल परिस्थिति व सुरक्षितता आपणास समाजाकडून मिळत असल्यामुळें आपले कर्तृत्व व्यक्तीच्या व समाजाच्या उन्नत हिताला पोषक व्हावें असा आग्रह धरण्याचा अधिकार समाजाला पोचतो.

विकसित व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक विशेष एकनिष्ठा हा असतो. जीवनाचें ध्येय एकदा ठरलें म्हणजे थोर पुरुष आपल्या सर्व साधनांचा उपयोग त्या एकाच ध्येयाच्या पूर्तीसाठी करतात. लो. टिळकांनीं वर्तमानपत्रें, व्याख्यानें, धार्मिक उत्सव, व ऐतिहासिक प्रसंग या सर्व अश्वशक्तींचा उपयोग राजकीय विमोचनाचा रथ चालविण्यासाठी केला. पंडित मदन मोहन मालवीय यानी आपलें तनमनधन बनारस विद्यापीठ उभारण्याच्या कामीं लावलें. राणा प्रतापचें जीवन स्वातंत्र्य रक्षणाच्या ध्येयाला वाहिलेले होतें.

थोर पुरुषांची चरित्रें फार उद्बोधक असतात, कारण ती आपणाला व्यक्तिमत्त्वाच्या विकसनप्रक्रियेचें प्रत्यक्ष दर्शन घडवितात. उच्च ध्येयांचा संभव कसा होतो, व ती आचरणात कशीं आणली जातात याचा चित्रपट तीं आपल्या डोळ्यांपुढें उभा करतात. अशा चरित्रांपासून आपणास असाही बोध होतो कीं व्यक्तिमत्त्व हे सर्वदा संभाव्य अवस्थेत असते. व्यक्ति जिवंत आहे तोपर्यंत कोणत्याही क्षणी तिच्या व्यक्तिमत्त्वाचा पूर्ण विकास झाला असें म्हणतां येत नाही. कारण भवितव्याचे द्वार अजून उघडेंच असते. उतार वयांत वाङ्मयमहर्षि टागोरांनी चित्रकलेंत नैपुण्य मिळविलें. व्यक्तिमत्त्वाचा

नवीन पैलू कोणत्याहीं क्षणीं आविर्भूत होईल; पण हा नवीन पैलू व्यक्तिमत्त्वाच्या एकंदर स्वरूपाशीं सुसंगत असेल; टागोरांचा चित्रकलाविलास सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठीं त्यांनीं चालविलेल्या मोहिमेशीं सुसंवादी होता.

सारांश, व्यक्तिमत्त्वाचा विकास घडविणें म्हणजे व्यक्तीची गुणवत्ता व्यक्ति व समाज यांच्या हितासाठीं जास्तींत जास्त कार्यक्षम करणें होय. कवि इकबाल यांनीं म्हटलें आहे कीं जलबिंदूनें आत्मविकासाचा धडा आत्मसात् केला कीं त्याचें रूपांतर बहुमोल मौक्तिकांत होतें. सॉक्रेटिस, बुद्ध, ख्रिस्त, महात्मा गांधी यांचीं चरित्रें याच उदात्त अर्थानें केलेला आत्मविकासाचा संकल्प व घडविलेली आत्मविकासाची सिद्धि यांचीं उदाहरणें होत. आत्मविकासाच्या या मार्गावर विद्यार्थ्यांचीं पावलें नीटपणें रोवणें हेंच शिक्षणाचें उद्दिष्ट होय.

व्यक्तिमत्त्वाच्या कल्पनेबाबत एक खुलासा करणें इष्ट आहे. व्यक्तिमत्त्वाचें स्वरूप स्पष्ट करण्यासाठीं थोर पुरुषांच्या चरित्रांचा भरपूर उपयोग येथें केला आहे. याचा अर्थ असा नव्हे कीं थोर कर्तबगारी हा विकसित व्यक्तिमत्त्वाचा अनिवार्य गुण आहे. तसे असतें तर बहुसंख्य बालकांच्या दृष्टीनें हे विवेचन निष्फळ ठरलें असतें. कारण बहुतेक मुलांच्या भागधेयांत सामान्य कर्तृत्वच असतें. व्यक्तिमत्त्व जसें मोठीं कामें करतांना व्यक्त होतें, तसेंच ते लहान कामें करण्यांतही होऊं शकतें, या तत्त्वाचें आग्रहपूर्वक प्रतिपादन करणें अगत्याचें आहे. स्वतःच्या कर्तृत्वाची मर्यादा लक्षांत घेऊन आपलें काम आपण हौसेनें निवडलें व निष्ठेनें आणि समर्पणवृत्तीनें तें पार पाडलें म्हणजे व्यक्तिमत्त्वाचा विकास झाला असे म्हणावयास हरकत नाहीं. कर्तृत्वाविषयीं अशी दीक्षित वृत्ति शिक्षकांतून निर्माण झाली पाहिजे.

****

क्र. ... 11482

७ :

# शीलसंवर्धन

**************************

औद्योगिक क्रांतीच्या पहिल्या भरांत ज्ञानसंपादन हेंच शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट बनलें होतें. हळू हळू त्या क्रांतींतील दोष उघडकीस येऊं लागले. भौतिकवादाचा सर्वत्र प्रसार होऊन अनादर व अश्रद्धा यांचें रान माजलें व अशा रीतीने शीलरहित ज्ञानाचें पितळ उघडें पडलें. तरुण पिढीच्या नास्तिक्यानें विचारवंतांचें डोळे पांढरे झाले. ते विचारूं लागले " आत्म्याचें पतन करणाऱ्या गजांतलक्ष्मीचा मानवाला काय उपयोग आहे ? "

सामाजिक जबाबदारीच्या वाढत्या जाणीवेनें या विचारचक्रास अधिकच गति मिळाली. मनुष्य हा मुख्यत: समाजाचा घटक असल्यामुळें प्रसन्नता हा त्याचा सर्वांत महत्त्वाचा स्वभावगुण आहे. नुसत्या ज्ञानानें अथवा अर्जनशक्तीनें पुरुष आदर्श पिता, पति, मित्र अथवा मतदार होऊं शकत नाहीं. समाजात असे पुष्कळ लब्धप्रतिष्ठित लोक आढळतात कीं ज्यांचे कुटुंबाशीं व समाजाशीं वर्तन अश्लाघ्य असतें व ज्यांच्याशीं संबंध येणें म्हणजे महासंकट असें लोक मानतात. उपजत स्वभावांतील वक्रता शिक्षणाने दूर झाली नाहीं तर ती शिक्षणाची असफलताच होय.

शीलसंवर्धनाला शिक्षणाचें उद्दिष्ट म्हणून महत्त्व येण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं सक्तीच्या शिक्षणाची योजना अमलांत आल्यापासून केवळ ज्ञाननिष्ठ शिक्षणाचा फोलपणा सर्वांस कळून चुकला आहे, ' ज्ञान येतें पण शहाणपण मागें राहतें ' या म्हणीचा प्रत्यय सर्वत्र येत आहे. ज्ञानाच्या वाढीबरोबर शोषण करण्याची प्रवृत्ति व जीवनकलहाची अमानुष तीव्रता वाढत आहे. अरुद्ध ज्ञानाचे भयंकर परिणाम आतां सर्वांस समजले

आहेत व ज्ञानावर विवेकबुद्धीचें नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता पटूं लागली आहे. म्हणून शीलसंवर्धन हेच शिक्षणाचें प्रमुख उद्दिष्ट असावें या विचाराला वळकटी आली आहे.

शील म्हणजे काय तें आपणांस समजते, पण त्याची व्याख्या करणे सोपें नाही. शीलाचें नास्तिपक्षी वर्णन करावयाचें झालें तर असें म्हणतां येईल की, जुगार व मद्यपान यांसारख्या घातक संवयी माणसाला नसल्या, त्याच्या अगीं एकलकोंडेपणा व उन्मत्तपणा हे स्वभावदोष नसले आणि स्वार्थीपणा व बेइमान अशा नैतिक कुप्रवृत्ति त्याच्या वर्तनात आढळल्या नाहींत तर त्याचें शील वरें आहे असें म्हणतां येईल. अस्तिपक्षीं असें म्हणतां येईल कीं शीलांत पुढील तीन गोष्टीचा अंतर्भाव हवा. सदागम (चांगलें काय याचें ज्ञान) सन्निष्ठा (जे चांगलें असेल त्याविषयी प्रेमभाव) व सदाचार. सत्य व न्याय याविषयी प्रीति, कुटूंब व समाज याविषयीं आस्था कर्तव्यतत्परता इत्यादि स्थिरवृत्तीवाचून शीलवत्ता पुरी होत नाहीं. तसेंच या स्थिरवृत्तीचें गुणानुक्रमें व्यवस्थापन झालेलें असलें पाहिजे, व उच्चतर स्थिरवृत्तीसाठीं हीनतर स्थिरवृत्तीचा त्याग करण्याची संवय जडली असली पाहिजे; उदाहरणार्थ, देशप्राप्तीसाठीं कुटुंबप्रेमाची भीड मोडतां यावयास हवी. तुरुंगातून पळून जाऊन जीव वाचविण्याच्या योजनेस सॉक्रेटिसनें नकार दिला, कारण राष्ट्राच्या कायद्यांचे निष्ठेनें पालन करणें हें तो स्वतःचें कर्तव्य मानात होता व कर्तव्यनिष्ठेपुढे स्वहित तुच्छ लेखण्याची संवय त्याला होती.

स्थिरवृत्तीचे हें व्यवस्थापन होण्यासाठी योग्य अहंवृत्तीची निर्मिती झाली पाहिजे व स्वतःच्या उच्च निष्ठांना अनुसरून वागण्याची निग्रहशक्ती संपादन केली पाहिजे. इंग्रजांमध्ये म्हण आहे कीं उदात्त ध्येयाच्या दगडांनी नरकाची जमीन घडवलेली आहे. म्हणजे उदात्त ध्येये मनात वागविणाऱ्या अनेक व्यक्ती नरकात गेलेल्या आढळतात. कारण निग्रहाच्या अभावामुळे प्रत्यक्ष व्यवहारात त्यांनीं उदात्त तत्त्वें सोडून हीन वृत्तीचा अवलंब केलेला असतो. पाडव्याला किंवा दसऱ्याला केलेले दररोज लवकर उठण्याचे, व्यायाम करण्याचे, निष्ठेनें अभ्यास करण्याचे संकल्प, आपण ज्या

त्वरेनें विसर्जित करतो तीवरून निग्रह किती दुस्साध्य आहे याची चांगली कल्पना येईल.

आणखी एका दृष्टिकोनांतून शीलाकडे पाहिले तर असें दिसतें कीं शीलांत दृढता, विशालता व गंभीरता या गुणांचा समावेश असावा. निश्चित ध्येयाला सतत चिकटून राहण्याची चिकाटी व ध्येयपूर्तीसाठीं कष्ट सहन करण्याची तयारी या दोन गुणामिळून दृढता सिद्ध होते. मॅझिनी, लेनिन, आगरकर, कर्वे यांच्या चरित्रांत हा गुण आढळतो. अनेक आपत्ती आड आल्या. मानहानि व वित्तहानि झाली तरी आपल्या ध्येयापासून ते ढळले नाहींत.

शीलांत विशालता येण्यासाठीं विविध अभिरुचीचा उपचय करावा लागतो. एकमार्गी जीवनाचें ध्येय आतां प्रशस्त मानीत नाहीत. एकेकाळीं शाळेशिवाय अन्य ठिकाणीं न जाणारा, सदा पुस्तकांत डोकें खुपसून राहणारा शिक्षक आदर्श गणला जात असे. आज अशा रीतीनें व्यवसायांतच गढून जाणाऱ्या व इतर सामाजिक हालचालींत भाग न घेणाऱ्या व्यक्तीचें शील कमी प्रतीचें मानतात. स्वतःचा व्यवसाय तर नीटपणें करतां आलाच पाहिजे, शिवाय प्रत्येक माणसाला क्रीडा, कला, राजकारण, समाजकारण इत्यादि मानवी जीवनाच्या अंगापैकीं कांहींत हौसेनें भाग घेतां आला पाहिजे.

गंभीरता म्हणजे ख्रिस्त, तुकाराम इत्यादि थोर विभूतींच्या आचरणांत आढळणारी सात्त्विक प्रज्ञा होय. पुष्कळांचा चांगुलपणा अहंकारदूषित असतो. ते स्वतः मोहवश होत नसल्यामुळें इतरांनाहि सन्मार्गानें वागणें सुलभ आहे असें ते धरून चालतात ज्यांच्या हातून प्रमाद घडतात त्यांच्याविषयी असें सज्जन फार कठोर वृत्ति धारण करतात. चुकणें हा मनुष्यधर्म आहे, व चुकलेल्याना क्षमा करण्यांत खरा दैवी गुण आहे. या तत्त्वाचा त्यांना विसर पडतो- ज्या परिस्थितींत अपराध घडला असेल ती परिस्थिति लक्षांत घेऊनच अपराधाची कोटि ठरविली पाहिजे. ख्रिस्त व तुकाराम यांचें स्वतःचें वर्तन निर्मळ होतें. तरीसुद्धां सामान्य लोक सहज मोहाच्या आहारीं जातात इंद्रियांचें दमन करणें त्यांना शक्य होत होत नाहीं याची जाणीव ठेवून अपराधांची क्षमा करण्यास ते नेहमी सिद्ध असत. दुसऱ्यांच्या दोषांचा

सहानुभूतिपूर्वक सदय बुद्धीनें विचार करण्यास तयार असणें हा उदात्त शीलाचा महत्तीय गुण होय. सामान्य सदाचारी लोक निर्दयपणें व सूडबुद्धीनें वागतात: . . .

शीलाविषयीं आणखी एक विचार असा आहे कीं शीलांत कांहीं सद्वृत्तींचा समावेश, व तद्विरुद्ध असत्प्रवृत्तींचा अभाव असणें आवश्यक होय. सच्छील पुरुष इतरांची सुखःदुखें समजूं शकतो व स्वार्थाची साधना करतांना आणिकांचा घात होणार नाहीं अशी खबरदारी तो घेतो. इतरांचे सद्‌गुण व त्यांची सत्कृत्यें यांचा रसिकतेनें गुणगौरव करण्यास तो उत्सुक व तत्पर असतो. दुसऱ्यांच्या उत्कर्षाबद्दल त्याला मत्सर वाटत नाहीं. स्वतःच्या मतांस जरी तो दृढपणें चिकटून राहात असला तरी विरुद्ध मतें तो समंजसपणें व सहनशीलतेनें ऐकतो व विचारांत घेतो. आपणांस विरोध करणारांवर दुष्ट हेतूंचा आरोप तो करीत नाहीं. त्याच्या स्वाभिमानाला उन्मादाचें रूप कधीं येत नाहीं. त्याच्या वर्तनांत लाचारी आढळत नाहीं, तथापि तो सर्वदा विनम्र व उपकारशील असतो.

शीलसंवर्धनाच्या प्रक्रियेचे तीन भाग पडतात. उदात्त स्थिरवृत्ती मनांत रुजविणें, योग्य अहंवृत्तीची निर्मिति करणें, व निग्रह शक्तीची वाढ करणें.

एके काळीं इष्ट वर्तनाबद्दल पारितोषिक देऊन व अनिष्ट वर्तनांबद्दल शिक्षा करून शीलसंवर्धन करण्याचा परिपाठ होता. प्रत्येक सत्य भाषणाबद्दल बक्षीस देऊन व प्रत्येक अनृत वचनाबद्दल शिक्षा करून सत्यप्रीति रुजवितां येते असा समज प्रचलित होता. उशीरा येणारांना बाकावर उभें करून वक्तशीरता साधेल व गृहपाठ न करणारांना शाळा सुटल्यावर बसवून घेतल्यानें उद्योगशीलता वृद्धिंगत होईल; अशी ही दृढ समजूत होती. आधुनिक मानसशास्त्राप्रमाणें या प्रक्रियेने स्थिरवृत्ति मुलांच्या मनांत रुजणार नाहींत, मुलें धोरणानें वागावयास मात्र शिकतील. प्रामाणिकपणापासून फायदा होतो म्हणून प्रामाणिकपणें वागावें; प्रामाणिकपणा हा एक प्रशंसनीय सदाचार आहे म्हणून नव्हे, अशी मुलांची वृत्ति बनेल.

बालकाच्या मनोवृत्तींत फरक घडवून आणणें हें शीलसंवर्धनाचें साध्य आहे, बालकांच्या वर्तणुकीत केवळ औपचारिक अनुरोध दिसून कांहीं

विभाग ……………
क्रमांक ………
नों. दि. ……

फायदा नाहीं, अशी या विषयांतील नवीन विचारसरणी आहे. नैतिक मूल्यें मनाला पटविण्याचें कार्य फक्त व्यक्तिप्रभावानें होऊं शकतें. [illegible] जीवनप्रक्रियेचा तो एक आनुषंगिक परिपाक आहे. स्थिरवृत्ति शिकवतां येत नाहींत; त्यांची नकळत लागण झाली पाहिजे. म्हणूनच आधुनिक मानसशास्त्र गृहाला शीलसंवर्धनाचें प्रमुख क्षेत्र मानतें.

जन्मापासून पहिल्या पांच वर्षांतच शीलसंवर्धनाचा पाया दृढ होतो. बालकाचीं नैतिक मूल्यें आईबापांच्या वागणुकीवर अवलंबून असतात. बालक त्यांच्या वागणुकीचे निरीक्षण दररोज करतो. आईबाप आपल्याला कोणत्या तत्त्वांचा उपदेश करतात व स्वत: कोणत्या तत्त्वांप्रमाणें वागतात यांचा पडताळा तो पाहतो व त्यांचीं कृतिनिविष्ट झालेलीं तत्त्वेंच तेवढीं तो उचलतो. म्हणून पालकांची मुलांशीं वागणूक सुसूत्र असावी. प्रीति दर्शविण्याचे प्रसंग व अधिकार गाजविण्याचे प्रसंग यांत गल्लत होऊं नये. लहरीनुसार लाड केले व दमन केलें तर अशा अनिर्बंध वागणुकीचा बालकांच्या नीतिजीवनावर फार अनिष्ट परिणाम होतो.

ज्या स्थिरवृत्ति मुलांनीं ग्रहण कराव्या असें आपणांस वाटतें त्याचा प्रत्यय पितरांच्या वर्तनांत दिसावा हें ओघानेंच आले. मुलांत सत्यप्रीति निर्माण व्हावी अशी इच्छा असेल तर आपण नेहमी सत्य भाषण केलें पाहिजे. मुलांकडून विनयाची अपेक्षा असेल तर आपल्याही वर्तनांत तो प्रगट झाला पाहिजे. सद्‌गुणांवर नुसती प्रवचनें देणें निष्फळ होय. समाजांत आज दुटप्पी नीति व ढोंगीपणा यांचा प्रभाव वाढता असल्यामुळें बालकांच्या शीलसंवर्धनाचें कार्य मोठे बिकट झालें आहे.

सारांश, आईबापाशीं एकरूप होऊन त्यांचीं नीतिमूल्यें आत्मसात करण्याकडे बालकाचा ओढा असतो. शिवाय तो विभूतिपूजक असतो व ज्या प्रतिष्ठित व्यक्तीशी त्याचा संबंध येईल तिच्या वर्तणुकीचें तो अनुकरण करतो. म्हणून शीलाचा योग्य आदर्श मुलांपुढे ठेवणें हा शीलसंवर्धनाचा एकमेव मार्ग आहे, असें नि:शंकपणें म्हणतां येईल.

अर्थातच, उदात्त स्थिरवृत्तींचें बीजारोपण करण्याच्या कार्यांत शाळेचा वाटाही महत्त्वाचा आहे. शाळा हा एक संघटित समाज असतो; या समाजाचें नियंत्रण सुव्यवस्था, न्याय व उद्योगशीलता या गुणांस अनु-

सरून करावें. शिक्षकांची वागणूक ही अनुकरणीय असावी. शिक्षकांच्या वर्तनांत मुलांना ज्ञानलालसा, सत्यप्रीति, व स्वतंत्रपणें विचार करणारी विवेचक वृत्ति या गुणांचा प्रत्यय यावा. अभ्यासक्रमातील विषयांचा विशेषत: वाङ्मय व इतिहास यांचा अभ्यास चालू असतांना या विषयांच्या अनुरोधानें मुलांच्या मनांत स्वातंत्र्य, कर्तव्य, सदयता व न्यायबुद्धि यांच्याविषयीं स्थिरवृत्ति निर्माण होतील असा विवेचनाचा रोख असावा.

योग्य अहंवृत्ति निर्माण करण्याच्या कार्यांतही गृह व शाळा यांची जबाबदारी समान आहे. पहिलें उद्दिष्ट बालकाची महत्त्वाकांक्षा जागृत करणें हें असावें; व दुय्यम उद्दिष्ट त्याच्या कर्तृत्वाची मर्यादा, व परिसरामुळें कर्तृत्वाच्या क्षेत्रावर पडणारी मर्यादा यांची जाणीव त्यास करून देणें हें असावें. घरांत व शाळेंत व्यापक कार्यक्षेत्र बालकास उपलब्ध करून द्यावें, व निरनिराळ्या क्षेत्रांत कार्य करण्यास त्यास प्रवृत्त करावें. प्रदीर्घ व सूक्ष्म निरीक्षणानतर पालकांनीं व शिक्षकांनीं मुलाच्या कर्तृत्वाचा कल ठरवावा व त्यास पोषक अशी शिक्षणाची योजना आखावी. परंतु प्रोत्साहन देतांना व गुणगौरव करतांना मुलाच्या मनांत स्वत:च्या कर्तृत्वाविषयी अवास्तव घमेंड निर्माण होऊं न देण्याची खबरदारी घ्यावी हळू हळू स्वत:विषयीं एक आदर्श चित्र बालकाच्या मनांत निर्माण होईल अशी योजना करावी. या आदर्शचित्राचे आदर्श विद्यार्थी, आदर्श पुत्र. आदर्श खेळाडू, आदर्श संघटक इत्यादि अनेक पैलू असतील. प्रसंगानुसार संवादाच्या ओघांत या निरनिराळया भूमिकांचे कमी अधिक महत्त्व बालकाच्या नजरेस आणावें अर्थातच दैनंदिन जीवनांत या भूमिकांचे मूल्यमापन होतच असतें व त्यावरून बालकास अप्रत्यक्ष सूचना मिळतच राहतात. अशा रीतीनें बालकाच्या मनांत गुणानुक्रमानें स्थिरवृत्तींचा सोपान तयार होईल व त्याच्या आधारें बालकास आपल्या प्रेरणांचें मूल्यमापन करतां येईल.

आतां निग्रहशक्ती वाढविण्याच्या प्रश्नाकडे वळूं. या कार्याचे तीन भाग पडतात. आत्मविश्वास निर्माण करणें हा पहिला, सारासार विचार करून निवड करण्याची संवय लावणें हा दुसरा. व अङ्गीकृत कार्याला चिकटून राहण्याचा प्रतिनिवेश निर्माण करणें हा तिसरा भाग होय. बालकांस आत्मविश्वास निर्माण करण्यासाठीं वडिलधाऱ्या माणसांनीं व शिक्ष-

कांनीं बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची बूज ठेवण्यास शिकलें पाहिजे. घरांत मुलाला एक लहानसा कोपरा दिलेला असावा, तें त्याचें राज्य मानावें. तसेंच कांहीं वस्तू मुलाच्या अनन्य मालकीच्या असाव्या. त्याच्या अनुमती-वाचून वडील माणसांनीं त्याच्या वस्तूंस हात लावूं नये, वा इतर मुलांस त्या खेळण्यासाठीं देऊं नये. शाळेंतून भयावर आधारलेल्या शिस्तीची हकालपट्टी व्हावी. उपरोधिक वा कुत्सित शब्दांनीं मुलांचा अधिक्षेप करण्याची संवय शिक्षकांनीं सोडावी. बालकांशीं होणाऱ्या वागणुकींत त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल आपणांस आदर वाटतो व त्यांच्या विषयीं आपणांस आपुलकी वाटते हें स्पष्ट दिसावें.

शिवाय निवड करण्याचा अधिकाधिक वाव मुलांना दिला पाहिजे निग्रही पितरांचीं मुलें दुर्बल मनोवृत्तीची असतात हें वचन अगदीं यथार्थ आहे. कांहीं आईबाप आपल्या मुलांची खेळणीं, त्यांचे कपडे व खेळगडी स्वतःच निवडतात, मुलांना कोणत्याही बाबतींत स्वयंनिर्णयाची संधी देत नाहींत. अशीं मुलें म्हणजे पितरांनीं चालविलेलीं कळसूत्री बाहुलींच होत. अशा मुलांच्या ठिकाणीं उपक्रमशीलता वा स्वतंत्र विचार करण्याची शक्ती दिसणें असंभवनीय होय. मोठेपणीं अशीं मुलें मित्रांच्या वा स्त्रियांच्या ओंजळीनें पाणी पितात, स्वावलंबन त्यांस कधीं साधूंच शकत नाहीं. वर्तनांत मुलांना अधिकाधिक स्वातंत्र्य देण्याची इष्टता यावरून सहज लक्षांत येईल.

शाळेंतही बदल झाला पाहिजे. पहिली आवश्यक सुधारणा म्हणजे अभ्यासाचे विषय निवडण्याची मोकळीक देणें ही होय. कांहीं विषय सर्वांना आवश्यक असले तरी कांहीं विषयांची निवड अभिरुचीप्रमाणें केल्यानें शिक्षणात रसवत्ता येते. स्वराज्याची पद्धतही शाळांमधून सुरू व्हावी. बहिःशाल कार्यक्रमांना उत्तेजन द्यावें व त्यांच्या नियोजनाचा अधिकार मुलांकडे द्यावा.

चिकाटीची संवय लागण्यासाठीं शाळेतील कार्यक्रम चित्तवेधक व उपयुक्त झाला पाहिजे व्यवसायपद्धति व डाल्टन योजना यासारख्या क्रीडापद्धतीचा अवलंब मुलांच्या वयानुरूप केला पाहिजे आणि मुलांच्या आत्मगौरव प्रवृत्तीचा जास्तींत जास्त उपयोग शिक्षणकार्यांत करून घेतला

पाहिजे. उदाहरणार्थ, वाङमयाच्या व इतिहासाच्या अध्यापनांत नाट्यी-करणाचा विपुल उपयोग करावा. शिवाय थोर पुरुषांच्या चरित्रांचे आदर्श मुलांपुढें मांडावे, व त्यांच्या असें निदर्शनास आणून द्यावें कीं जे कर्तव्याची दिशा शहाणपणानें ठरवून निष्ठेनें व उत्साहानें कष्टत राहतात त्यांच्याच वाट्याला सिद्धि व कीर्ति येतात. " कष्टेविण फळ नाहीं. " शिक्षकांनी व वडील मंडळीनीं आपल्या वर्तनानें एकनिष्ठ व दृढ उद्योगाचें उदाहरण मुलांस घालून द्यावें. शीलसंवर्धनाचें उद्दिष्ट अशा प्रकारें अप्रत्यक्ष उपायांनींच साधावें लागतें, प्रत्यक्ष शिकवणुकीचें महत्त्व यांत अत्यल्प होय.

****

८ :

# संस्कृतिसंवर्धन

*******************************

प्राचीन ग्रीसमधील नगरराज्यांत, विशेषत: अथेन्समध्यें संस्कृति संवर्धन हें शिक्षणाचें उद्दिष्ट असावें ही कल्पना प्रथम निघाली. त्या नगरराज्यातील समाजाचें विभाजन दोन वर्गांत झालेलें होतें. वरिष्ट वर्गात राजकीय हक्क असलेले नागरिक येत, व कनिष्ट वर्गांत गुलाम लोक. नागरिक वर्ग धनसंपन्न होता व त्यास काम फक्त युद्धकाळीं असे; शांततेच्या काळांत त्यास भरपूर फुरसद मिळे; गुलाम लोकांच्या कपाळीं कायमचे काबाडकष्ट लिहिलेले होते. मोकळा वेळ असल्यामुळें नागरिक युद्धकला व ललितकला---काव्य, नाटक, शिल्प, संगीत यांचा व्यासंग करीत. त्यांच्या मुलांसाठीं चालणाऱ्या शाळांतील अभ्यासक्रमांत याच विषयांचा समावेश असे. उपजीविकेसाठीं काम करणें नागरिकांना कमीपणाचें वाटे. सुखवस्तु जीवन कंठणें हा आपला हक्क मानीत, व तशाच प्रकारचें जीवन जगण्याचें शिक्षण त्यांच्या मुलांसाठीं दिलें जाई. उलट गुलामांच्या मुलांसाठी शिक्षणाची सोय नव्हती, कारण त्यांना शिक्षण देण्याची गरज समाजाला वाटत नव्हती. कामधंद्याचें शिक्षण त्यांना उमेदवारी पद्धतीनें मिळे.

कांहीशी अशीच परिस्थिती युरोपांत मध्ययुगांत व विद्येच्या पुनरुज्जीवनालगतच्या काळांत आढळते. फक्त उच्च वर्गाच्या लोकांसाठीं शिक्षणाची योजना होती व वाङ्मय, अलंकारशास्त्र, संगीत, व गणित हे विषय त्यांच्या अभ्यासक्रमात असत. अशा रीतीने उच्च वर्गासाठीं सांस्कृतिक शिक्षण, आणि कनिष्ट वर्गासाठीं कामधंद्याचें शिक्षण, अशी द्विदल परंपरा रूढ झाली. वर सांगितल्याप्रमाणें कनिष्ट वर्गाचें शिक्षण उमेदवारी पद्धतीनें होई. त्या शिक्षणास संस्थाप्राप्त शिक्षणाचा दर्जा नव्हता.

संस्कृति या शब्दाचे अनेक अर्थ होतात जें ज्ञान उपयुक्त नसून केवळ शोभादायक असेल तेंच संस्कृतिपर असा एक अर्थ होतो या अर्थाप्रमाणें गणित संस्कृतिप्रद नव्हे, संस्कृत भाषा आहे. इतरांच्या मतें संस्कृति म्हणजे मानवी व्यवहारांचा अभ्यास, जड सृष्टीचा नव्हे; म्हणून वाङमयाचा समावेश संस्कृतिपर ज्ञानांत होतो, पदार्थविज्ञानाचा होत नाहीं. आणखी एक समजूत अशी आहे की, ललितकलांचा व्यासंग म्हणजे संस्कृति होय; उपयुक्त कलांचा व्यासंग असंस्कृत गणावा: भांडी घडविणें हें संस्कृतींत मोडत नाहीं, पुतळे घडविणें मोडतें. याहून भिन्न विचाराचे लोक म्हणतात कीं उपजीविकेशीं संबद्ध नसलेल्या विषयांचा अभ्यास म्हणजे संस्कृति होय: संस्कृतीचें कार्य उदरंभरण नसून सामाजिक जीवनाला अलंकृत करण्याचें आहे.

यांपैकीं कोणताही अर्थ घेतला तरी समतेवर आधारलेल्या आजच्या लोकशाही युगाशीं तो विसंगत आहे, लोकशाहीच्या तत्त्वाप्रमाणें कष्ट करणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्य असून, फुरसदीचा उपभोग घेणें हा त्याचा हक्क आहे. सुधारलेल्या समाजाचें लक्षण जी संस्कृति तिचा न्याय्य वांटा प्रत्येकाला मिळाला पाहिजे. कांहीं लोकांना केवळ आराम, आणि कांहींना केवळ कष्ट, अशी विषम विभागणी आज खपणार नाहीं, म्हणून संस्कृति ही कोणत्याही एका वर्गाची मक्तेदारी होऊं शकत नाहीं.

पण संस्कृतिसंवर्धनाच्या उद्दिष्टाचें समर्थन आणखी एका युक्तिवादानें करतात. ज्या समाजांत माणूस राहतो, त्या समाजाशी अगदीं असंबद्ध अशा कांहीं वैयक्तिक गरजा माणसाला असतात, व अशा गरजा पुरविणें म्हणजे सांस्कृतिक शिक्षण होय, असा हा युक्तिवाद आहे. माणसाला शिव, सौन्दर्य व ज्ञान यांविषयीं उपजत ओढ असते. पहिल्या ओढीमुळें आत्मचिंतन करावें असें त्याला वाटेल, दुसऱ्या ओढीमुळें एखाद्या कलेची उपासना करण्याची आकांक्षा तो बाळगील, व तिसऱ्या ओढीमुळें निरुक्तासारख्या एखाद्या रुक्ष विषयाचा अभ्यास करण्याची उत्कंठा त्याला वाटेल. त्याला आदर्श नागरिक बनविणें हें जेवढें शिक्षणाचें काम आहे तेवढेंच त्याच्या या आकांक्षांची पूर्ति करणें हें आहे. अशा आकांक्षांच्या पूर्तीनें समाजाचें हित होईल कीं नाहीं हा विचार अप्रस्तुत होय; अशा

आत्मलक्षी व्यक्तिनिविष्ट ध्येयांचें साधन घडविणें हे शिक्षणकार्याचें सांस्कृतिक अंग होय.

अमेरिकन तत्त्वज्ञ व शिक्षणतज्ञ जॉन ड्यूई हा या विचारसरणींचा कट्टा प्रतिस्पर्धी होता. त्याच्या मतें अन्तर्गत व बहिर्गत अशी द्विविध मूल्यें मानणें हें खोडसाळपणाचें आहे. कारण त्यामुळें व्यक्ति व समाज यांत अनर्थकारक विरोध निर्माण होतो. व्यक्ति ही निरंतर समाजाचा घटक असते, तिच्या कार्यप्रवृत्ति समाजहिताला पोषक असतील तरच त्या प्रवृत्तींना उत्तेजन देणें योग्य ठरेल. आपल्या कृतींची समाजहितपरता वाढत जाणें हेंच खरें विकसन होय. व्यक्तीच्या तथाकथित आध्यात्मिक, बौद्धिक व कलाविषयक आकांक्षा तरच स्पृहणीय ठरतील, जर त्या योगें सामाजिक जीवन अधिक उन्नत, अधिक प्रबुध्द व अधिक सुभग होईल. जर या आकांक्षा स्वार्थपर नसून परार्थपर असतील तर शिक्षणानें त्यांची जोपासना व परिपूर्ति करावयास कांहींच प्रत्यवाय नाहीं.

कांहीं आधुनिक शिक्षणतज्ञ संस्कृतीचा वेगळाच अर्थ लावतात. रशियन शिक्षणतज्ञ कालिनिन याच्या मतें नळ व्यर्थ वाहूं न देणें, आणि स्वतःच्या हतरुणांत ढेकूण टिकूं न देणें, हें संस्कृतीचें लक्षण होय. सर्व उपलब्ध शास्त्रीय साधनांचा उपयोग करून जो जीवन शक्य तेवढें निरुपद्रव व सुखसमृध्द करील, तसेंच सार्वजनिक संपत्तीचा जो अपव्यय व अपहार होऊं देणार नाहीं त्यासच संस्कृति अवगत झाली असें म्हणावें. खाजगी व सार्वजनिक व्यवहार पार पाडताना यावच्छक्य पूर्णता साधणें, व सर्व कार्य समाजहितबुध्दीनें करीत राहणें यांतच संस्कृति खरोखरीं प्रतिबिंबित होते. समाजनिष्ठा व जबाबदारीची जाणीव यांचे जीवनांत प्रत्यक्षीकरण म्हणजे संस्कृति होय. या दृष्टिकोनांत शीलसंवर्धन व नागरिकत्वाचें शिक्षण या उद्दिष्टाचा समन्वय झालेला दिसतो.

जीवनाच्या सर्व अंगांसाठीं शिक्षण हवें असें प्रचलित मत आहे. शिक्षणानें विद्यार्थ्याला उदरंभरण करण्यास, सामाजिक जबाबदारी संभाळण्यास व सुसंस्कृत होण्यास समर्थ केलें पाहिजे. म्हणून केवळ संस्कृतिसंवर्धन हें उद्दिष्ट अपूर्ण वाटेल, परंतु या उद्दिष्टाच्या पुरस्कर्त्यांनीं शिक्षणकार्याची व्यापकता, शिक्षणांत आढळणारे सामान्य दोष यांचें उपयुक्त दिग्दर्शन केलें आहे.

शिक्षणांत फक्त चरितार्थाच्या साधनावर भर देणें योग्य होणार नाहीं. मानवाला शिक्षणाची गरज माणूस व कामगार या दोन्ही भूमिकांवरून असतें. मानवविशिष्ट मूल्यांची जाणीव बालकास करून देणें हें शिक्षणाचें अवश्य कर्तव्य होय. शिक्षणानें सामाजिक संबंध वाढून मानवी भावना, विचार व आकांक्षा यांचें व्यापक व खोल ज्ञान व्हावें म्हणून अभ्यासक्रमांत भाषा व वाङमय यांना महत्त्वाचें स्थान असावें.

शिक्षणानें अतिरिक्त एकांगीपणाविरुद्ध खबरदारी घेतली पाहिजे; कारण विशिष्ट विषयाचाच केवळ अभ्यास करीत राहिल्यानें वृत्ति संकुचित होतें. यशस्वी व्यापारी, वकील, वैद्य बहुधा एकमार्गी असतात, स्वतःच्या व्यवसायाव्यतिरिक्त मानवी व्यवहारांत त्यांना रस वाटत नाहीं. यामुळें त्यांच्या स्वतःच्या जीवनांत तर अपूर्णता राहतेच. पण शिवाय यांच्या अधीन ज्या व्यक्ती असतील त्यानाही आपल्या अभिरुचीनुसार वागण्यास संकोच होतो. आदर्श गृहस्थ होण्यासाठीं आत्म्याच्या खिडक्या सर्व दिशांना उघडया ठेविल्या पाहिजेत.

शिक्षणानें फुरसतीच्या वेळाचा सदुपयोग कसा करावा हेंही शिकविलें पाहिजे. कामांतील वेळ हां हां म्हणतां निघून जातो, पण रिकामा वेळ कसा घालवावा याचें कोडें पडतें, आणि मग रिकामा न्हावी कुडाला तुंबडया लावी या न्यायानें माणूस कांहींतरी करीत बसतो म्हणून शिक्षणाच्या द्वारा मनांमध्यें छंद, क्रीडा, कला याची आवड निर्माण केली पाहिजे, व रिकामा वेळही मनोरंजक व उद्बोधक कार्यक्रमानें सार्थकीं लावतां येतो हें पटवून दिलें पाहिजे. असें झालें नाहीं तर शिक्षणानें जीवनाच्या समग्र अंगाची तयारी होते हा दावा खरा ठरणार नाहीं.

संस्कृति संवर्धनाच्या उद्दिष्टाला अशा रीतीनें ऐतिहासिक तसेंच अद्यतन महत्त्व आहे. हें उद्दिष्ट प्रथम मांडलें गेलें तेव्हांची समाज रचना व सामाजिक मूल्यें आज जरी लुप्त झालीं असलीं, तरी शिक्षणाकडे बघण्याच्या या दृष्टिकोनांत अवशिष्ट अन्वर्थकता टिकून आहे. आजही आपण संस्कृतीला तुच्छ गणू शकत नाहीं. आज आपणांला हवीशी वाटणारी संस्कृति आजच्या विचारधारेस अनुसरून वेगळी आहे इतकाच फरक. शिक्षणानें संस्कृतिसंवर्धन झालें पाहिजे असाच आजच्या शिक्षणतज्ञांचा कौल आहे.

****

९ :

# समायोजनपटुता

*****************************

भावी जीवनांतील जबाबदारी तरूण पिढीला पार पाडतां यावी यासाठीं समायोजनपटुता आवश्यक आहे. तरूण पिढीचें समायोजन सुकर व कार्यक्षम व्हावें या हेतूनें केलेली योजना म्हणजे शिक्षण होय. तसेंच कमी समाधानकारक व कमी कार्यक्षम प्रतिक्रिया दूर करून त्यांचें जागीं जास्त समाधानकारक व कार्यक्षम प्रतिक्रिया होतील असा फरक घडवून आणणें हें शिक्षणाचें साध्य असतें. अर्थातच शिक्षण व समायोजन यांचा संबंध फार निकटचा आहे. त्या संबधाचें स्पष्टीकरण करूं.

समायोजनाच्या प्रक्रियेचीं तीन अंगें असतात. व्यक्तीची प्रेरणा; त्या प्रेरणेच्या पूर्तीच्या मार्गातील अडथळा व त्या अडथळ्यांमुळें उत्पन्न होणारा मानसिक ताण; तो ताण दूर करणारी कृति. समायोजनाचा हेतू आकांक्षेची पूर्तता हाच सदैव असतो. उदाहरणार्थ, शारीरिक निवृत्ती ही एक सर्वसामान्य प्रेरणा आहे. उन्हाळयांत थंडीमुळें या साध्यांत प्रत्यवाय येतो, म्हणून गरम कपडे घालून आपण परिस्थितीशीं समायोजन करतों. दुसरी एक सामान्य आकांक्षा परीक्षा पास होण्याची असते. अभ्यासक्रम कठीण असला आणि अपयशाचा धोका वाटला तर आपण एखाद्या खास वर्गात नांव घालतो, अथवा परीक्षेंत नक्कल करतो अथवा परीक्षकाला लांच देतों. सामान्यत: समायोजनाचे अनेक पर्याय उपलब्ध असतात. कांहीं वेळां समायोजक प्रत्येक पर्यायाचा क्रमाक्रमानें अवलंब करतो; आणि कांहीं वेळा त्यापैकीं कोणत्या तरी एका पर्यायाची निवड स्वैरपणें करतो. समायोजनाचा प्रयत्न नेहमीच यशस्वी होईल असें नाहीं. काहीं आकांक्षा कधींच पूर्ण न होण्यासारख्या असतात.

शिक्षणानें समायोजनाच्या तिन्ही अंगांत फरक घडून येतात. वर दिलेल्या उदाहरणावरून प्रेरणा पुष्कळ व बहुविध असतात हें स्पष्ट दिसतें. प्रेरणांमध्यें तीव्रता व गुणवत्ता या दोन्हीं दृष्टीनीं फरक असतात. कांहीं प्रेरणा फार प्रबळ असतात, कांहीं निस्सत्त्व असतात; कांहीं समाजहितपर असतात, दुसऱ्या समाजविघातक असतात.)अनिष्ट प्रेरणांचा लोप करून इष्ट प्रेरणाची जोपासना करणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट होय. सद्भिरुचि निर्माण करणें, चांगल्या कार्याविषयी आवड व निष्ठा बालवयांत रुजविणें, आणि महत्त्वाकांक्षा जागृत करणें हें शिक्षणाचें कार्य आहे.( महत्त्वाकांक्षा जागृत झाली तर सुखसोयी तुच्छ मानून मानव कष्टांचे डोंगर उपसण्यास तयार होतो.

समायोजनाच्या मार्गातील अडथळ्यांचा उगम त्रिविध असतो. एक तर तो व्यक्तीच्या स्वभावांतील दोषापासून उद्भवलेला असतो, अथवा परिसरांतील एखाद्या प्रतिकूल घटकाचा परिणाम असतो, किंवा दोन विरोधी प्रेरणांच्या संघर्षामुळें निर्माण झालेला असतो उच्च शिक्षणाचा अभ्यासक्रम पुरा करूं पाहणारा मंद बुद्धीचा विद्यार्थी आपल्या उपजत गुणवत्तेतील उणीवेशीं झगडत असतो. वैद्यकीसारखा खर्चिक शिक्षणक्रम अंगीकारलेला हुशार पण गरीब विद्यार्थी आपल्या दारिद्र्याशी झुंज देत असतो. दोन प्रेरणांमधील संघर्ष नित्य परिचयाचा आहे. घरीं आई आजारी आहे आणि आपली निवड शाळेच्या क्रिकेट संघांत झाली आहे. एक प्रेरणा ' घरी रहा ' अशी असते, तर दुसरी ' संधी दवडूं नको, खेळ ' असा आदेश देत असते.

\ शिक्षणाचा प्रयत्न समायोजनांतील अडथळ्यांची संख्या कमी व्हावी असा असतो.(तसेंच जे अडथळे दूर करतां येणार नाहींत त्यांची तीव्रता कमी व्हावी असाही शिक्षणाचा साक्षेप असतो. असाध्य महत्त्वाकांक्षा मनात बाळगली तर समायोजन दु:साध्य होतें, म्हणून कर्तृत्वाची मर्यादा प्रत्येकास कळणें अगत्याचें असतें.\आत्मज्ञान हें समायोजनाचा पाया होय.) शाळेत मुलाला आपल्या शक्तीचा आवाका व आपल्या शक्तीची मर्यादा, दोन्हीं गोष्टींचें नीट ज्ञान झालें पाहिजे. अतृप्त आकांक्षाचा धोका टळावा म्हणून आधुनिक शिक्षणांत शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शनाची योजना केलेली असते.

विद्यार्थ्यांचें वय, शक्ती व अभिरुचि ध्यानांत घेऊन शालेय कार्यक्रम आंखला पाहिजे. अभ्यासक्रम ठरवितांना मुलांची परिपक्वता लक्षांत घ्यावी. विविध विषयांच्या अभ्यासक्रमाची आंखणी अशी यथाक्रम असावी कीं कोणत्याही अवस्थेंत विद्यार्थ्याला त्याच्या शक्तीपलीकडचें काम करावयास सांगितलें जाणार नाहीं. तसेच बालकांच्या सहजप्रवृत्तींचा उपयोग त्यांची आत्मोन्नतीची आकांक्षा प्रभावी व्हावी म्हणून केला पाहिजे. अशा अनेक मार्गांनीं विद्यार्थ्याच्या शैक्षणिक परिसरांत बदल घडवून त्याचें समायोजनाचें कार्य सुलभ केलें जातें.

प्रतिकूल सामाजिक परिस्थिति हा समायोजनाच्या मार्गातील मोठाच अडसर होय. अंगीं योग्यता असून कर्तृत्वाला वाव मिळत नाही, ही परिस्थिति तरुणांना फारच नाउमेद करणारी असते. युवक पोटाला चिमटा घेऊन व अखड कष्ट करून तांत्रिक कसब संपादन करतो, पण बड्या पगाराची जागा त्याला न मिळतां त्याच्याहून कमी योग्यतेच्या पण मालकाशी संधान असलेल्या व्यक्तीला मिळते. वशिलेबाजी, प्रादेशिक व जातीय पक्षपात यामुळें असे अन्याय घडतात व साहजिक तरुणांचीं मनें सात्त्विक संतापानें जळूं लागतात.

शिक्षण अशा अन्यायाविरुद्ध दोन प्रकारची मोहीम चालू ठेवतें. पिळवणूक, विषमस्पर्धा व वशिलेबाजी या घातचक्राचा नायनाट करण्याची दीक्षा घेतलेली तरुण पिढी निर्माण करून समाजांत क्रान्ति घडवून आणण्याचा प्रयत्न करणें हा त्या आघाडीचा एक भाग होय. शिवाय शाळेबाहेर पडल्यावर सामाजिक परिस्थितीला तोंड द्यावें लागेल याची स्पष्ट कल्पना विद्यार्थ्यांना देणें हा दुसरा भाग होय. शाळेचें जग व व्यवहारी जग यामधील जो संधिकाल असतो, त्या कालांत मुलांना व्यवहारी जगांत प्रभाव गाजविणाऱ्या शुभाशुभ शक्तींची यथार्थ जाणीव करून दिली पाहिजे, हें मत आतां शिक्षणांत मान्यता पावलें आहे. नैतिक तत्त्वांच्या नांवानीं आपण भवसागर तरून जाऊं अशी भ्रामक समजूत मुलांच्या मनांत निर्माण करणें हें महापातक होय. कुटिल मानवी व्यवहारांत पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यातील अशुभ शक्तींची आगाऊ सूचना दिली तरच त्या शक्तींशी झुंज खेळण्यास ते दंड ठोकून तयार होतील.

विरोधी प्रेरणांमधील संघर्ष टाळणें शक्यही नाहीं व इष्टही नाहीं. हीन वासनांचा बुद्धिपुरस्सर त्याग करून कष्टप्रद उदात्त प्रेरणांचा अनुसार करण्यांतच मानवी जीवनाची खरी प्रतिष्ठा दिसून येते. प्रेरणांच्या मूल्यांची योग्य कल्पना देऊन या संघर्षाची कालमर्यादा त्रुटित करणें व त्यांतील कटुता कमी करणें एवढेंच शिक्षणाचें उद्दिष्ट असतें. शीलसंवर्धनाच्या विवेचनांत इष्ट स्थिरवृत्ती कशा निर्माण कराव्या, त्यांचें व्यवस्थापन कसें करावें, अनुरूप अहंवृत्तीची जोपासना कशी करावी व निग्रहशक्तीची वाढ कशी करावी याचा उल्लेख आलाच आहे. अहंवृत्तीच्या व निग्रहशक्तीच्या प्रभावानें प्रेरणांमधील संघर्षाचा त्वरित निर्णय लागून वागणुकीला इष्ट वळण मिळतें.

प्रेरणांचें मूल्यमापन करतां येऊं लागलें म्हणजे समायोजनाच्या पर्यायांपैकीं कोणत्या पर्यायाची निवड करावी याचाही निर्णय करतां येतो. समायोजनाचे कांहीं प्रकार पोरकट असतात, आणि कांहीं प्रकारांत निष्कृति करण्याचा अबोध हेतु दिसून येतो. आपण अडखळलों असतां जमिनीला ताडण करणें ही प्रतिक्रिया उघड उघड बालिश म्हणून दुर्लक्षणीय आहे. परंतु वरिष्ठानें आपला अपमान केला असतां त्याचा वचपा घरीं आल्यावर मुलास मारून काढणें हें वर्तन मात्र महत्त्वपूर्ण व दूषणीय आहे. या दोन्ही प्रतिक्रिया चेतकाशीं असंबद्ध असल्या तरी त्यामुळें मनावरील ताण कमी होतो. अशा लघुत्वद्योतक समायोजनाचा तिरस्कार करण्यास मुलास शिकविलें पाहिजे. आत्मज्ञानाला आत्मगौरवाची व आत्मसंयमाची जोड दिली पाहिजे.

आपणांस कोणी इजा केली तर तात्कालिक उपजत प्रेरणा आपणांस 'सूड घेऊन त्याला अधिक गंभीर इजा कर' असें सांगते. पण त्याच्या अपराधाची क्षमा करणें व तो अपराध विसरून जाणें ही प्रतिक्रिया अधिक उदात्त प्रेरणांवर आधारलेली आहे. अद्वेषवृत्तीचा आचार कठीण असतो. पण शिक्षणाचा हेतुच मुळीं सुलभ पण अल्पमोल सिद्धी अव्हेरून बहुमोल पण कष्टसाध्य ध्येयाची साधना करीत रहावयास शिकविण्याचा आहे. हीनतर समायोजन तुच्छ मानून उदात्ततर समायोजन निवडण्याची संवय बालकांना लागली तरच समायोजन कार्यक्षम करण्याचें शिक्षणाचें उद्दिष्ट पूर्ण झालें असें म्हणतां येईल.

अडथळा दूर झाला, मनावरील ताण कमी झाला, प्रेरणा सफल झाली म्हणजे समायोजनाची प्रक्रिया पूर्ण होत नाहीं; कारण एका प्रेरणेच्या समाधानांतूनच अन्य प्रेरणा निर्माण होतात, व त्याची पूर्तता करण्याची ओढ मनाला लागते. अंकगणितांतील कठीण उदाहरण सुटलें म्हणजे बालकाला अधिक कठीण उदाहरणें सोडवावीशीं वाटतात. गरीब माणूस भगीरथ प्रयत्नानें श्रीमंत झाला म्हणजे त्याला सुसंस्कृत समाजांत मिसळण्याची आकांक्षा निर्माण होते. अशा रीतीनें गरजा, परिसर व गरजा पुरविण्याचें सामर्थ्य यांची सतत उत्क्रांति होत असते. अधिकाधिक विषयांबद्दल बालकांच्या मनांत अभिरूची निर्माण करून आणि त्यांच्या शक्तींचा वाढता विकास करून या उत्क्रांतिचक्राची गति वाढविण्याचें कार्य शिक्षणाला करावयाचें असतें. म्हणून रुएडिगरच्या मते " शिक्षण देणें म्हणजे दुसरें कांहीं नाहीं. आधुनिक जीवनांत ज्यांना महत्त्व आहे अशा परिसरांतील घटकांशीं समायोजन करण्यास बालकांस शिकवा, त्यांच्या शक्तींना योग्य वळण द्या, त्यांच्या शक्तीचें विकसन व व्यवस्थापन करा, आणि अशा रीतीने आपल्या शक्तींचा योग्य व पूर्ण उपयोग करण्यास त्यांस समर्थ करा. "

१० :

# प्राचीन भारतीय शिक्षणाचीं उद्दिष्टें व ध्येयें

**************************·****

प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीविषयीं प्रत्यक्ष माहिती उपलब्ध नाहीं. तत्कालिन शिक्षणसंस्था व शिक्षणपद्धति यांची माहिती देणारे ऐतिहासिक कागदपत्र अस्तित्वांत नाहीत. प्राचीन वाङमयांत शिक्षणाची चर्चा करणाऱ्या ग्रंथांचाहि अभाव आहे. रामायण, महाभारत, उपनिषद, स्मृतिग्रंथ इत्यादि हिंदूच्या वाङमयांत जे त्रोटक व तुरळक उल्लेख शिक्षणाविषयीं आढळतात. त्यांच्यावरून शिक्षणाच्या स्वरुपाविषयीं अनुमानें काढावीं लागतात. बुद्धधर्मीयांच्या वाङमयांतहि असे उल्लेख सांपडतात, व बुद्धधर्मीयानीं चालविलेल्या विद्यापीठांना भेट देण्यास जे चिनी पाहुणे आले त्यांच्या प्रवासवर्णनांत शिक्षणपद्धतीचें वर्णन येतें. या सामग्रीचा उपयोग करून प्रसिद्ध इतिहासतज्ञ अळतेकर, मुकर्जी व दास यांनीं प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीची कल्पनाचित्रें सजविली आहेत.म्हणून त्या पद्धतीचीं उद्दिष्टचें व ध्येयें यांचा बोध आपणांस होऊं शकतो.

प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतींत दोन भिन्न पद्धतींचा अन्तर्भाव होतो. त्यांपैकीं जास्त पुरातन पद्धत हिंदूची असून तिची परंपरा चारहजार वर्षाहून अधिक काळपर्यंत अव्याहत चालू होती. बुद्ध पद्धतीनें हिंदू पद्धतीची बहुतेक वैशिष्टचें पुढें चालू ठेवली. या पद्धतीला हिंदू पद्धतीचें उत्क्रान्त स्वरुप समजावयास हरकत नाहीं पण बुद्ध पद्धतीला अधिक प्रसिद्धी मिळाली. बुद्ध धर्माचा प्रसार चीन देशांत झाल्यानंतर अनेक चिनी लोक धार्मिक भावनेनें भगवान बुद्धाच्या जन्मभूमीचें दर्शन घेण्यासाठीं व बुद्ध विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठीं भारतात आले. त्यांनीं लिहून ठेवलेल्या प्रवासवर्णनांचें भाषांतर युरोपीय भाषांत होऊन बुद्धधर्मीयांच्या शिक्षणपद्धतीचा बोलबाला झाला.

हिंदू पद्धत व बुद्ध पद्धत यांत फारसा फरक नाहीं. हिंदूच्या शिक्षणांत वेदांच्या अध्ययनाला प्राधान्य होतें, बुद्धाच्या शिक्षणांत तें वर्ज्य केलें होतें; सर्व हिंदू शिक्षक ब्राम्हण वर्णाचे असत, बुद्ध शिक्षकांत असें वर्णवैशिष्टच नव्हते; हिंदु शिक्षण फक्त ब्राह्मण व क्षत्रिय या द्विजातीच्या विद्यार्थ्यांना मिळे, बुद्ध विद्यापीठांची द्वारें सर्व वर्णाच्या विद्यार्थ्यांना उघडी होतीं. केवळ धार्मिक मतभेदामुळें उद्‌भवणारे हे फरक जर वगळले तर शिक्षणाचें उद्दिष्ट व शिक्षणाच्या पद्धति याबाबतींत हिंदू व बुद्ध यांत एकवाक्यता होती.

शिवाय प्राचीन भारतीय पद्धत द्विदल स्वरूपाची होती.तींत उच्च वर्गासाठीं व कनिष्ठ वर्गासाठी शिक्षणाची अगदीं भिन्न योजना होती.कनिष्ठ वर्गास फक्त उपयोगी उद्योगधंद्याचें शिक्षण मिळे, व तेंही शिक्षण संस्थातून मिळत नसे तर उमेदवारी पद्धतीनें मिळे क्वचित कांहीं व्यवसायाच्या शाळा असत, पण त्यांचा अभ्यासक्रम संकुचित असून मुख्य उद्देश विद्यार्थ्यांस कसबी करण्याचा असे. अर्थात प्राचीन भारतीय शिक्षणपद्धतीच्या उद्दिष्टांची व ध्येयांची चर्चा ही उच्च वर्गाच्या शिक्षणयोजनेपुरती मर्यादित आहे. लोकशाहीच्या उदयापूर्वीं सर्व देशांत द्विदल शिक्षणपद्धतीच प्रचलित होती. मुद्रणकलेचा शोध जेव्हां लागला नव्हता, दळणवळणाचीं साधनें जेव्हां अत्यल्प व अपुरीं होतीं, मानवी समानतेच्या तत्त्वाचा स्पर्शही जेव्हां मानवी मनाला झाला नव्हता, त्याकाळीं शिक्षणाची सोय केवळ उच्च वर्गापुरती मर्यादित असणें अगदी स्वाभाविक होतें.

प्राचीन भारतीय शिक्षणाचा अध्यात्मविद्येवर विशेष भर होता. त्या काळीं मुक्ती मिळविणें हें जीवनाचें ध्येय मानीत व शिक्षणाचें उद्दिष्ट मोक्षसाधनास व्यक्तीला समर्थ करणें हें होतें. प्राचीन भारतांत ज्ञानाचें वर्गीकरण दोन विभागांत करीत. ऐहिक विद्या व पारलौकिक विद्या. विद्यार्थी बहुतेक ब्राह्मणवर्णाचे असत आणि त्यांचें लक्ष अध्यात्मविद्येवर केंद्रित झालेलें असे. ज्ञानासाठीं ज्ञान हें मत तत्कालीनांस मान्य नव्हतें. जन्ममृत्यूच्या रहाटगाडग्यातून सुटका करणारें साधन एवढेंच ज्ञानाचें मूल्य मानीत. ‘ सा विद्या या विमुक्तये ’. ऐहिक विद्येचे साधन करीत नसत असें नाहीं. पण विशिष्ट वर्णातील जन्मामुळें ज्यांना अध्यात्मविद्या संपादन करण्याचा अधिकार नव्हता अशा कनिष्ठ लोकांकडे तें काम सोंपविलेलें असे.

प्राचीन भारतीय शिक्षण जरी अध्यात्मविद्येला वाहिलेलें असलें तरी त्याचा लौकिकव्यवहाराशीं संबंध तुटलेला नव्हता. या गूढाचें स्पष्टीकरण आपणाला प्राचीन भारतीयांच्या धर्मकल्पनेंत सापडतें. त्यांची समजूत अशी होती कीं मोक्षसाधनासाठीं वर्णविहित धर्माचें ( म्हणजे कर्तव्यांचें ) आचरण केलेंच पाहिजे. मुमुक्षूनें आत्मबोधाची कास अवश्य धरावी; पण असें करतांना त्यानें वर्णविहित कर्मे सोडून चालणार नाहीं. म्हणून ब्राम्हणाना जे शिक्षण दिलें जाई त्यांत धार्मिकविधींच्या माहितीबरोबरच सामाजिक कर्तव्यांची जाणीवही दिली जाई. या कर्तव्यांपैकीं अध्ययन व अध्यापन हीं प्रमुख होतीं. म्हणून ब्राम्हण युवकाच्या शिक्षणाचें उद्दिष्ट तो आदर्श विद्यार्थी, आदर्श अध्यापक, आदर्श भिक्षुक व आदर्श मुमुक्षु व्हावा असें चतुर्विध होतें.

मोक्षसाधन व धर्मपालन हीं जी प्राचीन भारतीय शिक्षणाची दोन प्रमुख उद्दिष्टें त्यांत शीलसंवर्धनाचें उद्दिष्ट अध्याहृत आहे. समाजाचें अध्यात्मिक नेतृत्व ज्यांच्याकडे जाणार त्यांचें अंगीं सच्छील हा आवश्यक गुण समजला जाई. गुरुगृहीं वास करून विद्या संपादन करावयाची अशी रीत प्राचीन भारतांत रूढ असल्यामुळें शीलसंवर्धन सहज होऊं शके. गुरु व शिष्य यांचें तत्कालीन संबंध व्यापारी स्वरूपाचे नसून कौटुंबिक स्वरूपाचे असत. गुरु हा परमार्थतः पितृपदी अधिष्ठित झालेला असे. त्यावेळचे गुरु म्हणजे ऋषि हे सत्त्वशील व धर्मपरायण असत व त्यांच्या सान्निध्यांत सतत राहिल्यानें शिष्यांच्या शीलाला इष्ट तें वळण अपोआप मिळे

असेंही एक मत मांडण्यांत येतें कीं, प्राचीन भारतीय शिक्षणाचें आत्माविष्कार हें ध्येय होतें. आत्माविष्काराचा अध्यात्मिक अर्थ घेतला व त्याचें स्वरुप आत्मबोधाच्या द्वारा 'सो ऽहम्' ही प्रतीति घडविणें असे धरलें, तर हें मत ग्राह्य धरण्यास हरकत नाहीं परंतु स्वतःच्या सर्व शक्तींचा पूर्ण विकास करून घेणें हा आत्मविष्काराचा अर्थ घेतला, तर प्राचीन भारतांत हें ध्येय अवगत नव्हतें असेंच म्हणावें लागेल इतकेंच नव्हे तर अशा ध्येयाला प्राचीन भारतीयांनीं विरोध केला असता असेंही म्हणतां येईल. ऐहिकापासून पराङमुख होणें ही प्राचीन भारतीय वृत्ति होती. ऐहिकांत मन रमविणें हा परमार्थाच्या मार्गातील अडथळा होय असें

ते मानीत. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धति आपल्या परीनें कार्यक्षम होती. आदर्श व्यक्तिमत्त्वाचें अनेक नमुने तिनें घडविले, व अनेक प्रकारांनीं ज्ञानवृद्धि घडवून आणली यांत शंका नाहीं. तिच्या अंगीं नसतीं उद्दिष्टें चिकटविण्याचा प्रयत्न गौरवास्पद नसून हास्यास्पद मात्र ठरेल.

शिवाय त्या शिक्षण पद्धतींतच तिचा ऱ्हास घडवून आणणारे दोष अंगभूत होते. ती पद्धत वर्णविशिष्ट असून अध्यात्मिक अंगावर अवास्तव भर दिल्यानें ती एकांगी झाली होती. कालांतराने धर्मैकनिष्ठतेचा परिणाम धर्मग्रंथाचें प्रामाण्य अंधपणें स्वीकारण्याच्या वृत्तीत झाला. धर्मवेत्त्यांची दृष्टी तर्काच्या प्रखर प्रकाशानें दिपूं लागली, नवीन ज्ञानाचें संशोधन करणारी धाडसी प्रतिभा लुप्त झाली, आणि घटापटांच्या शुष्क वादविवादांच्या दलदलींत भारतीय बुद्धिमत्ता रुतून बसली, प्रतिभेला प्रज्वलित करण्याचें ध्येय शिक्षणपद्धतीतून वर्ज्य झालें आणि घोकंपट्टी पद्धतीने निश्चेतन झालेलें श्रद्धेचें मढें जतन करून ठेवण्याचें कार्य केवळ चालू राहिलें,

प्राचीन भारतीय पद्धतीचे गोडवे गाणारे लोक त्या पद्धतीच्या पुढील वैशिष्ट्यांवर नेहमी भर देतात :—

( १ ) गुरु-शिष्यांचे अर्थनिरपेक्ष कर्तव्यप्रधान स्निग्ध संबंध.

( २ ) लोकरहाटीपासून दूर अशा मोहदुर्लभ वनांत शिक्षणाचें स्थान.

( ३ ) 'अन्तेवासी' पद्धतीनें विद्यार्थ्यांना लागणारें वळण.

यांत शरीरकष्ट करण्याची संवय, श्रमगौरव, अध्ययन, आहार व विहार यांत नियमितपणा, इत्यादी गोष्टींचा अन्तर्भाव होतो.

हीं वैशिष्टयें तत्कालीन समाजांतच शक्य होतीं. त्या वेळचे लोक अर्थपूजक नव्हते. कमी लोकसंख्या व विपुल क्षेत्र यामुळें लोक सुखवस्तु होते, त्यांना अन्नवस्त्राची चणचण नव्हती. अनावश्यक संग्रह करण्याची वृत्ति अपरिचित होती. राहणी साधी असून गरजा अत्यल्प होत्या. लोक सश्रद्ध असून वर्णविशिष्ट धर्माचें पालन केलेंच पाहिजे असें त्यांस वाटे. ब्राम्हणांना अध्ययन व अध्यापन या वर्णधर्माविषयीं आस्था होती.

आजची समाजरचना अर्थप्रधान आहे. आज जीवनकलह अत्यंत तीव्र झाला असून जिवंत राहण्यासाठीं माणसांना फार कष्ट करावे लागतात.

भौतिक शास्त्रांच्या विकासानें व औद्योगिक क्रांतीमुळें जीवनाचें स्वरूप पालटलें असून गरजा बेसुमार वाढल्या आहेत. आतां लोकशिक्षणाला अध्यात्मिक उन्नतीचे साधन मानीत नाहीत, तर प्रखर जीवन संगरातील अस्तित्वरक्षणाचें साधन मानतात.

आजच्या बदललेल्या परिस्थितींत प्राचीन भारतीय शिक्षणाचीं वैशिष्ट्यें पुनरुज्जीवित करणें शक्य नाहीं. शिक्षणाचीं उद्दिष्टें सामाजिक मूल्यांवर अवलंबून असतात व शिक्षणाच्या पद्धति समाजाची संस्कृति व औद्योगिक प्रगति यांनुसार बदलतात. प्राचीन भारतीय शिक्षण पद्धतीच्या अध:पातावरून आपणांस हाच धडा मिळतो कीं, शिक्षणाच्या साध्यांत व साधनांत समाजांतील क्रांतीला अनुसरून सतत बदल करीत राहिलें पाहिजे. परंपरेला चिकटून राहिल्यानें शिक्षणाला शिलावस्था येते व ती सामाजिक प्रगतीला बाधक होते आपल्या प्राचीन पूर्वजाविषयीं आपणांस कितीहि आदर वाटत असला तरी ‘त्यांचीं शिक्षणविषयक ध्येयें स्वीकारा’ असें म्हणणें हे ‘त्यांची पोशाखपद्धति व उत्पादनपद्धति स्वीकारा’ असें म्हणण्याइतकेंच हास्यास्पद होईल. आपण मागें वळूं शकत नाहीं. आजची लोकस्थिती जमेस धरून शिक्षणाचीं अद्यतन ध्येयें आपण ठरविलीं पाहिजेत व त्यांच्या साधनासाठीं आजच्या संस्कृतीचा पूर्ण उपयोग करणाऱ्या अद्यतन पद्धतीचा अंगीकार केला पाहिजे.

****

११ :

# शिक्षणाचीं केंद्रें

*************************************

## घर

घर हें शिक्षणाचें आदर्शस्थान होय. घरांत गुरु व शिष्य यामध्यें दुजेपणा असत नाहीं. कुटुंबातील सर्व वडीलमंडळी बालकाला चांगलें वळण लागावें म्हणून झटत असतात. हीं सर्व शिकविणारीं माणसें व बालक यांचें परस्परांवर प्रेम असतें म्हणून वडीलमाणसें आपणांस जो उपदेश करतील तो आपल्या हिताचाच असणार अशी बालकाची श्रद्धा असते. तो उपदेश क्वचित् प्रसंगीं त्याला कटु वाटेल, त्या उपदेशाप्रमाणें तो कदाचित् वागणारही नाहीं. तथापि उपदेशकांच्या सदिच्छेविषयी त्याला कधीं संदेह वाटत नाहीं. घराचा दुसरा विशेष हा आहे कीं तेथलें शिक्षण अनुभवाच्या द्वारा मिळत असतें. घरांत राविक कामें करावयाची असतात. आजाऱ्यांची शुश्रुषा, वडिलांची सेवा, कनिष्टांचें संगोपन, बरोबरीच्या व्यक्तींशीं सहकार्य व थट्टामस्करी या सर्व प्रासंगिक घटनांत शील घडविण्याचें सामर्थ्य आढळतें. घरांत भिन्न दर्जाची व भिन्न वयाची माणसें एकत्र येतात व या संघटनांतून वरिष्ठांशीं व कनिष्ठांशीं कसें वागावें याचे शिक्षण मिळतें. जबाबदार लोकशाही जीवनाची शिकवणूक मिळण्यासाठीं घरासारखें दुसरें आदर्श स्थान नाहीं. तसेंच सूचना, सहानुभूति व अनुकरण या साधारण प्रवृत्तींच्या द्वारा शिक्षण देण्यास अमर्याद वाव घरांत असतो, आईबाप व मुलें यांमध्यें अंगविक्षेप, आवाज, आचार व विचार या बाबतीत जें आश्चर्यकारक साम्य आढळून येतें त्यावरून वरील प्रवृत्तींच्या प्रभावानें वडील माणसें व बालक यांमध्यें एकरूपता कशी निर्माण होतें तें समजतें. मुलांना योग्य वळण लावणाऱ्या सर्व उपलब्ध संधीचा जर घरांत

योग्य उपयोग होऊं लागला तर राष्ट्राचें पुनरुज्जीवन होण्यास विलंब लागणार नाहीं.

बालकांच्या मानसिक विकासासाठीं अनुकूल परिस्थिति घरांत निर्माण करणें हें पालकांचें कर्तव्य आहे. निरामय विकासासाठीं मुलांना घरांत प्रेम, सुरक्षितता व गौरव या तीन गोष्टी आवश्यक असतात. मुलां-वरील प्रेम केवळ त्यांस खाऊ देऊन अथवा पापे घेऊन व्यक्त करूं नये. मुलांबरोबर खेळणें, त्यांना गोष्टी सांगणे, त्यांना फिरावयास नेणें, त्यांनी आरंभिलेल्या व्यवसायांत रस घेऊन साहाय्य करणें, हे प्रेम व्यक्त करण्याचें विहित मार्ग होत.आपल्या सुखांत व दुःखांत, आकांक्षात व अडचणींत वडील माणसें सहभागी आहेत अशी भावना मुलांच्या मनांत निर्माण व्हावी. मुलांना सुरक्षितता वाटावी म्हणून आपली शिस्त सुसंगत असावी, अतिरिक्त कठोरता वा अतिरेकी शिथिलता शिस्तीत नसावी. काय केलेलें चालेल व काय केलेलें खपणार नाहीं याची जाणीव मुलांस द्यावी. व तदनुसार वर्तन त्यांचेकडून करून घ्यावें. गौरवाची भूक भागविण्यासाठी मुलांना कर्तृत्वाची संधी दिली पाहिजे. वडिलांनी आपणांस काम सांगावें असें मुलांना वाटत असतें. त्यांच्या हौसेचा योग्य फायदा घेऊन आवाक्याप्रमाणें अधिकाधिक जबाबदारीचीं कामें मुलांस सांगावीं. डाकवाल्याकडून पत्रें घेण्याचें काम अगदीं लहान मुलास सांगितले तरी तें करण्यांत त्यास अभिमान वाटतो. घरांतील हिशोब लिहिण्याचे काम शाळकरी मुलांस सांगितलें तर त्यांस मोठेपणा वाटेल. योग्यतेप्रमाणें कामें मुलांवर सोपविल्यानें त्यांना गौरव तर वाटतोच, शिवाय त्यांच्या मनांत जबाबदारीची जाणीव निर्माण होते.

शारीरिक आरोग्य राखून वाढ नीट व्हावी म्हणून जपणें हेंही घराचें काम आहे. मुलांना पुरेसें पौष्टिक अन्न व जरूर तेवढी विश्रांति मिळाली पाहिजे. आळसानें मुलांस शिळें अन्न खाऊ घालणारी आई व मुलांची झोप आपल्या चैनीसाठीं मोडणारा बाप, या दोघांचीहि वागणूक बेजबाबदार होय. चांगल्या घरांत मुलांच्या हिताला प्राधान्य देतात तसेंच मलविसर्जनादि शारीरिक शुद्धीची कामें वेळेवर करणें, वक्तशीर खाणेंपिणें नियमित व्यायाम करणें इत्यादि आरोग्य राखण्यासाठीं अवश्य असणाऱ्या संवयी घरांतच लावल्या पाहिजेत.

बालकांच्या बौद्धिक वाढीला वाव व साहाय्य देणें हेंहि पालकांचें कर्तव्य होय. मुलांची कुतुहूलबुद्धि जागृत ठेवून तिला योग्य तें खाद्य पुरवीत राहावें. मुलांनीं अवघड प्रश्न विचारले तर त्यांवर रागावूं नये. जाणत्या माणसांकडून त्या प्रश्नांचीं उत्तरें मिळवून मुलांस सांगावी; निदान पक्षीं कोणाकडून उत्तरें मिळूं शकतील याचें दिग्दर्शन करावें. तसेच आपल्या मुलाच्या अंगीं एखादें उपजत कसब आहे कीं काय यांविषयीं पालकांनीं सतत तलासांत राहावें. चित्रें काढणें, गाणें, गोष्टी रचणें, खेळणीं तयार करणें या सारखे गुण मुलांत दिसून येतात. अशा तऱ्हेच्या गुणाचा शक्य तेवढा लवकर शोध लावून विकास घडविला पाहिजे, आणि मुलांच्या आकांक्षेला त्या आशादायक दिशेचें वळण दिलें पाहिजे. असें केलें तरच बालकांचें जीवन सुखी होऊन त्यांच्या सर्व शक्ती समाजहिताच्या कामीं लागतील.

सच्छीलाचा दृढ पाया घालणें हें कामहि घरांतच झालें पाहिजे. सत्यप्रीति, कर्तव्यनिष्ठा, उद्योगशीलता, सदयता, सहकारतत्परता व जबाबदार वृत्ति या स्थिरवृत्तींचें बीजारोपण घरांतच होऊं शकतें. या उद्दिष्टांचें उत्तम साधन म्हणजे या गुणांचें पालन ज्यांत नित्य होते अशा वर्तनाचें उदाहरण मुलांपुढें ठेवणें हें होय शिवाय प्रासंगिक वा गंभीर चर्चेत याच गुणांची नेहमी तरफदारी करावी. रेव्हरंड नारायण वामन टिळक यांनीं म्हटलें आहे——

मनाच्या ज्या अत्युच्च रम्य वृत्ति
अंकुरित त्या होवोनि वाढताती,
फुलें सुफळें येतात त्यांस जेथें,
जगीं उपमा कोणती त्या गृहातें ?

जेथें नेहमीं आनंद, आराम व स्नेह लाभतात, जेथें सर्वदा समाधान शांति, व सदिच्छा नांदतात, व ज्यांत सदय, सत्प्रवृत्त माणसें राहतात, असें स्थान म्हणजे घर होय. शिवाय थोर व्यक्ती, थोर शक्ती, व थोर तत्त्वें याविषयीं पूज्यबुद्धि मुलांच्या मनांत जागृत राहील असा निकराचा प्रयत्न घरांत करीत राहिलें पाहिजे. नियमितवेळीं श्रद्धापूर्वक देवतांचें पूजन करणें, घरांतील वडीलमाणसांचा मान राखणें, कायेनें, वाचेनें किंवा मनानें दिव्यत्वाची अवधीरणा होणार नाही, अशी खबरदारी घेणें, ही

पथ्यें घरांत पाळणें आवश्यक आहे. याचा अर्थ घरांत नेहमी गंभीर वातावरण असावें, विनोदाला वा करमणुकीला त्यांत स्थान नसावें असा नाहीं. परंतु पूज्य व्यक्ति व पूज्य ध्येयें यांची मानखंडना विनोदबुद्धीनें सुद्धा होणार नाहीं अशी खबरदारी घेतलीच पाहिजे.

शाळा

शाळेंत शिक्षक व विद्यार्थी मिळून अनेक व्यक्ति एकत्र येत असल्यामुळें शाळेला 'चिमुकला समाज' असें म्हणतात. इंग्रज शिक्षणतज्ञ नन् याच्या मतें शाळा म्हणजे समाजाचें संक्षिप्त व आदर्श स्वरूप असावें. समाजजीवनाचे सर्व इष्ट गुण शाळेंत प्रगट व्हावेत, परंतु त्यांतील दुर्गुणांस मात्र शाळेंत स्थान नसावें. शाळेंत वर्ग हवेत पण वर्गकलह नको; सर्व जातीच्या मुलांना शाळेंत प्रवेश मिळावा पण जातीय कटुता शाळेंत दिसूं नये; शाळेचा कारभार लोकमतानुवर्ती असावा, पण लोकशाहींत आढळून येणारे दुर्गुण—लाळघोटेपणा, लांचलुचपत, वशिलेबाजी मात्र शाळेंत दिसूं नयेत.

शाळा ही एका अर्थी समाजाचें संक्षिप्त स्वरूप आहे तर ती दुसऱ्या अर्थी घराचें वितत स्वरूप आहे शिक्षक हे पितृस्थानीं असतात, म्हणून पितरांची सर्व जबाबदारी शिक्षकांवर येऊन पडते. मुलांची शारीरिक वाढ व्हावी, त्यांचा मानसिक विकास व्हावा, व त्यांच्या सर्व उपजत शक्तींचें संशोधन व संगोपन व्हावें म्हणून जें कार्य घरीं सुरू झालेलें असतें तें शाळेंत पुढें चालू राहिलें पाहिजे. घरीं ज्यांचें बीजारोपणण झालें अशा शारीरिक व मानसिक स्वास्थ्य साधणाऱ्या संवयी शाळेंत दृढमूल झाल्या पाहिजेत, व घरांत घातलेल्या सच्छीलाच्या पायांवर उन्नत व्यक्तिमत्त्वाची इमारत शाळेने उभी केली पाहिजे.

शाळा ही समाजाची प्रतिनिधि असते, म्हणून समाजाच्या विशिष्ट संस्कृतीचें जतन करणें हें शाळेचें काम होय. ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत पूर्वजांनीं केलेला संग्रह टिकून राहिला पाहिजे व अभंग स्थितींत त्याचें लोण नवीन पिढीला पोचलें पाहिजे. ज्ञानाच्या अमुक एका शाखेचा मी अभ्यास करीन व तदन्तर्गत ज्ञानाचें रक्षण व वर्धन करीन अशी महत्त्वाकांक्षा मुलांच्या मनांत निर्माण करणें हें शाळेचें कर्तव्य होय. आपल्या पूर्वजांनीं केवळ पाठां-

तर पद्धतीनें पिढ्यान्‌पिढ्या वेदविद्येचें रक्षण केलें. ही महनीय परंपरा आपल्या पाठीशीं आहे. सामाजिक ज्ञानसंपदेचे रक्षणासाठीं ती पद्धत आतां उपयुक्त नसली तरी संस्कृतीचें रक्षण करण्यासाठीं आपल्या पूर्वजांनीं व्यक्त केलेली ती आंच व ती निरलस निष्ठा यांची गरज आज आपणांला अधिकच आहे.

संस्कृतीचें जतन करणें एवढेंच शाळेचें कार्य नव्हे. तरुण पिढीला त्या संस्कृतीची माहिती करून देणें, व तिच्यांतील गुणदोष दाखवून देणें हेंही काम शाळेचेंच आहे. विश्वबंधुत्वाच्या उदात्त तत्त्वज्ञानाचा व तदंगभूत धर्म-सहिष्णुतेच्या उदार परंपरेचा वारसा आपणांकडे आहे हें भारतीय मुलांस कळलें पाहिजे.पण त्यांस हेंही कळलें पाहिजे कीं याच सहिष्णुतेच्या परंपरेतून आपली धर्माबाबत उदासीन राहण्याची वृत्ति निर्माण झाली आहे व तीमुळें आक्रमक वृत्तीच्या परकी संस्कृतीशीं टक्कर देण्यास आपण असमर्थ झालों आहों. गाई व शेतकी यांविषयीं आपण जी शाब्दिक पूज्यबुद्धि दाखवितो तिचा फोलपणाही मुलांच्या नजरेस आणला पाहिजे. हिंदू लोक गाईला वंदन करीत असले तरी भारतांतील गाईइतक्या दुर्लक्षित गाई इतरत्र आढळत नाहींत; आणि ‘ उत्तम शेती ’ म्हणून कृषिकर्माला शाब्दिक श्रेष्ठ-पणा आम्हीं देत असलों तरी भारतांतील शेतकऱ्याच्या जीवनाइतकें दरिद्री व कष्टमय जीवन दुसऱ्या कोणत्याही देशांतील शेतकऱ्याचें नसेल.

भारत व चीन यांच्या इतिहासावरून स्पष्टपणें कळून येतें कीं संस्कृ-तीचें केवळ संरक्षण करण्याचे ध्येय ठेवलें तर राष्ट्राला बौद्धिक व नैतिक शिलावस्था प्राप्त होते. समाजजीवनांतील चैतन्य शाळेनें जिवंत ठेवलें पाहिजे. यासाठीं आपल्या संस्कृतीचे योग्य स्पष्टीकरण करून तिच्यांतील दोष निर्भयपणें दाखविले पाहिजेत. देशाच्या गत इतिहासांतील थोर कर्तृत्वा बद्दल मुलांनीं अभिमान जरूर बाळगावा; पण तो अभिमान पोकळ व वांझ नसावा; तितकेच भव्य कर्तृत्व वर्तमान व भविष्य काळांत घडविण्याची महत्त्वाकांक्षा त्यांतून निर्माण झाली तरच तो अभिमान सार्थकी लागेल; नाहीतर भ्रामक समाधान मानून वर्तमानांतील कर्तृत्वशून्यतेवर बुरखा घालण्यासाठीं त्याचा दुरुपयोग होईल.

शिक्षणासाठीं आलेल्या बालकाला सुसंस्कृत प्रौढ करून सोडणें हें शाळेचें उद्दिष्ट होय. यासाठीं शाळेनें मुलाला पुढील अधिगम प्राप्त करून दिला पाहिजे.

(१) मातृभाषेंत विचार प्रभावीपणें व्यक्त करण्याची शक्ती,

(२) स्वतंत्रपणें विचार करण्याची शक्ती,

(३) शारीरिक व मानसिक स्वास्थ्य ज्यायोगें अबाधित राहील अशा संवयी,

(४) मानवी जीवनाच्या प्रतिष्ठेचे ज्यायोगें समर्पक आकलन होईल अशीं नैतिक मूल्यें,

(५) आपल्या सामाजिक जबाबदारीची जाणीव.

अगदी कनिष्ठ दर्जाचा माणूसही समाजाची कांहींतरी उपयुक्त सेवा करूं शकतो, व म्हणून आपणही आपल्या मगदुराप्रमाणें समाजाची सेवा केली पाहिजे; स्वतःच्या लाभासाठीं समाजाची हानि तर करावयाची नाहीच, पण प्रसंगोपात समाजरक्षणासाठीं स्वहिताचा त्यागही केला पाहिजे. कायदा व सुव्यवस्था यांवर समाजाचें स्वास्थ्य अवलंबून असतें, म्हणून कायदे पाळणें व सुव्यवस्था राखणें व इतरांसही तसें करावयास लावणें हें आपलें कर्तव्य होय हीं तत्त्वें मुलांकडून आत्मसात करून घेणें हा शाळेच्या कर्तव्याचा भाग होय.

समाजाचें हित साधणें हें जसें शाळेचें काम आहे तसेंच व्यक्तीची उन्नति घडविणें हेंही आहे. प्रत्येक बालकाच्या अंगीं बीजरूपानें असणाऱ्या उपजत शक्ती उघडकीस आणणें व त्यांची यावच्छक्य वाढ करणें असें दुहेरी काम शाळेला करावयाचें असतें. प्रत्येक बालकाच्या मनांत स्वतःच्या प्रतिष्ठेची जाणीव निर्माण व्हावी व ती प्रतिष्ठा सांभाळण्यासाठीं लागणारा आत्मविश्वासही वाढीस लागावा. निरर्थक मत्सर व निष्फळ संताप यांत स्वतःच्या शक्तीचा अपव्यय करण्याऐवजीं त्या शक्तींना तर्कशुद्ध निग्रहाची वेसण घालून विधायक कार्यांत त्या शक्तीचा उपयोग करण्यास मुलांना शाळेनें शिकविलें पाहिजे.

## समाज

फक्त घरांत व शाळेंत शिक्षण होतें अशी समजूत करून घेणें योग्य नव्हे. वर्तनाला वळण लावण्याचें प्रभावी सामर्थ्य एकंदर सामाजिक परिस्थितींत आढळून येतें. बालकाचा जन्म सुसंस्कृत समाजांत होण्याऐवजीं रानटी टोळींत झाला तर त्याच्या जीवनाची घडी पार बदलून जाईल. आफ्रिकेंतील एखाद्या मागासलेल्या टोळींत जन्मलेल्या बालकापेक्षां न्यूयॉर्क-मध्यें जन्मलेल्या बालकाला आत्मोन्नति करून घेणें खासच अधिक सुकर असतें. सामाजिक व्यवस्थेचा प्रखर प्रभाव तरुण पिढीचीं नैतिक मूल्यें घडविण्यांत दिसून येतो. भांडवलशाही समाजांत तरुण पिढी अर्थपूजक होते. ठगांसारख्या गुन्हेगार जमातींत दरोडेखोरी व हत्या हे आदरणीय पराक्रम ठरतात. ज्या सामाजिक मूल्यांचा वडीलमाणसें केवळ उपदेश करतात तीं अवमानून ज्या मूल्यांना अनुसरून प्रौढांचें आचरण होतें तींच तत्त्वें नेमकीं उचलण्यात मुलें पटाईत असतात. जातीयतेचा धिक्कार वाणीनें कितीही केला तरी जोंपर्यंत समाजाच्या नेत्यांचें वर्तन जातीयतेवर आधारलेलें आहे, तोंपर्यंत तरुण पिढीच्या मनांतील जातीयतेचें विष आपण घालवूं शकणार नाहीं.

सामाजिक परिस्थितींतील इतर घटकांचाहि परिणाम बालकांच्या मनावर व वागणुकीवर होत असतो. त्यांपैकीं आजचे अत्यंत महत्त्वाचे घटक वर्तमानपत्रें व बोलपट होत. आपले बहुतेक सामाजिक व राजकीय विचार वर्तमानपत्रांतून तरी घेतलेले असतात किंवा बोलपटांतून तरी उचललेले असतात. या दोहोंच्या खालोखाल महत्त्व आकाशवाणी व ग्रंथालयें यांचें आहे. मुलाच्या मनाची ठेवण घडविण्यांत या सर्व घटकांचा कमीअधिक भाग असतो.

समाजाच्या ज्या वर्गांत बालक जन्माला येतो त्या वर्गाचीं वैशिष्टचें तो नकळत आत्मसात करतो, मध्यमवर्गातील मुलांच्या स्वभावांत कंजूषपणा, उद्योगशीलता व गतानुगतिकता या वृत्ती दिसून येतात. श्रीमंतांच्या मुलांत सामाजिक मूल्यांविषयीं अवहेलना आढळते. गरीबांच्या मुलांत प्राप्त क्षणाच्या सुखावर लक्ष केन्द्रित करून भूत व भविष्य यांची उपेक्षा करण्याची

वृत्ति दिसते. म्हणून राष्ट्राचे पुनरुज्जीवन करावयाचें असेल तर फक्त शिक्षणांत सुधारणा करून भागणार नाहीं; सामाजिक व आर्थिक क्रांतीही घडवून आणावी लागेल. स्वतःच्या क्षेत्रापुरता कोता विचार करण्याची संवय आपण सोडून दिली पाहिजे. व्यक्तिमत्त्वाची घडण हें कार्य केवळ शिक्षणाचें नसून वागणुकीला वळण देणाऱ्या सर्व शक्तींचा तो एकवटलेला परिपाक होय. आदर्श नागरिक निर्माण व्हावे असें आपणांस वाटत असेल तर वागणुकीला विरोधी वळण देणाऱ्या सामाजिक शक्तींचा सुसंवाद आपण घडवून आणला पाहिजे.

****

१२ :

# राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीयता यांचें शिक्षणांतील स्थान

******************************

## राष्ट्रवाद

जे लोक परकी अमलाखाली असतात, किंवा जे अशा पारतंत्र्यापासून नुकतेच मुक्त झालेले असतात, अशा लोकांमध्यें राष्ट्रवाद म्हणजेच देशभक्ती ही भावना उत्कट स्वरूपांत आढळते. ब्रिटिश राजसत्ता भारतांतून नाहींशी होण्यापूर्वीं कमींत कमी पन्नास वर्षे शिक्षणाला राष्ट्रीय स्वरूप देण्याची चळवळ सुरू झाली होती. आज सुद्धा असे राजकारणी पुरुष आढळतात कीं ज्यांच्या मतें आपल्या शिक्षणपद्धतीमधील मुख्य दोष राष्ट्रीय दृष्टीचा अभाव हा आहे. व " आपले शिक्षण आपल्या राष्ट्रीय संस्कृतीला अनुसरून झालें पाहिजे, " अशी मागणी जोरानें पुढें माडली जाते.

ही सूचना अमलांत आणण्याच्या मार्गातील एक अडचण ही आहे कीं खरें शिक्षण हें खऱ्या संस्कृतीप्रमाणेंच विश्वात्मक वृत्तीचें असतें. रामायण व महाभारत हे भारतीयांचे माननीय ग्रंथ आहेत. कन्फ्यूशिअसचे ग्रंथ हा चिनी लोकांचा वाङ्मयीन ठेवा आहे, व बायबल हा ख्रिस्ती लोकांचा पूज्यतम ग्रंथ होय. पण या सर्व ग्रंथांचें सार एकच आहे. सहिष्णुतेनें वागावें, कुटुंब रक्षावें, विद्यार्जन करावें व सदाचारी असावें, अशीच शिकवणूक या भिन्न ग्रंथांमधून मिळतें. जगांत असा एकही देश नाहीं कीं तेथील लोक हे सद्गुण मानीत नाहींत व शिक्षणानें हे सद्गुण मुलांत यावे असें म्हणत नाहींत. विश्वव्यापी मूल्यें समजून घेऊन तीं आचरणांत आणलीं म्हणजेच मनुष्य सुसंस्कृत होतो. संस्कृति दृष्ट्या जगांतील सर्व लोक एकरूप असून कोता राष्ट्रवाद हा खऱ्या संस्कृतीला पोषक नसून विघातक असतो.

शास्त्रें सुद्धां राष्ट्रीय सीमा मानीत नाहींत. चिनी गणितशास्त्राहून भिन्न असें भारतीय गणितशास्त्र असूं शकत नाहीं. मात्र गणितशास्त्राचें संवर्धन कोणत्याही राष्ट्रांतील व्यक्ति करूं शकते. पण कोणत्याही व्यक्तीनें गणित-शास्त्रांत घातलेली भर एकदां सर्वमान्य झाली म्हणजे तिचें वेगळें अस्तित्व उरत नाहीं. नवीन ज्ञानाच्या संशोधनास जे स्वतःस वाहून घेतात ते सर्व आपणांस मानवजातीच्या अज्ञानाविरुद्ध चालविलेल्या मोहिमेंतील पाईक समजतात.

म्हणून भिन्न देशामध्यें शिक्षणाचें माध्यम जरी वेगळें असलें, व इति-हास, वाङमय यासारख्या विषयांतील शिकविण्याचा मजकूर जरी देशपरत्वें भिन्न असला, तरी सर्वत्र शिक्षणाचें उद्दिष्ट एकच असतें. मुलांनीं विशुद्धपणें विचार करण्यास शिकावें, त्यांच्या मनांत उदात्त आकांक्षा निर्माण व्हाव्या, मानवजातीच्या पूर्णतेसाठीं चाललेल्या संगरांत त्यांनीं धडाडीनें भाग घ्यावा, असाच शिक्षणाचा प्रयत्न सर्व देशातून चाललेला असतो. म्हणून शिक्षण हें स्वभावतःच आंतरराष्ट्रीय आहे. ज्याप्रमाणें हवेचें वा पाण्याचें राष्ट्रीयी-करण होऊं शकत नाहीं, त्याचप्रमाणें खऱ्या शिक्षणाचेंही होऊं शकत नाहीं. खरें शिक्षण तेंच कीं जें शारीरिक स्वास्थ्य संभाळून अध्यात्मिक उन्नती-साठीं अविरत झटत राहण्याची प्रवृत्ति निर्माण करतें.

शिवाय देशभक्तीच्या भावनेंत स्वतःच्या भूमीवरील प्रेमापेक्षां पर-कीयांच्या द्वेषाचाच अंश जास्त असतो. इतर देशाशीं वितुष्टाचा प्रसंग आला म्हणजेच राष्ट्रीय भावनेला भरती येते. लंकेमध्यें किंवा दक्षिण आफ्रिके-मध्यें भारतीयांचा छळ होत आहे, किंवा चीन भारतावर स्वारी करण्याच्या योजनेंत आहे, अशा वार्ता येऊं द्या, लगेच प्रत्येकाचा राष्ट्राभिमान जागृत होतो. पण सतत चालू असलेल्या समाजविकास योजनेंत साहाय्य मात्र फार थोडया लोकांकडून व तेंही मंदोत्साहानें मिळतें.

तसेंच राष्ट्रवादामुळें युद्धांना व युद्धांमधील पराक्रमांना अवास्तव महत्त्व मिळतें, व सैनिकी पेशांची विभूतिपूजा होऊं लागते. या वृत्तीमुळेंच इतिहासग्रंथांत शिकंदर व नेपोलिअन यांच्यासारख्या व्यक्तींवर पानेंच्या पानें खर्ची पडलेली दिसतात. वास्तविक या व्यक्तींनीं साधलेलें मानवी हित अत्यल्प व त्यांनीं केलेलें अनर्थ बहुवस आहेत. शिवाजीच्या चरित्रांतही

सुरतेची लूट व अफजलखानाचा पाडाव या प्रसंगांचीं रसभरित वर्णनें आढळतात. त्या मानानें त्याची उदात्त माणुसकी व त्याची शहाणपणाची राज्यव्यवस्था यांस कमी महत्त्व दिलें जातें. सर्व जगभर भडक रंगाचा गण-वेश परिधान केलेला व तिरकी टोपी घालणारा लष्करी अंमलदार तरुणांना आदरणीय वाटतो. मानवजातीचे खरे हितकर्ते जे सॉक्रेटिसासारखे तत्त्वज्ञ, वाल्मिकीसारखे कवि, लुई पाश्चरसारखे शास्त्रज्ञ, यांचा मान यथातथाच केला जातो. अशा रीतीनें राष्ट्रवादामुळें नैतिक मूल्यें विकृत होतात.

म्हणून प्रसिद्ध इंग्रज तत्त्वज्ञ बर्ट्रांड रसेल यानें राष्ट्रवादाचा कडं-कडीत धिःकार केला आहे. तो म्हणतो. " राष्ट्रवाद हा आजकालचा सर्वांत भयंकर दुर्गुण आहे. राष्ट्रवादामुळें संभावित लोक लूटमारीसाठीं खून करावयास तयार होतात. " आक्रमक युद्धाचें सत्य स्वरूप अशा रीतीनें रसेलनें उघडें केलें आहे. भारतीय इतिहासांत अशाच अनेक युद्धांचा परि-चय होतो. चीन विरुद्धचें अफू युद्ध, ब्रिटिशांच्या ब्रम्हदेशाविरुद्ध मोहिमा, बंगालच्या दिवाणावर इंग्रजांनीं केलेली चढाई, या सर्वांचें मूळ लोभांत आढळतें. तरी सुद्धां या युद्धांत शौर्य गाजविलेल्या वीरांची स्तुतिस्तोत्रें ब्रिटिश लोक गातच असतात.

देशाभिमानामुळें लोक असत्य भाषण करण्यास प्रवृत्त होतात. जर्म-नींत हिटलर अधिकारावर येतांच नाझी लोकांनी आपल्या देशाचा इति-हास बदलून पक्षाच्या तत्त्वांस पोषक असा नवा खोटा इतिहास रचला. उदाहरणार्थ, येशू ख्रिस्त हा नॉर्डिक वंशाचा होता, व बिगरनॉर्डिक वंशाच्या ज्यूंनीं त्याचा छळ केला असें विधान करण्यास ते कचरले नाहींत. गोव्यावर आपला अंमल कायम ठेवण्यासाठीं पोर्तुगीज लोकांनीं चालविलेल्या खोट्या प्रचाराचा आपणांस ताजा अनुभव आहे.

शिक्षकांनीं हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं देशभक्तीचे दोन प्रकार अस-तात. त्यांपैकीं एक प्रकार विपर्यस्त विधानांवर आधारलेला व खोडसाळ असतो. 'आपला देश हाच सर्वोत्कृष्ट देश होय,' व 'आपलें सरकार करील तेंच नेहमी बरोबर' असें या प्रकारचे देशभक्त मानतात. आपल्या देशाच्या गत पराक्रमांची अतिशयोक्ती ते करतात, काल्पनिक गुण देशांच्या अंगीं चिकटवितात, व देशाच्या योग्यतेविषयीं अतिरेकी दावा मांडतात.

पुष्कळ भारतीयांस असें वाटतें कीं, भारतानें आशियांतील राष्ट्रांचें नेतृत्व करावे व जगास प्रीतीचें तत्त्वज्ञान व शांतता यांचें धडे शिकवावे. आपल्या तत्त्वज्ञानानें आपल्याच देशांतील असंतोष व कलह मिटूं शकले नाहींत ही गोष्ट ते नजरेआड करतात. तसेंच राष्ट्रकुटुंबांतील कोणत्याही राष्ट्रानें इतरांपेक्षां आपण श्रेष्ठ आहो असें प्रतिपादन करणें सूज्ञपणाचें नव्हे ही गोष्ट ते विसरतात, कांहीं राष्ट्रांच्या श्रेष्ठत्वाच्या कल्पनेमुळेंच पहिल्या महायुद्धानंतर अस्तित्वांत आलेला राष्ट्रसंघ कोलमडून पडला व त्या कल्पनेमुळेंच आज संयुक्त संघटनेचें (यूनोचें) बलही खच्ची होत आहे. राष्ट्रांनीं समता, बंधुत्व व सहकार या भावनांचाच परिपोष करणें सर्वांचें हिताचें होईल.

खरा देशभक्त आपल्या राष्ट्राचे सर्व दोष ओळखून असतो, तथापि राष्ट्रावर त्याचें अलोट प्रेम असतें. त्याची देशभक्ति म्हणजे उन्नतिप्रवण आकांक्षा असून, इतर देशांचें अहित न करतां आपल्या देशाचा सदैव उत्कर्ष होत रहावा म्हणून तो झटत असतो. आपल्या देशाचें औद्योगीकरण व्हावें असें तो इच्छितो, पण या प्रयत्नाचा हेतु मागासलेल्या लोकांचें शोषण करणें हा नसून देशांतील लोकांचें जीवनमान सुधारावें हा असतो. आपसांतील कलह विसरून देशांतील सर्व लोकांनीं सर्वोदयासाठीं झटावें असें त्यास वाटतें. ज्ञानाचा प्रसार व्हावा, शास्त्रांचें महत्त्व व त्यांचा उपयोग सर्वांस समजावा, शेतांतील उत्पन्न वाढावें, उद्योग धंदे उत्पादनक्षम व्हावेत अशी त्याची आकांक्षा असते. सामान्य जनतेचें जीवन सुविद्य, साकांक्ष, साक्षेपी, सुखी व समृद्ध व्हावे म्हणून जी अविरत व अश्रांत झटते तीच खरी देशभक्ति होय.

खऱ्या देशभक्तीचें बीजारोपण मुलांच्या मनांत शिक्षणानें अवश्य व्हावें. दुर्दैवानें खऱ्या देशभक्तीचें स्वरूप चटकन डोळ्यांत भरण्यासारखें दर्शनीय नसतें, व निशाण वा गणवेश यांसारख्या प्रतीकांनीं तें व्यक्तही होत नाहीं. व्यक्तिमत्त्वाची घडण करणें हें जे सर्वसाधारण शैक्षणिक उद्दिष्ट आहे त्यांत व देशभक्तीच्या उद्दिष्टांत फारसा फरक नाही. जर शिक्षण हें योग्य रीतीनें दिलें तर खऱ्या देशभक्तीचा प्रादुर्भाव मुलांच्या मनांत झाल्यावांचून राहणार नाही. म्हणून खोट्या देशभक्तीचें स्तोम माजणार नाहीं, अशी खबरदारी शाळेंत घेतली जावी. बढाईखोर व अकरणरूप राष्ट्र

वादाला शाळेंत बिलकुल थारा मिळूं नये. पूर्वजांचे पराक्रम हे आपल्या मार्गावरील दीपस्तंभ होत; खरा अभिमान स्वतःच्या प्रयत्नांनीं साधलेल्या उन्नतीबद्दलच धारण करतां येतो हें तत्त्व मुलांनीं शाळेंत आत्मसात केलें पाहिजे.

देशाच्या उन्नतीसाठीं जे जे प्रयत्न चाललेले असतील त्यांस हातभार लावण्याचा योग मुलांस घडविला पाहिजे. साक्षरताप्रसाराची मोहीम व समाजविकासाची कामें यांत मुलांनीं भाग घ्यावा. यात्रा व उत्सव प्रसंगीं त्यांनीं स्वयंसेवा करावी. देशांत उत्पन्न होणाऱ्या वस्तूंचा परिचय मुलांस करून द्यावा, व स्वदेशी व्रताचा स्पृहणीय भाग त्यांस समजावून द्यावा. ज्ञान वाढवून, कसब संपादन करून, सतत उद्योग करून देशाच्या सांस्कृतिक व भौतिक वैभवांत भर घालणे हें आपलें कर्तव्य होय हा धडा मुलांस शाळेच्या सर्व अन्तःशाल व बहिःशाल कार्यक्रमांतून सतत मिळत रहावा.

## आंतरराष्ट्रीयता

विसाव्या शतकाच्या प्रथमार्धांत जीं दोन महायुद्धें झाली त्यांत दोन्ही मानवी संस्कृतीचा सर्वनाश होण्याची भीति निर्माण झाली होती. सुदैवानें तें संकट टळलें. पुन्हां असें संकट ओढवूं नये म्हणून काय उपाय करावा याविषयीं विचार करणाऱ्या मानवजातीच्या हितचिंतकांना आंतरराष्ट्रीयतेचा प्रसार करणें हें एकमेव आशास्थान आढळलें. जर्मनींतील अतिरेकी राष्ट्रवादामुळें लागोपाठ दोनदां जग सर्वनाशाच्या कड्यावर येऊन ठेपलें होतें आणि विश्वबंधुत्व व आंतरराष्ट्रीय सहकार याविषयीं ज्वलंत श्रद्धा सामान्य जनतेच्या मनांत उत्पन्न झाली नाहीं, तर ही सर्वनाशाची तलवार मानवजातीच्या शिरावर सारखीच लोंबकळत राहील. युद्धाची सुरवात माणसांच्या मनांत होते; म्हणून आक्रमक युद्धें घडवून आणणाऱ्या राष्ट्रवादाविरुद्ध मानवी हृदयांची तटबंदी केली पाहिजे. सारांश, मानवजातीच्या रक्षणाचें शाळा हें अप्रतिरूप माध्यम ठरतें. भावी पिढ्या आपल्या देशाच्या सीमेपलीकडील लोकावर प्रेम करतील कीं त्यांच्याशीं शत्रुत्व करतील हें सर्वस्वी शिक्षकांच्या शिकवणुकीवर अवलंबून राहील. शांतता व विश्वबंधुत्व यासाठीं चाललेल्या मोहिमेंत शाळांनीं आघाडी संभाळली पाहिजे.

म्हणून असें प्रतिपादन करण्यांत येतें कीं राष्ट्राराष्ट्रांमध्यें सलोखा कसा निर्माण करावा याची शिकवणूक शिक्षकांना अवश्य मिळाली पाहिजे.

आंतरराष्ट्रीयतेचें आद्य सूत्र विश्वबंधुत्व हें आहे. आस्तिकांच्या मताप्रमाणें सर्व माणसांना आपण देवाचीं लेकरें मानलीं अथवा नास्तिकांच्या समजुतीप्रमाणें त्यांना मृत्यूचे यात्रेकरू मानलें तरी माणसामाणसांत शत्रुत्व राहण्याचें कारण दिसत नाहीं. जगाच्या इतिहासावरून असें दिसून येते कीं सर्व प्रकारच्या हवामानात व परिस्थितींत मानव पूर्णत्व साधनासाठीं झगडत आला आहे, आणि या संगरांत त्याला निसर्ग आणि आपल्याच हीन प्रेरणा यांनीं विरोध केला आहे. सर्व देशांत मानवी स्वभावाची घडण एकाच प्रकारची दिसून येते; आणि इतिहासाचें समतोल बुद्धीनें अवलोकन केलें तर असें दिसून येतें कीं मानवाचें सर्वश्रेष्ठ कर्तृत्व स्नेहाच्या प्रेरणेंतून निर्माण झालें आहे, द्वेषाच्या नव्हे. अर्थातच स्नेहवृत्तीचें संगोपन करणें हेंच मानवजातीच्या उन्नतीला पोषक ठरेल.

दुसरें सूत्र असें कीं राष्ट्राराष्ट्रांच्या हितसंबंधांत अपरिहार्य विरोध नाहीं. पृथ्वीच्या विविध भागांतील हवामान व प्राकृतिक परिस्थिति शेतीच्या व कारखानदारीच्या विशिष्ट उत्पादनास अनुकूल असलेलीं आढळतात. जावा सुमात्रादि बेटांत मसाल्याचे पदार्थ, भारतांत ताग, अफगाणिस्तानांत कोरडीं फळें, व भूमध्यसमुद्रप्रदेशांत रसाळ फळें होतात. घड्याळें व तत्सम नाजूक पोलादी वस्तूंच्या कारखानदारीस स्वित्झर्लंडमध्यें, इंग्लंडमध्यें जहाजें बांधण्यास, रशिया व अमेरिका येथें अवजड लोखंडी व पोलादी मालाच्या उत्पादनास अनुकूल परिस्थिति आढळते. तसेंच विविध लोकांच्या अंगीं भिन्न कसबें दिसून येतात. इराणी लोक गालिचे विणण्यांत, व जपानी लोक खेळणीं बनविण्यांत पटाईत आहेत. जर सर्व देशांतील कृतिविषयक, औद्योगिक, व कलात्मक उत्पादनाची विभागणी चढाओढीऐवजीं सहकाराच्या धोरणानें केली तर त्यांत सर्वांचें हित साधेल. अर्थात यांपैकीं कोणत्याही एका शाखेंत कोणताही देश अगदींच मागासलेला राहूं नये. कांहीं गोष्टींचें उत्पादन सर्वच देशांत चालू राहण्यास प्रत्यवाय नाहीं. परंतु स्वयंपूर्णतेचें कोतें धोरण मात्र विपर्यस्त वृत्तीचें व हानिकारकच ठरेल. विनिमयांतून शोषण करण्याची वृत्ति जर नाहींशी केली व परस्परांस पूरक

होईल अशा रीतीनें सर्व देशांतील उत्पादनाची योजना आंखली तर राहणीचें मान सर्वत्र सुधारेल.

म्हणून देशनिष्ठा व मानवनिष्ठा यांमध्यें संघर्ष होण्याचें कारण नाहीं. आंतरराष्ट्रीयतेचे पुरस्कर्ते स्वदेशनिष्ठेचें दान मागत नाहींत. उलट त्यांच्यामतें जो जगांत कुठेंही सुखी राहूं शकतो व कोणत्याही स्थानाबद्दल ज्याला आपुलकी वाटत नाही असा सबगोलंकार वृत्तीचा माणूस तिरस्कारणीयच होय. जो कुटुंबावर, गांवावर, देशांवर प्रेम करूं शकत नाहीं तो विश्वावर प्रेम काय करणार ? आंतरराष्ट्रीयता एवढेंच मागते कीं आपल्या स्नेहाचें क्षेत्र संकुचित ठेवूं नका; हळूहळू आपल्या स्नेहाची कक्षा वाढवा व तिच्या वेंघेंत सर्व मानवजातीचा समावेश होऊं द्या. मनुष्य जातीचें अनहित न करतां आपल्या देशबांधवांचे हित करण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. तद्वतच देशहिताला धक्का न लावतां मानव जातीचे कल्याण साधण्याचेही अनेक पंथ मोकळे आहेत. आपल्या कृतींनी जास्तींत जास्त लोकांचें म्हणजेच स्वदेशबांधवांनासुद्धां अखिल मानवजातीचें हित साधण्याचा साक्षेप आपण केला पाहिजे.

शिवाय हें मानव जातीचें हित राष्ट्रांच्या सहकार्यानें सुसाध्य होणार आहे. मानवाचे अनेक शत्रु आहेत, कर्करोग व क्षयरोग यांसारख्या व्याधि, धरणीकंप, झंझावात व ज्वालामुखीचे स्फोट यांसारखें निसर्गप्रकोप, आणि दारिद्र्य व अज्ञान यांसारख्या मनुष्य निर्मित उपाधी. जर जगांतील लोकांनीं एकजूट केली तर अत्यल्प काळांत या शत्रूंवर ते जय मिळवितील. संयुक्त राष्ट्रसंघटनेनें या दिशेनें बरीच पावलें टाकलेलीं आहेत. औद्योगीकरण त्वरित व्हावें व देशांतील साधनसंपत्तीचा योग्य उपयोग व्हावा म्हणून मागासलेल्या देशांना आर्थिक मदत देण्यांत येत आहे. तसेंच निरक्षरता नष्ट करण्यासाठीं, व हिवतापासारख्या रोगांचे उच्चाटन करण्यासाठीं मोहीमा चालू आहेत. सर्व सत्प्रवृत्त माणसांनीं या प्रयत्नांचा सक्रिय पुरस्कार केला पाहिजे. व त्यांच्याविषयीं कांहीं ठिकाणीं आढळून येण्याऱ्या संशयी वृत्तीचें निराकरण करण्यासाठीं झटलें पाहिजे.

आंतरराष्ट्रीयतेची तत्त्वसंहिता ही अशी साधी व सोपी असून सामान्य मानवाचे हित साधणारी आहे. तिचे शत्रु मात्र प्रबळ आहेत.

वसाहतवाद, धर्मवेड, परशोषक लोभ व अज्ञान या सर्व शक्ती राष्ट्रवादाचा पुरस्कार करून माणसांमाणसांमध्यें द्वेष व कलह उत्पन्न करणाऱ्या आहेत. या सर्व अरिष्टांचें निर्मूलन करण्यासाठीं शिक्षणानें चंग बांधला पाहिजे. व सर्व बालकांच्या मनांमध्यें विश्वबंधुत्वाची भावना व सर्व मानव जातीचें हित साधण्याची प्रेरणा निर्माण केली पाहिजे.

हें उद्दिष्ट साधण्यासाठीं शिक्षकांमध्यें आंतरराष्ट्रीयतेविषयीं दृढ श्रद्धा हवी. त्यांच्या विचारांत व कृतींत विशाल विश्वबंधुत्वाची साक्ष मुलांना पटावी. ज्या ज्या वेळीं कोत्या निष्ठांना प्रेरणा देणाऱ्या समस्यांचा विचार वर्गांत चालू असेल त्या त्या वेळीं शिक्षकानें निःपक्षपाती धोरण स्वीकारावें व कोणत्याही वादांत दोन्ही बाजूंच्या समर्थनार्थ मुद्दे मांडतां येतात हें दाखवून द्यावें. उदाहरणार्थ लंकेतील हिंदी रहिवाश्यांना भारतांत पैसे पाठविण्यास बंदी करावी कीं नाहीं हा प्रश्न घ्या. त्या रहिवाश्यांचे नातलग भारतांत राहतात म्हणून पैसे पाठवूं द्यावे असें आपण म्हणतों. पण लंकेत मिळविलेलें धन भारतांत पाठवून हिंदी लोक लंकेस निष्कांचन करतात असें तद्देशीयांस वाटतें. हाच आक्षेप आपण इंग्रज लोकांविरुद्ध घेत होतों. किंवा स्वतंत्र केनियांत आफ्रिकन लोकांनीं हिंदी लोकांना कसें वागवावें हा प्रश्न घ्या. " नागरिकत्वाच्या हक्कासाठीं तुम्हीं लढत होतां, आतां तो हक्क मिळाल्यावर हिंदी लोकांना तो हक्क तुम्ही नाकारणें सुसंगत होणार नाहीं " असा युक्तिवाद आपण करतों. पण हिंदी लोकांनीं ब्रिटिशांचें अंकितत्व स्वीकारून आफ्रिकन लोकांवर हुकमत गाजविली याचा विसर त्या लोकांस कसा पडेल ? " तुम्हीं आमची अवहेलना केली, आतां आम्हीं तुमची करूं. " असें प्रतिपादन त्यांनीं केल्यास नवल नाहीं. सारांश वादाच्या दोन्हीं बाजू निःपक्षपातीपणानें पारखून त्यांतून तडजोडीचा मार्ग काढणें हें सर्वांच्या हिताचें असते हें अशा समस्यांच्या विवरणानें मुलांस पटवून दिलें पाहिजें.

इतिहास शिकविण्याच्या पद्धतींत सुधारणा झाली पाहिजे. युद्धांचें महत्त्व व लष्करी पराक्रमाची पूजा इतिहासाच्या अध्यापनांतून वर्ज्य केली पाहिजे. मानवी संस्थांचा विकास, व त्यामुळें उंचावत जाणारी मानवी विचारांची व जीवनाची पातळी यांकडे अधिक लक्ष दिलें पाहिजे. अशा

दृष्टीनें इतिहासाचा अभ्यास झाल्यास मानवी संस्कृतीच्या वाढीस सर्व देशांतील व सर्व वंशांतील लोकांनीं हातभार लावला आहे हें सत्य मुलांच्या ध्यानांत येईल. तसेंच भौतिक शास्त्रांच्या वाढीचा इतिहासही मुलांना शिकवला पाहिजे. थोर शास्त्रज्ञांच्या चरित्राशीं परिचय झाल्यास पूर्णतेच्या हव्यासानें मानवांनी केलेल्या प्रयत्नांची व पराक्रमांची एकरूपता मुलांच्या नजरेंत भरेल.

शाळांनीं परकी भाषांच्या व वाङ्मयाच्या अभ्यासाला उत्तेजन द्यावें, कारण अशा अभ्यासानें आंतरराष्ट्रीय स्नेह वाढतो. टॉलस्टॉय, ड्यूमास अथवा हार्डी यांच्या अनुक्रमें रशियन, फ्रेंच व इंग्रजी भाषांतील कादंबऱ्या मुळांतून अथवा भाषांतरद्वारा वाचल्या म्हणजे आपणांस समजून येतें कीं मनुष्यस्वभाव सर्वत्र सारखाच आहे. सर्व देशांतील माणसांत आपणांला त्याच वासना, तेच अवगुण, व अनन्ताला गवसणी घालण्याची तीच दुर्दम्य आकांक्षा आढळून येते. अर्थातच आपलें सहानुभूतीचें क्षेत्र विशाल होतें, व विश्वबंधुत्वाची श्रद्धा आपल्या मनांत मूळ धरते.

शिक्षक व विद्यार्थी यांची राष्ट्राराष्ट्रांत देवघेव करणें हेंही आंतरराष्ट्रीयतेला पोषक होईल. पहिल्या महायुद्धानंतर कानडामध्यें व्हिन्सेंट मॅसी शिष्यवृत्ति सुरू करण्यांत आली. दरवर्षी ही शिष्यवृत्ति एका हिंदी विद्यार्थ्याला कानडांत जाऊन अभ्यास करण्यासाठीं मिळते. अशा रीतीनें या दोन राष्ट्रांतील स्नेहसंवर्धनाचें कार्य अखंड चालू आहे, तसेंच कार्य अमेरिकन संयुक्त संस्थानांतील वोटुमल शिष्यवृत्तिद्वारा होत असतें. अलीकडे संयुक्त राष्ट्रसंघटनेनें या योजनेचा पुरस्कार केल्यामुळें पुष्कळच सरकारांनीं अशा शिष्यवृत्त्या ठेवलेल्या आहेत. आणि प्रवास व अध्ययन अथवा प्रवास व निरीक्षण करण्यासाठीं परदेशांत जाणारे विद्यार्थी आंतरराष्ट्रीय सलोखा वाढविण्यास साहाय्यभूत होत आहेत.

या बाबतींत विश्वभारती विद्यापीठाची स्थापना करून डॉ. रवीन्द्रनाथ टागोर यांनीं मोलाची कामगिरी केली. आंतरराष्ट्रीयतेच्या पुरस्कारांत टागोर कालदृष्ट्या अग्रभागीं होते. जगांत इतरत्र कोठेंही राष्ट्राराष्ट्रांमधील स्नेहसंबंध वाढविण्याची इच्छाही व्यक्त होत नव्हती त्यावेळीं त्यांनीं या विद्यापीठाची स्थापना केली. सर्व देशांतील शिक्षक व विद्यार्थी यांना

एकत्र आणून रम्य निसर्गाच्या सहवासांत स्नेह व सहकार वाढविण्याची सोय टागोर यांनीं करून दिली. प्रस्तुत विषयाचा विचार करतांना टागोर यांच्या विश्वव्यापक दृष्टीचा व ती मूर्तस्वरूपांत आणण्याच्या त्यांच्या कर्तबगारीचा कृतज्ञतापूर्वक अवश्य उल्लेख केला पाहिजे.

विविध राष्ट्रांतील विद्यार्थ्यांमध्यें पत्रद्वारा मैत्री घडवून आणण्याची योजनाही स्वागतार्ह आहे. कुमारवयांतील मुलांची मनें ऋजु असतात. आपल्या देशांतील घटनांचें व विचारांचें त्यांनीं केलेलें अकृत्रिम वर्णन परदेशांतील विद्यार्थ्यांना आवडतें व त्यांच्या मनांत सहानुभूतीची भावना निर्माण होते.

शेवटीं डॉ. हुसमननें कार्यवाहींत आणलेल्या आंतरराष्ट्रीय शाळेचा उल्लेख करणें योग्य होईल. ही शाळा स्वित्झरलंडमध्यें मानटाना येथें काढली होती. तींत युरोपांतील इंग्रज, फ्रेंच, जर्मन इत्यादि राष्ट्रांतील विद्यार्थी होते. सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण मातृभाषेंतून व स्वदेशी शिक्षकांकडून दिलें जाई. भोजन, खेळ, बहिःशाल व सांस्कृतिक कार्यक्रम सर्व मुलांचे एकत्र होत. परकी भाषांच्या अध्ययनास उत्तेजन मिळे. डॉ. हुसमन यांचा हेतु राष्ट्रीय संस्कृतीशीं फारकत न करतां आंतरराष्ट्रीय वृत्तींचें संवर्धन करण्याचा होता. भारतांतील विविध राज्यांतील मुलांना एकत्र आणून भारतीय वृत्ति बाणविण्यासाठीं अशा योजनेचा उपयोग होऊं शकेल म्हणूनच तिचा मुद्दाम निर्देश केला आहे. अशी योजना अमलांत आणण्याच्या कामीं येणाऱ्या आर्थिक व व्यवस्थाविषयक अडचणी उघड दिसणाऱ्या आहेत. पण योजनेंतून मिळणारें फलही तितकेंच अमोल आहे.

****

१३ :

# फुरसदीसाठीं शिक्षण

******************************

एके काळीं फुरसद मिळणें ही उच्च वर्गांतील लोकांची मिरास होती. उलट बहुजनसमाजाला उपजीविकेसाठीं काबाडकष्ट करण्याचा हक्क बहाल करण्यांत आला होता; व ते कष्ट इतके असत कीं लोकांचा सर्व वेळ व त्यांची सर्व शक्ती उदरंभरणाच्या प्रयत्नांत खर्च होई. बहुधा अशाच परिस्थितीला उद्देशून इंग्रज कवी डेव्हीस यानें पुढील उद्‌गार काढले असावेत. " चिंतेच्या भाराखालीं दडपून गेल्यामुळें आपणाला स्वस्थ उभें राहून जगाचें निरीक्षण करण्यासाठी उसंतच मिळत नसेल तर आपलें जीवन नीरस व तुच्छ गणलें पाहिजे. "

सुदैवानें काळ बदलला आहे. जीवनाचे श्रम हलके करण्यासाठीं भौतिकशास्त्रांचा उपयोग होऊं लागल्यामुळें माणसांना पडणारे ढोरकाम कमी झालें आहे. प्रकाशासाठीं व स्वयंपाकासाठीं विजेची साधनें उपलब्ध झाल्यामुळें व नळांतून पाणी मिळूं लागल्यामुळें स्त्रियांचें घरकाम हलकें झालें असून त्यांस कामांतून जरा डोकें वर काढतां येऊं लागलें आहे. कारखाने चालविण्यासाठीं वीज व बाष्प यांची शक्ती मिळूं लागल्यानें, व श्रम वांचविणारीं यंत्रें वापरांत आल्यानें कामाचा वेळ कमी करूनही उत्पादन वाढत आहे. म्हणून कामाचे तास उत्तरोत्तर कमी करण्याची प्रवृत्ति वाढत आहे. अमेरिकेंतील फोर्ड मोटार कारखान्यानें सहा तासांचा दिवस व पांच दिवसांचा आठवडा मुक्रर करून कामगारांना जास्तीत जास्त फुरसद देण्याचें उदाहरण घालून दिलें आहे.

हा फरक घडत असतांनाच समाजाची सदसद्विवेकबुद्धीहि जागृत झाली आहे. लोकशाही तत्त्वाप्रमाणें काम करणें हें प्रत्येकाचें कर्तव्य असून

फुरसद मिळणें हा प्रत्येकाचा हक्क आहे. निरुद्योगी सुसंस्कृत वर्ग आणि कामाच्या रगाड्याखालीं दडपून गेलेला असंस्कृत कामगार वर्ग अशी समाजव्यवस्था हानिकारक होय. योग्य तेवढें कष्ट केल्यावर माणसाला मजा करावयासही वेळ उरला पाहिजे. म्हणून हलक्या समजल्या जाणाऱ्या व्यवसायांत काम करणाऱ्यांना सक्तीनें फुरसद मिळवून देणारे कायदे अमलांत आले आहेत. कारखान्यांच्या कायद्याप्रमाणें आठवड्यांतून एक दिवस सुट्टी देणें सक्तीचें असून रोजचे कामाचे तासही आठ तासांच्या वर जाऊन चालत नाहींत. तशीच तरतूद गुमास्ता कायद्यानें दुकानांतून काम करणाऱ्या लोकांसाठीं केली आहे.

औद्योगिक क्रांतीचा आणखी एक असा परिणाम झाला आहे कीं ज्यामुळें फुरसदीची आवश्यकता जास्तच तीव्रपणें भासते. यंत्रामुळें मोठ्या प्रमाणावर उत्पादन आवश्यक झालें. आणि कारागिरांचें स्वातंत्र्य नष्ट झालें. कारखान्यांत काम करणें अधिकाधिक लोकांस भाग पडत असून, यंत्र चालू ठेवणें एवढेंच तेथील कामाचें स्वरूप असते. कामांतून सृजनाचा आनंद नाहींसा झाला आहे. आणि बहुतेकांचें उपजीविकेचें काम नीरस व कंटाळवाणें झालें आहे. प्रत्येक माणसाला आत्माविष्काराचा जो आनंद आवश्यक असतो तो कामधंद्यातून मिळेनासा झाला आहे.

संशोधनासारखे कांहीं अपवादात्मक व्यवसाय उदरंभरण व आत्माविष्काराचा आनंद दोन्हीं प्राप्त करून देतात. परंतु कामगार, कारकून, दुकानदार, वाहतुकव्यवसायांतील नोकर इत्यादि बहुसंख्य लोकांना पोटाच्या कामांतून मानसिक समाधान मिळूं शकत नाही. मानसिक विकृतीपासून त्यांचें रक्षण करण्यासाठीं व त्यांची माणुसकी टिकविण्यासाठीं फुरसदीच्या व्यवसायांतून त्यांना सृजनाचा आनंद मिळाला पाहिजे. फुलझाडें लावून वा प्रतिस्पर्ध्याचा बॅडमिंटन सारख्या खेळांत पराभव करून अथवा सतार वाजवून तो आनंद लाभूं शकेल, व यंत्राधीन झालेल्या बहुजनसमाजाच्या मनाचा तोल सांभाळतां येईल. यंत्रांच्या वरचढपणामुळें फुरसद सर्वांस आवश्यक झाली आहे.

माणसाला फुरसदीची जरूर आणखी एका कारणासाठी असते. शारीरिक गरजा भागविण्यासाठीं कष्ट उपसणें मानवाला अपरिहार्य होय.

परंतु त्याला अशारीरिक गरजाही असतात. माणसाला ज्ञानाविषयीं जिज्ञासा, सौदर्याविषयीं अभिरुचि, सामाजिक संबंधाची आवड व तत्त्वचिंतनाविषयीं ओढ असतें. केवळ पोट भरलें म्हणजे पशुजीवनाची पूर्तता होते; मानवी जीवनाची पूर्तता या शरीरबाह्य प्रेरणांचे समाधान झाल्यावांचून होत नाहीं. त्यांच्या समाधानार्थ प्रत्येक व्यक्तीला फुरसद मिळणें हें जरूर आहे.

वर सांगितलेल्या कारणामुळें जास्त फुरसद जसजशी मिळूं लागली. तसतशी 'फुरसदीचा योग्य उपयोग कसा करावा' याचें शिक्षण देण्याची नड भासूं लागली. पाश्चात्य देशांत औद्योगीकरण आधीं व मोठ्या प्रमाणावर झालें. म्हणून तेथें ही आवश्यकता जाणवली. यंत्रांच्या बहुवसतेमुळें, श्रीमंत व गरीब, पांढरपेशे व मजूर, कामगार स्त्रिया व गृहिणी सर्वांनाच एवढी फुरसद असते कीं या वेळाचें काय करावें असा प्रश्न उद्‌भवतो. 'गरज तसा पुरवठा' या नात्यानें कालहरणाचे अनेक उपायही पाश्चात्यांनीं शोधून काढले आहेत. आकाशवाणी व बोलपट, शर्यती व जुगार, गुप्त पोलीसकथा व साहसाच्या गोष्टी, शब्दकोडीं व क्रीडानिरीक्षण, मद्यसेवन व धूम्रपान इत्यादि अनेक पर्याय रंजनासाठीं सिद्ध आहेत. जीवनांतील रसहीनतेची भरपाई करण्यासाठींच जणूं काय प्रत्येकाला आडगिऱ्हाइकी साहसाची प्राप्ती करून घेण्याची घाई झालेली दिसते. बोलपटांतील वा साहसकथांतील नायकांशी व नायिकांशीं तादात्म्य पावून आकर्षक जीवनाचा परप्रतीत आनंद उपभोगण्यांत बहुतेक लोक दंग दिसतात.

फुरसदीचा असा दुरुपयोग होतो ही गोष्ट पाश्चात्य देशांतील विचारवंतांना निषेधार्ह व अनर्थकारक वाटली. प्राचीन ग्रीक लोक आपला रिकामा वेळ उच्च प्रतीची नाटके बघण्यांत घालवीत आणि आपण कनिष्ठ प्रतीचें बोलपट पाहाण्यांत व्यतीत करतो अशी टीकाही झाली आहे. तथापि ही टीका योग्य नव्हे. ग्रीक लोक आपली सर्वच फुरसद नाटकांना देत हें विधान अतिरंजित आहे. शिवाय सर्वच बोलपट टाकाऊ असतात हा दावाही यथार्थ नव्हे. असें असलें तरी बरेच आधुनिक लोक रंजनाच्या कार्यक्रमांत हीन अभिरुचि व्यक्त करतात हेंहि खोटें नाहीं. म्हणूनच तत्त्व-

ज्ञांना अशी भीति वाटते कीं आजची वाढती फुरसद वराऐवजीं शाप तर ठरणार नाहीं ना ? आणि शिक्षणाच्या उद्दिष्टांत फुरसदीचा योग्य उपयोग कसा करावा यांविषयींच्या मार्गदर्शनाचा समावेश व्हावा असा त्यांचा आग्रह आहे. " ज्या शाळा मुलांना फुरसदीचा सदुपयोग करण्यास शिकवीत नाहींत त्या शाळाच नव्हेत, " इतक्या कडक शब्दांत या उद्दिष्टाचें समर्थन करण्यांत आलें आहे.

पोटासाठीं करावयाच्या कामांतून जो आत्मविष्काराचा आनंद व्यक्तीला मिळत नाहीं तो रंजनांतून मिळाला पाहिजे. माणसाची आणखी एक गरज स्वजातीशीं स्नेहसंबंध वाढविणेंही असते; तिचीही पूर्तता झाली पाहिजे. फुरसदीच्या व्यवसायांतून अधिकाधिक लोकांशी परिचय घडावा. आणि विमनस्कता व थकवा नाहींसा करण्याचें सामर्थ्यहि फुरसदी व्यवसायांत असलें पाहिजे. यासाठीं तो व्यवसाय हृद्य व कृतिप्रवर्तक असावा. हा शेवटचा गुण अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण योजनाविरहीत कालहरणानें ऐदीपणा व उदासीनता या वाईट संवयी जडण्याचा धोका असतो.

वरील सर्व उद्दिष्टें साधण्यासाठीं रंजनव्यवसाय व्यक्तिपरत्वें भिन्न असावा. कामधंद्याला तो पूरक असल्यामुळें कामाच्या स्वरुपाप्रमाणें रंजन कार्यक्रमहि भिन्न होईल. शिक्षक, कारकून इत्यादी बैठे काम करणाऱ्या लोकांना शारीरिक व्यायाम घडविणारा व्यवसाय फुरसदीसाठीं अनुरूप होईल. त्यांनीं सुतारकाम करावें अथवा बाग फुलवावी किंवा एखाद्या हुतूतूच्या किंवा फुटबॉलच्या संघांत नांव घालावें. उलट शारीरिक श्रम करणाऱ्या कामगारांनीं करमणुकीसाठीं एखादा बौद्धिक अथवा सांस्कृतिक व्यवसाय निवडावा. संगीत मंडळ अथवा वादविवाद सभा, अथवा हौशी नाटचसंघ, यांपैकीं एकाच्या कार्यात त्यांनीं भाग घ्यावा.

तसेंच रंजनाचा कार्यक्रम व्यक्तीच्या उपजत शक्तींना पेलेल असाच असावा. बुद्धिमंतांनीं बुद्धिबळें, वाङ्मयचर्चा यांसारखे बुद्धिप्रधान कार्यक्रम हातीं घ्यावेत, व धष्टपुष्टांनी हॉकी किंवा हुतूतू यांसारखे खेळ पसंत करावेत. स्वतःच्या अभिरुचीच्या व कुवतीच्या बाहेरचा व्यवसाय निवडल्यास रंजनांतही विफलता येईल, आणि सृजनाचा आनंद देण्याचा हेतु सफल होणार नाहीं. सुदैवानें फुरसदीसाठीं असंख्य व्यवसाय उपलब्ध आहेत.

म्हणून प्रत्येकाला आपआपल्या अभिरुचीप्रमाणें व कुवतीप्रमाणें रंजनव्यवसाय निवडण्यास अडचण पडूं नये. निवड करतांना व्यवसायाच्या द्वारा आपणांस जास्तींत जास्त शारीरिक व मानसिक स्वास्थ्य व आत्माविष्काराचें समाधान मिळेल अशी खबरदारी घ्यावी.

फुरसदीच्या व्यवसायाची इष्टानिष्टता पारखून घेणें आवश्यक होय. ती ठरविणाऱ्या निकषांचा आतां आपण विचार करूं. पहिला निकष हा आहे कीं फुरसदीचा व्यवसाय सृजनात्मक असावा. फुलांच्या माळा करण्यापेक्षां झाडें लावून फुलें फुलविणें अधिक चांगलें; तसेंच लाकूड फोडण्यापेक्षां लाकडाचें कपाट बनविणें इष्टतर होय; रसिकतेनें काव्याचें परिशीलन करण्यापेक्षांही स्वतः काव्यरचना करणें अधिक श्रेयस्कर समजावें. कागदकाम, लाकूडकाम, कशिदाकाम, चित्रकला इत्यादि व्यवसाय फुरसदीच्या वेळांत अवश्य करावे. या कामांत जरी सामान्य दर्जाचें कौशल्य संपादन करतां आलें तरी सुद्धां स्वतः केलेल्या कृतीनीं करणाराला मानसिक समाधान लाभेल आणि जीवन सार्थ व समृद्ध झाल्याची प्रतीति येईल.

तसेंच ज्या व्यवसायांत ज्ञान, कौशल्य व रसिकता यांची वाढ होण्यास भरपूर वाव असतो असे व्यवसाय रंजनासाठीं योग्य समजावे. काव्य, चित्रकला, संगीत, शिल्प इत्यादि कलांना अशा व्यवसायांत अग्रस्थान द्यावें लागेल. या कालांतून होणाऱ्या सांस्कृतिक विकासाला मर्यादा नसते व म्हणून त्यांचें श्रेष्ठत्व कोणीही मान्य करील. तथापि या व्यतिरिक्तही इष्ट व्यवसाय सापडूं शकतात. सृष्टिनिरीक्षणानेंही मनाची ग्रहणकक्षा विस्तृत होते. मानवी स्वभावाचें निरीक्षण हेंही काम तितकेंच आकर्षक व उद्बोधक असतें. आणि एकाचें पोटकाम तोच दुसऱ्याचा फुरसदीचा व्यवसाय होऊं शकत असल्यामुळें बौद्धिक व नैतिक विकास घडवून आणणारा रंजनाचा कार्यक्रम निवडणें कोणालाही दुष्कर नाहीं.

तिसरा निकष सामाजिक संबंध वाढविण्याची शक्ती हा होय. ज्या योगानें अधिक बांधवांची संघटना होऊं शकेल अशी करमणूक पसंत करावी. खेळ, वादविवाद, संगीताचे जलसे, हौशी नाटकसंघ, सहली इत्यादि कामांत भाग घेऊन फुरसदीचा वेळ घालविणें योग्य होईल. फुरसदीचा उपयोग आपल्या सामाजिक जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठीं केला पाहिजे. आपल्या भावनांच्या

समृद्धीसाठी व संस्करणासाठीं माणसांचा सहवास आवश्यक असतो. म्हणून फुरसदीच्या वेळांत नातलग व इष्ट मित्र यांच्या प्रासंगिक गाठी घेणें, कुटुंबातील माणसांना सहलीसाठीं नेणें, स्नेह्यासोबत्यांबरोबर चहाफराळ करणें वगैरे गोष्टी कराव्या.

निष्क्रिय करमणुकीपेक्षां सक्रिय करमणूक श्रेयस्कर हा शेवटचा निकष होय. क्रिकेटचा सामना बघण्यापेक्षां क्रिकेट खेळणें अधिक चांगलें. गायन ऐकणें हें स्वत: गाण्यापेक्षां कमी प्रतीचें गणावें. बहुतेक लोकप्रिय करमणुकी अकरणरूप म्हणून सदोष असतात. सिनेमा, नाटक, आकाशवाणी हे सर्व आधुनिक रंजनप्रकार आपणाला स्वस्थ बसायला लावतात; आणि, आपल्या चैतन्यशक्तींत शिथिलता आणतात. चांगलें गाणें कधींच ऐकू नये अथवा चांगलें नाटक कधींच पाहूं नये असें नाहीं. पण आपल्या रंजनाचा अधिक भाग आपणांस कार्यप्रवण करणारा असावा, आपण स्वत: एखादें वाद्य वाजविण्यास, अथवा एखादे कलाकुसरीचें काम करण्यास शिकावें. त्यायोगें पोटाच्या व्यवसायांत दुर्मिळ झालेली चैतन्यप्रीतीति आपणांस लाभू शकेल.

फुरसदीचा सदुपयोग कसा करावा याचें शिक्षण शाळेंत देतांना आपण वरील निकष लक्षांत ठेवले पाहिजेत. पहिली गोष्ट ध्यानांत धरावयाची कीं आपल्या विद्यार्थ्यांनाही पुष्कळ मोकळा वेळ मिळतो, व तो कांहीं तरी आकर्षक उद्योगानें कारणीं लावला पाहिजे. आजपर्यंत अशा तऱ्हेची खबरदारी शाळांनीं न घेतल्यामुळे आळसाची वाईट संवय आपल्या समाजांत दृढमूल झाली आहे.आपल्या प्रौढ मंडळींत हे समजत नाहीं कीं मिनिटांत पूर्ण साठ सेकंदांचें काम केलें पाहिजे; कारण बालपणापासून वेळ ऐदीपणांत घालविण्याचा त्यांचा परिपाठ आहे. फुरसदीच्या सदुपयोगाचें शिक्षण देतांना प्रथम ही समजूत पटविली पाहिजे कीं प्रत्येक क्षणांतून आपणांला विधायक जीवनाचा आनंद मिळवितां येईल; पण तो मिळविण्याची आकांक्षा मात्र पाहिजे.

शालेय अभ्यासांतच नव्हे तर इतर रंजनाच्या उद्योगांतही होसेनें भाग घेण्याचा उत्साह मुलांमध्यें निर्माण केला पाहिजे. मुलांचा कांहीं मोकळा वेळ अर्थातच गृहपाठ करण्यांत व्यतीत होईल. तरीही त्यांच्या फुरसदीपैकीं बराच मोठा भाग शिल्लक राहील आणि त्यासाठीं चित्तवेधक व्यवसाय पुरविणें हें शाळेचें कर्तव्य होय.

मैदानी क्रीडांविषयीं आवड मुलांच्या मनांत रुजविली पाहिजे. हल्लीं शारीरिक शिक्षणाकडे जरी वाढतें लक्ष शाळा देत असल्या तरी अशी अभिरुचि निर्माण करण्यांत त्यांना यश आलेलें नाहीं. शारीरिक शिक्षणांत हल्लीं दोन गोष्टींवर भर दिला जातो : एक—कसरत, जी मुलें अनिच्छेनें करतात, व दोन चढाओढीचें खेळ व स्पर्धा, ज्यांत अत्यल्प मुलांना भाग घेतां येतो. खरें उद्दिष्ट असें असावें कीं प्रत्येक मुलाच्या मनांत कोणत्यातरी एका खेळाविषयीं कायम टिकणारी आवड उत्पन्न करावयाची म्हणजे शालेय शिक्षण संपल्यानंतरही तो खेळ रंजनासाठीं खेळण्याची हौस कायम राहील; व फुरसदीचा एक हितावह व्यवसाय हस्तगत राहील. हे साधण्या-साठीं पुष्कळच संशोधन व प्रचारकार्य करावें लागेल. पण कष्ट पडले तरी हें उद्दिष्ट साधण्यासाठीं शाळांनीं झटावें. एखाददुसरें आंतरशालेय बीरुद मिळविण्यापेक्षां हें कार्य जास्त समाजहितवर्धक व म्हणून शाळेला यशावह होईल.

छंदांचा प्रचार सुद्धां हिरीरीनें केला पाहिजे. छायाचित्रें काढणें किंवा आवडतीं जनावरें पाळणें यासारखे कांहीं छंद महागरे व म्हणून बहुसंख्य मुलांच्या आवाक्याबाहेरचे असतात. तथापि कमी खर्चांत करतां येण्या-सारखे छंदही पुष्कळ आहेत. संकलनात्मक छंद अनेक आहेत. पोस्टाची तिकिटें, चित्रें, आगपेटयांचीं झांकणें, फुलें, फळें, सुविचार इत्यादींचा संचय-मुलें करूं शकतील. कागदाचीं फुलें करणें, मातीच्या वस्तु करणें इत्यादि छंदही सुलभ आहेत. ज्यांना छंद असेल अशा मुलांच्या संग्रहाचें प्रदर्शन भरवून तें पाहण्यास पालकांस बोलवावें, आणि पालकांचे सहकार्य मुला-मध्यें छंदांचा प्रसार करण्यासाठीं मिळवावें. मुलांना नेहमी हितकर उद्योगांत रमविणें आवश्यक असतें हें तत्त्व पालकांना अशा प्रदर्शनाच्या वेळीं पटवून द्यावें. मुलाच्या मगदुराप्रमाणें शिक्षकांनीं त्यास छंद सुचवावा, व आरंभीच्या काळांत थोडें साहाय्यही द्यावें, एकदा छंद जडला कीं मुलगा आपोआपच कार्यमग्न राहील.

तसेंच ललितकला शिकविण्याची हल्लीपेक्षां अधिक चांगली तरतूद शाळांनीं केली पाहिजे. संगीत, चित्रकला, हस्तव्यवसाय यांचे शिक्षण ते मुलांचे कायमचे छंद होतील अशा हेतूनें देण्यांत यावें. ज्यांचे अंगीं एखाद्या

कलेचा उपजत गुण असेल अशांच्या मनांत कलेविषयीं अभिरुचि उत्पन्न करणें सोपें असतें. पण एवढ्याने भागणार नाहीं. कलावंताच्या कलेचें रसग्रहण करण्याची शक्ति आजच्यापेक्षां अधिक मुलांत दिसूं लागली पाहिजे. म्हणून कलांचें अनुष्ठान हे इतर विषयांच्या अभ्यासाप्रमाणें कसे तरी उरकावयाचें काम बनूं नये. बालकांच्या सृजनशक्तीला आवाहान देणें व त्यांची सौन्दर्याभिरुची वृद्धिंगत करणें हे कलाशिक्षणाचे हेतु असावेत. या शिक्षणाचें मूल्यमापन परीक्षांनीं होऊं नये, तर सृजनात्मक कार्य करण्याच्या आनंदाचा उपभोग घेण्यास किती मुले पुढें येतात व चांगल्या कलाकृतींचा आस्वाद घेण्याची उत्सुकता किती बालक दाखवितात, यावरून व्हावें.

लहान सुट्यांचा विनियोग सहली व पदयात्रा काढण्यासाठीं करावा. दीर्घ सुट्यासाठी शिबिरें भरवावीं.अशा शिबिरांत मुलांना आरोग्यदायक व रम्य निसर्गाच्या सान्निध्यांत राहावयास मिळावें. शिवाय त्यांनीं समाजोपयोगी कार्यांत भाग घ्यावा. ग्रामीण भागात रस्ते तयार करणें, सार्वजनिक क्रीडांगणें सपाट व साफ करणें, पिकें काढणें या व अशा स्वरूपाचीं कामें मुलांनीं करावीं.

खेड्यांची पहाणीं करणें, एखादे खेडें निवडून त्यांत वर्षभर सुटींत समाजोन्नतीचें कार्य करणें, यात्रा, उरूस, बाजार यांत स्वयंसेवकांचें काम करून शिस्तीचे वर्तन करण्यास बहुजनसमाजास शिकविणें असे उपक्रमही मुलांना उद्योगशील व समाजोन्मुख करतील. बालकांच्या फुरसदीचा सदुपयोग शिकविणारी आद्य संघटना बालवीर संस्था तिलाही शाळेंत उत्तेजन देणें इष्ट होईल.

तसेच शाळेनें मुलांना वादविवादसभा, अभ्यासमंडळें,नाट्यसंघ, संगीत परिषद इत्यादि संस्था काढण्यास मिळून मिसळून वागण्याची व सहकार्यानें काम करण्याची संधी द्यावी. ज्याना मैदानी क्रीडांची वा स्पर्धांची आवड नाहीं अशीं मुलें या उपक्रमात हौसेनें भाग घेतील. सारांश फुरसदीच्या कार्यक्रमांत सर्व मुलांचा समावेश होईल असें शाळेंचें धोरण असावें. बालकाच्या मनांतील एखादी उपजत आवड शोधून काढणें, तिचें संगोपन करून ती दृढमूल करणें, आणि अशा रीतीनें यावज्जीव टिकणारा रंजनाचा कार्यक्रम मुलास उपलब्ध करून ठेवणें हें या सर्व साक्षेपाचें उद्दिष्ट असावें.

वर्तमान व भविष्य दोन्हीं काळांची तरतूद केली पाहिजे. आजचा फुरसदीचा वेळ सत्कारणीं लागावाच, पण त्यांतून भावी जीवनांतील रिकामा वेळही सत्कारणीं लागण्याची तजवीज व्हावी.

फुरसतीच्या बाबतीतील शाळेचे शेवटचें कार्य वाचनाविषयीं सदभिरूची निर्माण करणें हें होय. वाचन हें निर्विवादपणें रंजनाचें सर्वांत सोपें साधन आहे, त्यास कोणाचें साहाय्य लागत नाहीं. तें स्वस्त व नेहमीं उपलब्ध असणारें साधन आहे. आणि त्यांतून माणसाला गरजेच्या वेळीं सांत्वन व समाधान मिळूं शकतात. चांगले ग्रंथ हेच आपले श्रेष्ठ मित्र होत.

पण चांगले ग्रंथ वाचण्याची अभिरुची निर्माण करण्यासाठीं व तिची जोपासना करण्यासाठीं सोपस्कारांची जरुरी असते. पहिली पायरी म्हणून ज्यांत मुलास खरोखर गोडी वाटेल असे चांगले ग्रंथ वाचावयास मिळतील अशी सोय करणें. नीतिपाठ शिकविणारी पुस्तकें वाचण्याची सक्ती मुलावर करूं नये. त्यायोगें ग्रंथाविषयीं अरुचि निर्माण होते. मुलांना साहसपूर्ण जीवनाची आवड असते. अशा जीवनाचे वर्णन जसें टाकाऊ पुस्तकांत तसेंच चांगल्या वाङमयांतही आढळतें. असे चांगले ग्रंथ मुलांस सहजप्राप्य करावेत.

दुसरी पायरी म्हणून कुमारवयांतील मुलांबरोबर वाचलेल्या ग्रंथाविषयीं गुणदोषदर्शक चर्चा करावी. तुलनात्मक चर्चा करून मुलांच्या असें निदर्शनास आणून द्यावें कीं अभिजात ग्रंथांत आपणाला मानवी जीवनाचे व स्वभावाचें वास्तव चित्र आढळतें आणि टाकाऊ चोपड्यांमधील चित्रण भडक, अतिरंजित व असंभवनीय असतें; क्षणभर ते आपणाला दिपवितें पण थोड्याशा विचारानें त्यांतील फोलपणा उघडा पडतो. चांगले ग्रंथ म्हणजे खरें सोनें असून चोपडी म्हणजे सोन्याचा मुलामा केलेले पितळ होय. वाङमयरसग्रहणाची शक्ती बालकांत आली तर भावी जीवनांत वाचन हें त्यांचें फुरसदीचा वेळ घालविण्याचें मनोरंजक व आत्मोद्धारक साधन होईल.

****

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

१४ :

# व्यवसायासाठीं शिक्षण

********************************

अनेक कारणांमुळें आजकाल व्यवसायाच्या शिक्षणावर विशेष भर दिला जातो. यापैकीं एक कारण श्रमाची मान्य झालेली प्रतिष्ठा होय. असा एक काळ होता की ज्यावेळी सुशिक्षित माणूस शरीरकष्टाचें काम करण्यांत कमीपणा मानी. या वृत्तीविरूद्ध टीकाही कडक झाली " सुशिक्षित लोक म्हणजे पोकळ ज्ञानानें चढून गेलेले व्यवहारशून्य पोषाखी लोक होत. ते हलकी चामड्याची पिशवीसुद्धां वाहणार नाहींत. त्यासाठीं त्यांना मजूर लागणार. सारांश, शिक्षणानें लोक कष्टविन्मुख व अहंमन्य होतात असा समज होता व त्यांत तथ्यहि होते.

सुदैवानें ती वृत्ति आतां उरली नाहीं. हात बळकट असले म्हणजे डोकें युक्तिबाज असूं शकत नाहीं असे आतां कोणी मानीत नाहीं. दुसऱ्याकडून कष्ट करून घेण्यांत प्रतिष्ठा आहे असे आतां कोणास वाटत नाहीं. व पांढरपेशा व्यवसायाला जसे विशिष्ट विनयन लागतें तसेंच शरीरकष्टाच्या कामालाही लागते, हें तत्व आतां सर्वमान्य झालें आहे.

सर्व प्रौढांना मतदानाचा हक्क मिळाल्यामुळेंही श्रमाची प्रतिष्ठा वाढल आहे. ज्यावेळीं राजकीय सत्ता बुद्धिजीवी लोकांच्या हातांत केन्द्रित झाली होती त्यावेळीं कष्ट करणारे लोक कमी दर्जाचे आहेत अशी समजूत असणें स्वाभाविक होते. आतां परिस्थिती बदलली आहे. मतदानाचा हक्क सार्वत्रिक झाला आहे. अनेक देशांत मजूरपक्षाची मंत्रिमंडळें राज्यकारभार हाकीत आहेत. कामगारवर्गाच्या आधीन असणाऱ्या रशियानें राष्ट्रामध्यें अग्रस्थान मिळविलें आहे म्हणून श्रमविभागाच्या आवश्यकतेमुळें कांहीं लोकांना बौद्धिक कामें व कांहींना शरीरकष्ट करावे लागत असले तरी कामांत

११४८३



उच्चनीचता नाहीं ही समतोल वृत्ति आतां निर्माण झाली आहे. प्रत्येक नागरिकानें स्वतःच्या उपजत लायकीप्रमाणें काम करावें त्याची प्रतिष्ठा त्याच्या कामाच्या प्रकारावर अवलंबून नसून ज्या निष्ठेने तो तें काम करतो तीवर अवलंबून असते

कष्टांचें स्वरूपहि पालटलें आहे. शास्त्रीय संशोधन व यंत्रांची बहुवसता यामुळें उत्पादनपद्धतींत क्रान्ति झाली आहे. उद्योगधंद्यात काम करूं इच्छिणाऱ्या कामगारांच्या अंगीं सुद्धां बौद्धिक शिक्षण व शिकून प्राप्त केलेलें हस्तलाघव यांची आवश्यकता भासूं लागली आहे. म्हणून योग्य शिक्षणाशिवाय कामगारालाहि व्यवसाय मिळूं शकत नाहीं. कोणताहि खेड्यांतला माणूस घेऊन त्याची कारखान्यांत भरती करण्याचे दिवस आतां संपले आहेत. कारखानदारांना सुद्धां आतां कसबी कामगार लागतात. यामुळें व्यावसायिक शिक्षणाची मागणी वाढली आहे.

आर्थिक अपेक्षेमुळें या मागणीला अधिकच बळकटी आली आहे. उद्योगधंद्यात काम करणाऱ्या तंत्रज्ञांना इतकी कमाई होते कीं बौद्धिक व्यवसाय करणारांना सुद्धां त्यांचा हेवा वाटावा. म्हणून अशा तांत्रिक व्यवसायांची प्रतिष्ठा वाढली असून, जो तो त्या व्यवसायाकडे धांव घेऊं इच्छित आहे. अर्थातच तांत्रिक शिक्षणाची जोराची मागणी निर्माण झाली आहे. आणि या तांत्रिक शिक्षणाच्या आवश्यकतेबाबत विस्मयकारक मतैक्य आढळतें. राजकारणी लोक, समाजकारणी लोक व पालक सर्वच एकमुखानें तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था वाढवा अशी मागणी करीत आहेत.

तांत्रिक शिक्षण म्हणजेच व्यावसायिक शिक्षण असा गैरसमज मात्र होऊं देऊं नये. विधि विद्यालय, आयुर्वेद विद्यालय, शिक्षक विद्यालय हीं विद्यालयें सुद्धां व्यावसायिक शिक्षणच देत असतात. पण ही विद्यालयें जुनीं आहेत व तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था नवीन आहेत. म्हणून व्यावसायिक शिक्षणाची मागणी करणारे लोक आजकाल तांत्रिक शिक्षणाची आवश्यकता विशेष हिरीरीनें प्रतिपादतात.

तसेंच तांत्रिक शिक्षणाची भरपूर तरतूद केली म्हणजे आपल्या सर्व समस्या सुटतील असाहि चुकीचा समज आपण करून घेऊं नये. आपली लोकसंख्या फार असून व्यवसाय त्या मानानें कमी आहेत. शिवाय लोक-

संख्येची वाढ झपाट्यानें होत असून व्यवसायांच्या संख्येत त्या प्रमाणांत भर पडत नाहीं. लोकसंख्या व व्यवसाय यामध्यें समतोल निर्माण झाल्याशिवाय आपला बेकारीचा प्रश्न सुटणार नाहीं. पदवीधर जसे बेकार राहूं शकतात तसेंच तंत्रज्ञहि राहूं शकतात. कांहीं लोकांना असें वाटतें जग हें सुतारांचें व विणकरांचें नंदनवन आहे, आणि जर मुलांना सुतारकाम व विणकाम यांचें शिक्षण दिलें तर तीं आपलें पोट सहज भरूं शकतील. याहून अधिक भ्रामक समजूत असूंच शकत नाहीं. हातमाग चालविणाऱ्यांची आजची महाराष्ट्रांतील हलाखीची स्थिति पाहिली असतां ही गोष्ट स्पष्ट होईल. लोकसंख्येवर नियंत्रण ठेवून उद्योगधंदे झपाट्यानें वाढविण्यांत आपला तरणोपाय आहे. तांत्रिक शिक्षणसुद्धां जेवढ्यांना नोकरी मिळूं शकेल तेवढ्यांनाच द्यावें. तांत्रिक शिक्षणाची अनियोजित वाढ केली तर तंत्रज्ञांना आज मिळणारी बिदागी कमी होऊन बेकारीची समस्या अधिक बिकट होईल.

तथापि लोकमत व्यावसायिक शिक्षणास अनुकूल आहे यांत शंका नाहीं. व्यवसाय हेंच शिक्षणाचें केन्द्र करावें असा अभिनिवेश दिसून येतो. कुटुंबाचें पोषण करणें ही प्रत्येक नागरिकाची मौलिक जबाबदारी आहे. लोकशाहींत काम न करणाऱ्या परपुष्टांना स्थान नाहीं. तसेंच जो व्यवसाय करावयाचा तोही कसाबसा करणें योग्य नव्हे. व्यवसायाच्या रूपानें आपणांस समाजाचें ऋण फेडावयाचें असतें. म्हणून व्यवसाय आपण पूर्ण कार्यक्षमतेनें केला पाहिजे यासाठीं प्रथम नैसर्गिक शक्तींना अनुरूप असा व्यवसाय निवडणें जरूर असून नंतर त्या व्यवसायाचें यथासांग शिक्षण आपणांस मिळणें आवश्यक होय.

शिवाय कुमारवयांतील मुलांना जीवनाच्या वास्तविक स्वरूपाचा परिचय करून घेण्याची तीव्र आकांक्षा असते. विशिष्ट व्यवसायाचे शिक्षण त्याना अधिक आकर्षक वाटतें, उलट सर्वसाधारण शिक्षणांत त्यांना गोडी वाटत नाहीं कारण त्या शिक्षणाचा व्यवहाराशीं संबंध सहज समजूं शकत नाहीं. मानसशास्त्रदृष्ट्यासुद्धां व्यावसायिक शिक्षण अधिक चित्त-वेधक असतें, कारण तें कृतिप्रवण असते. उलट बौद्धिक शिक्षण विचार-प्रधान व अरूपगल्प असतें. व्यवसायनिष्ठ शिक्षण हें विद्यार्थी जास्त

चांगलें आत्मसात करूं शकतो, कारण त्या शिक्षणांतील सर्व अंगांचा परस्परांशीं संबंध स्पष्ट असून, त्या एकंदर शिक्षणाचा जीवनाशीं निकट संबंध असतो.

पालकांस व्यावसायिक शिक्षणाविषयीं विशेषच आस्था असते. मुलांच्या शिक्षणावर जो खर्च झाला त्याची भरपाई मुलांच्या अंगीं अर्जन-शक्ती येऊन व्हावी असें त्यांस वाटत असतें. व्यावसायिक शिक्षण मिळाल्यानें विद्यार्थ्यासही आत्मविश्वास वाटतो. शिक्षण संपल्यावर आपली अवस्था त्रिशंकुसारखी होणार नाहीं, आपणांस निश्चित कामधंदा मिळेल व आपण स्वावलंबी होऊं असा दिलासा त्यास वाटत असतो. उलटपक्षीं बऱ्याचशा पदवीधरांना पदवी मिळाल्यानंतर आतां काय ? हा प्रश्न भेडसावीत असतो.

प्रत्येक व्यक्तीला व्यवसायाचें शिक्षण मिळावें याबद्दल दुमत होण्याचें कारण नाहीं. व्यक्तीचे उपजत गुण ज्या व्यवसायास अनुरूप असतील त्या व्यवसायाचें सांगोपांग शिक्षण त्यांस मिळावें. असें केल्यानें तो व्यवसायांत सुखी होईल व त्याच्याकडून समाजाची कर्तबगार सेवा होईल. पण केवळ व्यवसायाचें शिक्षण देऊन भागणार नाहीं, व व्यवसायाचें शिक्षण फार लव-कर देऊं नये, या दोन तत्त्वांवर भर देणें अपरिहार्य आहे. मनुष्य हा केवळ भाकरीवर संतुष्ट राहणार नाहीं. शारीरिक गरजांप्रमाणेंच माणसाला आध्यात्मिक व सामाजिक गरजाही असतात, व त्यांची पूर्तता व्यवसायांतून होत नाहीं. या गरजांच्या पूर्ततेसाठींसुद्धां शिक्षण दिलें पाहिजे. माणसाला जीवनांत अनेक भूमिका वठवावयाच्या असतात; त्यांपैकीं उदरंभरण ही केवळ एक भूमिका आहे. कुटुंबाचा घटक, नागरिक, समाजाचा घटक, धर्माचा अनुयायी, या विविध भूमिका माणसाला पार पाडावयाच्या अस-तात व ती सिद्धि त्यास योग्य शिक्षणावांचून साध्य होणार नाहीं. मनुष्याने कार्यक्षम कारकून वा सुतार व्हावें हें अर्थातच महत्त्वाचें आहे, पण निदान तितकेंच महत्त्वाचें हेंही आहे कीं त्यानें मतदान शहाणपणानें करावें, व पिता व मित्र या नात्याने आपलीं कर्तव्यें नीटपणें करावी. शिक्षणाला जीव-नांच्या या अंगांकडे दुर्लक्ष करतां येणार नाहीं. तसेंच मनुष्याला फुरसद असतें हेंही विसरून कसें चालेल ? आजकाल फुरसदीच्या योग्य उपयोगा-विषयीं मार्गदर्शन हें शिक्षणाचें अत्यावश्यक अंग समजतात. तेव्हां शिक्षण

केवळ व्यवसायासाठीं असावें असे म्हणणें म्हणजे शिक्षणाच्या व्यापावर अयोग्य मर्यादा घालणें होय.

निष्कर्ष हा कीं माणसाला कामगार व माणूस या दोन्हीं नात्यांनीं शिक्षण हवें असतें. व्यवसायाचें शिक्षण त्याला मिळालें म्हणजे तो आर्थिक दृष्टया स्वावलंबी होतो. व मानवतेचें शिक्षण मिळालें म्हणजे तो खाजगी व सामाजिक जीवनांतील कर्तव्यें कार्यक्षमतेने व उदारबुद्धीने पार पाडूं शकतो. या दोन्ही शिक्षणांचा समन्वय करतां आला तर दुधात साखर पडल्यासारखें होईल. कांहीं थोर शिक्षणतज्ञांचा असा दावा आहे कीं असा समन्वय साधणें शक्य आहे.

अमेरिकन तत्त्वज्ञ व शिक्षणसूरि अध्यापक व्हाइटहेड यांच्या मते तांत्रिक शिक्षण व सांस्कृतिक शिक्षण यांच्यामधील विरोध भ्रममूलक आहे. प्रत्येक व्यवसायांत बुद्धीचा विकास करण्याची व ज्ञानाची वाढ करण्याची क्षमता असते. व म्हणून कोणत्याहि व्यवसायाचें शिक्षण योग्य रीतीने दिलें तर त्यांतून सांस्कृतिक शिक्षणही मिळणारच असें त्यास वाटतें. वकील, वैद्य, कृषक, नाविक, भिक्षुक, शिक्षक, स्थापत्यविशारद, इत्यादि जे उच्च गणिले गेलेले व्यवसाय आहेत त्यांच्या शिक्षणांतून सांस्कृतिक शिक्षण मिळूं शकतें व नैतिक व बौद्धिक विकास होऊं शकतो हें खरें आहे. कारण या व्यवसायांचें शिक्षण व्यापक ज्ञानावर व कसबावर आधारलेलें असतें. वैद्य होऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्याला रसायनशास्त्र, प्राणिशास्त्र, शरीरशास्त्र व मानसशास्त्र इत्यादि ज्ञानशाखांचें अध्ययन करावें लागतें; शिवाय त्यास चिकित्सा, औषध योजना, शस्त्रक्रिया यांचें शिक्षण घ्यावें लागतें. अशा विनयनांत दृष्टि विशाल करणारा प्रभाव दिसून येतो. तसेंच वर उल्लखिलेले जे उच्च व्यवसाय त्यांपैकीं प्रत्येकाला विशिष्ट नैतिक परंपरा आहे. वैद्याचें आद्य कर्तव्य प्राणरक्षण व वकीलाचें न्यायदान हें होय. हें कर्तव्य पार पाडण्याबद्दल द्रव्य घेऊन ते श्रीमंत होतात. हा आनुषंगिक परिणाम होय. तसेंच या सर्व व्यवसायांना प्रतिष्ठादायक इतिहास असून, त्या व्यवसायांत नवीन पदार्पण करणाऱ्यांना ज्यांच्यापासून स्फूर्ति मिळेल अशा विभूतींच्या चरित्रांनीं तो इतिहास भरलेला आहे. म्हणून यांपैकीं कोणत्याही व्यवसायाचें शिक्षणांत व्यवसाय शिक्षणाबरोबरच माणुसकीचें शिक्षण मिळून जातें.

परंतु आधुनिक जीवनांत असे अनेक व्यवसाय आहेत कीं, ज्यांत तरबेज होण्यासाठीं इतकें साक्षेपी व विकासक्षम शिक्षण घ्यावें लागत नाहीं. यारी चालविणारा, मोटार हांकणारा, डाकवाला, वर्तमानपत्र वांटणारा होण्यासाठीं द्यावयाचें शिक्षण बौद्धिक वा नैतिक विकास घडवून आणील असें कल्पनाशक्तीला कितीहि ताण दिला तरी म्हणतां येणार नाहीं. आजच्या यंत्राधीन युगांत बहुसंख्य लोकांचे उद्योग अशा यांत्रिक स्वरूपाचें असतात. त्यासाठीं तयारीहि तांत्रिक व अल्पकालीन लागते. म्हणून व्यावसायिक व सांस्कृतिक शिक्षणाचा समन्वय घडवून आणण्याची आकांक्षा असफल राहणार यांत शंका नाहीं.

तथापि आपण कालचक्र उलटही फिरवूं शकत नाहीं. उच्च वर्गासाठीं सांस्कृतिक शिक्षण व बहुजनसमाजासाठीं कामधंद्याचें शिक्षण अशी द्विदल पद्धति आपण पुन्हां स्वीकारूं शकत नाहीं. लोकशाहीचें सूत्र असें आहे कीं सर्व तरुण लोक उत्तम कामगार व आदर्श नागरिक झाले पाहिजेत व ज्यायोगें ते असे होतील तसें शिक्षण त्यांस मिळालें पाहिजे. ' व्यवसायविन्मुख सांस्कृतिक शिक्षण ' आणि ' संस्कृतिविन्मुख व्यावसायिक शिक्षण ' यांपैकी एकाचीच निवड करण्याचें दुर्भाग्य कोणाही व्यक्तीच्या वाटयाला येऊं नये, शिक्षणाची योजना अशी असावी कीं ज्यायोगें प्रत्येक व्यक्ती कसबी कामगार व आदर्श नागरिक होईल.

हल्लीं सर्व सुधारलेल्या देशांत मुलांना आधीं पुरेसे सांस्कृतिक शिक्षण देण्यांत येते व त्यानंतर व्यवसायाचें शिक्षण दिलें जातें. प्राथमिक शिक्षण मुलांच्या ६ ते १४ वर्षांपर्यंत सक्तीचें असतें; या शिक्षणाचा हेतु मुलांना ज्ञानार्जनाची, लेखनवाचनाचीं साधनें प्राप्त करून देणें, समाजाच्या संस्कृतीची त्यांस समजूत करून देणें व नागरिक शिक्षणाचा प्रारंभ करणें, हा असतो सामाजिक जीवनाची मुलांना नीट कल्पना यावी म्हणून जीवनाला आवश्यक असे जे अन्न-वस्त्र-घर यांच्या उत्पादनाचें तीन व्यवसाय आहेत त्या व्यवसायांचे कांहीं प्रत्यक्ष काम मुलांकडून प्राथमिक शिक्षणाच्या अवधींत करून घेणें इष्ट असतें.

व्यवसायाचें शिक्षण १४ व्या वर्षीं सुरू करावें असें बहुतेक शिक्षणतज्ञ म्हणतात. याचाच अर्थ असा कीं गुणकर्म लक्षांत घेऊन १४ व्या वर्षीं

मुलांस विविध शिक्षणसंस्थांत प्रवेश द्यावा. इंग्लंडमध्यें ११ व्या वर्षीच मुलांची परीक्षा घेतात. परीक्षेत मिळालेल्या गुणानुसार मुलांना बौद्धिक, तांत्रिक वा सामान्य दुय्यम शाळांत प्रवेश मिळतो. इतक्या लवकर हा निर्णय घेणें योग्य नव्हे असे मत आतां प्रभावी होत आहे. कांही मुलांचा विकास उशीरां होतो, व अशा मुलांच्या बाबतींत हा निर्णय अन्यायाचा ठरण्याचा संभव आहे; कारण इतक्या लवकर घेतलेल्या परीक्षेंत त्यांच्या गुणांचें यथार्थ आकलन होणार नाहीं. म्हणून असा उपाय सुचवितात कीं दुय्यम शाळांतील पहिलीं दोन वर्षें होईपर्यंत मुलांची एका प्रकारच्या शाळें-तून दुसऱ्या प्रकारच्या शाळेंत बदली सहज करतां यावी. तात्त्विकदृष्टचा हा उपाय समाधानकारक वाटला तरी प्रत्यक्ष व्यवहारांत त्याचा फारसा उपयोग होत नाहीं

दुसरी एक सूचना अशी कीं सांस्कृतिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण यांच्यामध्यें दोन वर्षांचें मध्यंतर असावें. या अवधीचा उपयोग मुलांच्या उपजत शक्तींचें व गुणांचें संशोधन करण्यांत खर्च करावा. मुलांना अनेक 'प्रकारच्या व्यवसायांचे, व तत्प्रीत्यर्थ लागणाऱ्या विशिष्ट गुणांचें ज्ञान करून विविध व्यवसायात त्यांस प्रत्यक्ष काम करण्यासही सांगावें. बौद्धिक व व्याव-सायिच कसोटचा वापरून मुलांच्या गुणांचें मूल्यमापन व्हावें. शिक्षकांनीं जागरूक राहून मुलांच्या वागणुकीचें सूक्ष्म निरीक्षण करावें अशा विविध मार्गांनीं दोन वर्षांच्या अवधींत मुलांच्या क्षमतेचा योग्य अंदाज करून तद-नुरूप व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थेंत त्यांस पाठवावें.

या व्यावसायिक शिक्षणाचा अवधी अर्थातच प्रत्येक व्यवसायाच्या गरजेप्रमाणें भिन्न असेल. संशोधनाच्या काळांत व व्यावसायिक शिक्षणाच्या काळांतही सांस्कृतिक शिक्षण चालूच राहावें. हें सांस्कृतिक शिक्षण मुलानें कुमारवयाची मर्यादा ओलांडीपर्यंत म्हणजे १९ वें वर्ष पूर्ण होईपर्यंत थांबू नये. जर एखाद्या व्यवसायाचें शिक्षण एक दोन वर्षांतच पुरे होऊन मुलगा व्यवसायांत पडला, तर त्यास आठवडयांतून कांहीं वेळ सांस्कृतिक शिक्षण देण्याची व्यवस्था करावी व ती १९ वे वर्ष पूर्ण होईपर्यंत चालावी.

व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थाचें स्वरूप कसें असावें हा प्रश्नही विचारार्ह आहे. जर व्यावसायिक शिक्षण उशीरा म्हणजे १६ व्या वर्षी

सुरू केलें तर ही समस्या विशेष बिकट होणार नाहीं. उलट व्यावसायिक शिक्षण जर अकराव्या अथवा बाराव्या वर्षीच सुरू केलें तर ज्या मुलांना बौद्धिक शाळांत न पाठवितां तांत्रिक वा सामान्य शाळांत पाठविण्यांत येईल त्यांच्या मनांत न्यूनगंड उत्पन्न होण्याचा धोका आहे. सर्व देशांत बौद्धिक शिक्षण देणाऱ्या दुय्यम शाळांची परंपरागत प्रतिष्ठा फार मोठी आहे. म्हणून मुलांस बौद्धिक शिक्षण गुणकर्मविभागानें नाकारलें तरी त्या मुलांस व त्यांच्या पालकांस कमीपणाचें शल्य सलत राहील.

म्हणून सर्व प्रकारचें दुय्यम शिक्षण बहुशाखी शाळांतून द्यावयाची कल्पना निघाली आहे. सर्व सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम सर्व शाखांच्या मुलांचे एकत्र व्हावेत, फक्त अभ्यासापुरतें वेगळेपण त्यांच्यांत असावें असें या योजनेचें स्वरूप आहे. असें केलें असतां मुलांत उच्चनीचपणाची भावना निर्माण होणार नाहीं, असें या सूचनेच्या समर्थकांस वाटतें. विरोधकांचें म्हणणें असें आहे कीं अशा प्रकारच्या शाळांचें नियंत्रण करणें मुलांच्या संवृत्त्याधिक्यामुळें कठिण होईल; व त्यांत विशिष्ट व्यवसायांच्या शिक्षणासाठीं आवश्यक असलेले अनुकूल वातावरण निर्माण होणार नाही. शिवाय अशा कृत्रिम उपायांनीं मुलांच्या गुणांमधील कमीअधिकपणा झाकतां येईल ही समजूत हास्यास्पद आहे. मुलें बौद्धिक श्रेष्ठता चटकन ओळखतात व तीबद्दल त्यांना आदर वाटतो, पण त्यामुळें त्यांना वैषम्य वाटत नाहीं. मुलांत न्यूनगंड निर्माण होईल या काल्पनिक भीतीसाठीं बहुशाखी शाळांची निर्मिति करण्याचें कारण नाहीं.

दुय्यम शाळा बहुशाखी असाव्यात कीं एकशाखी असाव्यात हा प्रश्न प्रयोगानें व अनुभवानेंच सोडवला पाहिजे. घाईनें एकतर्फी निर्णय घेणें अविचाराचें होईल. व्यावसायिक शिक्षणाची एकंदर योजनाच बहुविध समस्यांनीं भरलेली आहे. सर्वांना समाधानकारक व्यवसाय मिळण्यावर लोकांचें सुख व देशाची प्रगति अवलंबून आहे. गुणानुरूप शिक्षण घेण्याचा समंजसपणा जनतेंत निर्माण झाला तरच लोकशाही परंपरा व कर्यक्षम अर्थविधान यांचा समन्वय होऊं शकेल.

****

१५ :

# नागरिकत्वाचें शिक्षण

****************************

## गरज

लोकशाही शासनपद्धति अस्तित्वांत आली कीं नागरिकत्वाच्या शिक्षणाची गरज उत्पन्न होते. लोकशाही यशस्वी होणें हें नागरिकांच्या गुणवत्तेवर अवलंबून असतें. हक्क व जबाबदाऱ्या यांमधील अन्योन्याश्रय नागरिकांच्या लक्षांत आला पाहिजे. माणसाची स्वाभाविक प्रवृत्ति हक्कासाठीं भांडून कर्तव्याकडे दुर्लक्ष करण्याची असते. अशा तऱ्हेच्या वागणुकीमुळें लोकशाही शासनाची कार्यक्षमता कमी होत जाते. व मग नागरिकत्वाच्या शिक्षणाची आवश्यकता अधिकच तीव्रपणें भासूं लागते. लोकशाही टिकून राहावी असे वाटत असेल तर लोकांना हक्काविषयीं जितकी तळमळ वाटते तितकीच कर्तव्याविषयीं वाटावी अशी शिकवणूक शाळांमधून मिळाली पाहिजे.

मतदानाचा हक्क सर्व प्रौढांस मिळाल्यापासून नागरिकत्वाच्या शिक्षणाची गरज अधिकच जाणवूं लागली आहे. मतदानाचा हक्क कसा वापरावा याविषयीं मार्गदर्शन प्रत्येक प्रौढ व्यक्तीस मिळालें नाहीं, तर त्या हक्काचा दुरुपयोग होईल आणि अयोग्य व्यक्तींच्या हातीं शासनाधिकार जाईल, ही आपत्ती टाळण्यासाठीं आपणाला मिळालेला शासक निवडण्याचा अधिकार नीट वापरण्याचें शिक्षण सर्व जनतेला मिळालें पाहिजे.

या शिक्षणाची निकड वाटण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं अलीकडे हकुमशाही शासनपद्धतीविषयीं लोकांस आत्मीयता वाटूं लागली आहे. पहिल्या जागतिक महायुद्धाच्या शेवटापर्यंत म्हणजे इ. स. १९२० पर्यंत लोकशाही शासनपद्धति हीच सर्वश्रेष्ठ शासनपद्धति होय, असें सर्व

विचारवंतांस वाटत असे. पण रशियांत बोल्शेव्हिझम्‌चा, इटलींत फॅसिझम्‌चा व जर्मनींत नात्सीझम्‌चा उद्‌भव झाल्यापासून लोकशाही विषयींची ही श्रद्धा चळूं लागली आहे. लोकशाही शासनसंस्था दुर्बळ व कर्तृत्वशून्य असते असें मत पसरत आहे. मुसोलिनी व हिटलर यांस आरंभीं जे आश्चर्यकारक विजय मिळाले त्यामुळें या मनास दृढता आली. या दोन्ही हुकूमशहांचा पराभव व नाश झाला असला तरी लोकशाहीच्या दुर्बलतेविषयींचा संशय नष्ट झाला नाहीं. पुष्कळ लोकांस स्वयंशासनापेक्षां उपकारक शासन अधिक श्रेयस्कर वाटतें. शहाणे लोक सत्ताधारी झाले तर त्यांच्या हुकमतीखालीं राहून सुखी जीवन जगण्यास असे लोक तयार आहेत. ही वृत्ति लोकशाहीच्या मुळावर घाला घालणारी आहे. कारण लोकशाहीचें आद्यतत्त्व असें आहे कीं हुकूमशाही सुराज्यापेक्षां स्वयंशासित कुराज्य पत्करलें. हुकुमशाहीला अनुकूल असणाऱ्या मनःप्रवृत्तीचा बीमोड करण्याचें एकच साधन म्हणजे शिक्षण होय.

शिवाय अलीकडे शासनसंस्थेच्या कार्याचा व्याप सतत वाढत चालला आहे. पन्नास वर्षांपूर्वीं शासनसंस्थेचीं कार्यें फक्त दोन होतीं. एक अन्तर्गत शांतता व सुव्यवस्था राखणें, व दुसरें परचक्र येणार नाहीं अशी खबरदारी घेणें व आल्यास त्याचा प्रतिकार करणें. परंतु गेल्या अर्धशतकांत अधिकाधिक कामें अंगावर घेऊन शासनसंस्थेनें नागरिकाच्या संपूर्ण जीवनावरच जणूं काय कबजा मिळविला आहे. शिक्षण, आरोग्य, दळणवळण आणि उद्योगधंदे यावर सरकारचें नियंत्रण आज आहे. नजीकच्या भविष्यकाळांत अशी स्थिति उद्‌भवण्याचा संभव आहे कीं आपण सकाळीं सरकारी पानगृहांत चहा पिऊं, दुपारीं सरकारीं कचेरींत काम करूं आणि संध्याकाळीं सरकारी विश्रामालयांत करमणुकीसाठीं जाऊं. शासनसंस्थेच्या या सर्व व्यापी कारभारामुळें नागरिकांनीं जागरूक राहणें अत्यंत आवश्यक झालें आहे. कारण सरकारी कामाची व्याप्ति वाढली कीं कर्मचाऱ्यांची संख्या वाढते आणि सरकारी कर्मचारी नेहमी आपण लोकसेवक आहोत हें विसरून लोकांवर हुकमत गाजवूं पाहतात. म्हणून जागरुकत्वाचें शिक्षण लोकांस मिळालें पाहिजे. आपली सुखसोय पाहण्याच्या मिषानें आपली अस्मिता हिरावून घेतली जात नाहींना याविषयीं नागरिकांनीं अहर्निश सावध राहिलें पाहिजे.

उद्दिष्टें

नागरिकत्वाच्या शिक्षणाचा आद्य हेतु लोकशाही ध्येयाविषयीं श्रद्धा निर्माण करणें हा आहे. व्यक्तिमात्राची प्रतिष्ठा राखणें हें या ध्येयांतील मूलभूत तत्त्व आहे. प्रत्येक व्यक्ती सामाजिक जीवनाच्या संपदेंत मोलाची भर घालूं शकते, व म्हणून समाजाला हितकर असें प्रतिष्ठित जीवन कंठणें प्रत्येक व्यक्तीचें कर्तव्य होय असा या तत्त्वाचा भावार्थ आहे. यांतूनच स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तीन सूत्रांचा उद्भव झाला. समाजाची सेवा करतां यावी म्हणून व्यक्तीला स्वतंत्रपणें विचार करण्याचें व विचार व्यक्त करण्याचें स्वातंत्र्य हवें. स्वतःच्या मतांच्या प्रसारासाठीं संघ निर्माण करण्याचा हक्क यांत अध्याहृत आहे. लोकशाही ध्येयांत समाविष्ट केलेली समता ही गुणांची समता नसून, स्वतःच्या गुणवत्तेचा संपूर्ण उपयोग करून घेण्याच्या संधीची समता होय. दारिद्र्य व खेडेगांवांतील वस्ती अशा आकस्मिक कारणांनीं गुणांचा विकास खुंटता कामा नये. देशाची खरी संपत्ती म्हणजे देशांतील गुणी लोक होत. आणि समाजानें या गुणी लोकांना आपल्या गुणांचा यावच्छक्य विकास करण्याची संधी दिली पाहिजे. असें केलें तरच त्या व्यक्तीचें व समाजाचें जास्तींत जास्त हित होईल. समता याचा आणखी एक अर्थ कायद्याच्या दृष्टीनें समता म्हणजेच कोणत्याही प्रकारच्या विशेष हक्कांचा अभाव हा होतो. कोणतीही व्यक्ती कायद्याच्या कक्षेबाहेर असूं नये, प्रत्येक व्यक्ती आपल्या कृतीबद्दल जबाबदार राहावी, आणि कायद्यानें कोणत्याही व्यक्तीला विशेष सवलत देऊं नये. न्यायमंदिरांत वैभव वा दर्जा यांच्या जोरावर कोणासही विशेष सवलत मिळूं नये.

बंधुत्वाचें तत्त्व हें समतेच्याच तत्त्वाचें अन्य स्वरूप आहे. या तत्त्वाप्रमाणें सहकार प्रशंसनीय असून स्पर्धा अधिक्षेपार्ह होय. जगांतील सर्व मानव हे बांधव आहेत. माणसामाणसांत शत्रुत्व मानणें हा अज्ञानाचा, कोतेपणाचा वा दूषित दृष्टीचा परिणाम होय. जाती व वंश यांच्या हितसंबधांत अपरिहार्य विरोध नाहीं, परस्पर सहकार्यानें सर्वोदय साधतां येतो. जे लोक शारीरिक वा मानसिक व्याधीनें पीडित असतील तेच फक्त दुस-

ऱ्यांच्या नाशानें स्वतःचें हित साधूं पाहतात, आणि अशा वागणुकीनें परिणामीं त्यांचें स्वतःचेंच अहित होतें.

लोकशाहीचें दुसरें सूत्र असें आहे कीं शासनाचा हेतु जास्तींत जास्त लोकांचें हित साधण्याचा असावा, म्हणजेच सर्वोदय हें लोकशाहीचें उद्दिष्ट होय. याहून कमी व्याप्तीचीं उद्दिष्टें या सर्वंकष हेतूशी सुसंवादी असतील तरच ग्राह्य मानावीं. विशिष्ट समाजाचें राहणीचें मान सुधारणें, औद्योगीकरण करणें, दळणवळणाचीं साधनें वाढविणें हे सर्व साक्षेप प्रशंसनीय आहेत. पण त्यांची साधना जागतिक हिताला बाध न आणतां केली पाहिजे. त्यांच्या साधनानें आंतरराष्ट्रीय स्पर्धा व संघर्ष उद्‌भवूं देऊं नयेत. एवढा विवेक सांभाळून सरकारनें शासितांचें अधिकाधिक हित साधीत राहिलें पाहिजे. आणि प्रजेनेही सरकार अशा रीतीनें लोकहित साधीत राहील अशी दक्षता ठेवली पाहिजे.

तिसऱ्या सूत्रांत सर्वोदयाच्या साधनाचा मार्ग सांगितला आहे. जबरदस्ती व अत्याचार हे मार्ग निषिद्ध गणले आहेत. कारण ते बंधुत्वाच्या तत्त्वाशीं विसंगत आहेत. सुधारणा घडवून आणलीच पाहिजे, पण ती घडवितांना कायदा व सुव्यवस्था यांचा भंग होऊं नये. कारण कायदा व सुव्यवस्था समाजजीवनाला पायाभूत आहेत. चर्चा व मतपरिवर्तन हीं लोकशाहीचीं शस्त्रें होत. त्यांचें कार्य मंद गतीनें होत असेल, पण जें होतें तें टिकाऊ असतें. जबरदस्तीनें घडवून आणलेले बदल तत्त्वतः सदोष असतात, व ते अत्याचारी प्रतिक्रियेला जन्म देतात. सुसंमत तर्कवादानें घडवून आणलेल्या सुधारणेचा प्रभाव स्थिर व टिकाऊ असतो. लोकशाहीचें उद्दिष्ट जबाबदार व्यक्तीमध्यें सहकार्य घडवून आणावयाचें असतें; अर्थातच जुलूम व दडपशाही या गोष्टी लोकशाहीला अपथ्यकारक होत.

नागरिकत्वाच्या शिक्षणाचा आणखी एक हेतु लोकशाही उपायांनीं झालेल्या प्रगतीविषयीं अभिमान उत्पन्न करण्याचा असतो. आपण स्वावलंबन व सहकार्य यांचा अवलंब करण्यास शिकावें. कोणाच्या उपकारानें अथवा कायद्याच्या दडपणानें झालेलें कार्य हीन होय. ग्रामीण भागांत राहणारे लोक कोणाच्या मदतीवांचून स्वतःच्या श्रमानें रस्ते व बंधारे तयार करतील तर ते अधिक आदर्श नागरिक होतील. केवळ तांत्रिक सल्ल्या-

पुरतें साहाय्य घ्यावयास हरकत नाहीं. अशा आत्मोद्धारानें आत्मविश्वास व जबाबदारीची जाणीव दोन्हीं वाढतात. याबाबत डेन्मार्कमधील शेतकऱ्यांचें उदाहरण अनुकरणीय आहे. इतर देशांतील धान्याची मागणी कमी झाल्यामुळें या शेतकऱ्यांवर आपत्ती ओढवली होती. पण सहकार्य व स्वावलंबन यांच्या जोरावर त्यांनीं धान्याचें उत्पादन बंद करून दुधदूभत्याचें उत्पादन सुरू केलें, व आपली सांपत्तिक भरभराट घडवून आणली. यामुळेंच डेनमार्कमधील शेतकरी हे लोकशाहीचे कट्टे पुरस्कर्ते आहेत.

कोणत्याही परिस्थितींत लोकशाहीला चिकटून राहण्याचा निर्धार उत्पन्न करणें हा नागरिकत्वाच्या शिक्षणाचा आणखी एक हेतू आहे. स्वराज्य हें केव्हांही सुराज्यापेक्षां इष्टतर गणावें. स्वत:वर नियंत्रण ठेवण्याची शक्ती हळू हळू विकसित होत जाते. व या विकसनाच्या काळांत पुष्कळ चुका होण्याचा संभव असतो. हा अनुभव जसा व्यक्तींच्या तसाच राष्ट्रांच्या शासनांतही येतो. उलटपक्षीं हुकूमशाही मार्गांचा अवलंब केला तर लगेच दिखाऊ कार्यक्षमता प्रत्ययास येते; पण ती टिकणारी नसते. दीर्घकालावधी विचारांत घेतला तर स्वराज्यानेंच इष्ट व शाश्वत हित साधतां येते; कितीहि चांगलें राज्य असलें तरी ते स्वराज्याहून तुच्छ होय. आणि चुका वा आपत्ति यामुळें आपण स्वराज्याच्या ध्येयापासून ढळतां कामा नये, ही श्रद्धा मुलांच्या मनांत दृढमूल झाली पाहिजे. यादवीच्या ऐन भरांत लिंकननें अध्यक्षाची निवडणूक झालीच पाहिजे असा आग्रह धरला. उलटपक्षीं कोणत्याही थातुर मातुर कारणासाठीं निवडणूका पुढें ढकलण्याचा सल्ला देणारे पुढारी आढळतात. सत्ताधारी पुढाऱ्यांची ही कृति म्हणजे जनमताचा कौल घेण्यांत वाटणाऱ्या भीतीचा कबुलीजवाबच होय. पण निवडणूक हीच सत्तेचें उगमस्थान असल्यामुळें ती केव्हांही कोणत्याही सबबीवर पुढें टाकणें गैर होय. लोकशाहीचा आधार जी निवडणूक तीच डावलण्यापेक्षां कोणताही धोका पतकरणें श्रेयस्कर होय.

वरील उद्दिष्टें साध्य व्हावीत म्हणून मुलांच्या अंगीं आदर्श नागरिकाचे गुण विकसित करण्याचा प्रयत्न करावा. यापैकीं पहिला गुण सामाजिक जबाबदारीची जाणीव हा होय. आपलें स्वत:चें काम नीटपणें करणें हें या गुणाचें दृश्य फल होय. दुसरा गुण सत्याची व स्वातंत्र्याची आवड हा आहे.

सत्य जरी स्वतःच्या हिताच्या आड आलें तरी त्यास न सोडण्याचा निर्धार दाखविल्यास सत्यप्रीति प्रतीत होते; तसेंच सार्वजनिक व खाजगी बाबतींत स्वतःच्या नियंत्रणाखालीं असणाऱ्यांना स्वातंत्र्य उपभोगूं दिल्यास स्वातंत्र्याची आवड सिद्ध होते. आधुनिक जगांतील राजकीय, आर्थिक व सामाजिक वस्तुस्थितीचें साधारण ज्ञान असणें नागरिकांस आवश्यक असते. तसेंच दैनंदिन व्यवहारांविषयीं पूर्वग्रहरहित दृष्टीनें विचार करण्याची कुवतही नागरिकांस हवी. मनुष्य स्वभावाचें योग्य मूल्यमापन करण्याची कला नागरिकांस पाहिजे. कारण तीवांचून तो आपला मतदानाचा हक्क योग्य रीतीनें वापरूं शकणार नाहीं. नागरिकांच्या अंगीं जरूर असलेला शेवटला गुण म्हणजे वरिष्ठांशीं व कनिष्ठांशी योग्य रीतीनें वर्तन करण्याचें कसब होय. लोकशाहीत वरिष्ठाचा कनिष्ठ व कनिष्ठाचा वरिष्ठ होणें सहज शक्य असतें. आणि वरिष्ठ पद मिळाल्यास त्या पदामुळें अधिकार गाजविण्याची संधी मिळाली असें न मानतां अधिक मोलाची समाजसेवा करण्याची संधी मिळाली असेंच मानलें पाहिजे. वरिष्ठांचा उन्मत्तपणा आणि कनिष्ठांची अजीजी या गोष्टींना खऱ्या लोकशाहींत स्थान नसावें.

### साधनें

नागरिकत्वाचें शिक्षण देण्याचा प्रशंसनीय हेतू तडीस नेण्यासाठीं शाळांना काय करतां येईल याचा आतां विचार करूं. या बाबतींत शाळांना पुष्कळच काम करतां येण्यासारखें आहे असे सर्वांनाच वाटतें. मात्र शाळेनें कोणतें साधन या शिक्षणासाठीं वापरावें याबाबत मतभेद आहे. कांहीं शिक्षणतज्ञांच्या मतें नागरिकत्वाचें शिक्षण अप्रत्यक्ष साधनांनींच नीट होऊं शकतें. उलट इतर शिक्षणतज्ञ असें म्हणतात कीं, शासन पद्धतीची माहिती प्रत्यक्ष कथनावांचून देतां येणार नाहीं. तात्पर्य हें कीं शाळांनीं दोन्हीं साधनांचा उपयोग करावा. नागरिकत्वाचे गुण मुलांच्या अंगीं बाणण्यासाठीं अप्रत्यक्ष पद्धतीच उपकारक ठरेल. उलट भारताच्या राज्यघटनेची माहिती देण्यासाठीं प्रत्यक्ष पद्धतीचा अवलंब करावा लागेल.

### अप्रत्यक्ष साधनें

शाळेमध्यें हळू हळू मुलांचें स्वराज्य स्थापन करणें हें नागरिकत्वाच्या शिक्षणाचें सर्वांत महत्त्वाचें अप्रत्यक्ष साधन होय. जसजशीं मुलें मोठी होत

जातील तसतसा त्यांस स्वयंशासनाचा अधिकाधिक अधिकार द्यावा, म्हणजे त्यास असें वाटेल कीं शाळा हें आपण चालविलेलें राज्य असून त्याच्या उत्कर्षाबद्दल आपणच जबाबदार आहोंत. शिस्तभंगावर उपाय मुलांनीं अथवा त्याच्या प्रतिनिधींनेच करावा. अध्ययनातील प्रगतीबद्दल सुद्धां आपण स्वत:च जबाबदार आहोंत असें मुलांस वाटलें पाहिजे. मुलांची अशी केव्हांही समजूत होऊं देऊं नये कीं शाळेचें किंवा गुरुजनांचें हित त्यांनीं अभ्यास करण्यावर अवलंबून आहे. शाळा म्हणजे अध्ययनाची संधी उपलब्ध करून देणारा विशिष्ट परिसर होय. पण या संधीचा उपयोग करून घेण्याची जबाबदारी बालकांची आहे. त्यांनीं योग्य उपयोग केला नाहीं तर त्यांचेंच अहित होईल, गुरुजनांचें नाहीं अशी स्पष्ट कल्पना मुलांस दिली पाहिजे

तसेंच शाळेंतील कामाला सहकार्याचें अधिष्ठान देणें अगत्याचें आहे. आदर्श नागरिक हा समाजहितासाठीं खुशीनें सहकार्य करण्यास तयार असतो. दुर्दैवानें शाळांची परंपरा सहकारविरोधी व स्पर्धेला प्रोत्साहन देणारी असते. निबंधलेखन करताना किंवा उदाहरणें सोडवतांना मुलांनी एकमेकां साहाय्य करूं नये असे गुरुजी सांगतात. ही वृत्ति आत्यंतिक स्वार्थी-पणाला उत्तेजन देणारी व म्हणून निषेधार्ह गणली पाहिजे. शाळेतील कामांत साधिक कार्याला प्राधान्य मिळावें व वैयक्तिक कार्याला गौणत्व मिळावें. आदर्श कुटुंबांत मुलाच्या प्रगतीला सर्व कुटुंबीयांनीं हातभार लावला पाहिजे असें मानतात. शाळेंतही प्रत्येक बालकाच्या प्रगतीला इतर बालकांसह शाळेच्या सर्व घटकांनीं साहाय्यभूत व्हावें.

नागरिकत्वाच्या शिक्षणांत बहि:शाल कार्यक्रमांना विशेष स्थान आहे. मैदानी खेळ, वाङमय–मंडळें, नाट्य व संगीत यांचें संघ, या सर्वांत काम करतांना मुलांना सेवावृत्तीचें व जबाबदारीचें शिक्षण मिळतें. मात्र शाळेच्या अधिकाऱ्यांनी या कार्यक्रमाच्या नियोजनात व संचालनांत मुलांना पूर्ण-स्वातंत्र्य दिलें पाहिजे. बहि:शाल कार्यक्रमांत शिक्षकांची हुकूमशाही नसावी. अरेरावी अथवा फाजील उत्साही शिक्षकाकडे बहि:शाल कार्यक्रमाचें सूत्र-धारित्व असल्यास मुलांच्या उपक्रमशीलतेला वाव राहात नाही, आणि हौशी कार्यक्रमाना सक्तीच्या कामाचें स्वरूप येतें. थोडीशी अव्यवस्था झाली तरी ती पतकरून मुलाना चुका करीत करीत स्वराज्यास पात्र होण्याची संधी दिली पाहिजे.

शालेय विषयांच्या अध्ययनांतूनसुद्धां मुलांना नागरिकत्वाचें शिक्षण अप्रत्यक्षपणें मिळूं शकतें. इतिहास शिकवितांना इंग्लंड व फ्रान्स यांच्या लोकसभांच्या कार्यपद्धतींची तुलना करून लोकशाही यशस्वी होण्यासाठीं तडजोडीची वृत्ति आवश्यक असते हें सुचवितां येईल. भूगोल शिकवितांना डेनमार्कमधील शेतकऱ्यांच्या सहकारानें साधलेल्या उत्कर्षाचें चित्र मुलांपुढें मांडता येईल. शास्त्राच्या अध्ययनांत लुई पाश्चर व मेरी क्यूरी यांसारख्या शास्त्रज्ञांनीं स्वार्थनिरपेक्ष बुद्धीनें सर्व मानव जातीचें कल्याण साधण्याचा प्रयत्न कसा केला याचें दिग्दर्शन करतां येईल. सर्व विषयांतील आदर्श नागरिकत्वास पोषक अशा भागांवर भर दिला असता मुलांस नागरिकत्वाचें शिक्षण आकर्षकपणें मिळेल.

**प्रत्यक्ष साधनें**

दहावी अकरावीच्या वर्गांत प्रचलित प्रश्नांवर चर्चा करणें हें नागरिकत्वाच्या शिक्षणाचें उत्कृष्ठ प्रत्यक्ष साधन आहे. शाळांनीं प्रचलित राजकारणापासून अलिप्त राहावें हा पुराण समज आपण सोडून दिला पाहिजे. या वृत्तीमुळेच शाळा म्हणजे निर्जीव पुस्तकी विद्या देणाऱ्या जागा असा गैरसमजूत निर्माण झाला. दारूबंदी, शिधावाटप, सक्तीचें लष्करी शिक्षण, उद्योगधंद्यांचें राष्ट्रीयीकरण, यांसारख्या प्रश्नाच्या दोन्ही बाजू मुलानीं तपासून पाहिल्या पाहिजेत. बर्लिनचा प्रश्न, अल्जीरियांतील यादवी, दक्षिण आफ्रिकेंतील वसाहतशाही यांसारख्या प्रश्नांचेंसुद्धां त्यांस वावडें नसावें. शिक्षक निःपक्षपाती राहून प्रत्येक प्रश्नाचें सर्वांगीण विवेचन करावयास मुलांस उत्तेजन देईल तर मुलांस विवाद्य प्रश्नांचा समतोल विचार कसा करावा याचें शिक्षण मिळेल.

दुसरा मार्ग म्हणजे मुलांस स्थानिक स्वराज्य संस्था व विधिमंडळें यांच्या कामकाजाचें प्रत्यक्ष निरीक्षण करण्याची संधी द्यावी. पंचायती, नगरपालिका, लोकल बोर्ड इत्यादी संस्थांचें काम कसें चालतें हें मुलांस कळलें पाहिजे. हा कार्यक्रम उपकारक होण्यासाठीं थोडीशी योजकता लागेल. मुलांना समजेल अशा प्रश्नांची चर्चा जेव्हां अशा स्वराज्य संस्थांतून चालू असेल तेव्हांच मुलांस त्यांचें कामकाज पाहण्यासाठीं न्यावें. आवश्यक तें पूर्वज्ञान मुलांस द्यावें. भेट दिल्यानंतर वर्गांत भेटीची चर्चा व्हावी. अशी कार्य-

पद्धति अवलंबिल्यास मुलांना लोकशाहीचें काम कसें चालतें याविषयीं खरी-खुरी दृष्टि लाभेल.

प्रचारापासून सावध राहण्यास मुलांस शिकविणें हेंही शाळेचें कर्तव्य होय. विशिष्ट घटनेची माहिती देणारीं विरोधी पक्षांचीं वर्तमानपत्रें वाचावयास द्यावी. प्रत्येक पक्ष स्वतःच्या हितासाठीं विशिष्ट घटनेचें विपर्यस्त वर्णन कसें देतो हें मुलांस समजलें म्हणजे 'छापलेलें तें सर्व खरें' असें मानण्याचा प्रमाद मुलें करणार नाहींत. व्यवहारांतील उदाहरणें घेऊन एखादें मत ठासून व वारंवार सांगितलें तरी तें खरेंच असेल असें नाहीं. हें मुलांच्या निदर्शनास आणावें. असें वळण लावलें असतां कोणताही विचार ग्रहण करण्यापूर्वी मुलें तद्विषयक साधक बाधक प्रमाणें लक्षांत घ्यावयास व नंतरच त्याविषयीं आपलें मत ठरविण्यास शिकतील. सर्व प्रौढांस मतदानाचा हक्क मिळाला असल्यामुळें समतोल विचार करण्यास शिकविणें हा नागरिकत्वाच्या शिक्षणाचा अत्यंत महत्त्वाचा भाग झाला आहे.

आदर्श नागरिकत्वाचीं ध्येयें मुलांच्या मनांत रुजविण्यासाठीं देशांतील व जगांतील आदर्श विभूतींच्या संवत्सऱ्या साजऱ्या कराव्या. सॉक्रेटिस, बुद्ध, ख्रिस्त, अशोक, मार्कस ऑरेलिअस, महंमद, लिंकन, पाश्चर, मेरी क्यूरी, आइनस्टेन, महात्मा गांधी, इत्यादी व्यक्तींच्या चरित्रांतून अविस्मरणीय आदेश मिळतो. त्यांच्या चरित्राविषयीं माहिती मिळविणें व तत्संबंधीं चर्चा करणें हें सांस्कृतिक शिक्षणच होय. अशा विभूतींच्या थोर कृतींचा व उदात्त विचारांचा संदेश तरुण पिढीला पोचविणें हें देशोन्नतिकारक व मानवहित-वर्धक कार्यच गणावें.

मुलांना शासनपद्धतीची सविस्तर माहिती देणें हा नागरिकत्वाच्या शिक्षणाचा उपेक्षणीय भाग नव्हे. आपल्या घटनेचीं वैशिष्ट्यें मुलांना समजावीत. केंद्रसरकार व राज्यसरकार यांचीं घटना व कार्यें मुलांस अवगत व्हावीत. तसेंच स्थानिक स्वराज्य संस्थाची रचना व त्यांचें कार्य याचेंही ज्ञान विद्यार्थ्यांस मिळावें. घटनेच्या व शासनपद्धतीच्या अभ्यासांतून मुलांना नागरिक या नात्यानें आपणांस असलेल्या हक्कांचें व आपणांवर पडणाऱ्या कर्तव्याचें समुचित ज्ञान व्हावें. व लोकांच्या हितासाठीं लोकप्रतिनिधींच्या हातीं जाणारी सत्ता योग्य व्यक्तींना मिळेल व योग्य रीतीनें तिचा वापर होईल याविषयीं जागरूक राहण्याची दीक्षा त्यांना मिळावी.

****

## १६ :

# सांस्कृतिक शिक्षण

******************************

सांस्कृतिक हा शब्द इंग्रजी 'लिबरल' या शब्दाचा पर्याय म्हणून योजला आहे. ' लिबरल ' शब्दाचा मूळ अर्थ ' स्वतंत्र ' असा आहे अर्थात सांस्कृतिक शिक्षण म्हणजे स्वतंत्र लोकांचे शिक्षण होय.ही कल्पना ग्रीस देशांत प्राचीन काळी उद्‌भवली. त्याकाळीं ग्रीक समाजाचे दोन वर्ग. होते; एक स्वतंत्र, राज्यकर्त्यांचा वर्ग व दुसरा गुलाम, कष्ट करणारांचा वर्ग शिक्षणाची तरतूद फक्त स्वतंत्र वर्गांतील मुलांसाठींच होती. या लोकांना फुरसद भरपूर असे व त्या फुरसदीचा उपयोग ते ललितकलांच्या व्यासंगांत व ललित कलाकृतीच्या रसग्रहणांत करीत. म्हणून या वर्गाचें शिक्षण व्यवसाय पराङमुख होतें. त्याचा हेतु बुद्धीचा व अभिरूचीचा उत्कर्ष घडवून आणणें हा होता. या वर्गांतील लोकांना उपजिविकेची चिंता नव्हती; नैतिक व बौद्धिक सद्‌गुणांच्या अनुष्ठानांत काळ घालविणें एवढेच त्यांचें जिवित-कर्तव्य होतें. अशा स्वरूपाचें जीवन कंठण्यास तरुण पिढी समर्थ व्हावी अशा पद्धतीचें शिक्षण दिलें जाई. शिक्षण संपविलेल्या स्नातकाला केवळ शारीरिक सुखाविषयीं आणि दुर्गुणाविषयीं तिटकारा वाटावा आणि अत्यंत उदात्त तत्त्वांसाठीच जगण्यांत त्याला गोडी वाटावी; किंबहुना याहुन अन्य तऱ्हेचें जीवन त्यास असुखकारक वाटावे, असें या शिक्षणाचें उद्दिष्ट होतें. प्राध्यापक बुचर यांनीं म्हटलें आहे " ग्रीस देशांतच प्रथम शिक्षणाच्या द्वारा पुढील

उद्दिष्टें साधण्याचा प्रयत्न करण्यांत आलें. आदर्श सामाजिक जीवन जगण्याची पात्रता आणणें; ऐहिक उत्कर्ष साधण्याची शक्ती निर्माण करणें. प्रत्येक उपजत गुणाचा मग तो शारीरिक असो वा मानसिक असो, पूर्ण विकास घडविणें, पूर्णत्वाच्या साधनासाठीं झटत राहण्याची आकांक्षा निर्माण करणें; आणि असाध्य ध्येयाच्या साधनासाठीं चाललेल्या या धडपडींतच दिव्यत्वाचा साक्षात्कार घडविणें."

मध्ययुगांत युरोपमध्यें राजकर्त्या वर्गाच्या शिक्षणाला 'सांस्कृतिक शिक्षण म्हणत. या वर्गाची मुलें सुसंस्कार करणारे तीन विषय जे व्याकरण, साहित्यशास्त्र व तर्कशास्त्र त्यांचा अभ्यास करीत. याशिवाय गणित, भूगोल ज्योतिषशास्त्र व संगीत या विषयांचाहि त्यांच्या अभ्यासक्रमांत समावेश होई. हें सप्तविद्यांचें शिक्षण म्हणजे वस्तुतः व्यावसायिक शिक्षणच होतें; कारण या विषयांच्या अध्ययनानें राजकारण व धर्मकारण यांत व्यवसाय मिळूं शके परंतु या विषयाच्या अभ्यासानें बौद्धिक, नैतिक व अध्यात्मिक विकास होतो असाही समज होता. संपन्न व सत्ताधीश वर्गाचें हें शिक्षण असल्यामुळें त्यास समाजांत फार प्रतिष्ठा लाभली व दुय्यम शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची ही दिशा अनेक शतकें कायम राहिली.

विद्येच्या पुनरुज्जीवनानंतर युरोपांत शिक्षणावर मानववादाचा प्रभाव पडला. या प्रभावामुळें सांस्कृतिक शिक्षणाचें स्वरूप असें झालें. ( १ ) ग्रीक व लॅटिन भाषांतील अभिजात वाङमयाचा अभ्यास करणें, व ( २ ) त्या अभ्यासाच्या द्वारा पुढील शक्ती साध्य करून घेणें ( अ ) सौन्दर्याची अभिरुचि, ( आ ) जीवनांतील सुखांचें रसग्रहण, ( इ ) आत्मनिरीक्षण, ( ई ) स्वतःच्या बौद्धिक व भावनात्मक अनुभवांचे विश्लेषण.

कालांतरानें हें स्वरूप बदललें. आणि ग्रीक व लॅटिन या प्राचीन भाषांचा अभ्यास केवळ व्याकरणदृष्ट्या करणें, असें रुक्ष परिवर्तन सांस्कृतिक शिक्षणाचें झालें. यामुळें या शिक्षणाची प्रतिष्ठा कमी झाली. व जीवनापासून दूर राहणारी निरुपयोगी शुष्क पुस्तकी विद्या देणारें शिक्षण' अशी त्याची कुचेष्टा होऊं लागली.

या ऐतिहासिक सिंहावलोकनावरून सांस्कृतिक शिक्षणाचे विशेष स्पष्ट होतात. हें शिक्षण व्यवसायविन्मुख असतें, उदरंभरण करण्याची शक्ती मिळ-

चून देणें हा त्याचा हेतु नसतो. मानवजातीच्या सांस्कृतिक निर्मितीचा म्हणजेच वाङमयाचा व ललितकलांचा अभ्यास हें त्याचें उद्दिष्ट असतें. या अभ्यासाच्या द्वारा विद्यार्थ्यांना बौद्धिक व नैतिक मुक्तता व संयम प्राप्त करून देणें हा त्याचा हेतु असतो. या शिक्षणानें मानव तयार होतो, कामगार तयार होत नाहीं. टी. एच. हक्सले यांनी सांस्कृतिक शिक्षणाच्या उद्दिष्टांचें वर्णन एका वक्तृत्वपूर्ण परिच्छेदांत असें केलें आहे.

ते म्हणतात :—" पुढील गोष्टी सिद्ध झालेल्या दिसतील तरच त्या व्यक्तीस सांस्कृतिक शिक्षण मिळालें आहे असें मी म्हणेन. त्याचें शरीर म्हणजे त्याच्या इच्छेप्रमाणें वागणारा सेवक असावा. तो सांगेल तें काम शरीरास शक्य तितक्या सफाईनें व सुखानें करतां आलें पाहिजे. त्याची बुद्धि म्हणजे शुद्ध निर्विकल्प तर्कशास्त्राप्रमाणें चालणारें एक यंत्र असावें, या यंत्राचे सर्व भाग सारखेच शक्तिमान व वंगण घालून काम करण्यास सुसज्ज असावेत, त्याच्या हुकमाप्रमाणें वाटेल तें काम या यंत्रास ताबडतोब करतां यावें; मग तें काम सूक्ष्म शब्दच्छलाचें असो वा गहन तात्त्विक प्रमेयें सोडविण्याचें असो. त्याच्या मनांत निसर्गाच्या थोर व मौलिक तत्त्वांच्या ज्ञानाचा, व निसर्गातील घडामोड ज्या उत्सर्गानुसार होते त्यांच्या ज्ञानाचा संचय असावा. तो विरक्त संन्यासी नसावा, जीवनाचा उपभोग घेण्याचा उत्साह त्यास असावा, मात्र त्याचे विकार हे त्याच्या निश्चयशक्तीच्या व सदसद्विवेकबुद्धीच्या नियंत्रणाखाली असावेत. त्यास निसर्गातील व कलांतील सौन्दर्याची अभिरुचि असावी. सर्व प्रकारच्या दुष्टपणाचा त्यास तिटकारा असावा, व आत्मौपम्य बुद्धीनें सर्वांची प्रतिष्ठा त्यानें राखावी. "

सांस्कृतिक शिक्षणानें आदर्श माणूस तयार होऊं शकतो अशी हक्सले याची श्रद्धा आहे. सांस्कृतिक शिक्षणाविषयीची त्यांची अपेक्षा भूतलावर सफल होणें संभवनीय वाटत नाहीं. तें एक मनोराज्य आहे.

सांस्कृतिक शिक्षणाविषयीं जरा निराळे विचार आधुनिक काळांत व्यक्त झालेले दिसतात. रॉसच्या मतें सांस्कृतिक शिक्षणाचें ध्येय महत्त्वाचें व स्वीकारार्ह आहे. या शिक्षणानें माणसाला अज्ञान, पूर्वग्रह, अंधश्रद्धा यांपासून मुक्तता मिळावी, विकार व आर्थिक विपत्ती यांपासून बचाव कर-

ण्याची पात्रता यावी, व ज्या समाजांत आपण राहतों त्याचें यथार्थ ज्ञान मिळविण्याची व दुसऱ्यांना करून देण्याची शक्ती लाभावी. क्लाइव्ह बेलच्या मतें जीवनाचा हेतु जास्तीत जास्त ज्वलंत व उत्कृष्ठ अनुभव घेणें हा असून सांस्कृतिक शिक्षणाचा हेतु असे अनुभव घेण्याची पात्रता मिळवून देणें हा आहे. त्या साठीं या शिक्षणानें मानवाच्या गूढ व पेलव शक्तींचा विकास करून अनुभवासाठीं लागणारें आवश्यक ज्ञान पुरवावें.

शिक्षणाचें व्यापक स्वरूप ध्यानांत आणलें असतां त्याचीं चार उद्दिष्टें दिसून येतात : (१) आत्मज्ञान, म्हणजेच मानवाची प्रतिष्ठा जाणणें व संपादन करणें, (२) सामाजिक जबाबदारीची जाणीव, म्हणजेच सामाजिक जीवनाचे हक्क व कर्तव्यें समजून घेणें व आचरणें; (३) फुरसदीचा सदुपयोग; व (४) व्यवसाय, म्हणजेच समाजाची कांहीं उपयुक्त सेवा करून उदरनिर्वाह करणें. पहिल्या तीन उद्दिष्टांचा समावेश सांस्कृतिक शिक्षणांत होतो. माणसाला माणूस होण्यासाठीं शिक्षण दिलें पाहिजे, कामगार होण्यासाठीं नव्हे; असा या शिक्षणाच्या पुरस्कर्त्यांचा दावा आहे. हा विचार सदोष आहे, कारण माणसाला कार्यक्षम कामगार करण्याची आवश्यकता यांत अवगणली आहे. लोकशाहीचा असा आग्रह आहे कीं प्रत्येक माणूस समाजाचा आदर्श घटक तर असावाच पण तो उत्कृष्ठ कामगारही असावा, किंबहुना समाजाची कार्यक्षम सेवा करण्याची शक्ती नसेल तर मनुष्य समाजाचा आदर्श घटकही होऊं शकत नाहीं.

असें असलें तरी सांस्कृतिक शिक्षणाची कल्पना कालजमा झालेली नाहीं. दुसऱ्या एका नांवाच्या अवगुंठनाखालीं तिनें आपला प्रभाव पाडावयास आरंभ केला आहे. आज सर्वत्र सर्वसाधारण शिक्षणाची निकड आवेशानें मांडली जात आहे. व्यावसायिक शिक्षण व सांस्कृतिक शिक्षण यांमधील विरोध पुन्हां एकदां विशिष्ट शिक्षण विरुद्ध सर्वसाधारण शिक्षण या स्वरूपांत प्रगट होत आहे. सर्वसाधारण शिक्षणाचा हेतु असा सांगतात कीं त्यायोगें आपल्या काळांतील व समाजांतील साधारण जीवन जगण्याची शक्ती मुलांत यावी हा हेतु साध्य करण्यासाठीं मातृभाषेच्या अभ्यासांतून विचार समजण्याची व व्यक्त करण्याची शक्ती वाढविणें, सारासारविवेक करण्याची पात्रता उत्पन्न करणें, सौंदर्याविषयीं अभिरुचि रुजविणें, शारी-

रिक मानसिक आरोग्य राखण्यासाठीं आवश्यक असलेलें ज्ञान देणें, आणि आदर्श नागरिकत्वाचे गुण अंगीं बाणविणें, हे उपाय सांगितलेले आहेत.

मानवी जीवनाचें भौतिक समृद्धि हें एकमेव मूल्य आहे असें मानणाऱ्या पक्षाला सांस्कृतिक शिक्षणाची कल्पना युद्धाचें आव्हान देत आहे. शिक्षण हें ऐहिक उत्कर्षाचें साधन बनावें या विचाराला सांस्कृतिक शिक्षणाच्या समर्थकांचा कडवा विरोध आहे. 'आहारनिद्रामैथुन' एवढेंच मानवी जीवनाचें इतिकर्तव्य नव्हे. माणुसकीचें तृण बरें, राक्षसांचें वैभव नको, असा सांस्कृतिक शिक्षणाचा महनीय आदेश आहे.

****

१७ :

# शिक्षणाचें गृहितकृत्य-विद्यार्थी

*****************************

शिक्षणाचा हेतु जरी समाजास स्थैर्य येऊन त्याचा उत्कर्ष व्हावा हा असला तरी तो हेतु व्यक्तींचा विकास करूनच साधावयाचा असतो. शिक्षण घेणारे बालक हे स्वयंशासित वर्धमान जीव असतात हा उल्लेख वर आलाच आहे. बालकांच्या वर्तनाला त्यांच्या अन्तः प्रेरणा वळण देत असतात. शिक्षकाला त्या प्रेरणांचें ज्ञान अवश्य हवें. शिक्षणकार्यात ज्यांचें महत्त्व आहे अशा मनोविशेषांचा आतां विचार कर्तव्य आहे. या विषयाचें विवेचन व्यक्तिमत्त्वाचा विकास या प्रकरणांत अंशतः झालेंच आहे. प्रस्तुत विवेचनांत शिक्षणप्रक्रियेशीं संबद्ध असलेल्या सर्व मनोविशेषांचें समष्टिरूप पण संक्षिप्त समालोचन करावयाचें आहे.

पहिला विशेष सहजप्रवृत्ति होत. युद्ध, कुतूहल, आत्मगौरव, संपादन, निर्मिति इत्यादि प्रवृत्ति बालकामध्यें कमीअधिक प्रमाणांत प्रबल असतात. बालकाच्या प्रबल प्रवृत्तीला आत्मविकासाचें साधन बनविणें हा बालकाला शिक्षण देण्याचा इष्टतम मार्ग होय. सहजप्रवृत्तींचें उदात्तीकरण करणें हेंही शिक्षणाचें उद्दिष्ट असतें, कुमारवयांत प्रभावी होणाऱ्या कामवासनेला आत्मविकासपर व समाजहितपर वळण देण्याचें कार्यही शिक्षणांत अन्तर्भूत आहे. सहजप्रवृत्तींच्या कार्याला इष्ट वळण लावूनच शीलसंवर्धाचें कार्य शिक्षकाला साधावयाचें असतें.

दुसरा विशेष बुद्धि होय. बालक कोणत्या गतीनें शिकेल, तो कोणते विषय व किती विषय शिकूं शकेल, विशिष्ट विषयांत त्यांचा अधिगम कोणत्या अंशापर्यंत होऊं शकेल, या सर्व प्रश्नांचें उत्तर बालकाच्या उपजत बुद्धिमत्तेवर अवलंबून असतें. प्रत्येक बालकाच्या बुद्धीचें विश्वसनीय मापन

करून, तदनुरूप अभ्यासक्रमाची योजना करणें अगत्याचें आहे. शिक्षण मुलाची बुद्धि वाढवूं शकत नाहीं. पण असलेल्या बुद्धीचा पूर्ण उपयोग करण्याची शक्ति मिळवून देणें हेंही कमी महत्त्वाचें काम नाहीं. व्यवहारांत असें आढळतें कीं बहुतेक बुद्धिमान लोक आपल्या बुद्धीचा यावच्छक्य उपयोग करीत नाहींत. शिक्षणाचें एक महत्त्वाचें उद्दिष्ट कोणत्याही मुलाची बुद्धि फुकट जाऊं नये हे आहे.

तिसरा विशेष नैसर्गिक कसब होय. कांहीं मुलांना चित्रें काढण्याची, गाण्याची, मूर्ति करण्याची उपजत शक्ती असते बालकाच्या अंगीं असणाऱ्या कलांचा व लाघवांचा शोध लावणें, व त्या कलांची व लाघावांची जोपासना करणें हें शिक्षणाचें महत्त्वाचें कार्य आहे. समाजाचें संस्कृतिक जीवन कलावंताच्या विलासानें समृद्ध होतें. ज्या समाजांत कलावंतांची व त्यांच्या कलेचें रसग्रहण करणाऱ्या रसिकांची संख्या मोठी असते तो समाज प्रगतिपथावर आहे असें म्हणावयास हरकत नाहीं. कलावंताना आवश्यक तें शिक्षण व जरूर तें प्रोत्साहन देणें, व अशा रीतीने कलानिर्मितींत भर घालणें व कलाविषयीं रसिकता वाढविणें हें शिक्षणाचें उद्दिष्ट आहे.

चवथा विशेष विशिष्ट स्वभावगुण होत. उत्साह व शैथिल्य, रागीटपणा व शांतवृत्ति, चिकाटी व भ्रमरवृत्ति, उद्योगशीलता व आळस, सदयता व नैष्ठुर्य, धीटपणा व लाजाळू वृत्ति, असे परस्परविरोधी गुण माणसांत आढळून येतात. या गुणांचें मूळ आनुवंशिक असलें तरी त्या गुणांमध्यें अनुभवानें बराच फरक घडून येतो. कोणताही गुण अतिरिक्त कोटीस गेला म्हणजे दोषरूप होतो. म्हणून शिक्षणाचें उद्दिष्ट स्वभावगुणांचा समतोल राखणें हें असतें धीट मुलाच्या आगाऊपणास लगाम घालावी, व लाजाळू मुलास धीर देऊन माणसांत आणावे. इतरांस उपद्रवकारक होणाऱ्या फाजील सामाजिक वृत्तीस आळा घालावा, उलट माणूसघाणी वृत्ति बोथट करून सर्वांस मिळून मिसळून वागण्यास शिकवावें. याशिवाय आकांक्षा, चिकाटी, उद्योगशीलता, निर्भयता इत्यादि आत्मोत्कर्षास पोषक असणाऱ्या स्वभावगुणांची जोपासना करणें हेंही शिक्षणाचें कार्य होय.

अंगी थोर बुद्धिमत्ता असूनही श्रेष्ठ पदवीस न चढलेले अनेक लोक आढळतात. बुद्धीला आकांक्षा व उद्योग यांची जोड असेल तरच ती सफल

होते. वर्गांत कमी बुद्धीचा मुलगा कष्ट करून बुद्धिवान मुलाच्या वर नंबर मारूं शकतो. प्रसिद्ध इंग्रज कवि कॉलरिज याविषयीं असें सांगतात कीं त्याचे अनेक ग्रंथ केवळ संकल्परूपानें राहिले. केलेले संकल्प सिद्धिस नेण्याची कार्यतत्परता त्याच्या अंगीं नव्हती. यशाचा स्वर्ग कष्ट केल्यावांचून गांठता येत नाहीं या कटु सत्याची जितकी शिकवणूक द्यावी तेवढी थोडीच पडेल. म्हणून शिक्षणाचें एक महत्त्वाचें कार्य मुलांची आकांक्षा जागृत करणें व आकांक्षातृप्तीसाठीं चिकाटी व दीर्घोद्योग हे स्वभावगुण त्यांच्या अंगी बाणवणें हें आहे.

सारांश, शहाणा शेतकरी जसा क्षेत्राचा कस पाहून योग्य तें उत्पादन करीत असतो, तसेंच शिक्षकानें बालकाच्या स्वभावास अनुसरून अभ्यासक्रमाची आंखणी केली पाहिजे. शिक्षण हें व्यक्तिविशिष्ट असावें. ‘सब घोडे बारा टक्के’ हा नियम शिक्षणाला लागू पडत नाहीं. ज्याची जशी गरज व कुवत तशा प्रकारचें व त्या दर्जाचें शिक्षण बालकास देण्यांतच शिक्षणकार्याची सार्थकता आहे. प्रत्येक व्यक्तीला त्याच्या मगदुराप्रमाणें शिक्षण व काम मिळालें तरच तो सुखी होऊन समाजाची कार्यक्षम सेवा करील. अशा रीतीनें गुणवत्तेप्रमाणें कर्मविभाग व्हावा, व सुखी व कार्यक्षम नागरिकांच्या सहकार्यानें समाजाचा उत्कर्ष व्हावा हा शिक्षणयोजनेचा हेतु असतो. तो सिध्दीस जाण्यासाठीं विद्यार्थ्यांच्या स्वभावविशेषाप्रमाणे शिक्षणाची रूपरेषा ठरविणे अगत्याचें आहे.

****

## १८ :

# शिक्षक

*************************************

## शिक्षकाचें शिक्षणांतील स्थान

एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापासून शिक्षणविषयक तात्त्विक विवेचनाला जोराची गति मिळाली; आणि या विवेचनाचा परिणाम म्हणून शिक्षणाचें स्वरूप काय असावें याविषयींच्या कल्पनेंत क्रान्ति घडून आली. एके काळीं शिक्षण म्हणजे ज्ञानदान असें समीकरण मांडलें जाई. त्यानंतरची पायरी म्हणजे 'शीलसंवर्धन शिक्षणकार्याचें महत्त्वाचें अंग आहे' हा विचार मान्य झाला. आज शिक्षणाला राष्ट्रीय व सामाजिक उन्नतीचें साधन मानतात; आणि आदर्श व्यक्तीमत्त्व घडविणें यास शिक्षणकार्याचा गाभा समजतात. याचाच अर्थ असा कीं शिक्षणानें जीवनाच्या अनेक अंगाविषयीं शाश्वत अभिरुचि निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांच्या अंगी आपलें शिक्षण स्वतःच पुढें चालविण्याची शक्ती यावी, युक्त काय व अयुक्त काय हें ठरवूं शकणारी चोखंदळ निर्णयशक्ती विकसित व्हावी. आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव व समाजहितासाठीं सहकार्य करण्याची तत्परता निर्माण व्हावी.

शिक्षणापासूनच्या अपेक्षेंत जसा बदल झाला तसाच फरक शिक्षणकार्यातील शिक्षकाचें स्थान काय असावें या विषयींच्या कल्पनेंत झाला. शिक्षकास आतां जाणते लोक ज्ञानाचा विक्रेता अथवा विद्यार्थ्यांकडून ठराविक कामें करून घेणारा मुकादम समजत नाहींत. बालक व समाज दोहोंच्या कल्याणाची चिंता वाहणारा हितकर्ता ही शिक्षकाची आधुनिक भूमिका आहे. बालक आणि समाज यांमधील संबंध दृढ करण्याची जबाबदारी शिक्षकावर असते. बालकाच्या व्यक्तीमत्त्वाची यथातथ्य जाणीव करून घेऊन त्याचा विकास घडविणे, व त्या व्यक्तिमत्त्वाच्या चित्छक्तीला बाध न

आणतां त्याला समाजहिताची दीक्षा देणें हें शिक्षकाचें काम होय. समाज-व्यवस्था व्यक्तिहिताचें व समाजहिताचें उत्तम साधन व्हावें. म्हणून समाज-व्यवस्थेंत बदल घडवून आणण्याचाही प्रयत्न शिक्षकानें केला पाहिजे. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असून व्यक्तीचें हित व समाजाची प्रगति साधणें हें त्याचें उद्दिष्ट असते.

समाजजीवनांत शिक्षकाला अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे ही जाणीव आतां बहुतेक शहाण्या लोकांना झाली आहे. शिक्षणाची उत्तम व्यवस्था करून ती जर नालायक शिक्षकांच्या हातीं दिलीं तर ती फलद्रूप होणार नाहीं. समाजांतील अत्यंत गुणी माणसें शिक्षक पेशांत शिरावीं अशी तळ-मळ आतां सर्वत्र वाटूं लागली आहे. शिक्षकांचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारण्याचा प्रयत्न चालू आहे.

शिक्षणाचें अभ्यासक्रम, बालक व शिक्षक हे तीन मुख्य घटक होत. यापैकीं अभ्यासक्रमाला फाजील महत्त्व देण्याची प्रथा प्रथम अस्तित्वांत आली. नंतर बालकाचा उदो उदो करण्याचा पायंडा सूरू झाला. वर्तमान काळांत शिक्षकाचें महत्त्व पटूं लागल्याचीं चिन्हें दिसत आहेत. शिक्षकावरील भारी जबाबदारी योग्य रीतीनें पार पडावी अशी इच्छा असेल तर त्याच्या अंगीं उत्तम बुद्धिमत्ता असावी, त्याला उत्कृष्ट प्रकारचें विनयन मिळावें, आणि त्याच्या कार्याच्या महत्त्वास साजेल असा आर्थिक व सामाजिक दर्जा त्यास मिळावा. याशिवाय त्यांस नवीन उपक्रम करण्याचें स्वातंत्र्य हवें. असें स्वातंत्र्य शिक्षकास असेल तरच शिक्षकाच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव बालकां-वर पडून बालकाचें व्यक्तिमत्त्व इष्ट रूप धारण करील. व्यक्तीचा व्यक्ती-वर पडणारा प्रभाव हीच व्यक्तिमत्त्वाच्या घडवणुकीची गुरुकिल्ली आहे.

**शिक्षकाची पात्रता**

जीवनाविषयीचा तात्त्विक दृष्टिकोन ठरलेला असेल तरच माणूस आदर्श शिक्षक होऊं शकेल. शिक्षण हें जीवनाचें ध्येय साध्य करण्याचें साधन होय. जीवनाचें ध्येय निश्चित नसेल तर शिक्षक तरूण पिढींचें योग्य मार्गदर्शन करूं शकणार नाहीं. विश्व आणि मानवी जीवन यांविषयीं सुस-वादी तात्त्विक भूमिका शिक्षकाची नसेल तर त्याला शिक्षणाचें जीवनांतील स्थान व अभ्यासक्रमांतील प्रत्येक विषयाचा जीवनाशीं संबंध समर्पकपणें

समजणार नाहीं. तात्त्विक भूमिका नसलेला शिक्षक आपलें काम पोटार्थी वृत्तीनें करील, अध्यापनांत तो आपला जीव ओतणार नाहीं.

शिक्षकाच्या कार्याला विशाल ज्ञानाची पार्श्वभूमी आवश्यक आहे. तरुण पिढीला आपल्या वर्तमान संस्कृतीचे मर्म समजावून देणें, आणि त्या संस्कृतीचें संगोपन व संवर्धन करण्यास तरुण पिढीला प्रवृत्त करणें असें दुहेरी कार्य शिक्षकाला करावयाचें असते. आपल्या संस्कृतीचा उगम व विकास कसा झाला हें ज्ञान शिक्षकाला पाहिजे; तसेंच समाजजीवनाचें रहस्यही शिक्षकाला अवगत हवें. व्यावहारिक जगाशीं शिक्षकाचा मार्मिक परिचय झालेला हवा. म्हणूनच कांहीं विचारवंतांच्या मतें अध्यापनव्यवसायांत भरती करण्याची आजची पद्धत बदलली पाहिजे. आज शिक्षकेच्छू तरुण शाळेंतून अध्यापन विद्यालयांत जातो व तेथून पुन्हां शाळेंत येतो. समाजांतील अर्थकारण व राजकारण यांच्याशी शिक्षकाचा अत्यल्प परिचय असतो. ही कोंडी फोडली पाहिजे. इंग्लंडमध्यें दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतर कांहीं निवृत्त सैनिकांना अध्यापनव्यवसायांत घेतलें. लढाईवर जाण्यापूर्वी या लोकांनीं निरनिराळ्या व्यवसायांत काम केलेलें होतें. शिक्षण कार्यांतील या लोकांचें यश पाहून बहुविध व्यवसायांत काम केलेल्या लोकांची भरती अध्यापनव्यवसायांत करावी असें एक मत प्रचलित होऊं लागलें आहे.

अध्यापनविद्या ज्या शास्त्रांवर आधारलेली आहे त्या शास्त्रांचें अध्ययन शिक्षकानें करणें जरूर होय. ही शास्त्रें म्हणजे जीवशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र व अध्यात्मविद्या हीं होत. समाजशास्त्र व अध्यापनविद्या हीं शास्त्रें शिक्षणाचें उद्दिष्ट ठरवितात व जीवशास्त्र व मानसशास्त्र यांचेकडून विद्यार्थ्यांचा स्वभावविशेष समजतो व ठरलेलें उद्दिष्ट आपणांस ज्या योगें साध्य करतां येईल त्या पद्धतींचें आकलन होतें. या चार शास्त्रांपैकीं मानसशास्त्राचें सखोल अध्ययन शिक्षकानें केलें पाहिजे. इतर तीन शास्त्रांचें आपल्या कामापुरतें जुजबी ज्ञान त्यास असलें तरी पुरेल.

अभ्यासक्रमांतील जो विषय शिक्षक शिकविणार असेल त्याचें त्यास सांगोपांग ज्ञान हवें. वरवरचें किंवा त्रुटित ज्ञान अध्यापकास पुरेसे होत नाहीं. शिक्षकाला विद्यार्थ्यांच्यापेक्षां फक्त थोडें ज्ञान अधिक असलें म्हणजे झालें ही समजूत अधिक्षेपार्ह आहे. जीवनाशीं विषयाचा अनुबंध ध्यानांत येण्या-

साठीं त्या विषयाचें सखोल व परिपूर्ण ज्ञान आवश्यक असतें. तो अनुबंध समजला नसेल तर शिक्षक विद्यार्थ्यांच्या मनांत त्याविषयाविषयीं आपुलकी व उत्साह निर्माण करूं शकणार नाहीं.

अध्यापनविद्येचें सांगोपांग ज्ञान शिक्षकाला हवें. प्लेटो, रूसो, ड्यूई, महात्मा गांधीं इत्यादि महान इतिहासप्रसिद्ध अध्यापकांच्या विचारसरणीचा त्यानें अभ्यास केला पाहिजे. ऐतिहासिक दृष्टचा शिक्षणविषयक विचारांची उत्क्रांति कशी होत गेली तें त्यानें समजून घेतलें पाहिजे.वर्गांत शिकविण्याची प्रक्रिया कशी असावी याविषयींची विचारसूत्रें त्यास अवगत असावीत. शिक्षणाचें व्यवस्थापन व प्रशासन या विषयांचा अभ्यासही त्यानें केलेला असावा. चांगल्या शिक्षकांच्या अध्यापनाचें सुनियोजित निरीक्षण त्यानें करावें. व निष्णात अध्यापकांच्या देखरेखीखालीं व त्यांच्या मार्गदर्शनानुसार वर्गांत पुरेसे प्रत्यक्ष अध्यापन त्यानें करावें.

या ज्ञानविषयक अधिगमाखेरीज अभिनयाची कला व चित्रकला यांत शिक्षकाची गति असावी. शिकवावयाच्या विषयाचें विवरण करण्यांत, व उद्‌बोधक आकृति काढण्यांत कलांचा उपयोग होतो. म्हणून त्याचें अनुष्ठान शिक्षकानें परिश्रमपूर्वक करावें. तसेंच एकाद्या हस्तव्यवसायांत प्रावीण्य असणें हेंही शिक्षकाला उपयुक्त ठरतें. याशिवाय शिक्षकाला मैदानी खेळ खेळतां यावेत व ते खेळ खेळण्याची हौस त्यास असावी. एकदोन खेळ मुलांना शिकविण्याची पात्रता असल्यास अधिकच चांगलें. जो शिक्षक मुलां-बरोबर खेळांत मिसळतो त्याला मुलांचें मन अधिक कळतें व तो अधिक बालकप्रिय होऊं शकतो.

वैयक्तिक प्रभावाला शिक्षणांत महत्त्व असल्यामुळें शरीरसौष्ठव शिक्षकास उपकारक असते. प्रभाव पाडणारी उंची, पिळदार शरीर, नीटस अवयव व सुंदर चेहरा या गुणांमुळें शिक्षकाचें मुलांवर तावडतोब वजन पडू शकते. गोड आवाज असणेंही हितकर होय. अशा तऱ्हेचे शारीरिक गुण असल्यास शिक्षकाचें काम अधिक उठावदार होईल. प्रभावशाली शरीर-यष्टीवाचूनही कांही लोक चांगले शिक्षक होतात यांत शंका नाहीं. परंतु प्रभावशाली शरीरयष्टि असल्यास शिक्षकाचें काम सुकर होतें यांतही शंका नाहीं.

शिक्षकाच्या व्यवसायाला उच्च दर्जाची बुद्धिमत्ता अत्यावश्यक असते. मानसशास्त्रीय संशोधनावरून असे आढळून आलें आहे कीं बहुतेक शिक्षकांचा बुद्धिमानांक १२० च्या आसपास असतो. अध्यापनाची पूर्वतयारी म्हणून ज्या अनेकविध विषयांचा अभ्यास शिक्षकास करावा लागतो त्यांकडे पाहिलें असतां शिक्षकाला सामान्याहून वरचढ बुद्धीमत्ता हवी हा युक्तिवाद ग्राह्य दिसतो. प्रत्यक्ष अध्यापनकार्यांतही जें नियोजन, व्यवस्थापन, व विवरण करावें लागतें तें उच्च दर्जाच्या बुद्धिमत्तेवांचून साधणार नाहीं.

शिक्षकाच्या मानसिक गुणवत्तेपैकीं सर्वांत महत्वाचा विशेष म्हणजे समतोल स्वभाव हा होय. क्रोधिष्ट स्वभावाचा मनुष्य चांगला शिक्षक होणार नाहीं. राग आणणारें वर्तन कितीही वाईट असलें तरी शिक्षकानें केव्हांही क्रोधवश होऊं नये. तसेंच शिक्षक बुजरा वा माणुसघाण्या असून चालणार नाहीं. जो मुलांत सहज व मोकळेपणानें मिसळूं शकेल त्यालाच अध्यापनांत उच्च दर्जाचें यश प्राप्त होईल. बालकांचा विश्वास, स्नेह व आदर संपादन करण्यासाठीं शिक्षकानें मुलांत मिसळलेंच पाहिजे, आणि मुलांच्या मनांत शिक्षकाविषयीं या भावना असतील तरच शिक्षण प्रभावी होईल. आशावृत्ति हाही गुण शिक्षकांत हवा. निराशावादी शिक्षक अध्यापनाचें काम निस्सीम निष्ठेनें करूं शकणार नाहीं.

शिक्षकाचें शील दूषणातीत असावें. पण नुसता अकरणात्मक चांगुलपणा असून भागणार नाहीं. कृतिप्रवणता उत्पन्न करणारे गुण शिक्षकाच्या अंगीं हवेत. मुलांविषयीं उत्साहपूर्ण स्नेहवृत्ति हा त्यांपैकीं सर्वांत महत्त्वाचा गुण होय. मुलांचें प्रेम मिळविण्यासाठीं शिक्षकानें त्यांच्यावर प्रेम केलें पाहिजे. मुलांना शिकविणें हें काम सोपें नव्हे. तें करीत असतांना असे पुष्कळ आणीबाणीचें प्रसंग उद्भवतात कीं ज्यांतून पार होण्याचें एकमेव साधन म्हणजे बालक व शिक्षक यांचें परस्पर प्रेम हें असतें. निःपक्षपाती वृत्ति हाही गुण शिक्षकाच्या अंगीं असावा. शिक्षकाचा सर्वांत गर्ह्य दोष म्हणजे पक्षपात होय. शिक्षकानें कांहीं मुलांवर विशेष मेहेरबानी केल्यास ती तात्काळ मुलांच्या ध्यानांत येते, आणि त्यांचा शिक्षकाविषयींचा आदर व विश्वास डळमळूं लागतो. अशा शिक्षकाच्या हाताखालीं मुलांस सुरक्षितता वाटत नाहीं. म्हणून वर्गांतील सर्व मुलांशीं निःपक्षपाती वृत्तीनें वाग-

ण्याची विशेष खबरदारी शिक्षकानें घ्यावी. याचा अर्थ असा नव्हे कीं एकाद्या मुलानें चांगलें काम केल्यास शिक्षकानें त्याची प्रशंसा करूं नये. पण हुशार मुलांस लाडावून ठेवण्याचा मोह शिक्षकानें टाळला पाहिजे. तसेंच वर्गांतील मंदबुद्धीच्या बालकांस असें वाटूं नये कीं शिक्षक आपणाविषयीं बेफिकीर आहेत.

शिक्षकामध्यें आत्मविश्वास व नम्रता या गुणांचा मधुर समन्वय असावा. आत्मविश्वासावांचून शिक्षक उत्साहानें काम करूं शकणार नाहीं, व त्याचा प्रभाव विद्यार्थ्यांवर पडणार नाहीं. परंतु त्यानें अहंमन्य असूं नये आणि दर्पाचा स्पर्शही स्वतःस होऊं देऊं नये. चाळीस किंवा अधिक मुलांच्या वर्गांत एखाददोन मुलें अशीं असूं शकतात कीं ज्यांची बुद्धिमत्ता त्यांच्या गुरूच्या बुद्धीहून वरचढ आहे. अशा बुद्धिवान मुलांचा अधिक्षेप करण्याचें पातक शिक्षकानें कधींही करूं नये. शिक्षकाचें मन अधिक प्रगल्भ व त्याचा अनुभव अधिक विशाल असला, तरी तरतरीत मुलांच्या बुद्धिचापल्याचा अवमान करणें केव्हांही प्रशस्त ठरणार नाहीं.

इतर सर्व गुणांहून अधिक महत्त्वाचा शिक्षकगुण म्हणजे ध्येयवाद होय. आपण करीत असलेलें कार्य राष्ट्राच्या व मानवजातीच्या कल्याणाचें आहे अशी शिक्षकाची दृढश्रद्धा असावी. शिक्षकाचे जीवन हें सच्चे व सत्प्रवृत्त मानव तयार करण्याची दीक्षा घेतलेलें जीवन असावें. हिरेमाणकांच्या अथवा सुवर्णाच्या खाणींतून जी संपत्ति वेचली जाईल त्यापेक्षां आपण तयार करीत असलेली मानवी संपत्ति अधिक मोलाची आहे असा विश्वास त्यास वाटला पाहिजे. ही श्रद्धा असेल तरच शिक्षकाचें खडतर व आपन्न जीवन तो कंठू शकेल. आजकाल शिक्षकांची स्थिति सुधारण्याचे प्रयत्न चालू असले तरी शिक्षकजीवन म्हणजे पुष्पशय्या नसून कंटकशयनच असतें. दारिद्र्य, अपमान उपेक्षा इत्यादि विपत्तींवर मात करण्याचे सामर्थ्य फक्त ध्येयवादांतच आढळतें. विशेषतः आज भारतांत ध्येयवादी शिक्षकांची फार मोठी गरज आहे; कारण आपल्या शिक्षणाला अंधश्रद्धा, अज्ञान, बेफिकिरी व जात्यंधवृत्ति यांवर विजय मिळवावयाचा आहे.

## बालकेन्द्रित शिक्षणांतील शिक्षकाचें स्थान

परंपरागत शिक्षणाचा मुख्य हेतु ज्ञानदान हा होता. शिक्षकाचें काम वद्यार्थ्यांच्या गळीं ठराविक माहिती उतरविणें एवढेंच असे. विद्यार्थ्यांच्या

आवडीचा विचारच होत नसल्यामुळें मुलांची वृत्ति शिस्तभंग करण्याची असे, व शिक्षकाला आपल्या अधिकाराचा उपयोग करून विद्यार्थ्यांचें नियमन करावें लागे. विद्यार्जनासाठीं बक्षिसांची लालूच व शिक्षांचा धाक दाखवीत असत. मुलांनीं ज्ञानसंचय केला आहे कीं नाहीं याची तपासणी करणें अगत्याचें असल्यानें परीक्षांना फार महत्त्व असे. व शिक्षकांच्या यशाचें मूल्यमापन परीक्षांतील विद्यार्थ्यांच्या यशावरून करीत. अशा रीतीनें शिक्षकाचें काम सुस्पष्ट व यांत्रिक स्वरूपाचें असे. मुलांना अभ्यास करावयास लावण्याची शक्ती हाच शिक्षकाच्या अंगचा सर्वात महत्त्वाचा गुण मानीत.

बालकेन्द्रित शिक्षणपद्धतींत शिक्षकाच्या कार्याचें स्वरूप पार बदलून गेलें आहे. बालकांतील वैयक्तिक भेद शिक्षकाला ध्यानीं घ्यावे लागतात. प्रत्येक बालकाची बुद्धि व आवड यांचा योग्य कयास घेण्यासाठीं शिक्षकाला मानसशास्त्राचें अधिक खोल ज्ञान आवश्यक असतें. मुलांच्या गरजांना व गुणवत्तेला अनुसरून अभ्यासक्रमाची योजना करावयाची असते. म्हणून ठराविक अभ्यासक्रम व ठराविक अध्यापनपद्धति उपयोगी पडत नाहींत. शिक्षकाच्या अंगीं वेगवेगळ्या मुलांसाठीं भिन्न अभ्यासक्रम व विविध पद्धति योजण्याची बुद्धिमत्ता व कौशल्य लागतें. सर्व मुलांचा अधिगम सारखाच होईल अशी अपेक्षा नसते, प्रत्येक बालकास त्याच्या गतीनें प्रगति करण्याची मुभा असते. यामुळें तपासणीचें काम अधिक बिकट होतें. मुलांच्या नियमनासाठीं सत्तेचा उपयोग वर्ज्य समजला जातो, व मुलांच्या मनांत आत्मसंयमाची प्रेरणा निर्माण करावयाची असते. शिक्षकाचें स्वतःचें व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांस स्फूर्ति देऊन त्याच्या शीलास वळण लावील इतकें प्रभावी असावें लागतें. आणि पद्धतीत प्रगती करण्याची जबाबदारी शिक्षक बालकांवर टाकतात. शिक्षकाचे काम प्रगतीसाठीं आवश्यक तो परिसर निर्माण करून बालकाच्या आत्मोन्नतीच्या प्रेरणेस चोदना देण्याचें असतें.

बालकेन्द्रित पद्धतींत शिक्षकाचें कार्य बरेंच अंतर्मुख व म्हणून दुःसाध्य होतें हें उघड आहे. परंपरागत पद्धतींत कोणताही माणूस शिक्षक होऊं शके. परंतु या नवीन पद्धतींत शिक्षक होण्यासाठीं दुर्मिळ असे बुद्धिगुण व शीलगुण लागतात. बालकांच्या विकासशील मनाचें समर्पक ज्ञान आणि त्यांच्याविषयीं सहिष्णु आपुलकी नवशिक्षकाला आवश्यक असतात. नवीन शिक्षणाची योजना

अधिक तपशीलवार व काळजीपूर्वक करावी लागते. शीलसंवर्धन हे नवशिक्षणाचें उद्दिष्ट असल्यामुळें वहि:शाल कार्यक्रम योग्यपणें आखण्याची व पार पाडण्याची जबाबदारी शिक्षकांवर पडते.

नवशिक्षकाला व्यवसायपद्धतीसारख्या विद्यार्थ्यांच्या सांधिक कार्याला वाव देणाऱ्या पद्धति वापराव्या लागतात. वैयक्तिक कार्याला चालना देणाऱ्या डाल्टनपद्धतीसारख्या उपक्रमांचाही त्याला अंगिकार करावा लागतो. कथनपद्धतीला पूरक म्हणून चर्चापद्धतीचा आश्रय करणेंही त्यास आवश्यक असतें. नवशिक्षक हा मुलांना स्वतःच्या प्रयत्नांनीं व एकमेकांच्या साहाय्यानें शिक्षण घेण्यास समर्थ करतो. या नव्या पद्धतींत अत्यंत यशस्वी शिक्षक त्यालाच म्हणतां येईल कीं जो वर्गात अभ्यास चालू असतांना स्वतःचें अस्तित्व कमीत कमी भासवितो. शिक्षणकार्यांत जो अत्यल्प काळांत मुलांना स्वावलंबी बनवितो व स्वतःचें अस्तित्व अनावश्यक ठरवितो तो सर्वश्रेष्ठ शिक्षक होय. अशा रीतीनें शिकविणें हें परंपरागत शिकविण्यापेक्षां फारच कसबाचें व कष्टाचें काम आहे.

म्हणून बालकेंद्रित शिक्षण पद्धतीत शिक्षकांची आवश्यकताच नाहीशी झाली आहे काय, हा प्रश्न उपस्थित होण्याचें कारण नाहीं. शिक्षकाचें काम कमी झालें नसून वाढलें आहे व अधिक जटिल झालें आहे. मॉन्टेसरी पद्धतीच्या बालमंदिरांतही शिक्षक बालविकासाचें कार्य करीत असतो, त्याची भूमिका यंत्र चालविणाऱ्या यांत्रिक कारागिराची नसते. या पद्धतींतील शिक्षणसाधनाची योजना शिक्षकच करतो, व प्रत्येक साधनाचा काय उपयोग करावयाचा तें शिक्षकच ठरवून देतो. त्याचें काम अकरणरूप बध्याचें नसतें. बालकांच्या हालचालींचें तो सहेतुक निरीक्षण करीत असतो. मुलाच्या व्यवसायांत तो अकारण लुडबूड करीत नसला तर मधून मधून योग्य त्या सूचना देत राहतो, आणि ज्या क्षणीं एखाद्या बालकास कांहीं अडचण भासेल त्या क्षणीं त्याच्या साहाय्यास तो धावून जातो. मुलांच्या बौद्धिक व भावनात्मक विकासावर सूक्ष्म नजर ठेवून तो त्या प्रगतीचे आलेख तयार करतो.

बालकेन्द्रित शिक्षणपद्धतींत शिक्षकाला बालक व समाज यांमधील विचारवाहकाचें काम करावयाचें असते. शास्त्रें व कला यांच्या अभ्यासा-

विषयीं आवड मुलांमध्यें निर्माण करून त्यांच्या आकांक्षांना व कार्यशक्तींना योग्य वळण देण्याचे काम त्याचेंच असते. शिवाय शिक्षकापासूनच मुलांनीं नैतिक मूल्यें उचलावीं अशी अपेक्षा असतें. त्याची भूमिका छोटया लोक-राज्यांतील कार्यक्रमाच्या अध्यक्षाची असते. म्हणून त्यास नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्या चोखंदळपणें व कष्ट घेऊन पार पाडाव्या लागतात. शिक्षकाच्या शीलावरून शाळेच्या व पर्यायानें समाजाच्या शीलाचें मान ठरत असतें. सारांश, नवीन पद्धतींत शिक्षकावर पडणारी जबाबदारी अधिक गंभीर असते व त्यास करावयाची कामें अधिक बिकट असतात.

****

१९ :

# अभ्यासक्रम ठरविण्याचीं मूलतत्त्वें

***************************************

शिक्षणाच्या इतिहासाचें अवलोकन केलें असतां असें आढळून येतें कीं अभ्यासक्रमांत विषय समाविष्ट करून घेण्याचें प्रमुख कारण उपयुक्तता हें आहे. प्राचीन भारतांत भिक्षुकवर्ग वेदाध्ययन करी, क्षत्रिय लोक राज्यशास्त्र व युद्धकला यांचा अभ्यास करीत, आणि इतर श्रमजीवि लोक कला व हस्तव्यवसाय यांचें अनुष्ठान करीत. त्या त्या वर्गाला उपयोगी पडणारें शिक्षण देण्याचा प्रघात होता. युरोपांत मध्ययुगांत सरदारांना स्त्रीदाक्षिण्य व युद्धकला यांचे शिक्षण मिळे. धर्मोपदेशकांना तत्त्वज्ञान व धर्मशास्त्र यांचें अध्ययन करावें लागे, व इतर वर्गांतील लोक उपजीविकेचे धंदे शिकत असत.

युरोपमध्यें शाळांच्या अभ्यासक्रमांत ग्रीक व लॅटिन या भाषांचा प्रवेश झाला त्यावेळीं या भाषा धर्मोपदेशकांना व राजकारणी पुरुषांना आपापल्या व्यवसायासाठीं आवश्यक होत्या. कालांतरानें या भाषांची उपयुक्तता कमी झाली. तेव्हां त्यांचें अभ्यासक्रमांतील स्थान कायम ठेवण्यासाठीं ज्ञानसंक्रमण अथवा मनोविनयन या तत्त्वाचा आधार पुढें करण्यांत आला. प्राचीन भाषांचें शिक्षण हें उपयुक्त म्हणूनच सुरू झालें हें तथ्य अनेकांनीं अनेकदां निदर्शनास आणलें आहे. तथापि मनोविनयनाच्या सबबीवर त्यांच्या अध्ययनाचें समर्थन करण्याचा प्रघात अजून चालूच आहे.

वस्तुत: उपयुक्तता हेंच गमक योग्य होय. कारण शिकणाराच्या गरजा व हेतु यांची परिपूर्ति ज्या विषयाच्या अध्ययनानें होत नसेल, तो विषय शिकविला तरी त्यायोगें विनयन घडणारच नाहीं. अभ्यासक्रमाच्या रचनेचें हें आद्य तत्त्व आहे, कीं जो जो विषय शिकवावयाचा तो तो वाल-

काच्या वाढीस व विकसनास साहाय्यकारी झाला पाहिजे. विषयांची निवड करतांना वैयक्तिक भेदांची दखल घेतली पाहिजे ही गोष्ट या तत्त्वावरून स्पष्ट होते. बालकाची बुद्धिमत्ता व विशेष गुण यांना अनुसरूनच त्याचा अभ्यासक्रम ठरविला पाहिजे. जर मुलाच्या अंगीं वाङमयाच्या अध्ययनाची विशेष शक्ती व गणित शिकण्याविषयीं नावड दिसून आली तर त्यास गणिताच्या ऐवजीं वाङमयाचा अधिक अभ्यास करण्याची मुभा मिळावी. तसेंच ज्याला स्वरज्ञान नाहीं त्या मुलावर संगीताचें अध्ययन करण्याची सक्ती करण्यांत अर्थ नाहीं.

याचा अर्थ असा कीं दुय्यम शाळेंत मुलांना अभ्यासाचे विषय निवडण्याचें बरेंच स्वातत्र्य असावें. आपल्या देशांत चालत आलेली फक्त एकाच प्रकारचा अभ्यासक्रम असलेली दुय्यम शिक्षणाची पद्धत ही मुलांच्या कालाचा व शक्तीचा अपव्यय करते. प्राचीन भाषा शिकण्याची कुवत नाहीं, एवढ्याच कारणासाठीं मुलाला शालान्त प्रमाणपत्र देण्याचें नाकारणें व अशा रीतीनें उच्च अध्ययनाची दारें त्याला बंद करणें हा खरोखर जुलूम होय. अशा पद्धतींत पुष्कळ गुणी मुलांवरही नालायकीचा शिक्का बसतो व अनेक बालकांना अकारण वैफल्याचें दुःख भोगावें लागतें.

बालक समाजांतच जगतो व मोठा होतो, म्हणून त्याची सर्वांत निकडीची गरज समाजजीवनाच्या स्वरूपाचें आकलन व्हावें ही असते. म्हणून परिसराच्या वैशिष्ट्यास अनुसरून अभ्यासक्रमांतही बदल झाला पाहिजे, उद्योगप्रधान समाज व कृषिप्रधान समाज या दोहोंतील अभ्यासक्रम भिन्न असावेत. मुंबईसारख्या राजधानींत व एखाद्या चिमुकल्या खेड्यांत तेच विषय शिकविणें उपयुक्त ठरणार नाहीं. म्हणून शाळा व समाजजीवन यांतील अनुबंध साधणें हें अभ्यासक्रमाच्या रचनेचें दुसरें सूत्र आहे. हा अनुबंध साधला तरच प्रौढाच्या व्यवसायाशीं शाळेंतील अभ्यास निगडित राहील व त्यांत जिवंतपणा येईल. ज्ञाननिष्ठ अवास्तवतेपासून शिक्षणाचें रक्षण करण्याचा हाच एक उपाय होय.

अभ्यासक्रमाच्या रचनेचें तिसरें सूत्र लवचिकता हें आहे. समाजजीवन क्रान्तिप्रवण असल्यामुळें अभ्यासक्रमांत वारंवार सुधारणा करणें आवश्यक असते. शिक्षक पेशाचे लोक गतानुगतिकतेबद्दल कुविख्यात आहेत.

कोणताही बदल स्वीकारण्यास ते तयार नसतात. याचें उत्कृष्ट उदाहरण म्हणजे युरोपांत शिक्षकांनीं भौतिक शास्त्रें व स्थानिक भाषा यांचा समावेश अभ्यासक्रमांत करण्यास विरोध केला हें होय. आर्य भाषांच्या अध्ययनाचें इतकें वेड शिक्षकांस लागलें होतें कीं मातृभाषेवर प्रभुत्व मिळविण्याचें मूल्यही कबूल करण्यास ते तयार नव्हते. आणि औद्योगिक क्रान्ति होऊन अर्वाचीन जीवनांतील भौतिक शास्त्रांचें महत्त्व सिद्ध झाल्यानंतरही त्या शास्त्रांचा विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांत प्रवेश होऊं नये असा दुराग्रह शिक्षकांनीं चालू ठेवला. म्हणून असें विनोदानें म्हणतात कीं शाळेंत मुलांकडून जो अभ्यास करून घेतला जातो तो पन्नास वर्षांपूर्वीच्या समाजास अनुरूप असतो. शास्त्रीय शोधांचा व यंत्रांचा जीवनांत जसजसा अधिक उपयोग होत जाईल तसतशी समाजजीवनांतील क्रान्तीची गति वाढेल. म्हणून शिक्षणसंस्थांनीं स्थित्यंतरांशीं सुसंवाद राखण्याची हळुवारता संपादन केली पाहिजे. ज्या प्रांतांत लोक यंत्रांच्या साहाय्यानें सामुदायिक शेती करूं लागले आहेत त्या प्रांतांत वैयक्तिक शेतकामाच्या कालजमा पद्धती शिकविण्यांत हशील काय ?

अभ्यासक्रम ठरविण्याचा निकष शिक्षणाच्या पायरीवर अवलंबून असतो. प्राथमिक शाळेंत शिक्षणाचे उद्दीष्ट असें असतें. (१) ज्ञानार्जनाची साधनें देणें, (२) समाजाच्या संस्कृतीचा परिचय करून देणें, (३) शरीर निरोगी ठेवण्यासाठीं आवश्यक असलेलें ज्ञान देणें, (४) नागरिकत्वाचें शिक्षण देणें. दुय्यम शाळेचें प्रमुख कार्य विद्यार्थ्यांच्या व्यक्तिगत गुणांशीं व आवडीशीं निगडित असते. प्रत्येक मुलाच्या बुद्धिमत्तेचा व उपजत गुणांचा तलास करून तदनुरूप विकासाला वाव देणारा अभ्यासक्रम आंखणें जरूर असतें. म्हणून प्राथमिक शाळांचा अभ्यासक्रम जास्त एकरूप असेल व दुय्यम शाळांचा अभ्यासक्रम मुलांच्या निवडीला भरपूर अवकाश देणारा व म्हणून विविध असेल.

या सर्वसाधारण विवेचनानंतर आतां आपण अभ्यासक्रमाच्या तपशीलाचें विवरण करूं. बालकांच्या गरजा विविध स्वरूपाच्या असतात. शारीरिक, अध्यात्मिक, बौद्धिक, अभिरुचिविषयक, व्यावहारिक व सामाजिक. या सर्व गरजा पुरविण्यासाठीं अभ्यासक्रमांत पुढील विषयांचा समावेश

विभाग

करावा लागेल. शारीरिक शिक्षण, वाङ्मय, भौतिक शास्त्रें, कला व हस्त-व्यवसाय. या सर्व विषयांना अभ्यासक्रमांत स्थान असतें, हें सुविदित आहे. याशिवाय इतिहास व भूगोल या विषयांचाही अभ्यासक्रमांत अन्तर्भाव करतात. कारण, या विषयांच्या अध्ययनानें समाजाच्या अद्यतन संस्कृतीची सिद्धि उत्क्रान्तीच्या प्रक्रियेनें कशी झाली तें कळून येतें. परंतु हे सर्व विषय म्हणजे एकमेकांपासून अलगपणें अधिगत करावयाच्या ज्ञानशाखा आहेत. असें समजणें अयोग्य होईल. कोणत्याही विषयाच्या अध्ययनाचा प्रधान हेतु तद्द्वारा अद्यतन जीवन व जीवनमूल्यें यांची समजूत करून घेण्याचा असतो. इतिहासांवरून वर्तमान राजकीय परिस्थितीचा उलगडा होतो. भूगोला-वरून आपल्या प्राकृतिक परिसराचा आपल्या जीवनाशीं असलेला संबंध कळून येतो, वाङ्मयावरून सामाजिक मूल्यें व ध्येयें यांचें स्पष्टीकरण होतें. आरंभबिंदु सदैव आजची येथली स्थिती हा असावा, आणि निरंतर वर्ध-मान होणाऱ्या कालखंडाचें व भू–भागाचें सिंहावलोकन करीत वर्तमान स्थितीचें सम्यक आकलन करून घ्यावें. सर्व विषयांच्या अध्ययनांत त्यांचा जीवनाशीं अनुबंध स्पष्ट झाला पाहिजे.

अध्यात्मवादाची भूमिका अशी आहे कीं, शालेय अभ्यासक्रमांत मानवी संस्कृतीचें प्रतिबिंब दिसावें. जीवन अधिकाधिक संतोषप्रद व्हावें म्हणून मानवाचा जो अहर्निश खटाटोप चालला आहे, त्याच्या सर्व अंगांचा समा-वेश अभ्यासक्रमांत करावा. प्रकृतीशीं चाललेल्या मानवी संगराची कल्पना येण्यासाठीं भूगोल व भौतिक शास्त्रें, आपल्या बांधवाशीं त्यानें केलेल्या सहयोगाचीं व संघर्षाची समजूत पटण्यासाठीं वाङ्मय व इतिहास, आणि सौन्दर्यनिर्मितीसाठीं त्यानें केलेल्या भावोत्कट साक्षेपाचें ज्ञान होण्यासाठीं कला व हस्तव्यवसाय; या सर्व विषयांचा अंतर्भाव अभ्यासक्रमांत करावा. या विषयांतून मानवाची आत्मबोधासाठीं व अनंताकडे झेप घेण्यासाठीं जी धडपड चालली आहे तिचें आकलन होतें. हाच मानवी जीवनाचा गाभा असून त्याची जाणीव तरूण पिढीस करून दिली पाहिजे असा अध्यात्मवादाचा आग्रह आहे.

याच्या अगदीं उलट दृष्टिकोन प्रकृतिवादाचा आहे. बालकाची आवड व गरज जशी असेल तसा अभ्यासक्रम असावा. बालकाला जे काम द्याव-

याचें त्याचा उद्देश आजचें त्याचें जीवन सफल व समृद्ध व्हावें हा असावा. प्रौढ वयांतील गरजांची तरतूद करणें हा अभ्यासक्रमाचा हेतू नसावा. कोणतेही विषय मुलांनीं शिकलेच पाहिजेत असा आग्रह धरणें चुकीचें आहे. ज्या विषयाविषयीं अभिरुचि वाटेल तो विषय बालकानें शिकावा. सारांश, अभ्यासक्रम हा व्यक्तिविशिष्ट असावा. प्रत्येक बालकाच्या आवडीचें व गरजेचें आकलन झाल्यानंतरच तो ठरेल. पूर्वनियोजित व आवश्यक अभ्यासक्रम ठरवून देणें म्हणजे सांस्कृतिक अत्याचार होय.

उपयुक्ततावादाची भूमिका या दोन टोंकांमधील सुवर्णमध्य साधणारी आहे. बालकाच्या प्रस्तुत आकांक्षा सफल झाल्या पाहिजेत हे खरें; पण त्याचे भावी जीवन अगदीच डोळ्याआड करून चालणार नाहीं. बालकांना आत्माविष्काराची, रचनेची, निर्मितीची, विचारांची देवाण घेवाण करण्याची प्रेरणा उपजत असते. समाजोपयोगी व्यवसायांत म्हणजेच अन्न, वस्त्र व गृह यांच्या उत्पादनांत या प्रेरणांना भरपूर वाव मिळतो. तसा दिल्यास वर्तमान व भविष्य दोन्ही काळांची तरतूद होईल. तसेंच बालकांच्या प्रेरणा विफल होऊं देऊं नयेत हें खरें असलें तरी आपल्या प्रेरणा कोणत्या मार्गांनी पूर्ण कराव्या हें अल्पवयी बालकांना नेहमीच कळणार नाहीं. म्हणून ज्ञानी व अनुभवी प्रौढांनी त्या प्रेरणांच्या कार्यप्रवृत्तीला वळण लावणें इष्ट आहे. सारांश, मुलांची आवड व गरज ध्यानांत घेणारा पण त्याबरोबरच भावी जीवनाची तरतूद करणारा अभ्यासक्रम आंखावा.

## ज्ञान कीं कृति

कांहीं ठराविक विषयांचें ज्ञान मुलांस असणें आवश्यक आहे व म्हणून त्या विषयाचा अभ्यासक्रमांत समावेश करावा असें एका पक्षाचें मत असून दुसऱ्या पक्षाचा आग्रह असा आहे कीं प्राधान्य ज्ञानाला न देतां कृतीला द्यावें. ज्ञानाला प्राधान्य दिलें असतां पुढील अपाय संभवतात असें कृतीच्या पुरस्कर्त्यांचें म्हणणें आहे. ज्ञानावर भर दिला असतां अभ्यासक्रमाचे विषयवार तुकडे पडतात. प्रौढांची मूल्यें बालकांवर लादलीं गेल्यामुळें अभ्यासांत मुलांना हौस व हुरूप वाटत नाहीं. शाळेंत करावयाचा अभ्यास हा शाळेपुरताच उपयोगी, त्याचा जीवनाशीं संबंध नाहीं फक्त परीक्षेशीं आहे असा

समज दृढ होतो. अशा रीतीनें ग्रहण केलेलें ज्ञान व्यक्तीशीं एकरूप होऊं शकत नाहीं, त्यावरून जीवनाच्या साध्याचा बोध होत नाहीं व ज्ञानाविषयीं बेफिकिरीची वृत्ति बळावते.

अभ्यासक्रम कृतिरूप असला कीं मुलांनीं निवडलेल्या व पार पाडलेल्या कार्यांतून ज्ञानार्जन होतें. व्यवसायपद्धतींत अशा तऱ्हेनें अभ्यासक्रम आंखलेला असतो. या पद्धतीच्या पुरस्कर्त्यांचें असें म्हणणें आहे कीं बालकांनींच कृतीची निवड व तिचें मूल्यमापन करावयाचें असल्यामुळें अंगीकृत कार्याविषयीं मुलांना आपलेपणा वाटतो. जीवनाशीं निगडित अशा परिस्थितींत ज्ञानार्जन होत असल्यामुळें बालकाच्या अस्मितेशीं तें तावडतोब एकरूप होतें. समूहाचें साध्य तडीस नेण्यासाठीं सर्व बालकांचें सहकार्य आवश्यक असल्यामुळें सामाजिक जबाबदारी अंगीं बाणते. शिक्षक अधिकाराचा वा दडपणाचा उपयोग करीत नसल्यामुळें विद्यार्थ्यांशी प्रेमाचे संबंध निर्माण होतात. शिवाय कार्य तडीस नेतांना बालकांच्या कलात्मक, रचानात्मक व कल्पक प्रेरणांचा समतोल उपयोग होत असल्यामुळें सर्वांगीण विकास घडून येतो.

उलट कृतिरूप अभ्यासक्रमाचे विरोधक असें प्रतिपादन करतात कीं व्यवसायपद्धतींतील उद्दिष्टाची निवड सामान्यपणें बालक करीत नाहींत. शिक्षक आपली निवड त्यांच्यावर कौशल्यानें लादतो. शिवाय निवडलेलें कार्य व विषयाचा अभ्यास यांचा पुष्कळदा निव्वळ बादरायण संबंध असतो. आणि अशा पद्धतीनें ज्ञानार्जन झालें तर त्या ज्ञानांत महत्त्वाच्या उणीवा राहून जातात. जीवनांत यशस्वी होण्यासाठीं केवळ प्रासंगिक अनुभवानें मिळविलेलें ज्ञान पुरें पडत नाहीं, पद्धतशीर अभ्यास करून ज्ञान संपादावें लागतें अशा तऱ्हेच्या पद्धतशीर अभ्यासाची कांहींच तरतूद कृतिरूप अभ्यासक्रमांत आढळत नाहीं.

अभ्यासक्रम विषयनिष्ठ असावा या मताचे प्रतिपादक असा दावा मांडतात कीं विषयांची निवड त्यांच्या सामाजिक उपयुक्ततेमुळेंच केलेली असते. यशस्वी जीवनासाठीं आवश्यक वाटणारीं ध्येयें, व कसबें, माहिती व संवयी या विषयांच्या अभ्यासांतून सिद्ध होतात. जर अशा उपयुक्त विषयांचें अध्ययन नीरस वाटत असेल तर तो दोष विषयांचा नसून अध्यापन-

पद्धतीचा होय. शिवाय या विषयांत जी तर्कशुद्धता अंगभूत आहे तीमुळें अध्यापनाच्या कार्याला सुरळीत दिशा मिळते. अभ्यासाचे विषय मुलांपुढें निश्चित स्वरूपाचें साध्य उभें करतात, व त्यामुळें बालकांना स्वतःच्या यशापयशाचें मूल्यमापन स्वतःच करतां येतें. आणि विषयांच्या अभ्यासांच्या रूपानें बालकांच्या आकांक्षांना सर्वसंमत व बहुमोल वळण मिळतें.

दोन्हीं पक्षांच्या युक्तिवादांत तथ्यांश आहे तथापि आज या वादाला विशेष महत्त्व उरलें नाहीं. अध्यापनकार्यांत शिक्षकाची वृत्ति व शिकविण्याची हातोटी याच गोष्टी महत्त्वाच्या असतात. अभ्यासक्रम कशा स्वरूपाचा आहे याला महत्त्व कमी, हें तत्त्व आतां मान्य झालें आहे. कृतिरूप अभ्यासक्रम असला तरी ज्ञानार्जन हा त्याचा हेतु असतो; आणि विषयनिष्ठ अभ्यासक्रम असला तरी विषयाचा अभ्यास जीवनकार्याशीं निगडीत असावा लागतो. या वादाविषयीं आणखी एक समंजस मत असें आहे कीं किशोरांच्या अध्यापनांत कृतिरूप अभ्यासक्रम योजणें हितावह असून कुमारांच्या अध्यापनांत विषयनिष्ठ अभ्यासक्रमाची उपयुक्तता अधिक आढळते.

## विषयांचा अनुबंध

दुय्यम शाळांमधून विषयनिष्ठता वाढत आहे, प्रत्येक शिक्षक असें म्हणतो कीं मी फक्त हाच विषय शिकविणार, कारण याचाच मी विशेष अभ्यास केला आहे. शिक्षक व विषय अशा रीतीनें परस्परांशी बद्ध झाले कीं विषयांविषयीं अभिनिवेश वाढतो व इतर विषयांविषयीं तुच्छता वाटूं लागते. मग आपल्याच विषयाचा अभ्यास मुलांनीं अधिक करावा, इतर विषयांकडे दुर्लक्ष केलें तरीं चालेल अशी वृत्ति निर्माण होते. आणखी एक परिणाम असा होतो कीं हा विषय जीवनाशीं कसा संबद्ध आहे त्याची जीवनांत कोणती उपयुक्तता आहे या अंगाकडे दुर्लक्ष होऊन विषयाच्या तात्त्विक अभ्यासावर भर दिला जातो, व त्यामुळे मुलांमध्यें घोकंपट्टी करण्याची संवय वाढीस लागते. बालक हे वर्धिष्णु जीव आहेत. या गोष्टीचा विसर पडून त्यास अभ्यास करणारीं यंत्रें मानण्याचा सराव होतो. तसेंच विषयनिष्ठतेमुळें शिक्षकांमध्यें चढाओढ व मत्सर प्रादुर्भुत होतात. या सर्व अनिष्टांचा परिहार व्हावा म्हणून 'विषयांचा अनुबंध साधा' हें सूत्र मांडण्यांत आलें आहे.

शिक्षकांनीं आपल्या विषयाला प्राधान्य देऊं नये, मुलांच्या विकासाला द्यावें, व मुलांचा विकास घडावा या हेतूनें सर्वांनीं एकोप्यानें काम करावें. एकाच वर्गाला निरनिराळे विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनीं वारंवार एकत्र यावें, व मुलांची विविध विषयांत कितपत प्रगति होत आहे याविषयीं विचारविनिमय करावा तसेंच इतर विषयांत किती अभ्यास संपला आहे व कोणता चालू आहे याची माहिती प्रत्येक शिक्षकास असावी. या माहितीचा उपयोग त्याला स्वतःच्या अध्यापनांत होईल. वर्गांत नुकत्याच पूर्ण झालेल्या इतिहासाच्या व भूगोलाच्या भागांतून भाषाशिक्षक लेखनासाठीं विषय निवडू शकेल, तसेंच कांहीं विषयांमध्यें परस्पर संबंध बराच असतो. उदा. इतिहास व भूगोल, गणित व शास्त्र, इतिहास व वाङ्मय हे विषय एकमेकांशीं निगडित आहेत. शिक्षकानें अध्यापनांत हे परस्पर संबंध साक्षेपानें मुलांच्या नजरेस आणले पाहिजेत.

पण हा अनुबंधाविषयीं वरवरचा विचार झाला. अनुबंधाचा खरा अर्थ असा आहे कीं सर्व ज्ञान हें विद्यार्थ्यांच्या जीवनाशीं निगडित असावें. निरनिराळ्या विषयांचा अनुबंध साधणें हें उद्दिष्ट नसून बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची एकरूपता साधणें हें आहे. जो जो विषय बालक शिकेल त्या त्या विषयांमधून बालकाच्या जीवनास उज्वलता व समृद्धता आली पाहिजे. आरोग्यशास्त्राच्या अभ्यासामुळें त्याचें जीवन निर्मळ व निरामय व्हावें, व इतिहासाच्या अध्ययनामुळें जीवनासाठीं उदात्त ध्येय त्याला मिळावें. सारांश, विषय हे दुय्यम असून बालकाच्या व्यक्तिमत्त्वाची घडण हे आद्य उद्दिष्ट आहे हें तत्त्व शिक्षकानें केव्हांही नजरेआड होऊं देऊं नये.

**अभ्यासक्रम व बहिःशाल कार्यक्रम**

अभ्यासाचे विषय व बहिःशाल कार्यक्रम यांमध्यें दुजा भाव ठेवणें ही गोष्ट आतां कालजमा झाली आहे. ज्यावेळीं ज्ञानार्जन हेंच शिक्षणाचें एकमेव उद्दिष्ट मानीत त्या वेळीं असा दुजा भाव असणें साहजिक होतें. त्या परिस्थितींत विषयांच्या अभ्यासाला प्राधान्य देत. कारण विषयाविषयीं मिळविलेल्या ज्ञानाचेंच मूल्यमापन परीक्षांतून होई. अर्थातच बहिःशाल कार्यक्रम केवळ अलंकारस्वरूप असे. नवीन विचारांना नाखुषीनें दिलेली

ती एक सवलत होती. बहिःशाल कार्यक्रमांना सापत्नभावानें वागविण्यांत येई, व ते कार्यक्रम पार पाडणाऱ्या शिक्षकांना महत्त्व नसे.

अलीकडील काळांत लंबक उलट दिशेला झुकलेला आहे. मुख्याध्यापक अशी तक्रार करीत असतात कीं बहिःशाल कार्यक्रमांतच मुलांचा एवढा वेळ खर्च होतो कीं त्यांना अभ्यासाला वेळच उरत नाहीं. या तक्रारीवरून असें दिसतें कीं सर्व शालेय कार्यक्रमाचें जे एकमेव उद्दिष्ट–विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण–त्याचें नीटसें आकलन शालाप्रमुखांना झालेलें नाहीं. शाळेंत बौद्धिक विषयांचा जो अभ्यास करावयाचा तो माहिती मिळावी म्हणून नसून त्यांतून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा म्हणून असतो. शाळेंत होणारीं नाटकें, जलसे, मैदानी खेळ यांचाही तोच हेतु असतो. सर्वच कार्यक्रमांच्या द्वारा बालकाला आत्मज्ञान व्हावें, त्याचा आत्मविश्वास वाढावा, व त्याला आत्मसंयमाची संवय लागावी हा हेतु असतो. प्रत्येक कार्यक्रमांतून विनयनाचें जेवढें माप पदरांत पडेल तेवढा वेळ व तेवढें महत्त्व त्यास दिलें पाहिजे. बहिःशाल कार्यक्रमांत मुलांचे विशेष गुण प्रगट होतात, त्यांना परस्परांच्या स्वभावाचें ज्ञान होते, सहकार्याची संवय लागते, व बालकांचें शीलसंवर्धन होतें. म्हणून शाळेमध्यें त्यांना योग्य वाव देणें इष्ट व आवश्यक आहे. वस्तुतः व्यक्तिनिष्ट बौद्धिक अभ्यास व समूहनिष्ट सांस्कृतिक कार्यक्रम यांमध्यें हेवादेवा असण्याचें कारण नाही. भावी नागरिकांच्या घडवणुकींत दोहोंचा भाग असतो. या दोन कार्यक्रमांतील दुजा भाव त्याज्य होय; व शाळेचा जो विनयनात्मक प्रभाव बालकांवर पडावा असें आपण इच्छितो त्याचीं ही दोन परस्पर पूरक अंगें आहेत हा विचारच अधिक ग्राह्य होय.

REFBK-0011492
दि.
ग्रं. क्र. ९१८५२

# कांहीं पारिभाषिक शब्द

## प्रकरण पहिलें

| | |
|---|---|
| जीवशास्त्र | Biology |
| जीव | Organism |
| परिसर | Environment |
| स्वायत्त | Autonomous |
| समायोजन | Adjustment |
| औपचारिक | Formal |
| संस्कारस्वास्थ्य | (School) tone |
| चेतक | Stimulus |

## प्रकरण दुसरें

| | |
|---|---|
| अध्यात्मविद्या | Metaphysics |
| प्रकृतिवाद | Naturalism |
| भौतिकवाद | Materialism |
| यथार्थवाद | Positivism |
| जीवशास्त्रीय प्रकृतिवाद | Biological Naturalism |
| अध्यात्मवाद | Idealism |
| उपयुक्ततावाद | Pragmatism |
| दर्शन | School of philosophy |
| व्यवसायपद्धति | Project method |
| उपक्रमशीलता | Initiative |
| वास्तववाद | Realism |

## प्रकरण तिसरें

| | |
|---|---|
| अंशात्मक मापन | Quantitative measurement |

## प्रकरण चौथें

| | |
|---|---|
| परिपक्वता | Maturation |
| कुलपद्धति | House system |
| सविमर्श क्रिया | Deliberate action |
| सहजप्रवृत्त | Instinctive |
| उन्नतमुख अंगस्थिति | Erect posture |
| अधिगम | Achievement |

## प्रकरण पांचवें

| | |
|---|---|
| व्यक्तिमत्त्व | Individuality |
| आवहन | Contribution |
| अनुरोध | Conformity |
| असंवेय | Irreconciliable |

## प्रकरण सहावें

| | |
|---|---|
| लालित्य | Grace |
| सहजप्रवृत्ति | Instincts |
| स्वभावविशेष | Temperament |
| अप्रतिरूपता | Uniqueness |

## प्रकरण सातवें

| | |
|---|---|
| (स्वभावांतील) प्रसन्नता | Graceful disposition |
| शोषण | Exploitation |
| स्थिरवृत्ति | Sentiment |
| गुणानुक्रमें व्यवस्थापन | Hierarchical organization |
| अहंवृत्ति | Self Sentiment |
| निग्रहशक्ति | Will |
| लाचारी | Servility |
| स्थिरवृत्तींचा सोपान | Hierarchy of Sentiments |

## प्रकरण आठवें

| | |
|---|---|
| संस्कृति | Culture |

**प्रकरण नववें**

निष्कृति — Compensation

**प्रकरण दहावें**

उद्दिष्टें — Aims
ध्येयें — Ideals
अध्यात्मविद्या — Spiritual–lore
आत्माविष्कार — Self-realisation
अंतेवासी पद्धति — Residential System

**प्रकरण अकरावें**

सुरक्षितता — Security
गौरव — Recognition
सुसंगत — Consistent
संक्षिप्त व आदर्श स्वरूप — Idealized epitome

**प्रकरण बारावें**

राष्ट्रवाद — Nationalism
आंतरराष्ट्रीयता — Internationalism
बहि:शाल — Extra Curricular
संयुक्त राष्ट्र संघटना — United nations Organization

**प्रकरण तेरावें**

फुरसद — Leisure
आत्माविष्कार — Self expression
परप्रतीत — Vicarious
सृजनात्मक — Creative
छंद — Hobby

**प्रकरण चौदावें**

व्यवसाय — Vocation
बहुशाखी — Multipurpose

**प्रकरण पंधरावें**

नागरिकत्व — Citizenship
हुकूमशाही — Dictatorship
मतपरिवर्तन — Persuasion

**प्रकरण सोळावें**

सांस्कृतिक — Liberal
साहित्यशास्त्र — Rhetoric
सर्वसाधारण शिक्षण — General Education

**प्रकरण सतरावें**

गृहीतकृत्य — Data

**प्रकरण अठरावें**

समाजाचा शिल्पकार — Social engineer
अभ्यासक्रम — Curriculum
व्यवस्थापन — Organization
समतोल स्वभाव — Balanced temperatment
बालकेंद्रित — Child centered
प्रशासन — Administration

**प्रकरण एकोणिसावें**

उपयुक्तता — Utility
मनोविनयन — Formal discipline
ज्ञाननिष्ठ अवास्तवता — Academic unreality
कृतिरूप अभ्यासक्रम — Activity approach to curriculum
ज्ञाननिष्ठ अभ्यासक्रम — Subject approach to curriculum
विषयनिष्ठता — Specialisation
विषयांचा अनुबंध — Correlation of studies

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ४ | १ | कर | करतात |
| ८ | ५ | सुबोधपणें | सबोधपणें |
| ९ | १८ | पृथक्करणातील | पृथक्करणातीर्त |
| १५ | ८ | बुद्धीच्या बालकांना | बुद्धीच्या प्रौढांनी बालकांना |
| २९ | १६ | निसर्गानें | निसर्ग |
| ३१ | १० | इष्टता | दृढता |
| ३१ | १७ | विभक्ताची उणीव | विभक्तत्वाची जाणीव |
| ४३ | १६ | आत्मविश्वासाला | आत्मविकासाला |
| ४८ | २३ | समाज व | समाजहितपर व |
| ५२ | १७ | देशप्राप्तीसाठीं | देशहितासाठीं |
| ६३ | १२ | उन्हाळ्यांत | हिवाळ्यांत |
| ९२ | १४ | आनं | आनंद |
| ९५ | १८ | कालातून | कलांतून |
| ९५ | २६ | बांधवांची | बांधवाशीं |
| ९८ | २३ | काढण्यास | काढण्याची, |
| १०७ | १४ | संवृत्याधिक्यामुळें | संख्याधिक्यामुळें |
| १०९ | ५ | मनास | मतास |

****

संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा